म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ...इ.हांडी...
सं. क्र. 3868

परचुरे



REFBK-0026622

ग्रंथसंगती

गोविंद तळवलकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

19 AUG 1992

2 SEP 1992

9 SEP 1992

26 SEP 1992

12 OCT 1992

21 OCT 1992

31 OCT 1992

19 DEC 1992

3 JAN 1993

20 FEB 1993

16 OCT 1993

13 NOV 1993

19 OCT 1994

12 NOV 1994

(ड. मा. पहा)
२०००-१२-८८


ग्रंथिसंगती

ग्रंथसंगती

संदर्भ
निबंध
३४७४
२६६२२
टाळलेर

गोविंद तळवलकर



REFBK-0026622

परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई-४०० ००४.

प्रकाशक :
सौ. शुभदा विष्णू परचुरे
परचुरे प्रकाशन मन्दिर,
२०३/४, मेहता भवन,
३११, राजा राममोहन रॉय मार्ग,
गिरगाव, मुंबई-४.

आवृत्ती : फेब्रुवारी १९९२

© गोविंद तळवलकर

मुखपृष्ठ : मोहन वाघ/कमल शेडगे

मुद्रक : अरुण नाईक
अक्षर प्रतिरूप प्रा. लि.,
इंडिया प्रिंटिंग हाऊस,
आंबेकर मार्ग, वडाळा,
मुंबई-४०० ०३१.

लेझरजुळणी
अक्षय फोटोटाइपसेटर्स,
'कुलदीपक' सुभाष पथ,
ठाणे-४०० ६०१.

मूल्य : ८५ रुपये

ग्रंथसंगती

गोविंद तळवलकर

प्रास्ताविक

इंग्रजीत अनेक विषयांवर उत्तमोत्तम पुस्तके प्रसिद्ध होत असतात. त्यात काही समकालीन प्रश्नांसंबंधी असतात तर काही नित्याच्या विषयासंबंधी. त्याचा परिचय वाचकांना करून द्यावा या उद्देशाने 'महाराष्ट्र टाइम्स' मध्ये मी एक सदर काही वर्षांपूर्वी सुरू केले व ते सातत्याने चालू आहे. त्यास चांगला प्रतिसाद मिळतो.

या सदरात मी परिचय करून दिलेल्या ग्रंथांची संख्या बरीच आहे. हे ग्रंथ आपणहून माझ्याकडे आले असे म्हणता येत नाही. ते धुंडाळून मिळविले आहेत. 'प्रेम लाभे प्रेमळाला' याप्रमाणे शोधले की ग्रंथप्रेमीस ग्रंथ मिळतात. हा शोध देशात व परदेशातही घेतला गेला आहे.

संग्रहातील लेख एकत्रित करण्याच्या व त्यांची बाकीची उस्तवारी करण्याच्या कामी माझी कन्या डॉ. निरूपमा आणि सुषमा यांचा उपयोग झाला. श्री परचुरे यांनी हा संग्रह आत्मीयतेने प्रकाशित केला याबद्दल त्यांचे आभार.

– गोविंद तळवलकर

१५, राम महाल
दिनशा वाच्छा रस्ता
चर्चगेट, मुंबई-४०० ०२०.

अनुक्रमणिका

1 भारताचा आर्थिक इतिहास / ७
2 नामदार गोखले / १२
3 सामाजिक प्रबोधन / १८
4 सामाजिक सुधारणा / २२
5 उदारमतवादाची वाटचाल / २७
6 राजा राममोहन रॉय / ३०
7 महात्मा फुले यांचे कार्य / ३४
8 रॉय यांचे विचार / ३७
9 दहशतवादापासून नव-मानवतावादापर्यंत / ४०
10 सामान्यांच्या प्रतिक्रिया / ४५
11 ब्रिटिश राजवटीचा उल्लेखनीय अभ्यास / ४८
12 काँग्रेस व ब्रिटिश सरकार / ५०
13 सौहार्द व मतभेद / ५३
14 मतभेद व एकजूट / ६१
15 स्वातंत्र्याचा उष:काल / ६६
16 राष्ट्रपतीपदाचा वाद / ७०
17 नेहरूंचा अखेरचा काळ / ७३
18 पाकिस्तानातील बजबजपुरी / ७७
19 अमृतसर / ८३
20 परराष्ट्र सचिवाच्या आठवणी / ९१
21 ब्रिटनचा अध:पात / ९५
22 शेती व औद्योगिक क्रांती / ९८
23 शेतकऱ्यांचे प्रश्न / १००
24 इंग्रजांचा इतिहास / १०३
25 युद्धपूर्व इंग्लंड / १०६
26 ब्रिटिश मजूर पक्ष / १०९
27 केंब्रिज मुद्रणालय / ११३
28 डिकन्स व प्रकाशक / ११६
29 हॅरॉल्ड मॅकमिलन / ११९
30 दूरचित्रवाणी व राजकारण / १२२

३१ संपादकाचे अनुभव / १२८
३२ आस्वादक समीक्षा / १३१
३३ गाल्ब्रेथ यांचा लेखसंग्रह / १३४
३४ आधुनिक जगाचा इतिहास / १३७
३५ जपानची घोडदौड / १४०
३६ अविकसित देश / १४३
३७ अमेरिकेपुढील मूलभूत प्रश्न / १४६
३८ कलकत्ता / १५१
३९ नेत्यांची व्यक्तिचित्रे / १५४
४० चीनवर प्रकाशझोत / १५६
४१ चिनी प्रचारयंत्रणा / १६२
४२ सांस्कृतिक क्रांती / १६४
४३ सांस्कृतिक क्रांतीची पूर्वपीठिका / १६८
४४ रशियन लेखकाची रोजनिशी / १७२
४५ प. युरोपातील कम्युनिस्ट / १७५
४६ रशियाची दीडशे वर्षे / १८०
४७ रशिया व भारत / १८५
४८ रशियातील समाजजीवन / १८९
४९ स्टालिनशाहीतील हत्याकांड / १९३
५० इतिहासाचा निर्णय / १९८
५१ भयानक पर्वाचा इतिहास / २०३
५२ क्रुश्चॉव यांचे ऐतिहासिक कार्य / २०६
५३ क्रुश्चॉव यांच्या आठवणी / २०८
५४ रशियानांच्या दुःखाची व्होल्गा / २१३
५५ एक क्रांतिकारी पुस्तक / २१७
५६ मार्क्सवादी विचारांचा कोश / २२०
ग्रंथसूची / २२३



भारताचा आर्थिक इतिहास

केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस व नॅशनल बुक ट्रस्ट यांचे अभिनंदन करावयास हवे. नॅशनल बुक ट्रस्टच्या वतीने ओरिएंट लॉंगमन्सने केंब्रिज विद्यापीठाने तयार केलेला भारताचा आर्थिक इतिहास दोन खंडांत व अवघ्या शंभर रुपयांत प्रसिद्ध केला आहे. दोन्ही खंडांची मिळून सोळाशे पाने आहेत. पहिला खंड इ.स. १२०० ते १७५० व दुसरा १७५७ ते १९७० एवढ्या कालखंडाचा आढावा घेतो. एक गोष्ट ठळकपणे जाणवते की, पहिला खंड जेवढा विश्लेषणात्मक आहे तितका दुसरा नाही. दुसऱ्यात भरपूर माहिती आहे. काही तज्ज्ञांच्या मते अधिक माहिती देता आली असती. पण दुसऱ्या खंडात माहिती देताना शिस्त कमी आहे. शिवाय दोन्ही खंडांत निरनिराळ्या तज्ज्ञांचे प्रबंध आहेत. त्यांचे संपादन – विशेषत: दुसऱ्याचे – अधिक काटेकोरपणे झाले असते तर द्विरुक्तीचा दोष टळला असता. संपादकांनी कालक्रमाप्रमाणे लेखन स्वीकारण्याऐवजी विषय आणि विभागवार निबंध घेतले आहेत. त्यामुळेही काही मुद्दे व माहिती याची पुनरावृत्ती झाली आहे. पहिला खंड अर्थातच सरस आहे. असे जरी असले तरी गेल्या आठशे वर्षांचा आर्थिक इतिहास एकत्रित मिळणे, हे अभ्यासकांना सोयीचे आहे. आपल्याकडे कागदोपत्री पुरावे, ऐतिहासिक कागदपत्रे यांचे जतन फारसे होत नव्हते. त्यामुळे मध्ययुगीन भारताचा आर्थिक इतिहास सुसंगतपणे लिहिणे हे महाकठीण. संपादकांनी त्यात यश मिळवले आहे.

बर्नियरला मध्ययुगीन भारतात शहरे ही केवळ हंगामी वस्त्या होत्या असे वाटत होते. पण तशा त्या वस्त्या नव्हत्या, स्थिर स्वरूपाची शहरेच होती हे येथे दाखवून देण्यात आले आहे. व्यापारी मार्ग बदलत गेले आहेत. तसेच काही शहरांचे वैभव कायम टिकलेले नाही. चौदाव्या शतकात लाहोर हे उध्वस्त शहर होते,. तर मुलतान भरभराटीला आले होते. सतराव्या शतकाच्या सुमारास लाहोर पुन्हा भरभराटले. सतराव्या शतकात खंबायतच्या ऐवजी सुरतेचा विकास झाला.

दक्षिण भारतात व्यापार बराच होत होता. चिनी कागदपत्रात कांजीवरमचा उल्लेख १४ व्या शतकातही केलेला आहे. मलबारचा किनारा हा सागरी वाहतूक व व्यापार यांनी गजबजलेला असे. ग्रीक व रोमन व्यापारी दोन हजार वर्षांपूर्वी मलबारच्या किनाऱ्यावर येत. ख्रिस्ती शतकाच्या प्रारंभापासून तेराव्या शतकापर्यंतच्या व्यापाराचा विचार केला तर एक घटक लक्षात येतो. तो हा की, नवव्या शतकापासून दक्षिण भारतात, विशेषत: मलबार भागात, असलेले मुस्लिम व्यापाऱ्यांचे प्राबल्य. सागरी व्यापारावर त्यांचे वर्चस्व स्थापन

झाले होते. काही फिरत्या व्यापाऱ्यांनी संघ स्थापन केले होते. युरोपात गुलामांची जी पद्धती होती तशीच ती येथे होती असा पुरावा नाही. जमीनमालक शेतमजुरांना वेठीला धरीत, पण गुलामगिरीची संस्था होती व ती राजसत्तेने मान्य केली होती असे नव्हे; वेठबिगारी अर्थातच होती.

तेराव्या शतकात दक्षिणेमध्ये शहरांचा उदय झाला. याचा अर्थ व्यापार अधिकच वाढला असे नव्हे. पण या शहरात व त्याच्या आसपासच्या भागात अनेक वस्तूंचे उत्पादन वाढले. याच काळात मोठमोठी मंदिरे बांधली जाऊ लागली. या मंदिरांच्या उभारणीमुळे व्यापारी व कारागीर यांना प्रोत्साहन मिळाले. दहाव्या शतकापर्यंत पालस, प्रतिहार व राष्ट्रकूट या घराण्यांचा वर्चस्वस्थापनेचा प्रयत्न होता व त्यात त्यांचा संघर्षही होई. चौदाव्या शतकात कालव्यांची हळूहळू वाढ होऊ लागली. शेतीसाठी कालवे बांधण्याचे श्रेय पहिल्याप्रथम कोणाकडे जात असेल तर ते घ्यासीउद्दिन तुघलक याच्याकडे. सोळाव्या शतकात विहिरीवर मोट बांधून शेतीला पाणी सोडल्याचे उल्लेख बाबराने केलेले आहेत. तेराव्या शतकात पंचवीस प्रकारची धान्ये व इतर उत्पादन शेतीतून निघत होते. मका, बटाटे, शेंगदाणे, मिरची, टोमॅटो, तंबाखू यांचे उत्पादन होऊ लागले. फळांच्या उत्पादनाबाबत इबन बलुताने दिलेली माहिती अधिक व्यापक आहे. आंबा हा लोकप्रिय व महाग होता. कलम करण्याच्या प्रक्रियेचा मात्र उल्लेख नाही. द्राक्षे दिल्लीच्या जवळ क्वचित होत. महंमद तुघलकानंतर फिरूज तुघलक आला. त्याने दिल्लीच्या जवळ द्राक्षांच्या बाराशे बागा उभ्या केल्या. द्राक्षे इतकी आली की किंमती कोसळल्या.

साधा शेतकारी हा मालक नव्हता. खोत, जहागीरदार वगैरे मालक असत. पण सर्व खोत श्रीमंत होते असे नव्हे. चौदाव्या शतकाच्या सुमारास जुनी मातब्बर घराणी नष्ट होऊन नवी पुढे आली. अलाउद्दिन खिलजीने उत्तर भारताच्या बऱ्याच मोठ्या भागावर समान स्वरूपाचा शेतसारा बसविला. महंमद तुघलकाच्या काळात उत्तरेप्रमाणे माळवा, दक्षिण व गुजरात अशा मोठ्या साम्राज्यात एकसाची सारापद्धती आली. पण यामुळे शेतकऱ्यांचे दिल्लीच्या आसपास उठाव झाले. याचमुळे दुष्काळही पडला व सुलतानास लोकांना कर्जे द्यावी लागली. तकावीची ही सुरुवात होती. लोदींच्या कारकीर्दीत पैशाऐवजी धान्याच्या रूपाने कर भरण्याची पद्धती आली. सुलतान सर्व भागातील कर वसूल करीत नसे. त्यासाठी मग जहागीरदार, विभागीय अधिकारी यांचा उपयोग होई. अलाउद्दिनचा एक मंत्री शफी कार याने परवान्यांच्या हिशेबांची तपासणी करण्याची पद्धती आणली.

चांगल्या प्रतीचे लोखंड व तांबे यांच्या खाणी चालू होत्या. पण भारत ही सुवर्णभूमी होती व सोन्याचा धूर निघत होता या कल्पनेला वस्तुस्थितीचा आधार दिसत नाही.

कारण सोने व चांदी यांच्या खाणी अगदीच थोड्या व त्यातूनही उत्पादन बेताचे होते. तथापि सोन्याबद्दल येथे आवड फार. यामुळे येथील माल परदेशात जाऊन मोठ्या प्रमाणावर सोन्याची आयात होत असे. हिरे-माणकांचीही अशीच आयात होई. तुतिकोरिनच्या समुद्रात मोती काढले जात. तसा उल्लेख मार्कोपोलोने केला आहे. कापूस उत्पादनाचे उल्लेख १४ व्या शतकात आहेत. पण अकरा व बाराव्या शतकात पिंजाऱ्यांचा उल्लेख असल्याने कापूस याही वेळी वा त्याअगोदर निश्चत असणार. इराण व अफगाणिस्तानातून कच्चे रेशीम आणून येथे रेशमी कापड बनविले जात होते. या कापडधंद्यावरून अनेक प्रकारची कारागिरी होती हे स्पष्ट होते. कापडाचे रंगकाम कसे होते त्याविषयी दस्तऐवजी माहिती नाही.

शहरातील रोजगारीचे आणखी एक साधन म्हणजे बांधकाम. तेराव्या शतकापूर्वी कागद वापरला जात असल्याचा पुरावा नाही. पुढे मोगल काळात रस्ते बांधले गेले आणि त्यामुळे व्यापार वाढला. घोरींच्या आक्रमणापासून गुलामांचा व्यापार सुरू झाला. फिरूज तुघलकने गुलामांची निर्यात बंद केली.

दक्षिणेत विजयनगरचे साम्राज्य भरभराटले होते. १३०० ते १७०० या काळात दक्षिणेत दोन हजार देवालये बांधली गेली. विजयनगरच्या साम्राज्यात ब्राह्मणांचे प्रभुत्व होते आणि सैन्यातही त्यांचाच वरचष्मा होता. भारतात अरबस्तानातून घोड्यांची आयात होत होती. नौकानयन मोठ्या प्रमाणावर होते तेव्हा त्या अनुषंगाने अनेक प्रकारच्या कौशल्याचा प्रसार झाला. त्या काळात लोकसंख्येचे प्रमाण काय होते, निरनिराळ्या भागात ते किती होते याचा बराच तपशील देण्यात आला आहे.

मोगल काळापासून अवाढव्य खर्च राजसत्ता करू लागली. स्वारीवर जावयाचे तरी बाजारबुणग्यांचे प्रमाण अतोनात असे. लेखक सांगतात की मोगल जमीन महसुलाची वा कर-आकारणीची पद्धती पाहिल्यास ज्यांच्यापाशी अगदी थोडे आहे त्यांच्यावर अधिक भार घालण्याचे उद्दिष्ट दिसते. अर्थात दडपशाही व पिळवणूक एवढीच वैशिष्ट्ये होती असे नव्हे. शेतकऱ्यांच्या हिताच्याही काही गोष्टी केल्या जात. अगदी औरंगजेबालाही रयतेला संरक्षण न दिल्याबद्दल खंत वाटली होती. मोगल काळाबद्दल बराच तपशील ग्रंथात आहे व त्याकरिता फारसी, अरबी ग्रंथांचा, कागदपत्रांचा मोठा उपयोग करण्यात आला आहे आणि एक निष्कर्ष असा काढला आहे की, मोगलांनी शिलकी संपत्ती ताब्यात घेण्यात निर्घृणपणा दाखविला. पण त्याचबरोबर दीर्घकाळ व मोठ्या प्रदेशात शांतता आणली. तथापि मोगलांचे ठिकठिकाणचे अधिकारी किती व कशाप्रकारे प्रजेला लुटत हेही तपशीलाने दिले आहे. यात शाहिस्तेखान आघाडीवर होता. मोगल राजांनी व्यापाऱ्यांचे

महत्त्व जाणले होते व त्यांच्याशी बऱ्यापैकी संबंध ठेविले जात. दक्षिणेत वारंवार संघर्ष होत, पण महाराष्ट्रात अनेक शहरे सधन होती.

सागरी व्यापार मोठ्या प्रमाणावर होता. त्यासाठी जहाजे बांधली जात. पण काही थोडे लोक यात भांडवल गुंतवीत. १७ वे शतक हे नौकानयन, जहाजबांधणी या दृष्टीने सुवर्णयुग, पण याच शतकाच्या अखेरीस जहाजबांधणीचा धंदा मागे पडू लागला. इराण व भारत यातील राजकीय सत्ता घसरगुंडीला लागली आणि जहाजबांधणीही कमी होऊ लागली. याच काळात डच, स्पॅनिश व ब्रिटिश व्यापारी आपल्या संघटना स्थापन करू लागले. त्यांच्या बोटी सुधारत गेल्या. आपले व्यापारी इतरांचाही माल घेऊन परदेशात विकत आणि ते गटागटाने विक्रीसाठी बाहेर देशांत जात. पण पाश्चात्य देशांत यातून व्यापारी संघटना, कंपन्या उभ्या राहिल्या, कंपन्यांच्याद्वारे जहाजबांधणी व व्यापार होऊ लागला. त्याप्रमाणे येथे झाले नाही. तेव्हा परदेशी बाजारपेठा भारत गमावू लागला. याचा व्यापारावर मोठा परिणाम झाला. ज्याप्रमाणे येथे तंत्रकौशल्य प्रगत होऊन यंत्रांची निर्मिती झाली नाही, त्याप्रमाणे व्यापार प्रगत होऊन संघटित व्यापारासाठी कंपन्या स्थापन झाल्या नाहीत. या पार्श्वभूमीवर पाश्चात्य व्यापारी कंपन्यांचे येथे आगमन झाले आणि अखेरीस ईस्ट इंडिया कंपनीने इतरांना बाजूला टाकून येथे राज्यविस्तार केला.

दुसऱ्या खंडात प्लासीच्या लढाईपासूनचा इतिहास आहे. प्लासीची लढाई झाली तेव्हा अबदालीने दिल्ली जिंकून आपला प्रतिनिधी तेथे ठेवला होता. मोगल सत्ता घसरणीला लागली होती. ओरिसा वगैरे भागात अलीवर्दीखानाने बसविलेल्या जकातीमुळे १७४० ते ५० या दहा वर्षांत ३० टक्क्यांनी किंमती वाढल्या. मराठ्यांनी सुरतेवर चढाई केल्यावर आजुबाजूच्या उद्योगांवर परिणाम झाला तर बंगालवरच्या स्वारीनंतर मुर्शिदाबाद इत्यादी केंद्रांचीही तशीच गत झाली. पण जाट व मराठ्यांच्या काळात १७८७ पर्यंत आग्रा हे संपन्न व वाढते शहर होते. तथापि मोगलांच्या सत्तेचा अस्तकाळ असला तरीही देशभर आर्थिकदृष्ट्या अराजक होते किंवा मोठा अधःपात झाला होता असा पुरावा लेखकांना मिळालेला नाही. पाश्चात्य कंपन्यांचा येथे व्यापार वाढू लागला तेव्हा रोजची मजुरी देण्यास प्रारंभ झालेला दिसतो. या कंपन्यांमुळे जहाजबांधणीच्या कामाला चालना मिळाली.

ईस्ट इंडिया कंपनीच्या हाती जो भूप्रदेश येई तेथे जमीनमालकी व महसूल यांची समान पद्धती नव्हती. निरनिराळ्या पद्धतींचा तपशील येथे देण्यात आला आहे व त्यांच्या बऱ्यावाईट परिणामांची चर्चा आहे. विविध पद्धतींमुळे एकच एक निष्कर्ष काढणे कठीण. जमीनमालकी व महसूल हा प्रश्नच तेव्हा सर्वात महत्त्वाचा होता, कारण उद्योगधंद्यांचा प्रारंभ झालेला नव्हता. यामुळे लेखकांनी अनेक पाने या विषयासाठी खर्ची घालून वाचकांपुढे प्रचंड प्रमाणात माहिती ठेविली आहे. अठराव्या शतकातून एकोणिसाव्या

शतकात आल्यास सावकारांच्या हाती मोठ्या प्रमाणावर जमिनी पडल्या आणि जमीनमालकांचे मजूरही मोठ्या संख्येने झाले असा निष्कर्ष काढता येत नाही असे लेखकांनी म्हटले आहे. पुढे कापडगिरण्या वाढल्या व उद्योगधंद्यांना खरी सुरुवात झाली. पोलाद कारखाना निघाला. पण भारत स्वतंत्र झाला तेव्हा उद्योगाचे क्षेत्र मर्यादित होते. त्यानंतरच औद्योगीकरणाचा पाया मजबूत व विस्तारित झाला. याची विस्तृत माहिती या ग्रंथात आहे. त्यावरून वाचकांनी निष्कर्ष काढावे. दुसऱ्या खंडाचा उपयोग मुख्यत: माहिती हाती लागणे यासाठी आहे.

४-८-१९८४

नामदार गोखले

नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचे श्री. वी. आर. नंदा यांनी इंग्रजीत लिहिलेले चरित्र हा एक उत्तम चरित्रग्रंथ म्हणून ओळखला जाईल. इंग्रजीत गोखले यांच्यावर इतके चांगले पुस्तक नव्हते हे तर खरेच; पण मराठीतही जी पुस्तके आहेत त्यांत हे उजवे ठरेल. कारण नंदा यांनी कितीतरी नवी माहिती उजेडात आणली आहे. यासाठी त्यांनी गोखले, कर्झन, मोर्ले, मिंटो, बटलर इत्यादी अनेकांचा पत्रव्यवहार; सरकारी पत्रव्यवहार आणि बरेच ग्रंथ बारकाईने वाचले आणि त्यांचा उपयोगही चपखलपणे केला आहे. शिवाय गोखले यांचे व्यक्तित्त्व उभे करताना नंदा यांनी त्यावेळच्या राजकीय व सामाजिक परिस्थितीचेही वस्तुनिष्ठ दृष्टिकोणातून चित्रण केले आहे हा या पुस्तकाचा विशेष मानावा लागेल.

गोखले यांच्याबरोबर रानडे, ह्यूम, वेडर्बर्न, दादाभाई, टिळक, गांधी, मोर्ले, कर्झन इत्यादींची व्यक्तिचित्रेही नंदा सरसपणे रंगवितात. रानडे यांची चतुरस्र विद्वत्ता, त्यांचा दूरदर्शीपणा, निरनिराळ्या संस्थांच्या द्वारे समाजजीवन समृद्ध करण्याची वृत्ती अशी एक ना अनेक वैशिष्ट्ये थोडक्यात पण मार्मिकपणे चित्रित केली गेली आहेत. रानडे हे मवाळ खरे, पण खरे देशभक्त. त्यांच्यासंबंधी तेव्हाच्या गव्हर्नरच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचा सभासद रेव्हन्स्क्रॉफ्ट लिहितो की रानडे हे मनोमनी होमरूलवादी आहेत. याच गृहस्थाला अशी भीती वाटत होती, की रानडे यांची विद्वता, संयम यांचा अभाव असलेले शेकडो रानडे कालांतराने तयार होतील व भावात्मक राष्ट्रवादीचा जन्म होऊन ती आपल्या राज्याला घातक ठरेल. रानडे हे सुधारणावादी, मवाळ असले तरी सुरेंद्रनाथ बॅनर्जी, फेरोजशहा मेहता यांच्याप्रमाणे आंग्ल संस्कृतीचा अंगीकार केलेलेही नव्हते. त्यांचा पोषाख व आचारविचार हे भारतीय होते. ते तुकारामाचे अभंग गुणगुणत आणि इमर्सनचे परिच्छेदही तोंडपाठ म्हणत. अर्थात इंग्रजी सत्ता ही दैवी देणगी असे त्यांना वाटे आणि चर्चा करीत असता रानडे अनेक इंग्रजांच्या गुणांचे कौतुक करीत. ब्रिटिश सत्तेचा उपयोग भारतात आधुनिक युग आणण्यासाठी करता येईल; येथे नवे परिवर्तन घडवून ज्ञानविज्ञाननिष्ठ समाज निर्माण करता येईल अशी त्यांची धारणा होती. या परिवर्तनासाठी ते सर्वतोपरी प्रयत्न करीत, पण गोखले यांनी रानड्यांचे स्वभाववैशिष्ट्य अचूक वर्णन केले आहे. गोखले म्हणतात, की रानड्यांची भाषा आत्मनैपदी नसे; ज्या संस्था त्यांनी स्थापन केल्या आणि चालविल्या त्यांच्या अहवालात स्वत:चे नाव येणार नाही याची ते काळजी घेत. आजच्या प्रसिद्धीलोलुपतेच्या काळात हे विशेष उल्लेखनीय ठरते.

रानडे व गोखले यांच्या काळातले तेलंग, मंडलिक, ह्यूम, वेडर्बर्न इत्यादी अनेकांच्या व्यक्तिवैशिष्ट्यांचे नंदा यांनी असेच थोडक्यात पण मार्मिक चित्रण केले आहे. ह्यूम यांनी काँग्रेस स्थापन केली व जोपासली. पण पुढे ते वृद्ध झाले. ते आणि वेडर्बर्न यांनी स्वत:च्या पदरचे पैसे खर्च करून इंग्लडमध्ये हिंदुस्थानच्या हितसंवर्धनासाठी एक ब्रिटिश कमिटी चालविली होती. वेडर्बर्न हे ह्यूमपेक्षा वयाने लहान, त्यामुळे वेल्बी कमिशन असो वा पुढे मोर्ले-मिंटो सुधारणा असोत, त्यावेळी गोखले यांच्या इंग्लंडमध्ये अनेक प्रमुख व्यक्तींच्या भेटीगाठी व्हाव्या यासाठी खटपट करण्यात वेडर्बर्न यांचा पुढाकार होता. युद्ध सुरू होण्यापूर्वी व नंतर गोखले इंग्लंडमध्ये होते. त्यावेळी राजकीय सुधारणांच्या मागणीसाठी प्रचार व गाठीभेटी याकरिता वेडर्बर्न यांनी किती प्रयत्न केले, ते नंदा यांनी अनेकविध पुराव्यानेच दाखवून दिले आहे. वेडर्बर्न-गोखले पत्रव्यवहार यादृष्टीने महत्त्वाचा असून, त्यावरून गोखले यांच्या कामगिरीची कल्पना येते. त्याचप्रमाणे वेडर्बर्न यांची गुणग्राहकता, भारताबद्दलची आत्मीयता यांचे मनोज्ञ दर्शन घडते.

गोपाळ कृष्ण गोखले यांच्या जीवनाचा विचार केला, तर एक गरीब कुळातला मुलगा पुढे ग्लॅडस्टनच्या तोडीचा संसदपटू असल्याची प्रशस्ती काही खुद्द ब्रिटिश राज्यकर्त्याकडूनच मिळवितो ही वैयक्तिक गुणवत्ता व कर्तृत्व यादृष्टीने महत्त्वाची गोष्ट आहे. मवाळ हे आंग्लाळलेले व म्हणून ही प्रशंसा झाली, असे निदान आज तरी कोणी म्हणणार नाही. गोखले यांनी जो नावलौकिक कमावला तो स्वत:च्या कष्टावर, बुद्धीच्या जोरावर. फेरोजशहा यांच्याप्रमाणे ते श्रीमंत नव्हते आणि त्यांनी ठरविले असते, तर संपत्तीही त्यांनी मिळविली असती. पण देशसेवा हे व्रत मानून त्यांनी अनेक प्रश्नांचा सखोल अभ्यास केला आणि कौन्सिले असोत की कमिशने असोत, तेथे आपली अभ्यासपूर्ण मते निश्चितपणे पण संयमी भाषेत मांडली. रानडे यांनी त्यांच्याकडून अनेक प्रश्नांचा अभ्यास करवून घेतला. सरकारी लठ्ठ अहवाल हे गोखले कादंबरी वाचावी तसे तन्मयतेने वाचीत. जी. व्ही. जोशी यांच्याकडून त्यांनी आकडेशास्त्र, अर्थशास्त्र यांचे धडे घेतले. अशा तयारीनंतरही त्यांच्या अभ्यासात शेवटपर्यंत खंड पडला नाही. वेल्बी कमिशनच्या वेळीच नव्हे, तर इंग्लंडला जाताना बोटीवर त्यांचे दहा-दहा तास वाचन चाले. इंग्लंडमध्ये ते पंधरा-सोळा तास दिवसाकाठी काम करीत. वास्तविक ज्या वेल्बी कमिशनपुढील साक्षीने गोखल्यांच्या भावी कीर्तीचा पाया घातला, त्या कमिशनपुढे साक्ष देणारांत सर्वांत तरुण म्हणजे गोखले. पण त्यांची साक्ष सर्वांत उत्तम झाली. हाती घेतलेले काम अगदी चोख व कष्टात कसूर न करता पार पाडण्याची त्यांची सवय होती. याचा प्रत्यय प्राध्यापक म्हणून ते काम करीत तेव्हाही विद्यार्थ्यांना येत होता आणि कौन्सिलात गेल्यावर गव्हर्नर वा व्हाइसरॉय यांच्यापासून सर्वांना येऊ लागला. पुरावा, आकडेवारी

यांच्या आधाराशिवाय न बोलण्याच्या गोखल्यांच्या पद्धतीमुळे ब्रिटिश राज्यकर्ते किती अस्वस्थ होत हे काही गव्हर्नर व व्हाइसरॉय यांची जी पत्रे नंदा यांनी दिली आहेत, त्यावरून कळून येते. वास्तविक त्यावेळची कौन्सिले ही एकप्रकारे केवळ वादविवाद सभा होत्या. पण त्याही स्थितीत गोखले यांच्यासारखे सभासद अभ्यासपूर्ण बोलत आणि आज विधिमंडळे समर्थ बनली असता मंत्री व आमदार-खासदार आडमाप बोलतात, हा विरोध लक्षणीय ठरेल. गोखले यांनी अगदी तरुण वयात मंत्री होण्याचे ठरविले होते व पुढे वेल्बी कमिशनच्या वेळी ते इंग्लंडला गेले तेव्हा ब्रिटिश पार्लमेंटच्या वातावरणाचा प्रभाव पडून पार्लमेंटचे सभासद होण्याची इच्छा त्यांना झाली होती. ते मंत्री झाले नाहीत आणि पार्लमेंटचे सदस्यही झाले नाहीत. परंतु ही दोन्ही पदे त्यांनी उत्तम प्रकारे भूषविली असती.

तथापि राजकारण हा धकाधकीचा मामला असून गोखले यांना या धकाधकीची बरीच झळ लागली. गोखले हे समाजसुधारणावादी होते. साहजिकच रानडे, आगरकर यांच्याप्रमाणे त्यांनाही टिळक प्रभृतींच्या टीकेचे लक्ष्य व्हावे लागले. या सुधारणावादाच्या संदर्भात गोखले यांच्यावर पहिली बायको टाकून दुसरे लग्न केल्याबद्दल टीका होत असे. पण गोखले यांच्या पहिल्या बायकोला महारोग होता, तिच्या संमतीने त्यांनी दुसरे लग्न केले आणि त्यांनी व त्यांच्या दुसऱ्या बायकोने पहिलीची देखभाल केली हे नंदा यांनी दाखवून दिले आहे. विशेषत: महारोगाचा उल्लेख हा निदान प्रथमच होत असावा. त्यावेळचे सामाजिक वाद हे आता कालबाह्य ठरले आहेत. त्यामुळे त्यांची चरित्रकाराने दखल घेणे आवश्यक असले तरी त्यावरच भर देण्याची गरज नाही. नंदा यांनी हा विवेक पाळला आहे. तसेच खुद्द गोखले यांनीच समाजसुधारणेपेक्षा राजकारणाला प्राधान्य दिले होते. त्यामुळेही तत्कालीन सामाजिक वादाला गौणस्थान देणे क्रमप्राप्तच ठरते.

राजकारणाच्या क्षेत्रातही जहाल व मवाळ हा वाद सर्वच देशात होता व आहे. कालचे जहाल हे आजचे मवाळ वा प्रतिगामीही ठरू शकतात. तेव्हा राजकारणाचे हे वैशिष्ट्य लक्षात घेतले तर निदान १९१९ पर्यंतच्या मवाळांच्या बाबतीत आज वस्तुनिष्ठ मूल्यमापन करणे कठीण जाऊ नये. नंदा यांनी ते केले आहे. ब्रिटिश सरकारकडून जेवढ्या अधिक राजकीय सुधारणा मिळतील तेवढ्या घ्यावयाच्या व अधिकांसाठी सनदशीर प्रयत्न करावयाचे हा गोखले यांचा मार्ग होता. एकदा प्रत्येक मार्गाची मर्यादा व व्याप्ती यांची जाणीव ठेविली की, त्या क्षेत्रात कोणी जास्तीत जास्त जीव ओतून काम केले याचा विचार प्राप्त ठरतो. तो केल्यावर गोखले यांचे कर्तृत्व उजळून दिसते. लोकमान्य टिळकांनी लोकमत जागृत करून सरकारवर दडपण आणण्याचा मार्ग स्वीकारला होता. त्याची किंमत देण्याची त्यांची तयारी होती. सर्वसामान्य लोकांवर याचा प्रभाव अधिक पडणार व पडतो हे मान्य केलेच पाहिजे. शिवाय तो कष्टाचा, त्यागाचा मार्ग आहे. टिळकांनी तो पत्करला. पुढे जेव्हा वंगभंगाची चळवळ सुरू झाली तेव्हा या देशाला सनद नसताना सनदशीर

चळवळ कशी होऊ शकते असा प्रश्न ते विचारीत होते आणि बहिष्काराचा पुरस्कार करीत होते.

गोखले यांचा पंथ वेगळा होता. ब्रिटिश सरकारने कायद्यात सुधारणा करून राजकीय प्रगती घडवून आणण्याचे ठरविल्यामुळे विधिमंडळे, कमिशने आली. ही साधने स्वायत्ततेचे ध्येय गाठण्यासाठी कसोशीने व कौशल्याने वापरण्याचे गोखले यांनी ठरविले होते. त्यासाठी त्यांनी सर्वस्व पणाला लावले. गोखले व टिळक यांचे पंथ या दृष्टीने परस्परविरोधी होते. यातूनच जहाल-मवाळ वाद माजला. याचे विश्लेषण नंदा यांनी वस्तुनिष्ठतेने केले आहे. हा वाद विकोपाला जाऊन सुरतेला काँग्रेस दुभंगली त्यावेळी कोणी काय भूमिका घेतल्या याची पार्श्वभूमी नंदा यांनी रंगविली आहे. टिळक व गोखले यांच्या दृष्टिकोणात मुळातच फरक होता. त्यातच सहा सालच्या काँग्रेसमध्ये बहिष्काराचा जो ठराव मंजूर झाला तो बंगालपुरता वंगभंगामुळे मर्यादित करावा असा गोखले व मवाळ यांचा आग्रह होता, तर ही चळवळ देशव्यापी करावी हा कलकत्ता काँग्रेसचे अध्यक्ष दादाभाई नवरोजी यांच्या भाषणाचा संदेश आहे असे टिळक, अरविंदबाबू वगैरे जहाल आग्रहपूर्वक प्रतिपादन करीत होते. गोखल्यांनी आपल्या मताच्या प्रचारार्थ उत्तर भारताचा दौरा काढला. यानंतर सात सालची काँग्रेस आली तेव्हा कलकत्त्यात दादाभाईंनी दिलेला संदेशच पुढे चालू ठेवावयाचा की नाही हाही एक वादाचा मुद्दा होता. सुरतेला पुढे जे वादळ झाले त्यास हेसुद्धा एक तात्कालिक कारण होते. त्याची जरा अधिक दखल नंदा यांनी घेतली असती तर बरे झाले असते. तथापि सुरतेला जी दंगल झाली ती सुरू करण्याची प्रेरणा अरविंदबाबूंची होती, टिळकांना याची कल्पना नव्हती असे खुद्द अरविंदबाबूंनीच एका लेखात नंतर प्रगट केले होते. नंदा यांनी त्यातील उतारा दिला आहे. सुरतेच्या दंगलीस केवळ जहाल जबाबदार नाहीत. फेरोजशहांच्या लोकांनीही बरीच तयारी केली होती हे अनेकांनी यापूर्वी दाखवून दिले आहे. सुरतेला काँग्रेसमध्ये फूट पडल्यावर मोतीलाल नेहरूंनी जवाहरलालना लिहिलेल्या पत्रात जहालांवर टीका केली होती (जवाहरलाल मात्र मवाळांचे टीकाकार होते). मालवीय तर म्हणाले की, टिळक ज्या व्यासपीठावर असतील त्यावर आपण कधी बसणार नाही.

सुरतेला मवाळांनी काँग्रेस ताब्यात घेतली, नंतर घटना बदलून जहालांना दरवाजे बंद केले, पण यामुळे काँग्रेस वाढली काय? तसे झाले नाही. नंदा यांनी हे अनेक प्रकारे दाखवून दिले आहे. खुद्द गोखलेच काँग्रेसच्या दौर्बल्याने व्यथित झाले होते. वेडर्बर्न यांना १९०९ मध्ये लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात की, सरकारी नोकर व जहाल यांच्या कैचीत सापडलेल्या मवाळांपाशी पुरेशी सार्वजनिक सेवाबुद्धीसुद्धा नाही, हिंमत नाही. बंगालमध्ये आपल्या बाजूला नाणावलेला पुढारी नाही. सुरेंद्रनाथ हे उत्तम वक्ते आहेत, पण संघटक नाहीत. त्यानंतर लाहोरची काँग्रेस झाली. गोखले वेडर्बर्न यांना कळवितात की, काँग्रेसला

फारच कमी उपस्थिती होती. अनेक प्रांतांतून अगदीच तुरळक प्रतिनिधी होते. बहुसंख्य पंजाबने दुर्लक्षच केले. काँग्रेसच्या दुरवस्थेची गोखले यांनी केलेली वर्णने वाचल्यावर आजच्या काँग्रेसची आठवण होते.

या काळातील आणखी महत्त्वाची घटना म्हणजे मोर्ले-मिंटो सुधारणा कायद्याखाली आलेले विभक्त मतदारसंघ. राजकीय सुधारणांसाठी गोखले यांनी जिवाचे रान केले. मोर्ले व इतर ब्रिटिश राजकारणी यांना त्यांनी हिंदुस्थानची बाजू समजावण्यासाठी फार कष्ट केले. नंतर सुधारणा आल्या; पण त्यांच्या अंमलबजावणीसाठी जे नियम केले त्यांनी या सुधारणांवर बोळा फिरविला गेला. नंदा यांनी अनेक पुराव्यांनिशी हे दाखवून दिले आहे. विभक्त मतदारसंघांबद्दल तक्रार झाली; पण त्याबद्दल गोखलेच नव्हे तर इतर काँग्रेसजनांनी उदार धोरण स्वीकारले होते. मुस्लिम अलगतावादाला संघटित स्वरूप लीगच्या स्थापनेपासून आले. त्यापूर्वी मुस्लिम शिष्टमंडळ व्हाइसरॉय लॉर्ड मिंटो यांना भेटले होते. या शिष्टमंडळाची भूमिका व सरकारची दृष्टी यांचे पुरेसे आकलन गोखले यांना झाले नाही, हे नंदा मान्य करतात. तथापि गोखलेच नव्हे, तर तात्यासाहेब केळकर यांनीही 'मराठा'त लिहिताना या शिष्टमंडळाचे स्वागत केले. मुसलमानांच्या राजकीय आकांक्षा वाढल्या असल्या तर ते स्वागतार्ह आहे असे तात्यासाहेब लिहितात. मुसलमान गव्हर्नर झाला तर ते चांगलेच. आणि लष्करात अगदी वरिष्ठ जागेवर मुसलमान अधिकाऱ्याची नेमणूक का करू नये? असे तात्यासाहेबांनी विचारले होते. मुस्लिम अलगतावादाचे परिणाम पुढे विशेष दिसू लागले, पण व्हाइसरॉयना भेटलेले शिष्टमंडळ, विभक्त मतदारसंघ यांच्या भावी परिणामांची गोखले प्रभृतींना कल्पना आली नाही.

मोर्ले-मिंटो सुधारणा आल्या आणि मग गोखले यांचे कौन्सिलातील काम वाढले. त्यांची अभ्यासपूर्ण भाषणे सरकारला तापदायक वाटू लागली होती. व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंज आपली अस्वस्थता प्रगट करताना मुंबईच्या गव्हर्नरना लिहितात, की गोखले हे फार धोकादायक गृहस्थ आहेत. कौन्सिलमध्ये मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे विधेयक गोखले यांनी आणले व त्यावर अप्रतिम भाषण केले. पण गोखले येथे शिक्षणप्रसार करू पाहात असतानाच त्यांना इंग्रजांचेही राजकीय शिक्षण करावयाचे होते. म्हणून त्यांनी युद्ध सुरू होण्याच्या पूर्वी इंग्लंडमध्ये मुक्काम टाकला व या राजकीय शिक्षणाचे अविरत कार्य केले. दक्षिण आफ्रिकेत जाऊन त्यांनी गांधींच्या चळवळीला पाठिंबा दिला. या चळवळीबद्दल त्यांना किती आस्था होती हे त्यांनी आपल्या प्रकाशकाला लिहिलेल्या पत्रावरून कळून येते. दक्षिण आफ्रिकेतील हिंदी सत्याग्रहींच्या कुटुंबियांकरिता हिंदुस्थानात पैसे जमविण्यास सुरुवात झाली, तेव्हा गोखले यांनी आपले प्रकाशक नटेसन यांना पैसे देण्यास सांगितले. त्यांनी केवळ शंभर रुपये दिले. गोखले रागावून लिहितात, की आपले बांधव आफ्रिकेत हालअपेष्टा भोगीत असता तुम्ही केवळ शंभर रुपये पाठविल्याचे पाहून

मला फार राग आला. माझे केवळ सात हजार रुपये बँकेत आहेत, पण मी हजार रुपये दिले व आणखी हजार देईन; एवढेच नव्हे, तर सर्वच्या सर्व सात हजारही देईन.

गोखले देशासाठी पैशाची काळजी करीत नव्हते, कारण देशसेवा हे व्रत त्यांनी स्वीकारले होते. भारत सेवक समाज काढण्यामागे त्यांची उदात्त दृष्टी होती. या समाजाच्या सभासदांना अतिशय काटेकोर शिस्तीत वागावे लागे. सभासदाने आपल्याला दाखविल्याखेरीज लेख लिहिता कामा नये, अशी त्यांची ताकीद होती. शिस्त, वक्तशीरपणा, निर्मळ जीवन आणि अभ्यास हा त्यांनी भारतसेवकांना दंडक घालून दिला होता. श्रीनिवासशास्त्री यांच्या रोजनिशीतील नंदा यांनी दिलेले उतारे यादृष्टीने उद्‌बोधक आहेत. हा सच्चा भारतसेवक शेवटच्या श्वासापर्यंत देशाची काळजी करीत होता. शेवटपर्यंत ते हसतमुख होते आणि आपण इकडील आनंद घेतला; आता तिकडचा घेण्याची आपली तयारी आहे, हे त्यांचे अखेरचे शब्द होते. गोखले यांच्या वृत्तीवर याने प्रकाश पडतो.

गोखले यांच्या मृत्यूनंतर भारतीय राजकारणाला वेगळे वळण लागले. मवाळांचे कार्य संपत आले होते. जहालांच्या मार्गाच्या मर्यादा स्पष्ट झाल्या होत्या आणि राजकीय चळवळ अशा एका टप्प्याला येऊन पोहोचली होती, की जेथून दुसरा मार्ग शोधणे भाग होते. हा मार्ग गांधींच्या सत्याग्रहाने सापडला.

नंदा यांनी ही सर्व ऐतिहासिक पार्श्वभूमी व परंपरा स्पष्ट केली आहे. या कोंदणामुळे गोखले यांचे त्यांनी रंगविलेले चरित्र अधिक उठावदार झाले असून आपल्याकडे क्वचित इतके चांगले चरित्र वाचावयास मिळत असल्याने या चरित्राचे महत्त्व विशेष वाटते.

सामाजिक प्रबोधन

एकोणिसाव्या शतकात कलकत्ता, मद्रास, मुंबई व पुणे यासारख्या शहरांत अनेकविध संस्था स्थापन झाल्या. यापैकी मुंबई व पुणे येथील संस्थांचा आढावा घेऊन या भागात राजकारण, समाजकारण व अर्थकारण या क्षेत्रांत समाजधुरीण कोणती कामगिरी बजावीत होते, याचे परिशीलन जेम्स मॅसालॉस यांनी केले आहे. त्यांच्या पुस्तकाची बैठक प्रामुख्याने वर्णनात्मक आहे, विश्लेषणात्मक कमी आहे. परंतु त्यांनी इतक्या विविध संस्था, तत्कालीन आर्थिक व सामाजिक हितसंबंध यांची एवढी माहिती दिली आहे, की त्यांच्या परिश्रमांचे कौतुक करावे तेवढे ते थोडेच ठरेल. यासाठी त्यांनी केवळ इंग्रजी साधनसामग्री पाहिलेली नाही, तर मराठी साधनांचाही उपयोग केला आहे. या संस्थांच्या कामाचा, कार्यपद्धतीचा तपशील पाहिल्यावर गेल्या शतकात समाजातील धुरीण किती जागरूक होते आणि समाजाचे ऋण मानून आपले कर्तव्य करीत होते याची कल्पना येते. मुंबईत नाना शंकरशेट, पेटिट, दादाभाई, भाऊ दाजी, मंडलिक इत्यादी प्रमुख होते, तर पुण्यात रानडे व पुढे टिळक, गोखले यांनी पुढाकार घेतला होता.

ईस्ट इंडिया कंपनीचा तो काळ होता. याच काळात येथे एक नवा व्यापारीवर्गही वाढीला लागला होता. या व्यापाऱ्यांपैकी काहींनी कंपनीला तिच्या मोहिमांसाठी कर्जेही दिली होती. तथापि नवा व्यापारीवर्ग व नव्याने शिकलेला वर्ग राज्यकारभारात आपला काही वाटा असावा, अशी आकांक्षा बाळगू लागला होता. मुंबईवर एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत व त्यानंतरही काही काळ पारशी लोकांचे बरेच प्रभुत्व होते. व्यापारातही ते अग्रभागी असत. वाडिया घराणे तर बोटी बांधण्याची मोठी कंत्राट घेई. या साऱ्या मंडळींना नागरी कारभार समाजव्यवहार यात काही वाटा हवा असे. त्यातून काही संस्था स्थापन झाल्या. पण ईस्ट इंडिया कंपनीच्या सनदेचा ५४ साली फेरविचार करण्याचा प्रश्न आला, तेव्हा ब्रिटिश सरकारकडे पाठवावयाच्या निवेदनाबाबत मुंबईतील शेठमंडळींचे प्रमुख आणि दादाभाई वगैरे तेव्हाचे तरुण यांच्यात मतभेद झाले. नोकऱ्या, सरकारी कारभार यांत मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे ही या तरुण मंडळींची इच्छा होती. म्हणून त्यांना अर्जात निश्चित स्वरूपाच्या मागण्या ग्रथित व्हाव्या, असे वाटत होते. मुंबईतील व्यापारीवर्ग सामाजिक कार्यात भाग घेऊ लागला याचे इंग्लंडमध्येही कौतुक झाले पण बॉम्बे असोसिएशनची १८५२ मध्ये स्थापना झाली, तेव्हा येथे काहींनी ती सरकारविरोधी कट करण्यासाठीच स्थापन झाल्याचा संशय घेतला. तथापि नाना शंकर शेट

यांनी असा कोणताही उद्देश नसल्याचे स्पष्ट केले. लोककल्याण साधण्यासाठी अगदी सनदशीर अशाच साधनांचा वापर केला जाईल असेही त्यांनी आश्वासन दिले.

या काळात दादाभाई नवरोजींचा प्रभाव फार होता. त्यांनी केवळ मुंबईतच नव्हे, तर इंग्लंडमध्ये जाऊन तेथे प्रतिष्ठित लोकांशी चांगले संबंध प्रस्थापित केले होते. इंग्लंडात दादाभाईंनी काही संस्थाही स्थापन केल्या. प्रथम त्यांनी लंडन नेटिव्ह असोसिएशन स्थापन केली. ती अल्पजीवी ठरली. नंतर लंडन इंडियन सोसायटीची स्थापना केली. परंतु इंग्लंडातील संस्था अधिक व्यापक पायावर उभी करण्याची आवश्यकता दादाभाईंना जाणवू लागल्यावर ६६ साली ईस्ट इंडिया असोसिएशनचा जन्म झाला. हिंदी प्रश्नाबाबत निबंध प्रसिद्ध करण्याचे काम या संघटनेने हाती घेतले. दादाभाईंनी पहिला निबंध लिहिला, तो 'भारताबाबतची इंग्लंडची कर्तव्ये' हा होता. यातूनच पुढे दादाभाईंचा लुटीचा सिद्धान्त जन्माला आला. हिंदुस्थानातून संपत्तीचा ओघ इंग्लंडकडे जात आहे याची चर्चा दादाभाईंनी पहिल्या निबंधात केली होती. हळूहळू मुंबईच्या सामाजिक जीवनात शेटसावकारांपेक्षा प्राध्यापक, वकील वगैरे व्यावसायिकांचा प्रभाव वाढू लागला व यात मंडलिक, दादाभाई, फेरोजशहा इत्यादींचा समावेश होतो.

या काळात जे निरनिराळे कायदे होत होते, त्यासंबंधात बॉम्बे असोसिएशनचे प्रमुख आपली मते मांडीत. या कायद्यांपैकी एक कायदा सिटी सर्व्हेचा होता. या कायद्याने वा कायद्यातील दुरुस्तीने जमीन वा मालमत्तेविषयीचे कागदपत्र तपासण्याचा अधिकार सरकारी अधिकाऱ्यांना होता. सार्वजनिक मालकीची जमीन बेकायदेशीररीत्या कोणी ताब्यात घेऊ नये हा या विधेयकाचा उद्देश होता, पण असोसिएशनचे अध्यक्ष मंगलदास नथुभाई यांनी विरोध केला. घरात शिरून अधिकाऱ्यांनी कागदपत्र तपासावयाचे म्हणजे खाजगी हक्कावर आक्रमण होते, असा त्यांचा युक्तिवाद होता. आजच्या संदर्भात असोसिएशनचा हा सारा खटाटोप चुकीचा ठरतो. तथापि असे अनेक कायदे होते, की जे इंग्रज अधिकाऱ्यांनी चांगल्या बुद्धीने केले होते, त्यात समाजकल्याणही होते; पण तेव्हाच्या धुरिणांच्या आर्थिक हितसंबंधांना धक्का लागतो म्हणून या कायद्यांना विरोध होत असे. कापसात भेसळ करण्यास प्रतिबंध करणाऱ्या विधेयकालासुद्धा असोसिएशनने विरोध करून केवळ व्यापाऱ्यांचे हित पाहिले.

ब्रह्मो पद्धतीने होणारे लग्न हे कायदेशीर ठरविण्यासाठी एक विधेयक आणण्यात आले होते; पण त्यास केवळ सनातनी हिंदूंनीच विरोध केला असे नव्हे, तर प्रार्थना समाजानेसुद्धा केला. पुढे ब्रिटिश सरकारने हे विधेयक नामंजूर केले.

पुण्यात ज्ञानप्रसारक सभा वाढीला लागली. या संस्थेत रानडे, भांडारकर वगैरेंचे निबंध वाचले जात. याच काळात वृत्तपत्रे व नियतकालिके यांची संख्या वाढू लागली. मराठीतील पुस्तकांचे वाढते प्रकाशन हे आणखी एक वैशिष्ट्य. १८१८ नंतरच्या दशकात केवळ तीन मराठी पुस्तके प्रसिद्ध झाली होती; १८४७-४८ मध्ये ही संख्या १०२ वर गेली; पुढील दशकात ती पाचशे झाली आणि १८६४ ते १८७४ या काळात पंधराशे तीस पुस्तके प्रसिद्ध झाली. कविता, कादंबऱ्या यापेक्षा निनिराळ्या विषयावर प्रबोधन करणारी पुस्तके या काळात प्रसिद्ध झालेली दिसतात. भाषांतरावरही बराच भर दिला जात होता.

धर्मसुधारणा व सामाजिक सुधारणांनाही चालना दिली जात होती. बंगाली समाजसुधारक ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या पुणे, मुंबईच्या भेटीने सुधारणाकार्याला चालनाच मिळाली. १८६९ मध्ये मुंबईत पहिला विधवाविवाह झाला. त्यामुळे रानडे प्रभृतींना वाळीत टाकले गेले. यानंतर पुण्यात शंकराचार्यांपुढे वाद झाला, पण रानडे पक्षाचा एक पंडित फुटला. शंकराचार्य या वादात तटस्थ राहिले नाहीत अशी त्यांच्यावर नंतर सुधारकांनी टीका केली.

१८७० नंतर सरकारची आर्थिक परिस्थिती बिघडली. अर्थसंकल्प तुटीचा होऊ लागला. दुष्काळ पडला तेव्हा रानड्यांच्या नेतृत्वाखाली पुण्याच्या सार्वजनिक सभेने मोठी कामगिरी बजावली. या सभेने ग्रामीण जीवनातील प्रश्नांची जाणीव ठेवली हे तिचे वैशिष्ट्य ठरेल. यामुळे सुशिक्षितांना शेतकऱ्यांच्या दुःस्थितीची कल्पना आली. सार्वजनिक सभेने सरकार व रयत यांच्यातील मध्यस्थ म्हणून काम केले आणि जेव्हा आर्थिक चौकशी करण्याकरिता सरकारने समिती नेमली तेव्हा सार्वजनिक सभेतर्फे दिला गेलेला साक्षीपुरावा महत्त्वाचा होता. वासुकाका जोशी, रामचंद्र उदास इत्यादींनी भरपूर पुरावा या समितीला सादर केला. बॉम्बे असोसिएशननेही गुजरातच्या ग्रामीण भागासंबंधी चौकशी करून अहवाल तयार केले होते. तथापि मुंबईच्या संस्थेपेक्षा पुण्याच्या सार्वजनिक सभेची मुळे ग्रामीण भागात अधिक गेली होती. ६५ च्या सुमारास जेव्हा शेतसारा वाढला, तेव्हा त्याविरुद्धचे अहवाल देऊन शेतकऱ्यांच्या दुःस्थितीची कल्पनाही सार्वजनिक सभेने दिली. पुढे दक्षिणेत जेव्हा शेतकऱ्यांचे दंगे झाले, तेव्हा सभेचे इशारे बरोबर होते हे सिद्ध झाले.

याप्रकारच्या चौकशी अहवालातूनच हिंदुस्थानच्या दारिद्र्याची मीमांसा सुरू झाली. दादाभाईंनी तर हा आपला अभ्यासाचा व मतप्रसाराचा विषय केला. संपत्तीचा ओघ इंग्लंडकडे जात असल्याचा दादाभाईंचा सिद्धान्त रानडे यांना प्रारंभी मान्य होता, पण नंतर विचारांती त्यांचे मत बदलले.

या रीतीने आर्थिक, राजकीय व सामाजिक जागृती करणाऱ्या संघटना मुंबई व पुण्यात वाढत होत्या तशाच त्या कलकत्ता ते मद्रासमध्येही होत्या. एवढेच नव्हे, तर कलकत्त्याचा

याबाबत पुढाकार होता. मुंबईकर मागाहून जागृत झाले. देशातल्या महत्त्वाच्या शहरांत या ज्या संस्था स्थापन होऊन कार्य करीत होत्या, त्यांच्या पुढाऱ्यांत राष्ट्रीय संघटनेच्या कल्पनेचा प्रसार झाला आणि यातून काँग्रेसचा जन्म झाला. मॅसालॉस यांनी काँग्रेसच्या स्थापनेपर्यंत या विविध संघटनात्मक कार्याचा साक्षेपाने आढावा घेतला असून, राष्ट्रीय प्रबोधनाचा इतिहास ज्यांना अभ्यासावयाचा असेल, त्यांना हा आढावा उपयुक्त वाटेल.

२२-१-१९७७

सामाजिक सुधारणा

केंब्रिज विद्यापीठातर्फे प्रसिद्ध होत असलेल्या भारताच्या इतिहासाचा हा तिसरा खंड असून त्यात गेल्या शतकांतील सामाजिक व धार्मिक आंदोलनांचा आढावा घेतला आहे. देशाच्या चारही विभागातील आंदोलनांची दखल घेण्याचा लेखक पॉल ब्रास यांचा प्रयत्न दिसतो. त्याचप्रमाणे सर्व प्रमुख धर्मांच्या अनुयायांनी कोणत्या दिशेने प्रयत्न केले, त्यांची तपासणीही लेखकाने केली आहे. पण लेखकाने सर्व विभागांना सारखेच महत्त्व दिले आहे, असे मात्र म्हणता येणार नाही. यामुळे बंगाल, उत्तर भारत इत्यादींना जितके स्थान दिले आहे, किंबहुना दक्षिण भारतास जेवढे स्थान दिले आहे, तितके महाराष्ट्रास नाही. वास्तविक धार्मिक व सामाजिक आंदोलने महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर झाली आणि उत्तर व तामिळनाडू यापेक्षा महाराष्ट्रात पुढारलेल्या जातीतील लोक या सुधारणा कार्यात अग्रभागी होते. तसेच बहुजन समाजात जागृती करण्याचे प्रयत्न येथे फार लवकर झाले. याची काही चांगली फळेही महाराष्ट्रात दिसून आली आहेत.

याचा अर्थ लेखकाने महाराष्ट्रातील सामाजिक व धार्मिक आंदोलनांची मुळीच दखल घेतली नाही, असे नव्हे. प्रार्थना समाजासारख्या संस्था, रानडे प्रभृतींचे कार्य यांचा आढावा त्याने घेतला आहे. पण रानडे, तेलंग, भांडारकर अशांचे कार्य, जोतिबा फुले, महर्षी शिंदे, शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड, भाऊराव पाटील अशांना लेखकाने न्याय दिलेला नाही. या शतकातील आंदोलनांचाही आढावा घेण्यात आला असल्यामुळेच शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड, महर्षी शिंदे इत्यादींची नावे येथे घेतली आहेत की, ज्यांची दखल लेखकाने घेतली नाही. किंबहुना यापैकी अनेकांच्या नावांचा उल्लेखही नाही. लोकहितवादी, आगरकर, गोखले इत्यादींची अवस्था अशीच आहे. सार्वजनिक सभेसारख्या संस्थांचे कामही महत्त्वाचे होते. सामाजिक व धार्मिक आंदोलनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांनी अस्पृश्यतेविरुद्ध दिलेला लढा व केलेली जागृती यामुळे येथे एक नवे समाजपरिवर्तन घडले. बाबासाहेबांनी नंतर धर्मांतर केले. त्याचेही काही परिणाम झाले आहेत. लेखकाने याचे काही विवेचन केले नाही. सामाजिक प्रश्नांवरून महाराष्ट्रात दोन तट पडले होते. यातून जे विचारमंथन झाले, त्याचे परिणाम पुढे महात्मा गांधींच्या चळवळीच्या वेळी दिसू लागले होते. लेखकाने याची अधिक चर्चा करणे युक्त होते. एक लहानसा दोष राहून गेला आहे. तो म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या नावाचा चुकीचा उल्लेख. विनायक धनंजय सावरकर असा उल्लेख लेखकाने केला

आहे. कदाचित धनंजय कीर हे जे सावरकरांचे चरित्रलेखक त्यांच्या नावामुळे लेखकाची गफलत झाली असावी.

इंग्रजांनी प्रथम बंगालमध्ये पाय रोवले आणि त्यांच्या अस्तित्वाचे परिणाम प्रथम तेथेच दिसू लागले. बंगालच्या पूर्व भागात पर्शियनपेक्षा उर्दूचा वापर करण्याची चळवळ मुसलमान समाजात झाली व ती एक प्रकारे सुधारणेची चळवळ होती. तथापि लवकरच कडव्या धर्मवादाचा पुरस्कार करणारा वर्ग पुढे आला. बंगालमधील मुसलमान समाजातील सुधारणेच्या चळवळीबरोबरच आणखी एक आंदोलन होऊ लागले होते. ते जमीनदार विरुद्ध कुळे असे होते. जमीनदार साधारणत: हिंदू होते, तर कुळे मुसलमान.

इंग्रजांच्या राज्याचा विस्तार होऊ लागला तेव्हा कारभाराची भाषा जरी इंग्रजी वा पर्शियन असली तरी सामान्य लोकांशी व्यवहार करावयाचा, तर स्थानिक लोकांची भाषा कारभाऱ्यांना अवगत असणे आवश्यक होते. म्हणून पहिल्या काही काळात अनेक इंग्रज अधिकाऱ्यांना बंगाली भाषा येत होती. त्यांनी दुय्यम म्हणून ज्या स्थानिक लोकांना कामावर घेतले होते, ते बंगालीतून व्यवहार करीत. पुढे शिक्षणाप्रमाणे कारभारातही इंग्रजी याच भाषेचा वापर करण्याचे धोरण अवलंबिण्यात आल्यावर बंगालीभाषा मागे पडली.

बंगालमध्ये पाश्चात्य ज्ञान, शिक्षण यांचा आग्रह धरणाऱ्यांत राजा राममोहन रॉय हे होते. त्यांनी धर्मसुधारणेचाही पंथ स्वीकारला आणि ब्राह्मो समाजाची स्थापना झाली. देवेंद्रनाथ ठाकूर, केशवचंद्र सेन अशांनी सुधारणावादी चळवळ चालविली. कलकत्त्यात इंग्रजांनी प्रथम फोर्ट विल्यममध्ये महाविद्यालय सुरू केले. आपल्याच अधिकाऱ्यांना शिक्षण देण्याचा हेतू होता. त्यानंतर मिशनऱ्यांनी शिक्षणाच्या क्षेत्रात प्रवेश केला. पाश्चात्य विद्येचा अवलंब करणे आवश्यक असले, तरी ती घेऊनही आपले स्वत्त्व टिकविले पाहिजे, हा विचार बळावून हिंदू कॉलेजची स्थापना झाली.

कालांतराने हिंदू धर्माचा विशेष अभिमान बाळगणारा पंथ उदयास आला. रामकृष्ण परमहंस हे शक्तीचे उपासक मानले पाहिजेत. विवेकानंदांनी त्यांची दीक्षा घेतली आणि हिंदू धर्मीयांना धर्माचे वेगळेच दर्शन घडविले. आत्मटीकेपेक्षा सेवेवर विवेकानंदांनी भर दिला आणि रामकृष्ण मिशन या संघटनेने स्वयंसेवकांचे जाळेच तयार केले.

या सर्वांच्या मतांचा आढावा घेतल्यावर लेखकाने व्यक्त केलेला अभिप्राय नमूद करण्यासारखा आहे. त्याचे म्हणणे असे की, बंगालमध्ये हिंदू व मुसलमान या दोन्ही पंथांच्या पुढाऱ्यांनी सुधारणा करताना खरा धर्म कोणता याची चिकित्सा सुरू केली खरी, पण त्याचमुळे दोन्ही पंथीयांत कडवेपणाही वाढू लागला आणि याचा परिणाम म्हणून दोन समाजातील अंतर पूर्वीपेक्षा वाढत गेले.

गेल्या शतकात दिल्ली इंग्रजांच्या ताब्यात गेली. तीवर मुसलमानांचे वर्चस्व होते. पण हिंदूंची संख्या मुसलमानांपेक्षा अधिक होती. १८४७ मध्ये हिंदू ४७ टक्के होते, ते ८१ मध्ये ५७ टक्के झाले. उलट मुसलमानांची टक्केवारी ४५ वरून ४१ वर खाली आली. शाह वली उल्ला याने मुसलमान समाजात शिक्षणाचा प्रसार करण्याचे काम हाती घेतले. पाश्चात्यांच्या प्रभावामुळे इस्लामचे शुद्ध स्वरूप बिघडले असून, ते शिक्षणाने सुधारण्यावर त्याचा भर होता. त्याने सौदी अरेबिया इत्यादी देशांचा दौरा केला होता. इस्लामच्या शुद्ध स्वरूपाची शिकवण देण्याचे त्याने ठरविले.

त्याच्या मार्गात दोन अडथळे होते. एक सुफी पंथ व दुसरा शिया. सूफी पंथावर त्याचा आक्षेप नव्हता, पण शियांना मुसलमान मानले, तरी त्यांना सुधारून खरे मुसलमान केले पाहिजे, असे त्यास वाटत असे. ज्याप्रमाणे राममोहन रॉय यांचा भर आधुनिक शिक्षणावर होता, त्याप्रमाणे सर सय्यद अहमद यांचाही होता. त्यांनी अलिगडच्या महाविद्यालयात व पुढे विद्यापीठात या दृष्टीने शिक्षणाचा क्रम ठरविला. देवबंद पंथाने इस्लामी शिक्षणावर कटाक्ष ठेविला होता. सूफी पंथास त्याचाही विरोध नव्हता. तथापि अनेक प्रकारचे कर्मकांड त्यास मंजूर नव्हते. सामान्य लोकांना धर्माचा अर्थ समजणे शक्य नसते, म्हणून धर्मगुरूंची आवश्यकता असल्याचे हा पंथ मानतो. साहजिकच मुल्ला-मौलवींना महत्त्व आले.

पंजाबमध्ये शीख पंथात निरंकारी व नामधारी असे दोन पंथ तयार झाले व अद्याप आहेत. त्यांच्या संस्थापकांनी शीख पंथात काही सुधारणा करण्याचे व्रत घेतले होते. नामधारी पंथाच्या धर्मगुरूने गुरू गोविंद सिंग यांनी आपल्या ठिकाणी पुन्हा जन्म घेतल्याचा दावा केला आणि त्याचे अनुयायी तसे मानीत आले आहेत. या पंथाकडे हरिजनादी समाज आकर्षित झाला. त्याने कडवा प्रचार केल्यामुळे ब्रिटिश सरकार या पंथाबाबत सावध राहात असे. लष्करातील शीखांपुढे प्रचार करण्यास त्यास मनाई होती.

हिंदूंमध्ये आर्यसमाज हा सुधारणावादी पंथ होता. तो मूर्तिपूजक नाही; वेदांप्रमाणे या समाजाची उभारणी व्हावी, असे त्याचे मत आहे. आर्यसमाज हा गेल्या अनेक वर्षात स्वयंसेवी काम करण्यात पुढाकार घेत असतो. गुजरातेत स्वामी नारायण हा संप्रदाय वाढीला लागला होता. आजही त्याचे असंख्य अनुयायी आहेत.

दक्षिणेत ब्राह्मो समाजाची स्थापना झाली होती आणि थिऑसॉफी हाही पंथ बराच वाढला होता. दक्षिणेत ख्रिश्चन मिशनऱ्यांनी धर्मांतराचे काम मोठ्या प्रमाणावर केले होते. तिनवेल्ली या जिल्ह्यात नाडर समाज बराच होता. त्याचा मुख्य व्यवसाय ताडीचा. यात अनेकांच्या हाती पैसा आला होता. त्यातच नादन ही जी आणखी एक जात तिच्या हाती

जमीनजुमला होता. सावकारीतही तिचा प्रवेश झाला होता. पण या समाजास प्रतिष्ठा नव्हती. तेव्हा धर्मांतर करून ती मिळवण्याचा एक उपाय अवलंबिण्यात आला.

तिनवेल्ली जिल्ह्यात १८५९ सालापर्यंत ४० हजार ख्रिश्चन झालेले होते. याची प्रतिक्रिया होऊन हिंदू संघटित होऊ लागले व त्यांनी शिक्षणसंस्था स्थापन केल्या. विभूती संगम, वेद सिद्धान्त सभा अशा संघटनाही स्थापन झाल्या होत्या. या सर्व वातावरणात हिंदू व ख्रिश्चन यांच्यात बराच तणाव निर्माण झाला होता. त्रावणकोरमध्येही या प्रकारचा तणाव होता आणि शिवाय हिंदू व मुसलमान यांच्यातही संबंध दुरावत चालले होते. यातून मोपल्यांनी बंड केले. यात असंख्य मारले गेले. तसे पाहिले तर ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या प्रचारामुळे व त्याहीपेक्षा धर्मांतराचे जे काम ते करीत होते, त्यामुळे त्यांच्याविरुद्ध अनेक विभागात मोहीम उघडली गेली होती. धर्मावरच घाला येत आहे, असे पाहून हिंदू समाजास सावध करावयास निघालेल्या अनेकांनी सनातनवादाचा आश्रय घेतलेला दिसेल. १९५७ च्या उठावाची जी काही कारणे आहेत, त्यात मिशनऱ्यांनी चालविलेले धर्मांतराचे काम हेही एक कारण होते.

अशा रीतीने धर्मचर्चा अधिकाधिक प्रमाणात होत होती आणि धर्मसुधारणा करू पाहणारांकडूनही एकाच समाजात तणाव निर्माण केला जात होता. लेखकाने धार्मिक चळवळीवर अधिक भर दिला आहे. त्या मानाने सामाजिक सुधारणांसाठी झालेल्या आंदोलनांची त्याने कमी दखल घेतली आहे. ब्रिटिश सत्ता येथे स्थिर झाली आणि मग हिंदू, मुसलमान व पाश्चात्य अशा तीन संस्कृतींचा संघर्ष सुरू झाला. त्यांच्यात काही वेळा सहकार्यही होत गेले. इंग्रजांच्या बरोबर येथे आलेली पाश्चात्य संस्कृती ही आधुनिक विज्ञानावर आधारित होती. त्यामुळे येथील जीवनात फार मोठे परिवर्तन होऊ लागले. परकी सत्तेकडून राजकीय हक्क मिळविण्यास महत्त्व आले आणि तत्पूर्वी ज्या राजकीय हक्कांची जाणीव नव्हती, ती होऊन त्यासाठी संघटना बांधण्याचे काम नव्यानेच होऊ लागले.

राजा व प्रजा अशी विभागणी असल्यामुळे प्रातिनिधिक कारभाराचा प्रश्न नव्हता आणि त्यासाठी संस्था स्थापण्याचाही नव्हता. पण इंग्रजी सत्तेबरोबरच कायद्याच्या राज्याची कल्पना आली आणि प्रातिनिधिक कारभाराचीही आली. यासाठी राजकीय संघटनांची स्थापना झाल्यावर राजकारणाला समाजकारणापेक्षा महत्त्व आले. पण राजकीय हक्क मिळण्याची शक्यता निर्माण झाल्यावर वेगवेगळ्या धर्माचे पुढारी स्वधर्मीयांचे संघटन करू लागले. अल्पसंख्य समाजाच्या पुढाऱ्यांनी धर्माचे स्वरूप शुद्ध राखण्यासाठी प्रयत्न करण्याचे ठरविल्यामुळे त्या समाजात सामाजिक सुधारणांना दुय्यम स्थान प्राप्त झाले.

तसेच राजकीय हक्कांना अग्रहक्क देण्याचे धोरण अधिक लोकप्रिय ठरणे स्वाभाविक होते. यामुळेही सामाजिक सुधारणांसाठीच्या आंदोलनाने वेगळे वळण घेतल्याचे दिसते.

ज्या प्रमाणात राजकीय सुधारणा होत गेल्या व काही हक्क मिळू लागले, त्या प्रमाणात हक्कांची जाणीव वाढली आणि प्रत्येक समाज आपल्या अस्मितेची जपणूक करू लागला. यातून समाज एकसंध होत जाण्याऐवजी त्यात दुफळी वाढत गेली. आजकाल तीच वाढत आहे आणि हे कोठवर जाईल, याचा अंदाज लागणे शक्य नाही.

२-११-१९९०

उदारमतवादाची वाटचाल

ब्रिटनमधील हुजूर व मजूर पक्षांनाच गेली अनेक वर्षे सत्ता मिळत गेली. पण मजूर पक्षातून फुटलेल्या काहींनी सोशल डेमॉक्रटिक पक्ष स्थापन करून लिबरल पक्षाशी सहकार्य केले. या युतीने गेल्या आठवड्यात पार्लमेंटची क्रॉयडन या मतदारसंघातील पोटनिवडणूक जिंकली. यामुळे ब्रिटिश राजकीय जीवनास वेगळे वळण लागण्याचा संभव आहे. लिबरल पक्षाला कधी नव्हे एवढे महत्त्व आले आहे. अशा वेळी लिबरल पक्षाचा इतिहास, उदारमतवादाची परंपरा याचा इतिहास उद्‌बोधक ठरेल. इयान ब्रॅडले यांनी असा इतिहास लिहिला आहे. ब्रॅडले हे लंडन टाइम्सच्या संपादक वर्गापैकी आहेत व त्यांनी इतरही पुस्तके लिहिली आहेत. सोशल डेमॉक्रटिक पक्षावरही त्यांचे पुस्तक नुकतेच निघाल्याचे समजले.

उदारमतवाद – लिबॅरलिझम – हा ब्रिटनमध्ये निर्माण झाला नाही. त्याचा जन्म अमेरिकन व फ्रेंच क्रांतीत झाला. राजकीय बाबतीत उदारमतवादी हा शब्द प्रथम फ्रेंच क्रांतीच्या संदर्भात वापरला गेला आणि १८०७ च्या सुमारास प्रचारात आला. अमेरिकन स्वातंत्र्यवाद्यांना व फ्रेंच क्रांतीची मूल्ये जतन करू पाहणारांना कोणत्याही प्रकारची हुकूमशाही मान्य नव्हती. इंग्लंडमध्ये १८ व्या शतकाच्या अखेरीस उदारमतवादी शक्ती वाढू लागल्या व १८३० च्या सुमारास उदारमतवाद हा शब्दप्रयोग प्रचलित झाला. १८१५ ते १८३० हा तेथील उदारमतवादाचा उदयकाळ मानावा लागेल.

अठराव्या शतकाच्या अखेरीस कारखानदारी वाढू लागली. पण ब्रिटिश राजकीय जीवनावर सरंजामदारांचा पगडा होता. नव्याने निर्माण झालेला कामगारवर्गही मतदानाचा अधिकार मागत होता. तथापि क्रिमियन युद्धामुळे लिबरल पक्षाची वाढ होऊ शकत नव्हती. परंतु या युद्धाच्या काळात सरंजामदारी पक्षाच्या सरकारचा गलथान कारभार उजेडात आला तेव्हा कारखानदार वर्गाचे प्राबल्य वाढले. हा वर्ग विजीगिषु होता. त्याचा कटाक्ष व्यापार वाढविण्यावर असल्याने त्याला उद्योगधंद्याच्या वाढीवर येणारी बंधने नको होती. आंतरराष्ट्रीय व्यापारात ब्रिटन आघाडीवर होते. हा व्यापार अधिक वाढावा अशी नव्या वर्गाची मागणी होती. सत्ताधारी गटाची जी दृष्टी असते तीच त्या त्या काळात प्रभावी ठरते असे मार्क्सने म्हटले आहे. त्याप्रमाणे ब्रिटनमधील हा कारखानदार वर्ग हा प्रभावी होता आणि त्याच्या कल्पना याच प्रभाव गाजवीत होत्या. म्हणून खुला व्यापार, किमान सरकारी हस्तक्षेप इत्यादी तत्त्वांचा पुरस्कार होऊ लागला. कारखानदारीमुळे नवा

कुशल कामगारांचा वर्ग तयार झाला होता. तो सुखवस्तू होता. कार्यक्षमता, धाडस हे त्याचे गुण होते. सरकारी हस्तक्षेपास त्याचा विरोध होता. लिबरल पक्ष हा या वर्गाचा पक्ष होता.

ब्रॅडले यांनी हा सारा इतिहास सविस्तर वर्णन केला आहे. १८५५ मध्ये वृत्तपत्रांवरील स्टॅंपड्यूटी रद्द झाली व याच वेळी मोठ्या खपाची वृत्तपत्रे प्रसिद्ध होऊ लागली. तिकडे जर्मनीतही याच स्वरूपाच्या प्रवृत्ती वाढीला लागल्या होत्या. १८५९ मध्ये अनेक उदारमतवादी ब्रिटिश पार्लमेंटमध्ये निवडून आले. पुढच्याच वर्षी लिबरल असोसिएशनची स्थापना झाली. या राजकारणी पुरुषांना अनेक साहित्यिकांचा व विचारवंतांचा पाठिंबा मिळू लागला. ॲंटनी ट्रोलॉप, जॉर्ज इलियट, जॉर्ज मेरिडिथ हे त्यापैकीच. जॉन मोर्ले यांनी १८६७ च्या सुमारास फोर्टनाइटली रिव्ह्यू या उदारमतवादी नियतकालिकाची संपादकीय सूत्रे हाती घेतली आणि खपाप्रमाणे त्याची प्रतिष्ठा वाढविली. ऑक्सफर्ड व केंब्रिज विद्यापीठातील अनेक प्राध्यापक व विद्यार्थी हे उदारमतवादी तत्त्वज्ञानाचे व पक्षाचे पुरस्कर्ते झाले होते. अमेरिका व युरोप यातही विचारवंतांचा असाच पाठिंबा मिळत होता. १८६० नंतर मतदानाचा हक्क व्यापक करावा ही मागणी वाढत गेली. कुशल कामगार, तंत्रज्ञ, प्रशासक, व्यवस्थापक असा जो वर्ग वाढीला लागला होता तो सुखवस्तू मध्यमवर्ग होता. हा मध्यमवर्ग व कामगार यांची मतदानाचा हक्क वाढविण्याची मागणी होती. परिस्थितीचा दबावही असा होता, की हुजूर पक्षीय डिझरायलीचे सरकार असूनसुद्धा सुधारणा कायदा लिबरल पक्षाच्या अपेक्षेपेक्षाही अधिक व्यापक झाला. मतदारांची संख्या दुप्पट झाली. ग्लॅडस्टन हा उदारमतवादी पक्षाचा प्रमुख होता. व्यापार व उद्योग वाढावयाचा तर युद्ध टाळले पाहिजे व शांतता नांदली पाहिजे. यामुळे युद्धविरोध हे लिबरल पक्षाचे एक वैशिष्ट्य असल्याचे दिसते. सरकारचा हस्तक्षेप कमीत कमी असावा ही या पक्षाची मुख्य मागणी असल्यामुळे व्यक्तिवादाचा तो जोरदार पुरस्कार करीत असे. पण व्यक्तिवादाचा इंग्लंडमध्ये अतिरेकी पुरस्कार होत आहे अशी टीका मॅझिनीसारखे इटालियन करीत होते. लिबरल पक्षाची मदार कार्यक्षमतेवर असल्यामुळे स्पर्धेला वाव मिळावा अशी त्याची मागणी होती. पण यातून केवळ संपत्ती हीच परमेश्वर ठरण्याचा संभव आहे असा इशारा देणारेही होते. कार्यक्षमता वाढवावयाची असल्याने शिक्षणावर भर देण्यात येत असे. चेंबर्लेनने शिक्षणप्रसाराला चालना मिळेल अशा रीतीने कायदा केला. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे झाले.

लिबरल पक्षात व पंथात दोन विचारप्रवाह पुढे निर्माण झाले. एक सरकारने कमीत कमी हस्तक्षेप करावा असा आग्रह धरीत होता. पण दुसऱ्याला हे मान्य नव्हते. कारखानदारीच्या वाढीबरोबर कामगारवर्ग वाढला व शहरे वाढली. त्या काळात

कामगारवर्गाचे जिणे अत्यंत कष्टाचे होते. डिकन्सच्या कादंबऱ्यांत त्याचे वर्णन आहे. ग्लॅडस्टनने जमीनसुधारणा केल्या व त्यामुळे सरंजामदारवर्गाला शह मिळाला. पण कामगारवर्गाची हलाखी, शहरातील बकाल जीवन हे सर्व कोणत्याही राजवटीला धोकादायकच ठरणारे होते. तेव्हा ग्लॅडस्टनने घरबांधणी वगैरेबाबत तीन आयोग नेमले. या आयोगांनी केलेल्या शिफारसी अमंलात आणावयाच्या तर सरकारच्या हाती कमीत कमी सत्ता असावी हा लिबरल पक्षाचा आग्रह गुंडाळून ठेवणे भाग होते. सामाजिक परिस्थितीच अशी होती, की लिबरल पक्षालाच सरकारच्या हाती अधिक सत्ता देणे भाग पडले. चेंबर्लेनने स्थानिक स्वराज्य संस्था वाढविल्या आणि त्यांच्या हाती अधिक सत्ता दिली. नव्या शहरांचे प्रश्न हे लिबरल पक्षालाच आपला आग्रह सोडण्यास भाग पाडीत होते असे नव्हे. हुजूर पक्षालाही सुधारणावादी भूमिका घेणे अपरिहार्य होत होते. म्हणून डिझरायलीने शहरातील सांडपाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था केली. सरकारने असली गटाराची कामे करण्याबद्दल लिबरल पक्षातीलच काहींनी टीका केली. पण त्यामुळे नवा सामाजिक संदर्भ त्यांच्या लक्षात आला नाही हे स्पष्ट झाले.

लिबरल पक्षाचा प्रभाव कमी होण्यास दोन कारणे झाली. एक तर जो नवा मध्यमवर्ग तयार झाला व वाढला तो शहरांच्या उपनगरात राहू लागला. तेथे नवी संस्कृती निर्माण झाली. या वर्गाला राजकारणात फारसा रस राहिला नाही. दुसरे कारण म्हणजे कामगारवर्गाच्या मागण्या. हा वर्ग असुरक्षित होता. त्याच्या किमान मागण्या मान्य करण्याइतक्या सुधारणा करावयाच्या तर ज्या कारखानदार, तंत्रज्ञ व व्यवस्थापक वर्गाचा या पक्षाला पाठिंबा होता त्यालाच दुखवावे लागणार होते. श्रमजीवी वर्गाच्या परिस्थितीत खऱ्या सुधारणा लिबरल पक्ष करू शकणार नाही अशी भावना पसरू लागली. याच भावनेचा आविष्कार फेबियन्सनी केला व मजूर पक्ष तर उघड उघड लिबरल पक्षाच्या विरुद्ध उभा राहिला. वाढता कामगारवर्ग मजूर पक्षाकडे वळला तर सुखवस्तू मध्यमवर्ग व कारखानदार हुजूर पक्षाला पाठिंबा देऊ लागले. लिबरल पक्षाला यामुळे ओहोटी लागली.

कालचक्र आता वेगळी दिशा घेत आहे. आज हुजूर व मजूर या दोन्ही पक्षांना चाकोरीबाहेर पडता येत नाही. मजूर पक्षात बेन यांचा गट अतिजहाल भूमिका मांडतो. यामुळे समाजकल्याणाची दृष्टी ठेवूनही अर्थव्यवहाराला गती मिळेल, अतिरिक्त राष्ट्रीयीकरणाचा अवलंब करून नोकरशाही वाढेल यासाठी समाजनियंत्रणाचा आधार घ्यावा अशी भूमिका मांडणारा सोशल डेमॉक्रटिक पक्ष लिबरल पक्षाचे साहाय्य घेऊन पुढे येत आहे. लिबरल पक्षाला समाजकल्याणाची दृष्टी स्वीकारणे भाग झाले आहे.

३१-१०-१९८१

राजा राममोहन रॉय

भारतीय प्रबोधनाचे एक प्रमुख प्रवर्तक राजा राममोहन रॉय यांच्या जन्मशताब्दीनिमित्त ७२ साली नेहरू-स्मृती ग्रंथालयातर्फे एक परिसंवाद आयोजित केला होता. त्यात वाचले गेलेले निबंध एकत्र करून या ग्रंथालयाचे प्रमुख श्री. व्ही. सी. जोशी यांनी त्यांचे संपादन केले आहे. एकूण नऊ निबंध वाचले गेले आणि प्रस्तावनेच्या रूपाने रजत राय यांनी आणखी एक निबंध लिहिला आहे. अशा रीतीने दहा निबंधांच्याद्वारे राजा राममोहन रॉय यांची सामाजिक, राजकीय, धार्मिक क्षेत्रातील कामगिरी कोणती याविषयी ऊहापोह केला गेला आहे. राममोहन व त्यांच्या काळातील आर्थिक परिस्थिती, त्यांचे आर्थिक विचार, त्यावेळची स्त्रियांची परिस्थिती; बंगाली भाषेवरील राममोहन यांचा प्रभाव; बंगालच्या प्रबोधनाचे स्वरूप आणि राममोहन यांचे त्यातील स्थान अशा विविध विषयांवर अभ्यासू लेखकांनी आपले निबंध लिहिले असल्याने राममोहन रॉय यांचे कार्य, त्यावेळची बंगालची परिस्थिती याविषयी बरीच नवी माहिती पुढे आली आहे. भारतीय प्रबोधन कार्यातील राममोहन यांचे स्थान पाहता या ग्रंथाचे महत्त्व निर्विवाद आहे.

सतीच्या चालीला विरोध करून तिच्यावर बंदी आणण्याच्या कामात राजा राममोहन रॉय यांचा भाग मोठा होता. यासंबंधातील काही माहिती उद्‌बोधक ठरेल. मध्यभारत व राजस्थानातील राजेरजवाडे, त्यांचे दरबारी, तसेच विजयनगरच्या साम्राज्यातील राजे आणि त्यांचे दिवाण इत्यादींच्या घराण्यात ही सतीची चाल विशेष प्रचलित होती. मोगल साम्राज्याचा ऱ्हास आणि इंग्रजी सत्तेचा १८१८मधील उदय या मधल्या काळात या चालीची भारताच्या काही भागात एकदम वाढ झाली. बंगालसारख्या प्रदेशात इंग्रजी सत्ता लवकर आली. तेथे, तसेच ज्या बनारसच्या आसपासच्या प्रदेशात सामाजिक अभिसरण विशेष प्रमाणात होते त्या भागात, सतीची चाल झपाट्याने पसरली. १८१५ ते १८२७ या काळात ब्रिटिश अधिकाऱ्यांनी बंगाल, मुंबई व मद्रास या प्रांतांची सतीच्या चालीबाबत पाहणी केली तेव्हा प्रांतपरत्वे भिन्न परिस्थिती असल्याचे आढळले. १८१४ ते १८१९ या काळात सर्व मद्रास प्रांतातील सती गेलेल्या स्त्रियांची संख्या बंगालच्या एकट्या हुगळी जिल्ह्यापेक्षा बरीच कमी होती. मंद्रास प्रांताच्या तेलगू भाषिक विभागात सतीची चाल इतर विभागांपेक्षा अधिक होती. मलबारमध्ये तिचा मागमूस नव्हता, कोइमतूर, सेलम वगैरे भागात ती अस्तंगत झाली होती. मुंबई प्रांतात १८१४ ते १८१९ या काळात सती गेलेल्या स्त्रियांची संख्या एकट्या कलकत्ता विभागाच्या निम्म्याने होती. दक्षिण कोकणात

ही चाल विशेष प्रचलित होती. पण महाराष्ट्राच्या इतर भागात ती नव्हती. त्या काळात बंगाल प्रांतात उत्तरप्रदेशही समाविष्ट होता. या सर्व भागात सतीच्या चालीचा जोर होता. कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या जातींत ही चाल नव्हती हे खरे नव्हे; तर सर्व जातींत ती होती. एवढेच नव्हे, तर ब्राह्मण-क्षत्रियांनी आपले पावित्र्य व श्रेष्ठत्व सिद्ध करण्याचे एक साधन म्हणून सतीच्या चालीचा वापर केल्याने कनिष्ठ मानलेल्या जमातीही याच चालीचा अवलंब करू लागल्या अशी माहिती रजत राय यांनी दिली आहे. या वातावरणात राममोहन रॉय यांनी सतीच्या चालीविरुद्ध प्रचार केला आणि मग तीवर बंदी आली.

या संग्रहातील काही लेखक, विशेषत: सुमित सरकार आणि डेव्हिड कॉफ यांनी राममोहन रॉय यांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय कार्याचे व दृष्टिकोणाचे परीक्षण मार्क्सवादी दृष्टीतून केले आहे. आजच्या काळातल्या कसोट्यांवर शंभर वर्षांपूर्वीच्या व्यक्तीच्या कार्याचे मूल्यमापन करणे हे न्याय्य नव्हे. परंतु या दोघांनाही त्याचे भान नाही. दोघांनीही राममोहन रॉय यांचे विचार व आचार यातील विसंगती आवर्जून उल्लेखिली आहे. पण एकतर सामाजिक सुधारणांच्या बाबतीत केवळ राममोहन रॉय यांचाच असा अपवाद होता असे नव्हे, तर राजकीय क्षेत्रातील व्यक्तींचेही विचार व आचार यात तफावत पूर्वीही आढळते व आजही दिसते. वॉशिंग्टन, जेफर्सन इत्यादी स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते, पण ते गुलामगिरीचा पुरस्कार करतात. निदान तिच्याविरुद्ध उभे ठाकत नाहीत. सरकार व कॉफ यांच्या टीकेचा रोख असा, की राममोहन रॉय यांनी वैचारिक प्रबोधनाचे जे काही कार्य केले ते वरिष्ठ वर्गापुरते होते, त्यांच्या सामाजिक चळवळी याच वर्गापुरत्या मर्यादित होत्या; ब्रह्मो समाजाची एकेश्वरवादाची कल्पना ही राममोहन रॉय यांनी पाश्चात्यांकडून घेतली, पण बंगालमधील पूर्वापारच्या एकेश्वरी पंथांची त्यांनी दखल घेतली नाही; लूथरने तत्कालीन सामान्य लोकांच्या भाषेत बायबल पुन्हा लिहून प्रसिद्ध केले पण राममोहन यांची भाषा ही सामान्य जनांची नव्हती, तर उच्चवर्णीय होती; इत्यादी प्रमुख आक्षेप या लोकांनी घेतले आहेत.

आजही आपल्याकडे साक्षरता प्रसार फार झालेला नाही. अशा स्थितीत ज्या लेखणीच्या माध्यमाने राममोहन रॉय नवे विचार प्रसारित करीत होते ते सामान्य जनांना कसे कळणार होते? त्यामुळे राममोहन यांच्या चळवळी वरिष्ठ वर्गापुरत्या मर्यादितच राहणार होत्या. एवढेच कशाला, त्यांच्यानंतर कितीतरी वर्षांनी काँग्रेसची स्थापना झाली तरीही तिचे कार्यक्षेत्र दीर्घकाळ वरिष्ठ वर्गापुरते होते आणि काँग्रेसच्या अधिवेशनात पूर्णत: परकी, म्हणजे इंग्रजी, भाषा वापरली जात होती. गांधीजींपासून काँग्रेसचा पाया विस्तारित झाला व ग्रामीण भागात तिचा व्याप वाढला. जेव्हा केव्हा समाजजागृतीच्या कार्याचा प्रारंभ होतो तेव्हा सुशिक्षित असा मध्यमवर्गच पुढाकार घेतो. या कार्याला व्यापक

अधिष्ठान कालांतरानेच प्राप्त होते. महात्मा गांधीही काँग्रेसच्या चळवळीला लगोलग व्यापक स्वरूप देऊ शकले नाहीत. ते प्राप्त झाले तीस सालानंतर. या स्थितीत राममोहन रॉय यांना दोष देण्यात काय अर्थ आहे? राममोहन यांनी तत्कालीन सामान्य लोकांची भाषा न वापरता संस्कृताधिष्ठित बंगालीचा आश्रय घेतला हे खरे. पण त्यांनी इंग्रजीऐवजी बंगाली आणि पर्शियन या भाषांचा उपयोग केला आणि पाश्चात्य जगातले विचार प्रसृत करण्याचे ठरविले हेच अभिनव होते. त्यांची भाषा संस्कृताधिष्ठित होती हे खरे. पण बंगाली भाषेत याप्रकारच्या लिखाणाचा तो प्रारंभ होता. लूथर हा जर्मन भाषेत लिहिणारा पहिल्या पिढीचा समाजसुधारक नव्हता. इंग्रजी भाषाही एकाएकी व प्रारंभापासून सोपी बनलेली नाही. मिल्टन, कार्लाईल यांची भाषा पहिल्या वा दुसऱ्या महायुद्धानंतरच्या इंग्रजी भाषेप्रमाणे सोपी व सामान्य जनांची नव्हती. म्हणून राममोहन रॉय यांना त्यांच्या संस्कृताधिष्ठित भाषेबद्दल दोष देणे हे योग्य नव्हे. भाषेचा व्यापार जितके अधिक लोक करीत जातील तितकी ती सोपी होत जाते. राममोहन रॉय यांच्या काळी अगदी अल्पप्रमाणातील लोक असा व्यापार करू शकत होते. आणि समजा राममोहन यांनी सोपी, बोली बंगाली भाषा वापरली असती व तीत ग्रंथलेखन वा वृत्तपत्रीय लेखन केले असते तरीही ते त्या काळातील सामान्य बंगाली लोक वाचू शकले असते काय? साक्षरता प्रसारच नसल्याने हे सोपे बंगालीही सामान्य माणसे वाचू शकली नसती.

सुमित सरकार यांनी आणखी काही आक्षेप घेतले आहेत. त्यांच्या मते राममोहन रॉय हे ब्रिटिश साम्राज्यवाद्यांच्या वासहातिक धोरणाचे एक आधार होते. त्या काळात मुक्त व्यापाराचे तत्त्व ब्रिटिश भांडवलवाल्यांच्या पथ्यावर होते आणि या व्यापारात सहभागी होता येत असल्याने राममोहन हे त्या चक्रात सापडले. पण ब्रिटिश सत्ता आल्यावर येथील सामाजिक व अर्थव्यवस्था कोलमडून पडू लागली आणि ती टिकवून धरणे किंवा नव्याने दुसरी व्यवस्था करणे हे राममोहनच काय पण कोणाच्याही आवाक्याबाहेरच होते. ब्रिटिशांनी येथे तांत्रिक शिक्षण न देता पुस्तकी शिक्षण दिले. राममोहन यांनी तांत्रिक शिक्षणाचा आग्रह धरला, पण प्रत्यक्षात मेकॉलेची पुस्तकी शिक्षणपद्धती आली हे खरे आहे. पण राममोहन ती थांबवू शकत नव्हते. तसेच मेकॉलेची पुस्तकी शिक्षणपद्धती आली असली तरी ती मूलत: व पूर्णत: टाकाऊ होती ही कल्पना हास्यास्पद आहे. या पद्धतीनेच जगातील नवे विचार, नवे ज्ञान यांची ओळख झाली. राजकीय स्वातंत्र्य, सामाजिक सुधारणा, समाजस्थितीची चिकित्सा इत्यादी दृष्टी या शिक्षणपद्धतीने आली. फ्रेंच क्रांतीच्या स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या तत्त्वांनी राममोहन रॉय प्रभावित झाले पण या तत्त्वांची ओळख त्यांना इंग्रजी भाषेच्या ज्ञानाने झाली व त्यांचे महत्त्वही यामुळेच जाणवले.

सुमित सरकार काय किंवा कॉफ काय, यांनी मार्क्सवादी दृष्टिकोण स्वीकारूनही राष्ट्रवादाच्या चष्म्यातून राममोहन रॉय यांच्या कार्याचे मूल्यमापन करण्याची कसरत केली आहे. मार्क्सवाद व राष्ट्रवाद यांचा हा संकर हास्यास्पद होऊन त्यातून अनेक तर्कदुष्ट विधाने केली गेली आहेत. टिपू सुलतानाला यश मिळाले असते तर ब्रिटिशांच्या आगमनाने येथे जे आर्थिक व सामाजिक परिवर्तन झाले ते आपोआप झाले असते असे सरकार सांगतात तेव्हा ते मार्क्स विसरले असे म्हणावे लागते. यासंबंधात हे लक्षात घेतले पाहिजे, की आर्थिक स्थित्यंतर हे असे थोड्या काळात व एकाएकी होत नाही. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीच्या पूर्वी बऱ्याच अगोदर तिची पार्श्वभूमी तयार झाली होती. शेतीत सुधारणा प्रथम झाली, तीमुळे मोठा वर्ग रिकामा झाला. त्याचा उपयोग नव्या यांत्रिक व तांत्रिक सुधारणा करण्यासाठी झाला. याचे तपशीलवार विवेचन स्ट्रॅची यांनी 'एन्ड ऑफ द एम्पायर' या ग्रंथात केले आहे. ते वाचल्यावर आपल्याकडील ब्रिटिश साम्राज्यविषयक राष्ट्रवादी टीकेचे वैयर्थ्य लक्षात येते. खुद्द मार्क्सने भारताबद्दल लिहिताना स्पष्ट म्हटले आहे, की इंग्लंडने भारतात सामाजिक क्रांती घडवून आणताना स्वार्थी हेतू बाळगले हे खरे; पण तो मुख्य प्रश्न नाही. इंग्लंडचे गुन्हे कांहीही असोत, ही क्रांती घडवून आणण्याच्या कामी ते इतिहासाच्या हातातील साधन बनले हे लक्षात घेतले पाहिजे असे मार्क्स म्हणतो. ब्रिटिश सत्तेने येथील सामाजिक, राजकीय व आर्थिक व्यवस्था मोडकळीस आणली असली तरी नव्या व्यवस्थेची सुरुवात केली आणि मार्क्स यास अप्रत्यक्ष क्रांतीच म्हणतो. मार्क्सवादी दृष्टीतून राममोहन रॉय यांच्या कार्याची चिकित्सा करताना सरकार यांच्यासारखे अखेरीस सवंग राष्ट्रवादाचा आश्रय करतात हे ऐतिहासिक विवेचनाच्या दृष्टीने उपकारक नाही.

१३-३-१९७६

महात्मा फुले यांचे कार्य

केंब्रिज विद्यापीठाच्या एशियन स्टडी विभागाने महाराष्ट्रातील सत्यशोधक समाज व महात्मा फुले यांचे कार्य यासंबंधी एक संशोधनात्मक ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांच्यात ब्रिटिशपूर्व काळात संघर्ष होता काय, की ब्रिटिश राजवटीत त्याचा जन्म झाला असा प्रश्न लेखिकेने उपस्थित केला आहे. त्याचे पूर्ण उत्तर तिने दिलेले नाही. तथापि ब्रिटिश सत्तेच्या आगमनानंतर महाराष्ट्रात निर्माण झालेला ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद व म. फुले यांचे कार्य याची माहिती दिली आहे. मराठीत यासंबंधी विपुल लिखाण झाले आहे. त्यामुळे निव्वळ मराठी वाचकास त्यात फारसे काही नवीन आढळणार नाही.

मग या पुस्तकाचे महत्त्व काय? तर महाराष्ट्रात जी सामाजिक चळवळ झाली, त्या निमित्ताने जे विचारमंथन झाले त्याची इंग्रजीत नोंद झाली. यामुळे परभाषी लोक हे वाचू शकतात. अर्थात यापूर्वी याविषयी इंग्रजीतून लिखाण झाले नाही असे नव्हे, पण त्या सर्वांची दखल घेऊन लेखिकेने हे पुस्तक लिहिले आहे. शिवाय मराठीतील ग्रंथ व इतर प्रकाशित वाङ्मयाचा आधार घेतला आहे. केंब्रिज विद्यापीठ मुद्रणालयासारखी प्रकाशनसंस्था असल्याने या पुस्तकास परदेशीही वाचक मिळतील. याही दृष्टीने त्याचे महत्त्व आहे. ओरिएंट लॉंगमनने भारतीय आवृत्ती काढली हे बरे झाले.

भारताच्या हिंदी भाषी विभागात सामाजिक सुधारणेची चळवळ अद्यापही झाली नाही. वरिष्ठ जातींचा वरचष्मा कायम आहे. उलट महाराष्ट्र व दक्षिण भारतात राजकीय सत्ता बहुजन समाजाच्या हाती आहे. तिची भावनात्मक आणि वैचारिक अशी तयारी ब्राह्मणेतर चळवळीतून झाली. या पुस्तकाच्या लेखिकेने याची जाणीव ठेवून सत्यशोधक चळवळीचा सामाजिक व ऐतिहासिक संदर्भ निवेदन केला आहे.

वेदोक्ताचे प्रकरण हे लोकमान्यांच्या वेळीच झाले नव्हते. त्याचा प्रारंभ १८२० मध्येच झाला आणि सातारचे महाराज प्रतापसिंह भोसले यांनी यात पुढाकार घेतला होता. वेदोक्ताचा अधिकार मराठा समाजास मिळाला पाहिजे कारण ते क्षत्रिय आहेत आणि क्षत्रियांना हा अधिकार आहे असे त्यांचे म्हणणे होते. यासाठी त्यांनी राजस्थानात आपले दूत पाठविले व शिवाजी महाराजांच्या वेळेपासूनचा इतिहास तपासला. राजस्थानात क्षत्रियांना कोणते अधिकार आहेत हे पाहिले. वेदोक्ताचा अधिकार हा क्षत्रियत्व सिद्ध करण्याचा होता. यास बाळाजीपंत नातू इत्यादींनी तेव्हा विरोध केला. यासाठी ब्राह्मण व उत्तरेतील पंडित यांचे वादसुद्धा प्रतापसिंह महाराजांनी घडवून आणले.

या वादाचा तपशील वाचल्यावर आपल्याला अचंबा वाटतो. वादासाठी थेट पुराणाचा आधार घेतला गेला. परशुरामाने पृथ्वी नि:क्षत्रिय केल्यावर क्षत्रिय उरलाच नाही. मग मराठे कोठले क्षत्रिय? हा ब्राह्मण पंडितांचा सवाल. त्याला उत्तर देण्यात आले. पुढे मराठे हे क्षत्रिय ठरून त्यांना वेदोक्ताचा अधिकार असल्याबद्दलचा जाहीरनामा निघाला. या वादाचा अचंबा अशासाठी की, कोणीही परशुराम अस्तित्वात होता व त्याने पृथ्वी नि:क्षत्रिय केली याला पुरावा काय, परशुरामाची पृथ्वी होती किती आणि ती त्याने नि:क्षत्रिय केली म्हणजे काय केले व कसे शक्य होते याबद्दल प्रश्न, शंका उपस्थित केली नाही. पौराणिक दंतकथांच्या द्वारे ब्राह्मण पंडित वाद घालीत होते व या पुराणांच्याही चौकटीत राहून मराठ्यांना आपला हक्क शाबीत करावयाचा होता. पण या साऱ्या भाकडकथा असून हा काथ्याकूट कशासाठी, असे विचारण्याचे कोणाला सुचले नाही. सर्व समाज अध:पतित झाला होता. अवनत अशा (डेकेडन्ट) समाजाच्या पुढाऱ्यांचा हा एक निष्फळ बौद्धिक खेळ होता आणि तो करून काल्पनिक मोठेपणा, प्रतिष्ठा जपण्याचा हव्यास होता. परशुरामाची कथा हा वादाचा विषय व्हावा हे बौद्धिक अवनतीचे लक्षण होते.

अशा या संघर्षास ब्रिटिश राजवटीच्या काळात जोर आला. त्यावेळी ख्रिस्ती मिशनरी सर्वत्र होते. महात्मा फुले यांच्यावर मिशनरी कार्याचा प्रभाव होता. बायबल वगैरेचे वाचन त्यांनी केले होते. पण मिशनऱ्यांचा प्रभाव पडून ते ख्रिस्ती मात्र झाले नाहीत. इतकेच नव्हे, तर आपल्या समाजास आपणास ख्रिस्ती करावयाचे नाही हे त्यांनी स्पष्टपणे म्हटले होते. वास्तविक ख्रिस्ती धर्मप्रचारक हे ख्रिस्ती पुराणातील सर्व गोष्टी सत्य मानीत. येथील समाजसुधारकांचा हिंदू पुराणांवर कटाक्ष होता तेव्हा ख्रिस्ती पुराण ते प्रमाण मानणे शक्य नव्हते. एक भिक्षुकशाही सोडून दुसरी भिक्षुकशाही जवळ करण्याचे महात्मा फुले यांना मंजूर होण्याची शक्यता नव्हती. लेखिकेने ख्रिस्ती धर्मप्रचारक व येथील सुधारक यांच्यातील हा मतभेद मार्मिकपणे कथन केला आहे. अर्थात काही शिकलेसवरलेले मात्र ख्रिस्ती धर्मप्रचारास बळी पडले.

महात्मा फुले यांनी बहुजनसमाजाची चळवळ ही मराठ्यांपुरती मर्यादित ठेवण्याची दृष्टी बाळगली नव्हती. ते स्वत: माळी होते. आज म.फुले यांचे महात्म्य वर्णन करणाऱ्यांपैकी अनेक मराठा पुढारी माळ्यांशी सख्य करून आहेत असे म्हणता येणार नाही. माळ्यांचा सहकारी साखर कारखाना तो माळ्यांचा म्हणून बाजूला टाकलेला दिसतो. महात्मा फुले यांना या प्रकारचा जातिभेद मान्य नव्हता. त्यांनी अस्पृश्यांच्या उद्धाराचा विचार केला. त्यांना ब्राह्मणांचे वर्चस्व मान्य नव्हते आणि केवळ मराठ्यांचे वर्चस्व असावे हेही मंजूर नव्हते. तेव्हा सुधारकांना आगरकर पचला नाही व पचणारा नव्हता हे टिळकांनी म्हटले होते. त्याचप्रमाणे महात्मा फुलेही आजच्या बहुजनसमाजाच्या पुढाऱ्यांना पचलेले

नाहीत. म. फुले यांच्यावर थॉमस पेनच्या विचाराचा पगडा होता; तो स्वातंत्र्यवादी होता हे लेखिकेने बरोबर दाखविले आहे. लेखिका कोणत्याही एका मतपंथाच्या आहारी गेलेली नाही. येथील राजकारणात व समाजकारणात तिचे हितसंबंध गुंतलेले नाहीत. त्यामुळे वस्तुनिष्ठ विवेचन ती करू शकली आहे.

१६-११-१९८५

रॉय यांचे विचार

मानवेंद्रनाथ रॉय यांच्या तीन पुस्तकांचा परिचय करून घ्यावयाचा आहे. या तिन्ही पुस्तकांची ही दुसरी आवृत्ती आहे. बिऑंड कम्युनिझम व न्यू ह्युमॅनिझम या दोन पुस्तकांत मार्क्सवादाची चिकित्सा असून नवमानवतावादी सिद्धान्ताचे प्रतिपादन आहे. पॉलिटिक्स, पॉवर ॲन्ड पार्टीज यात मार्क्सवाद, संसदीय लोकशाही, पक्षीय राजकारण, राजकारण व नैतिकता इत्यादी विषयांची चर्चा असून नवमानवतावाद्यांनी राजकारणाकडे कोणत्या दृष्टीने पाहावे याबद्दल ऊहापोह केला आहे.

रॉय हे दीर्घकाळ मार्क्सवादी होते आणि मार्क्सवादाचा फेरविचार करण्यास त्यांनी सुरुवात केल्यावरही मार्क्स, रशिया इत्यादींसंबंधात त्यांनी इतर अनेक कम्युनिस्टविरोधकांप्रमाणे भूमिका घेतली नाही व भाषा वापरली नाही. मार्क्सवादाकडून नवमतवादाकडे रॉय वळले यात विशेष नवल घडले असे नव्हे. कारण रॉय यांचा पिंड हा तत्त्वचिंतकाचा होता. त्यामुळे ते सतत स्वत: स्वीकारलेले सिद्धान्त तपासत. शिवाय त्यांना लेनिनप्रमाणे राज्यकारभार करून स्वत:च प्रतिपादन केलेल्या व मार्क्सच्या सिद्धान्तांना बेधडकपणे मुरड घालण्याची आवश्यकता नव्हती. लेनिन तात्त्विक सिद्धान्ताची चर्चा करतो खरा, पण तो मुख्यत: प्रचारक आणि सत्तावादी होता. म्हणून सत्तावादी राजकारणासाठी तो कसलाही विधिनिषेध बाळगत नसे. रॉय यांना सत्तावादी राजकारण करावयाचे नव्हते व त्यांना ते जमणारे नव्हते. या स्थितीत त्यांनी मार्क्सवादाची चिकित्सा करणे अपरिहार्यच होते. रॉय यांचे आणखी एक वैशिष्ट्य लक्षात घ्यावयास हवे व ते म्हणजे मानवतावादाला ते मार्क्सवादी असतानाही महत्त्व देत हे. कम्युनिस्ट क्रांती म्हणजे केवळ रशियन क्रांती एवढेच अनेकजण मानतात. रॉय यांनी फ्रेंच क्रांतीला फार महत्त्व दिले होते व तत्पूर्वीच्या औद्योगिक क्रांतीलाही. या तिन्ही पुस्तकांत त्यांनी अनेकदा मार्क्सवादाची मूळ प्रेरणा मानवतावादी होती, परंतु पुढे मार्क्सही प्रचारक बनला व कम्युनिस्ट पक्षांनी या प्रेरणेलाच सोडचिठ्ठी दिली असे म्हटले आहे.

यात लेनिनचा पुढाकार विशेष होता. रॉय यांनी हे दाखवून दिले आहे की, कामगारवर्ग हा क्रांतीचा अग्रदूत असे मार्क्स मानीत असला तरी या अग्रदूतालाच नियंत्रित करण्याचे कार्य लेनिनने कम्युनिस्ट पक्षावर सोपविले आणि पक्ष हा कामगारवगपिक्षा अधिक शक्तिमान बनविला. कामगारवर्ग स्वत:च्या बळावर, स्वत:च्या बुद्धीने क्रांती करूच शकत नाही. त्याचे नियंत्रण करण्याचे, त्याचे नेतृत्व करण्याचे काम कम्युनिस्ट पक्षाला

करावयाचे आहे हे लेनिनचे मुख्य सूत्र होते. हे नेतृत्व अर्थातच मध्यमवर्गाकडे आले. परंपरागत मार्क्सवादात मध्यमवर्गावर नेहमीच आसूड ओढले आहेत, पण पक्षाला प्राधान्य देऊन लेनिनने या मध्यमवर्गालाच क्रांतीचे नेतृत्व दिले. परंपरागत मार्क्सवादी पठडीचा संरक्षणकर्ता ही भूमिका लेनिनने घेतली होती; पण प्रत्यक्षात मात्र त्याने मार्क्सवादी सिद्धान्त बाजूला ठेवूनच क्रांतीचे तंत्र बसविले.

रॉय मार्क्सचा आर्थिक नियतीवाद मानीत नाहीत. याप्रकारे समाजाची घडण होत नाही. उत्पादनाच्या साधनांचा परिणाम मानवावर होत असला तरी विचार करण्याची शक्ती त्याच्यापाशी असल्याने तो परिस्थितीला वेगळे वळण देऊ शकतो आणि अमूर्त अशा सिद्धान्ताचा वा ऐतिहासिक प्रक्रियेचा तो दास बनतो असे नव्हे हे रॉय यांनी दाखवून दिले आहे. उत्पादनाच्या साधनांचा प्रभाव मानवावर पडतो हे मान्य केले, तरी अगदी प्रथम उत्पादनाचे साधन कोणी व कसे निर्माण केले? या प्रश्नाच्या उत्तरातच आर्थिक नियतीवादाच्या मर्यादा स्पष्ट होतात.

मार्क्सवादी सिद्धान्ताप्रमाणे सरंजामशाहीतून भांडवलशाही व भांडवलशाहीची प्रगत अवस्था म्हणजे कामगारांची हुकुमशाही. रॉय या विचारसरणीतील काही दोष व विसंगती दाखवून देतात. कामगारांची हुकुमशाही स्थापन होऊन साम्यवादी व्यवस्था आली, की प्रगतीचा अखेरचा टप्पा गाठला गेला. या अवस्थेत शासनयंत्रणा विराम पावते. पण रशियन क्रांतीनंतर शासनयंत्रणेचा प्रभाव कमी होण्याऐवजी ती अधिक सर्वंकष व अधिक निर्घृण बनली आहे आणि त्याचेच सर्व तत्त्वज्ञान बनविण्यात आले.

रॉय यांनी आणखी एक विसंगती या संदर्भात दाखविली आहे, की साम्यवादी अवस्था ही जर अखेरची अवस्था असेल तर त्या अवस्थेत मानवाची प्रगती थांबणार असे मानावे लागेल. कारण यानंतर पुढे जावयाचेच नाही. दुसरे असे, की ही जी अत्यंत प्रगत अवस्था ती निर्माण करणार कोण? मार्क्सच्या म्हणण्याप्रमाणे कामगार. पण आर्थिक दुरवस्थेमुळे कामगार हा बौद्धिक व सांस्कृतिकदृष्ट्याही कंगाल बनलेला असणार; तर सांस्कृतिकदृष्ट्या अशी प्रगत अवस्था तो कशी काय निर्माण करणार?

आज मार्क्सवादाची या प्रकारची चिकित्सा नाविन्यपूर्ण नाही. पण ही चिकित्सा रॉय यांनी ४५-४६ सालात केली होती. त्यावेळी हे नाविन्यपूर्ण होते.

याप्रकारे मार्क्सवादाचे विश्लेषण केल्यावर मानव हाच मानदंड मानणारे तत्त्वज्ञान रॉय यांनी प्रतिपादिले. ते परिपूर्ण आहे असे तेच मानीत नव्हते. पण आधुनिक ज्ञानविज्ञानाशी ते अधिक सुसंगत व त्याची अधिक बूज राखणारे आहे. कम्युनिस्ट पक्षाच्या पोलादी चौकटीने काय अनर्थ होतो हे रॉय यांनी पाहिले होते आणि म्हणून त्यांना पक्षीय

राजकारणाच्या मर्यादाच जाचक वाटत होत्या. आर्थिक व राजकीय सत्तेचे केंद्रीकरण मानवाच्या प्रगतीला मारक ठरेल हे त्यांनी जाणले होते. पण विकेंद्रीकरणाच्या रॉय यांच्या कल्पना गांधींप्रमाणे नव्हत्या. प्रस्थापित सामाजिक संबंध कायम राखून पंचायत राज्य आणणे म्हणजे विकेंद्रीकरण नसून ग्रामीण भागातील आर्थिक व जातीय हितसंबंधीच इतरांना दडपणार असे रॉय यांनी म्हटले होते आणि गेल्या तीस वर्षांत त्याचा वारंवार अनुभव आला आहे.

रॉय यांनी लोकशाहीचाच पुरस्कार केला पण अशिक्षित, अज्ञानी समाजात लोकशाहीला झुंडशाहीचे स्वरूप येऊ शकते आणि कोणत्याही कारणाने लोकांना झुलविणारे नेते लोकशाहीचा उपयोग स्वत:ची सत्ता वाढविण्यासाठी करीत असतात. प्लेटोने लोकांना शहाणे करण्याचे, त्यांना विचार करण्यास लावण्याचे महत्त्व प्रतिपादन केले होते. रॉय यांनी खरी लोकशाही दृढ होण्यासाठी याचाच पुरस्कार केला आणि स्वत: याचे उदाहरण घालून दिले. त्यांच्या या विचारांचे सार या तीन पुस्तकांत आहे.

२-५-१९८१

दहशतवादापासून नव-मानवतावादापर्यंत

श्री. मानवेंद्रनाथ रॉय यांचे जीवन व विचार यासंबंधी सध्या उत्सुकता व आत्मीयता निर्माण होऊ लागली आहे. अशा वेळी रॉय चरित्र-ग्रंथ प्रसिद्ध झाला ही उचित गोष्ट असून रॉय व त्यांचे राजकारण, तत्कालीन राजकीय, आर्थिक आणि वैचारिक प्रवाह यांचा अधिक सखोल अभ्यास करणारांना या ग्रंथातील माहितीचा चांगला उपयोग होईल. अनेकांच्या बाबतीत चरित्राचा नायक त्यांना अपरिचित असतो. श्री. व. भ. कर्णिक यांना मात्र रॉय यांचा निकटचा सहवास रॉय भारतात परत आल्यापासून अखेरपर्यंत लाभला होता. तथापि केवळ यावर अवलंबून न राहता कर्णिकांनी भरपूर माहिती गोळा केली आहे आणि म्हणून रॉय यांच्या विचारसरणीचा अभ्यास करणारांची विशेष सोय झाली आहे. सहाशे पानांपेक्षा अधिक पानांचा हा ग्रंथ मोठा खरा; पण दहशतवादी क्रांतिकार्यापासून मेक्सिको, जर्मनी, रशिया, चीन व नंतर भारत अशा देशांतील क्रांतीच्या व स्वातंत्र्यचळवळीच्या कार्यात सहभागी झालेल्या रॉय यांच्या जीवनाचा विचार केला तर एवढा विस्तार अटळ होता हे कोणीही\कबूल करील.

बंगालच्या खेड्यात जन्मलेल्या नरेन्द्र भट्टाचार्य यांचे पुढे एम. एन. रॉय यांच्यात रूपांतर झाले. रॉय यांचे घराणे विद्यासंपन्न होते आणि विद्येचे संस्कार त्यांच्यावर लहानपणापासूनच झाले. वयाच्या तेराव्या चौदाव्या वर्षापासूनच देश स्वतंत्र करण्यासाठी कोणताही धोका पत्करण्याचा मार्ग त्यांनी स्वीकारला. बंकिमचंद्रांच्या 'आनंदमठ' कादंबरीचा तसेच विवेकानंदांच्या शिकवणुकीचाही रॉय यांच्यावर परिणाम झाला होता. पण ते अध्यात्मिक मुक्तीच्या मागे नव्हते. त्यांना देश पारतंत्र्यातून मुक्त व्हावा याची आस होती. यातूनच ते बारिंद्र घोष, जतीनदास इत्यादींच्या सहवासात येऊन दहशतवादी मंडळात सामील झाले. राजकीय दरोडे घालून पैसा व शस्त्रास्त्रे जमा करण्याच्या कामात ही मंडळी गुंतलेली होती. पुढे जर्मनी व जपानशी संधान बांधून मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्रे गोळा करण्यासाठी रॉय यांची जावा येथे रवानगी झाली. यातूनच पुढे ते अमेरिका व मेक्सिकोत गेले. अमेरिकेत लाला लजपतराय तसेच इतर हिंदी क्रांतिकारक यांच्याशी रॉय यांचा संबंध आला. यापैकी अनेक क्रांतिकारक एकमेकांचा द्वेष करण्यात व भांडण्यात गुंतले होते. लाला लजपतराय यांच्या एका सभेत एका कामगाराने ब्रिटिशांचे राज्य जाऊन काळ्या वरिष्ठ वर्गीयांचे राज्य आल्यामुळे सामान्य हिंदी माणसाच्या जीवनात काय फरक पडणार असा प्रश्न विचारला असता लालाजी गरम झाले; पण रॉय अंतर्मुख बनले.

यातूनच मार्क्सवादाच्या अभ्यासाची प्रेरणा मिळाली. मार्क्सवादाच्या अभ्यासाने रॉय यांची दृष्टी बदलली. केवळ शस्त्रास्त्रांच्या जोरावर स्वातंत्र्य मिळवून चालणार नाही तर वैचारिक क्रांती व्हावयास हवी याची जाणीव त्यांना झाली आणि मार्क्सवादाच्या रूपाने त्यांना वैचारिक शस्त्र उपलब्ध झाले. रॉय यांचा कम्युनिस्टांशी संपर्क वाढला. अर्थात् अमेरिकेत राहणेही त्यांना कठीण होऊन त्यांनी मेक्सिको गाठले.

मेक्सिकोच्या समाजवादी अध्यक्षांशी रॉय यांची चांगली मैत्री जमली. इतकी की रशियन प्रतिनिधी बोरोडिन यास रॉय यांचा उपयोग होऊन त्याचे बस्तान त्यांनी बसवून दिले. मेक्सिकोच्या राजकीय जीवनात रॉय यांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते आणि त्यांनी मेक्सिकोतच राहावे असा त्यांना आग्रह होता. पण बोरोडिन याचा आग्रह आणि नव्या साहसी जीवनाची ओढ यामुळे रॉय यांनी रशियाला जाण्याचे ठरविले. अर्थात रशियाला जाणे सोपे नव्हते. म्हणून स्पेन, जर्मनी असा मुक्काम करीत करीतच रॉय मॉस्कोला पोहोचले. तेथे बोरोडिनच्या शिफारसीमुळे त्यांचे नाव झालेले होते आणि मग लेनिनपासून रशियन पुढारीमंडळाशी त्यांचे जवळचे संबंध प्रस्थापित झाले.

रॉय यांच्या बुद्धिमत्तेचा लेनिनवर प्रभाव पडला होता आणि युरोपातील पुढारलेल्या देशांत कम्युनिस्ट क्रांतीची चिन्हे दिसत नसून आशिया खंडातच या प्रकारची क्रांती करता येईल असे त्याचे मत होते. म्हणून यांगत्सी व गंगा नदीवर लंडन, बर्लिन व वॉशिंग्टन यांचा पाडाव करण्याचे त्याचे धोरण होते. रॉय यांनाही हिंदुस्थानात क्रांती घडवून आणावयाची होती व यासाठी रशियाची मदत मिळण्याची त्यांना आशा होती. तथापि या क्रांतिकार्याची वैचारिक बैठक ठरणे आवश्यक होते आणि यातूनच भारत, चीन इत्यादी देशांतील आर्थिक व सामाजिक संबंधांचे विश्लेषण करणे लेनिनला आवश्यक वाटले. लेनिनची भूमिका अशी, की साम्राज्यशाहीविरुद्ध लढा तीव्र करण्यासाठी वसाहतीतील भांडवलदार व मध्यमवर्ग यांच्या लढ्याला पाठिंबा द्यावा. या वसाहतीतील कम्युनिस्ट पक्षांनी कामगार व शेतकरी यांचे सामर्थ्य या कामी उपयोगी आणावे. रॉय यांना या सिद्धान्ताचा काही भाग मान्य होता. पण वसाहतीतील भांडवलदार हे साम्राज्यसत्तेचे विरोधक वा शत्रू नसून ते भागीदार आहेत असे त्यांचे म्हणणे होते. त्याचबरोबर ब्रिटिश आयात निर्यात व्यापाराचा अभ्यास करून रॉय यांनी असे दाखवून दिले की, ब्रिटनमधील भांडवलदारवर्गाला साम्राज्याच्या निकडीच्या गरजा भागवून फार थोडे भांडवल हिंदुस्थानात निर्यात करण्यासाठी उपलब्ध होते. ब्रिटिश भांडवलदारवर्गाने भांडवलनिर्मितीतील उणीव भरून काढली नाही तर साम्राज्याचा डोलारा कोसळेल. निर्यात करण्यासाठी ब्रिटनपाशी भांडवलही कमी आहे. यामुळे हिंदुस्थानातच तेथील भांडवलाच्या जोरावर उद्योगधंदे सुरू करण्याचे धोरण स्वीकारावे लागते. यामुळे हिंदी भांड़वलदार वर्ग राष्ट्रीय चळवळीविषयी उदासीन आहे व तो अधिक उदासीन होईल. यासाठी हा वर्ग

साम्राज्यविरोधी लढा उभारील व त्यास कामगार व शेतकरी यांनी पाठिंबा देण्याचा प्रश्न निर्माण होईल असे नव्हे, तर या वर्गांनी आपणच लढा उभारला पाहिजे. लेनिन व रॉय यांच्या विचारसरणीत हा फरक होता. कम्युनिस्ट काँग्रेसने लेनिन व रॉय यांचे दोन्ही सिद्धान्त स्वीकारले.

या पुस्तकातील आकडेवारी ही फारशी विश्वासार्ह नव्हती असे रॉय यांनी नंतर म्हटले असले तरी मूळ सिद्धान्त त्यांनी बदलला नाही. त्यांना मदत करणारे मुखर्जी यांनी आकडेवारी देताना घोटाळे केले होते. तथापि ब्रिटनची भांडवलनिर्यातीची कुवत कमी झाल्याचा जो मूळ सिद्धान्त रॉय यांनी मांडला होता, तोच प्रा. नी. वि. सोवनी यांनी 'नवभारत'च्या पारीख-विशेषांकात खोडून काढला आहे. पहिल्या महायुद्धानंतर ब्रिटनची भांडवलनिर्यात कमी झालेली नाही. साहजिकच निर्वसाहतीकरणाच्या सिद्धान्ताचा आर्थिक पाया कोसळतो. कर्णिक यांच्या ग्रंथात याची दखल घेतलेली नाही. तसाच विचार केला तर हिंदी लोकांना राजकीय क्षेत्रात हळूहळू भागीदार करण्याचे धोरण ब्रिटन का व कसे अमलात आणीत होते याचा विचार केला तर लेनिन, रॉय व इतर कम्युनिस्ट यांच्या सिद्धान्तांना धक्काच बसतो.

वसाहतीच्या स्वातंत्र्याची चळवळ आणि कम्युनिस्टांची भूमिका यासंबंधी दोन वेगवेगळे प्रबंध कम्युनिस्ट काँग्रेसने स्वीकारले व पुढे लेनिनने रॉय यांची ताश्कंद येथे लष्करी व राजकीय शिक्षण देणाऱ्या विद्यालयावर प्रमुख म्हणून नेमणूक केली. तेथे रॉय यांनी अनेक हिंदी, अफगाण वर्गीरेना शस्त्रास्त्रांचे आणि कम्युनिस्ट विचारसरणीचे शिक्षण दिले. शस्त्रास्त्रांचा बराच साठा येथे होता व तो भारतात पाठवावयाचा होता. पुढे लेनिननंतर स्टालिन रशियाचा सर्वाधिकारी झाला. रॉय व त्याचे संबंधही उत्तम होते. पण भारतात शस्त्रे पाठविण्याचा कार्यक्रम रद्द झाला. रॉय यांच्यामुळे ब्रिटनशी संबंध बिघडू नये म्हणून त्यांना प्रथम जर्मनी व नंतर चीनला धाडण्यात आले. चीनमधील क्रांतीबाबतही त्यांचे व बोरोडिन यांचे मतभेद होते. त्या काळात रॉय यांना अनेक महत्त्वाचे अनुभव आले. स्टालिनने त्यांचा प्रथम पाठपुरावा केला होता. पण चीनहून परतल्यावर स्टालिनने भेटही नाकारली. पुढे त्यांच्या निर्वासहतीकरणाच्या सिद्धान्तावर एका सामान्य हिंदी कम्युनिस्ट कार्यकर्त्याकडून टीका झाली. रॉय यांच्या या काळातील कार्याची, भूमिकेची सविस्तर माहिती कर्णिक यांनी दिली आहे. स्टालिनच्या बदललेल्या भूमिकेमुळे रॉय अंतर्मुख झाले. पण ते त्याचे विरोधक बनले नाहीत. त्यांनी जर्मनीला प्रयाण केले तेव्हा ते आजाराने अशक्त बनले होते आणि नंतर कालांतराने ते हिंदुस्थानात गुप्तपणे आले व मुंबईत वावरू लागले. तत्पूर्वी त्यांच्याशी संपर्क ठेवून कम्युनिस्ट चळवळ वाढविल्याबद्दल मीरत खटला उभा राहिला होता आणि डांगे प्रभृतींना शिक्षाही झाली होती. पण रशियन नेत्यांनी रॉय

यांना वाऱ्यावर सोडल्यावर येथील कम्युनिस्ट पक्षाने त्यांच्याविरोधी पवित्रा घेतला तर नवल नव्हे.

रॉय यांनी भारतात गुप्त वेषाने काही काळ काढला, पण ते अखेर पकडले जाऊन त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला झाला आणि सव्वापाच वर्षांनंतर ते बाहेर आले. कम्युनिस्ट पक्षाने त्यांना बहिष्कृत ठरविले होते व रॉय यांचेही त्याच्याशी जमणारे नव्हते. त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आणि काँग्रेसचे नेतृत्व क्रांतिवादी बनविण्याच्या प्रयत्नाला ते लागले. त्यांचे प्रथम काँग्रेसच्या नेतृत्वाने स्वागत केले. पण थोड्याच दिवसांत त्यांना बाजूला करण्याचे प्रयत्न सुरू झाले. रॉय यांनी 'इंडिपेंडंट इंडिया' हे साप्ताहिक सुरू केले तेव्हा पं. नेहरू, सुभाषचंद्र इत्यादींनी शुभसंदेश धाडले, पण गप्प राहूनच तुम्ही देशसेवा करावी असा गांधींचा उपदेश होता! गांधींचे धोरण व मार्ग रॉय यांना अमान्य होते आणि ते आपली मते स्पष्टपणे मांडीत. गांधींचे नेतृत्व बदलणे रॉय यांना या देशात शक्य नव्हते आणि गांधींनी बुद्धिवादापेक्षा आतला आवाज प्रमाण मानला होता व हा आवाज फक्त आपल्यालाच ऐकू येतो असे त्यांनी अँड्रूज यांना सांगितले होते.

आतल्या आवाजाचे हे तंत्र कोणालाही असहिष्णु बनविते. गांधींनी इन्डिपेंडंट इंडिया बंद करावा ही सूचना केली याचे कारण त्यांच्या आतल्या आवाजाला रॉय यांचा आवाज मानवणारा व मान्य होणारा नव्हता.

नेहरूंनाही गांधींचे धोरण पसंत नसे, पण त्यांनी विशिष्ट मर्यादिपलीकडे न जाण्याचे ठरविले होते. रॉय यांनी मतभेदाची तड गाठण्याची भूमिका घेतली. पुढे युद्धविषयक धोरणाबाबत हे मतभेद विकोपाला गेल्याने रॉय यांना काँग्रेसबाहेर जाणे भाग होते. दुसरे महायुद्ध हे फासिस्टविरोधी आहे ही रॉय यांची मीमांसा होती. काँग्रेसने ते साम्राज्यवादीच ठरविले. युद्धानंतर ब्रिटनमध्ये नव्या शक्ती पुढे येतील आणि चर्चिल यांचे काही न चालून हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळेल, असेही रॉय म्हणत होते. शेवटी तसेच झाले. तथापि युद्धसहकार्याची भूमिका येथे लोकांना मान्य नव्हती आणि लोकांवर प्रभुत्व नसल्याने ब्रिटिश सरकारनेही वाटाघाटींच्या वेळी रॉय यांना महत्त्व दिले नाही. काँग्रेस पुढाऱ्यांशी सत्तासंक्रमणाच्या वाटाघाटी होतात याबद्दल रॉय टीका करीत, पण काँग्रेसला येथे क्रांती नको होती. येथील आर्थिक व सामाजिक धंद्यात उत्पात व्हावयास नको होता, त्याचप्रमाणे ब्रिटिशांनाही नको होता. दोघांनीही तडजोडीचा मार्ग स्वीकारल्यानंतर जे घडले तेच घडणे अटळ होते.

स्वातंत्र्य येण्यापूर्वीच रॉय यांनी आर्थिक नियोजनाचे विचार मांडले व त्यांच्या शिष्यांनी जनता योजना तयार केली. राज्यघटनाही रॉय यांनी तयार केली होती. तथापि

आर्थिक, राजकीय व सामाजिक हितसंबंधांची अमूलाग्र फेरमांडणी रॉय करू पाहात असले तरी देशाच्या नव्या नेत्यांना हे करावयाचे नसल्याने त्यांनी हे संबंध फारसे न दुखवता जे करता येईल ते करण्याचे ठरविले होते. सध्याची परिस्थिती हे याचे फलित आहे.

रॉय यांचा पिंड विचारवंताचा होता व त्यामुळे त्यांचा वैचारिक प्रवास थांबला नाही. युद्ध व युद्धोत्तर परिस्थिती यांचा अभ्यास करताना त्यांना मार्क्सवादाच्या मूल सिद्धान्ताचेच परीक्षण करणे आवश्यक वाटले आणि मार्क्सवादापलीकडे जाण्यावाचून गत्यंतर नाही अशी खात्री पटली. यानंतर त्यांनी नवमानवतावादाची तत्त्वे प्रतिपादन केली. कर्णिकांनी हा सर्व भाग विस्ताराने वर्णन केला आहे. मार्क्सवादाचा फेरविचार करूनही रॉय यांनी स्टालिनविरोधकाची भूमिका घेतली नाही. आता स्टालिनच्या राजवटीवर प्रकाश टाकणारे साहित्य प्रसिद्ध होत असता रॉय यांची स्टालिनविषयीची मीमांसा पटत नाही. त्यांनी मार्क्सवादाचे जे विश्लेषण केले आहे ते सर्वमान्य होण्यासारखे आहे.

सध्या खरी लोकशक्ती कशी निर्माण होईल, लोकांचे राजसत्तेवर वर्चस्व कसे राहील याची बरीच चर्चा चालू आहे. त्या संदर्भात राज्यघटना व आर्थिक नियोजन यांच्यासंबंधातील रॉय यांच्या विवेचनाची गंभीरपणे दखल घेतली जाणे इष्ट ठरेल.

दहशतवादापासून नवमानवतावादापर्यंत रॉय यांचा वैचारिक प्रवास झाला होता. या प्रवासाचा आलेख कर्णिक यांनी काढला असून काटेकोरपणे माहिती दिली आहे. मार्क्सवादाला विरोध हाही तात्त्विक दृष्टीनेच केला पाहिजे हे रॉय यांनी दाखवून दिले असून कोणत्याही सर्वकष तत्त्वज्ञानाचा वैचारिक पाया यामुळे उखडता येतो. रॉय यांची ही मोठी देणगी आहे.

११-३-१९७८

सामान्यांच्या प्रतिक्रिया

ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसतर्फे 'सबाल्टर्न स्टडीज' या नावाची एक ग्रंथमाला प्रसिद्ध होत असते. या मालेतील पाचवा खंड बाहेर आला आहे. भारत व दक्षिण आशिया यांचा पारतंत्र्याच्या व स्वातंत्र्याच्या काळातील इतिहास असे या ग्रंथमालेचे स्थूल स्वरूप सांगता येईल. हा इतिहास राष्ट्रवाद, साम्राज्यवाद वा मार्क्सवाद यांचा स्वीकार करून लिहिलेला नाही. त्याचा रोख मोठे पुढारी व संघटना यांच्या कार्यावर नसून सामान्य लोकांच्या विशिष्ट परिस्थितीत काय प्रतिक्रिया झाल्या, त्यांच्यावर कोणते परिणाम झाले हे स्पष्ट करण्यावर आहे. म्हणूनच सबाल्टर्न स्टडीज असे या ग्रंथमालेचे नाव आहे. पाचही खंडांचे संपादक एक असले तरी लेखक अनेक आहेत. त्या सर्वांचा समान दृष्टिकोण आहे, असे नव्हे. या निमित्ताने अनेकविध क्षेत्रातील माहिती पुराव्यासह पुढे येते हे विशेष महत्त्वाचे.

पाचव्या खंडात ब्रिटिश काळातील मद्रास प्रांतातील पोलिसदलाची चर्चा आहे. त्याचप्रमाणे दक्षिण गुजरातमधील मद्यप्राशनाचीही आहे. उत्तर प्रदेशात कुमाऊँ भागामध्ये व्यापार तत्त्वावर जंगलांची वाढ करण्याचे धोरण ब्रिटिशांनी आखले तेव्हा आदिवासींची प्रतिक्रिया काय होती, याची एका निबंधात माहिती आहे. तर बंगालच्या मालदा जिल्ह्यातील संथाळांच्या उठावाची पार्श्वभूमी दुसरा एक निबंध स्पष्ट करतो. १८५७ च्या उठावातील प्रमुख व्यक्तींबद्दल बरेच लिहिले गेले आहे. पण मीरत वगैरे भागातील चार जणांनी कोणते कार्य केले, याबाबत एक निबंध आहे. एक जमीन मालक, मौलवी, एक आदिवासी यांच्या कार्याचे मूल्यमापन हा निबंध करतो. ईस्ट इंडिया कंपनीचे कारभारी म्हणून काही इंग्रज इकडे आले. त्यातील काहींनी संस्कृत, पर्शियन व अरेबिक भाषांचा अभ्यास केला. स्थानिक भाषा शिकत असतानाच त्यांनी येथे अधिकाराची, कारभाराची भाषा ठरविली. हे कसे होत गेले यावर एक निबंध प्रकाश टाकतो.

मद्रासच्या पोलिसदलाचा ब्रिटिशांच्या काळातील इतिहास पाहिला तर असे दिसते की अगदी अव्वल इंग्रजी अमदानीत या दलात मुसलमानांचा भरणा मोठा होता. पण कोणत्याही एका समाजाचे वर्चस्व राहू नये म्हणून मग प्रयत्न सुरू झाले. प्रारंभी अनेक वर्षे साधे पोलिस शिपाई हे निरक्षर होते. त्यांना मग शिकविण्याची व्यवस्था केली गेली व किमान शिक्षण घेतलेल्यांचा भरणा सुरू होऊ लागला. इन्स्पेक्टर इत्यादी वरच्या हुद्यावर हिंदी लोकांना दीर्घकाळ नेमले जात नव्हते. पण सामान्य शिपाई हे सामान्य वर्गातून येत. या निबंधात एक लक्षात घेण्याजोगा मुद्दा मांडला आहे, तो म्हणजे सामान्य शिपायांची

वृत्ती. खालच्या वर्गातून आलेल्या, कमी प्राप्ती असलेल्या शिपायांना सामान्य जनतेबद्दल आपुलकी वाटेल, अशी सर्वसाधारण समजूत असते. पण ते खोटे ठरले आहे. गणवेश घातलेला शिपाई हा आपली पार्श्वभूमी विसरतो आणि आपण अधिकारी आहोत हे लक्षात घेऊन तो अधिकार गाजवितो. लाठीमार वगैरे करताना तो दयामाया दाखवीत नाही. समान वर्गामुळे त्यास आत्मीयता वाटते हे खरे नव्हे.

दक्षिण गुजरातमधील सामान्य लोक ब्रिटिश येथे येण्यापूर्वीपासून ताडी पीत. ताडाची झाडे सर्वत्र होती आणि बहुतेक जण आपापल्या झाडाची ताडी पीत. ताडी हे एक प्रकारे गरिबांना अन्न होते. ब्रिटिश येथे आल्यावर त्यांनी काहीकाळ ताडीबाबत हस्तक्षेप केला नाही. पुढे ताडाच्या झाडावर कर बसविण्यात आला. त्याचप्रमाणे मोहाच्या फुलांपासून दारू गाळण्यास उत्तेजन देण्यात आले. ताडीविक्रीचीही दुकाने निघू लागली. हा उद्योग पारशी लोकांकडे असे. संबंधित अधिकाऱ्याच्या धोरणाप्रमाणे ताडी व दारू याबाबत सरकारी हुकूम बदलले जात. प्रिचर्ड या अधिकाऱ्याने ताडाच्या झाडांवर बराच कर बसविला व ताडीवरील अबकारी कर वाढविला. अनेक आदिवासी फुकट ताडी पिऊ शकत होते ते बंद झाले. प्रिचर्डने मोहाची दारू करण्यास उत्तेजन दिले. दारूचा मक्ता दिला. ताडी महाग झाली. यास लेली नावाच्या अधिकाऱ्याने विरोध केला. त्याला ताडीसंबंधीचे पूर्वीचे धोरण योग्य वाटत होते. ताडी व दारू महाग वाटू लागली तेव्हा बेकायदा दारू गाळण्यास प्रारंभ झाला. शिवाय दीव-दमणमधून दारू येई ती स्वस्त होती. मद्यपानाचा सामूहिक निषेध म. गांधींच्या चळवळीपासून सुरू झाला. यास फार यश आले असे नव्हे. स्वातंत्र्यात गुजरातने दारूबंदी स्वीकारली. ती अयशस्वीच ठरली.

१८५७ च्या उठावातील चौघांची कामगिरी एका निबंधात आहे. शाहमल, देवीसिंग, मौलवी अहमदुल्ला शाह आणि गोनू. शाहमल हा बारूत तहसिलीमधील, देवीसिंग हा मथुरेजवळ, गोनू हा छोटा नागपूर भागातील, मौलवी अहमदुल्ला शाह हा मूळ हैद्राबादचा. नंतर तो फैजाबाद येथे स्थायिक झाला. चौघही ज्या भागात राहात तो बागायती होता.

शाहमलचे बंड हे स्थानिक स्वरूपाचे होते पण त्याने आपल्या आसपासच्या विभागावर कब्जा बसवून ब्रिटिशांना टक्कर दिली. त्यांची सत्ता काही काळ अस्तित्वात नव्हती. त्याच्या ताब्यातल्या भूप्रदेशावर तो पूर्णतः राज्य करीत असे. शाहमल यास लोकांचा पाठिंबाही मोठ्या प्रमाणात होता. जाट, रजपूत व इतर जमातींचे एकमेकात वैर असले तरी कंपनी सरकारविरुद्ध सर्व एक झाले होते. शाहमलला जिवंत वा मेलेला पकडण्यासाठी एक हजार रुपयांचे बक्षीस लावलेले होते. पुढे ब्रिटिश सैनिकाच्या गोळीला तो बळी पडला. त्याचे मुंडके फिरविण्यात आले. पण बंडखोरीचे प्रतीक म्हणून स्थानिक लोक त्याकडे पाहात.

देवीसिंगाने ज्या भागावर आपली हुकमत बसविली होती तेथील सावकार, व्यापारी यांना तो लुटत असे. कंपनीचे स्थानिक अधिकारी पराभूत झाले तेव्हा आपण जिंकलो अशा समजुतीत तो असतानाच त्याच्यावर अधिक सैनिक चालून आले व तो मारला गेला.

गोनू हा साधा शेतकरी होता. तो उठावात सामील झाला. त्याने ब्रिटिशांना खबर देणारांना दहशत बसविली.

मौलवी अहमदुल्ला शाह याने इराण, अरबस्थान, इंग्लंडपर्यंत प्रवास केला होता. त्याच्यावर लोकांचा विश्वास होता. मुसलमानांना वाटे की त्याच्यापाशी दैवी शक्ती आहे. सामुदायिकरीत्या ब्रिटीशांविरुद्ध संघर्ष केला पाहिजे असे तो म्हणत असे. जिहादचा पुकारा त्याने केला होता आणि शरीयतप्रमाणे राज्य स्थापन झाले पाहिजे असे तो म्हणे. यामुळे इतर तिघांपेक्षा तो वेगळ्या वर्गात पडतो.

अशी विविध प्रकारची माहिती दस्तऐवजी पुराव्यासह देणाऱ्या लेखांचा हा संग्रह वाचनीय झाला आहे.

७-६-१९८६



ब्रिटिश राजवटीचा उल्लेखनीय अभ्यास

हिंदुस्थानवरील ब्रिटिश साम्राज्यसत्तेचा अंत १९४७ साली झाला असला तरी १९१३ पासून येथे राज्यकारभार करणे ब्रिटिशांना परवडेनासे झाले. या राज्याच्या आर्थिक बाजूचा अभ्यास करून साम्राज्यसत्ता संकोच पावत ती अखेरीस कशी नष्ट झाली याचे दिग्दर्शन प्रा. टॉमलिन्सन यांनी केले आहे. व्यापार व उद्योगात येथे भागीदार निर्माण झाले आणि निर्वसाहतीकरणाला (डीकॉलनायझेशन) सुरुवात झाली असे मानले जाते. आर्थिक सत्तेच्या भागीदारीचा परिणाम राजकीय भागीदारीत झाला व भागीदारीचा पुढे साम्राज्यसत्तेचा अंत होण्यात झाला. मानवेंद्रनाथ रॉय यांनी निर्वसाहतीकरणाचा हा सिद्धान्त विस्तृतपणे मांडला आहे.

पहिल्या महायुद्धापासूनच्या कालाचा आढावा घेतल्यास निर्वसाहतीकरणाचे ध्येय पत्करून आर्थिक व राजकीय बाबतीत भागीदारी करण्याची योजना ब्रिटिशांनी राबविली असे नव्हे. तसेच जगात इतरत्र साम्राज्यासंबंधी समान धोरण होते असेही नव्हे. १८४१ ते ७१ या काळात ब्रिटनने गोल्डकोस्ट, पंजाब, सिंध, हाँगकाँग, वऱ्हाड, अवध, ब्रह्मदेशचा काही भाग, कोवलून व सिएरा लेओन हे भाग ताब्यात घेतले. पण त्याच काळात कॅनडा, न्यू बर्नस्विक, नोव्हास्कोटिया, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया व केप वसाहत यांना स्वायत्त सरकार दिले. १८८० नंतर आफ्रिकेत ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार झाला असला तरी त्याच खंडातील इतर काही वसाहतींना स्वातंत्र्य देण्यात आले.

येथे जे ब्रिटिश अधिकारी आले त्यातले अनेकजण बऱ्याचवेळा हिंदुस्थानच्या वतीने ब्रिटिश सरकारशी वाद घालताना दिसतात. विशेषत: आर्थिक बाबतीत अनेक व्हाइसरॉय व अर्थसचिव यांनी ब्रिटिश सरकारचे आयातनिर्यात धोरण, जकाती आणि हुंडणावळीचा दर या संबंधात हिंदुस्थानवर कसा अन्याय होत होता हेच पुराव्यानिशी मांडले आहे. ज्या प्रमाणात येथे नवे उद्योग निघाले, व्यापार वाढला त्या प्रमाणात ब्रिटिश कारखानदार व सरकार यांच्याबरोबरचा झगडाही वाढला. टॉमलिन्सन यांनी याचा तपशील दिला आहे. अखेरच्या काळात पौंडी गंगाजळीचा प्रश्न हा हिंदुस्थान सरकार व ब्रिटिश सरकार यांच्यातील वादाचा विषय झाला होता. लिनलिथगो व वेव्हेल यांनी चर्चिल यांना विरोध करून पौंडी गंगाजळी हिंदुस्थानला मिळाली पाहिजे आणि युद्धाचा खर्च म्हणून ती रद्द करता कामा नये ही भूमिका घेतली व त्यात ते यशस्वी झाले.

जागतिक, आर्थिक व व्यापारी परिस्थितीचाही हिंदुस्थानच्या अर्थकारणावर परिणाम होत होता. २० ते ३० या सालात कच्च्या मालाच्या किंमती घसरल्या. हिंदुस्थान त्या काळात कच्चा मालच मुख्यत: पैदा करीत होता. त्याच्याच किंमती घसरल्याने ब्रिटिश साम्राज्याची अर्थव्यवस्था कमकुवत झाली. पाश्चात्य जगात मंदीची लाट आली आणि या मंदीच्या गंभीर परिणामांपासून हिंदुस्थानला वाचविणे ब्रिटिश सरकारला जमले नाही. त्यामुळे आपोआपच येथील कारखानदार व व्यापारीवर्ग सरकारपेक्षा काँग्रेसकडे वळला. शेतीच्या किंमती घसरल्यानंतर ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक खिळखिळी झाली. कुळे आपला खंड भरू शकत नव्हती तर जमीनमालकांना महसूल देणे कठीण झाले. या स्थितीत ग्रामीण भागात तट पडू लागले. ज्यांच्यापाशी थोडीफार मालमत्ता होती, जमीन होती ते सरकारकडे स्थैर्यासाठी व आश्रयासाठी पाहू लागले. ग्रामीण भागात कर्जबाजारीपणा वाढला. ३० सालनंतर काही प्रांतिक सरकारांनी कर्जबाजारीपणा कमी करण्याचे थोडे उपाय योजले आणि जमीन महसूल दिला नाही म्हणून जमिनी जप्त होणार नाहीत यासाठी काही उपाय योजले. ३५ च्या कायद्याखाली प्रांतिक सरकारे आली तेव्हा जमीनविषयक खटले मिटविण्यासाठी कायदेशीर तरतूद केली गेली.

या प्रकारच्या विकास न होणाऱ्या अर्थव्यवस्था असलेल्या देशावर राज्य करणे अनेक दृष्टीने ब्रिटिशांना परवडेना. राजकीय विरोध वाढलेला होता आणि युद्धाचा परिणाम होऊन राज्यकारभार सुरळीतपणे करणे कठीण झाले. ब्रिटनमध्ये युद्धानंतर नव्या प्रवृत्ती पुढे आल्या. त्यांचे प्रतिनिधित्व मजूर पक्ष करीत होता. स्वतंत्र भारताशी व्यापारी संबंध अधिक हितकारक ठरतील असे ४२ साली परराष्ट्रमंत्री बेव्हिन यांनी म्हटले होते. झालेही तसेच. भारत स्वतंत्र झाल्यावर त्याचे व ब्रिटनचे आर्थिक संबंध वाढले, ब्रिटनची येथील गुंतवणूक वाढली. वसाहत संपुष्टात आली, पण निर्वसाहतीकरणाने परकी भांडवल वा ब्रिटिश भांडवल येथून नष्ट झाले नाही. टॉमलिन्सन यांनी हे सर्व आकडेवारीसह सिद्ध केले आहे. ब्रिटिश राजवटीचा एका वेगळ्या दृष्टीतून केलेला हा अभ्यास उल्लेखनीय आहे.

१-३-१९८०

काँग्रेस व ब्रिटिश सरकार

स्वातंत्र्यपूर्व भारताविषयी पाश्चात्य अभ्यासकांचे ग्रंथ प्रसिद्ध होत असून टॉमलिन्सन यांचा 'द इंडियन नॅशनल काँग्रेस ॲन्ड द राज' हा यापैकीच एक ताजा ग्रंथ. टॉमलिन्सन यांनी २९ ते ४२ हा काळ निवडला आहे. या काळात मॉन्टेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा राबवून त्यांचे अपूर्णत्व सिद्ध झाले आणि नवा सुधारणा कायदा करणे अपरिहार्य बनले. त्यामुळे ३५चा कायदा आला आणि तो अल्पकाळ राबवला गेला नाही तोच दुसरे महायुद्ध सुरू झाले. या काळात काँग्रेसचे अंतर्गत राजकारण काय होते याविषयी टॉमलिन्सन यांनी बराच प्रकाश टाकला आहे. ३५च्या कायद्याखालील निवडणुकीपूर्वीच ३० व ३२ साली जे सत्याग्रह झाले आणि त्यातून गोलमेज परिषदांची निष्पत्ती झाली त्यामुळे काँग्रेस ही अशी शक्ती होऊन बसली, की तिच्याविना घटनात्मक प्रश्न सोडविणे अशक्य बनले. अर्थात ब्रिटिश सरकारने मुसलमान, इतर अल्पसंख्य जाती व संस्थानिक यांच्या हितसंबंधांची जपणूक करण्याच्या नावाखाली काँग्रेसच्या शक्तीला सुरुंग लावण्याचे भरपूर प्रयत्न केले. पण ते करूनही काँग्रेसला टाळून घटनात्मक पेचप्रसंग सोडविणे सरकारला शक्य नव्हते. ३५सालच्या कायद्याखाली ज्या निवडणुका झाल्या त्यांनी तर काँग्रेसची शक्ती सर्वार्थाने वाढली; पण त्याच सुमारास जीनांच्या नेतृत्वाखाली मुस्लिम लीग अधिक चढाईखोर बनली आणि तिने पाकिस्तानची मागणी जोरदारपणे मांडण्यास सुरुवात केली.

पहिल्या महायुद्धानंतर हिंदुस्थानात राजकीय सुधारणा अमलात आणणे अपरिहार्य झाले. त्याप्रमाणे मॉन्टेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा आल्या व द्विदल राज्यपद्धती आली. ती हिंदी लोकांच्या आकांक्षा पुऱ्या करण्यास असमर्थ आहे हेही लगेच सिद्ध झाले. यातूनच २४ साली मडीमन समिती नेमली गेली. तिने तत्कालीन कायद्यातील उणिवा स्पष्ट केल्या. या स्थितीत सायमन कमिशनची नेमणूक झाली. हे कमिशन केवळ ब्रिटिश सदस्यांचे होते. काँग्रेसने त्यावर बहिष्कार टाकला. कमिशन काय, की ब्रिटिश सरकार काय यांनी नवा घटना-कायदा करताना मुस्लिम हितसंबंध जपण्याचे धोरण ठरविले होते. संघराज्य स्थापन करावे हा सरकारचा हेतू. मुस्लिम सदस्यांनी पहिल्या गोलमेज परिषदेत संघराज्याला विरोध केला. पण जेव्हा प्रांतिक स्वायत्ततेच्या काळात आपले संबंध जपले जातील याची त्यांना कल्पना आली तेव्हा त्यांनी आपला पवित्रा बदलला. जातीय निवाडा देऊन ब्रिटिश सरकारने मुसलमानांना एकप्रकारे आश्वासनच दिले.

या काळात ३०-३२ साली महात्मा गांधींनी सत्याग्रहाची मोहीम केली. पहिल्या चळवळीनंतर गांधी-आयर्विन करार झाला. यासंबंधात टॉमलिन्सन यांनी दिलेली माहिती उद्‌बोधक ठरेल. डॉ. एस. गोपाळ यांनी 'द व्हाइसरॉयल्टी ऑफ लॉर्ड आयर्विन' या आपल्या पुस्तकात आयर्विन यांच्या नैतिक भूमिकेची प्रशंसा केली आहे. १९१७ च्या ब्रिटिश सरकारच्या धोरणविषयक निवेदनाचे उद्दिष्ट भारताची घटनात्मक प्रगती वसाहतीच्या स्वातंत्र्याच्या दिशेने व्हावी हे असल्याचे आयर्विन यांनी जाहीर केले खरे, पण टॉमलिन्सन यांनी हे दाखवून दिले आहे, की आयर्विन हे वारा येईल तशी पाठ फिरवीत होते. भारतीय जनतेला त्यांनी वसाहतीच्या स्वातंत्र्याचे आमिष दाखविले खरे, पण बाल्डविन यांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी वसाहतीच्या स्वातंत्र्याची ब्रिटिशांची कल्पना व हिंदी लोकांची कल्पना वेगळी असल्याचे म्हटले. एवढेच नव्हे, तर भारतास वसाहतीचे स्वातंत्र्य नजीकच्या काळात मिळण्याची शक्यता नाही असेही त्यांनी बाल्डविन यांना लिहिले होते. लॉर्ड सॉल्सबरी यांनाही त्यांनी याच अर्थाचे पत्र लिहिले. उलट महात्मा गांधींना मात्र त्यांनी आश्वासन दिले की, वसाहतीचे स्वातंत्र्य भारताला मिळेल व बाल्फर जाहीरनाम्याप्रमाणेच या स्वातंत्र्याचे स्वरूप राहील. ही उघड उघड थाप होती. म्हणजे सत्‌चरित म्हणून ज्या आयर्विन यांची प्रतिमा आजवर रेखाटली गेली ती खरी नव्हती. ते हिंदी नेत्यांना व ब्रिटिश सरकारला एकाच वेळी वेगवेगळ्या गोष्टी सांगत होते.

या पार्श्वभूमीवर गोलमेज परिषद व नंतरचा ३५ सालचा कायदा यांची तपासणी करावयास हवी. हिंदी नेते केवळ प्रांतिक स्वायत्तता मागत नव्हते. त्यांना केंद्रातही सत्ता हवी होती. पण ब्रिटिश सरकार ३५ च्या कायद्याखालीही केंद्रात लोकप्रतिनिधींना सत्तेत भागीदार करावयास तयार नव्हते. प्रांतिक स्वायत्ततेमुळे मुसलमानांच्या मागण्या पुऱ्या करता येतील. निदान त्यांना संरक्षण मिळेल अशी ब्रिटिश सरकारची कल्पना होती. पण काँग्रेसची शक्ती खच्ची करण्यास सरकार उत्सुक असले तरी मर्यादित प्रमाणात का होईना काँग्रेसच्या हाती जी सत्ता आली त्यामुळे काँग्रेस अधिक प्रबळ झाली आणि निवडणुकीचे तिचे यंत्र अधिक कार्यक्षम बनले.

तथापि हे सर्व ब्रिटिश सरकारच्या विरोधाच्या बाबतीत झाले असले तरी ३५ च्या कायद्याखाली निवडणुका होण्याच्या आधीच्या काळात व या निवडणुकीत यश येऊन सत्ताग्रहण केल्यानंतर काँग्रेसची अवस्था काय होती यावर टॉमलिन्सन यांनी बराच प्रकाश टाकला आहे. निवडणुकीपूर्वी काँग्रेसची सभासदसंख्या घटली होती. सत्याग्रहाने काँग्रेस काही काळ प्रबळ झाली पण पुन्हा ती दुर्बल बनू लागली. निवडणूक आली आणि मग काँग्रेसची सभासदसंख्या एकदम फुगली. या काळात तिकिटे मिळविण्यासाठी जी घाई चालली होती ती पाहून नेहरू, पटेल प्रभृतींना उबग आला. पुढे मर्यादित सत्ता मिळाली

तेव्हा काँग्रेसजनांच्या अंतर्गत भांडणांना ऊत आला. गटबाजी वाढली. बिहार, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश इत्यादी प्रांतातील काँग्रेसच्या राजकारणात या गटबाजीने थैमान मांडले. सत्ता नव्हती तेव्हा किसानसभा या काँग्रेसच्या शक्तीत भर घालणाऱ्या आहेत असे काँग्रेसजनांना वाटे पण सत्ता आल्यावर बिहारमध्ये सत्ताधारी काँग्रेसजन किसानसभेला सापत्न वागणूक देऊ लागले. ज्या राज्यात जमीनदारी होती तेथे जमीनदारांच्या हितसंबंधांना धक्का न लावण्यात सत्ताधाऱ्यांचे प्रयत्न खर्ची पडत. ३५ च्या सुधारणा राबवितानाच त्या मोडून टाकण्याचा प्रयत्न होईल ही नेहरूंची भूमिका होती, पण जे काँग्रेसजन सत्तेत सहभागी झाले ते मात्र त्या दिशेने प्रयत्न करीत नव्हते. यातच काँग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना झाली. त्याला वरिष्ठ काँग्रेसजनांचा विरोध होता. या स्थितीत घटनात्मक पेचप्रसंग निर्माण करून सुधारणांचे पुढचे पर्व अमलात आणण्यास सरकारला भाग पाडण्याची काँग्रेसची ताकद राहिली नाही. परंतु सत्तेमुळे काँग्रेसची ताकद वाढली आणि प्रांतिक मंत्रिमंडळावर वचक ठेवण्यासाठी काँग्रेसने संसदीय मंडळ स्थापन केल्याने काँग्रेसचे अखिल भारतीय नेतृत्व पक्के झाले. अर्थात सत्ताग्रहणापूर्वी प्रांतो-प्रांतीचे नेते जेवढे प्रबळ नव्हते तेवढे ते सत्ताग्रहणानंतर प्रबळ झाले हेही खरे. मुस्लिम लीगला सत्ता फारशी मिळाली नाही पण मुसलमानांवरील अत्याचारांची कहाणी रचून लीगने आपले सामर्थ्य वाढविले असे टॉमलिन्सन यांनी म्हटले आहे ते खरे आहे. उत्तरप्रदेशात निवडणुकीपूर्वी काँग्रेसने लीगशी करार करून तिला सत्तेत वाटा देण्याचे ठरविले होते अशी हवा काही ब्रिटिश लेखक, खलिक्कुझमान व काही प्रमाणात मौलाना आझाद यांनी निर्माण केली होती. हे सर्व खोटे होते हे यापूर्वी काहींनी दाखवून दिले आहे. टॉमलिन्सन यांनीही असा करार नव्हता असे स्पष्टपणे म्हटले आहे.

संघराज्य स्थापन करण्याच्या दिशेने पावले उचलण्यास सरकारला भाग पाडावे असे हे वातावरण नव्हते. लॉर्ड लिनलिथगो हेही संघराज्यासाठी प्रयत्नशील राहिले नाहीत. पण महायुद्धामुळे ब्रिटिश सरकारला काहीना काही हालचाल करणे भाग पडले. यातूनच जी योजना आली ती म्हणजे क्रिप्स-योजना. क्रिप्स-योजना फसणे अपरिहार्यच होते. त्यानंतर चार वर्षांनी भारतीय स्वातंत्र्याच्या दृष्टीने हालचाली सुरू झाल्या.

११-९-१९७६

सौहार्द व मतभेद

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पत्रसंग्रहाचा सहावा खंड अनेक महत्त्वाच्या पत्रांनी युक्त असून सरदारांच्या व्यक्तिमत्त्वावर त्यामुळे उत्तम प्रकाश पडतो. ज्येष्ठ काँग्रेस नेते, भारताचे उपपंतप्रधान आणि गृहमंत्री या नात्याने काँग्रेस संघटना व सरकारी यंत्रणा यांतील अनेकविध प्रश्न त्यांना सोडवावे लागत; अनेकविध व्यक्ती त्यांच्याकडे सल्ला मागत आणि त्या व्यक्तींचे प्रश्न सरदारांना सोडवावे लागत. या संग्रहात एक तार कै. काका गाडगीळांना धाडलेली आहे. पहिल्या पत्नीच्या मृत्यूनंतर लगेचच दुसरा विवाह ते करीत असल्याचे कळल्याबरोबर सरदारांनी काकांना विवाह लांबणीवर टाकण्याची तार केली. इतक्या लवकर विवाह केल्याने काकांचे राजकारणातील स्थान व काँग्रेस संघटना यांना बाधा होईल, असे सरदार म्हणतात. आसामचे मुख्यमंत्री गोपीनाथ बार्डोलाय व राज्यपाल सर अकबर हैदरी यांच्यात मतभेद झाले, तर तेही सरदारांना मिटवावे लागत. पण ते मिटविताना सरदार उगाच घोळ घालीत नाहीत. बार्डोलाय यांना ते सरळच कळवितात, की तुमची बाजू बरोबर नाही व राजीनामा दिला तर हसे होईल.

शासनयंत्रणा कशी चालवावी, तिचे उद्दिष्ट काय व महत्त्व कसे ठेवावे, याबाबत सरदारांच्या कल्पना पक्क्या होत्या आणि त्याबद्दल ते जागरूक होते. एक दिवस त्यांच्या निवासस्थानी एक गलिच्छ कपड्यांतील तारेचा शिपाई तार देण्यास आला. त्याबरोबर सरदारांनी तेव्हाचे दळणवळण खात्याचे मंत्री रफी अहमद किदवई यांना पत्र लिहिले व तारेचे शिपाई, पोस्टमन यांचे पोषाख असे घाणेरडे कसे? त्यांना गणवेष दिला जातो की नाही? परकी वकिलातीत आपले पोस्टमन व तारेचे शिपाई असेच जात असतील तर कसे होईल? असे प्रश्न विचारले. किदवईंनी लगेच कळविले, की जो शिपाई तुमच्याकडे तार घेऊन आला, तो हंगामी होता. तरीही हंगामी शिपायांनाही पोषाख देण्याची आजच्या आज व्यवस्था होत आहे! किदवई यांची कार्यक्षमताही यावरून दिसते. याउलट बाळासाहेब खेरांचा कारभार! बाळासाहेब सरदारांना पत्र लिहून मुंबईच्या हायकोर्टात नेमावयाच्या न्यायमूर्तींबाबत विलंब लागून चालणार नाही, असे मत व्यक्त करतात. सोबत मुख्य न्यायाधीश छगला यांचे पत्र असते. छगला आपल्या पत्रात न्यायमूर्ती नेमण्याची निकड प्रतिपादन करतात, पण ती करताना राजकीय कारणांनी अशा नेमणुकी होऊ नयेत वगैरे मतप्रदर्शन करतात. सरदार पटेल ही दोन्ही पत्रे वाचून बाळासाहेब खेरांना उत्तरात विचारतात, की न्यायमूर्तीच्या नावाची शिफारस तुम्ही करावयाची आहे, ती केली नसता हा सर्व पत्रव्यवहार कशासाठी?

बाळासाहेब खेर व महाराष्ट्र काँग्रेस यांचे फारसे रहस्य नव्हते. केशवराव जेधे प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष होते. त्यांना खेरांची अनेक धोरणे पसंत नसत. केशवराव जेधे यांनी बेळगावला केलेल्या भाषणाचा वृत्तांत एका कन्नड वृत्तपत्रात आला होता. त्याचे कात्रण खेरांनी सरदारांना धाडले व योग्य ती कारवाई करण्याची मागणी केली. केशवरावांच्या या भाषणाचा वृत्तांत खरा, की खोटा हे अगोदर न तपासता या रीतीने वर दाद मागण्याची पद्धत विचित्रच म्हणावी लागेल. कानडी भाषी वृत्तपत्रातील या वृत्तांतात केशवरावांच्या तोंडी जे भाषण घातले आहे, ते एकंदरच काँग्रेस सरकारवर टीका करणारे आहे. ते म्हणाले, बाळासाहेब खेर हे मुख्यमंत्री खरे, पण खरी सत्ता मोरारजींच्या हाती आहे. वालचंद हिराचंद यांच्याकडून पैसे घेऊन काँग्रेसने निवडणुका लढविल्या. असले भांडवलदारी सरकार नको तर मजुरांचे सरकार हवे. डायाभाई पटेल म्हणतात, की मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही. (हे ४८ साली) केशवराव त्यांच्या स्वभावाप्रमाणे विचारतात. मुंबई डायाभाईंच्या वडलांची आहे काय? नेहरू एका पत्रात मुंबईच्या विधिमंडळातील काही आमदारांनी मुंबईसह महाराष्ट्राची मागणी केल्याने अस्वस्थ होऊन सरदारांना पत्र धाडतात. हेही ४८ साली. अस्थिरता निर्माण होऊन व्यापार उद्योगावर परिणाम होईल असे नेहरूंचे मत होते. मुंबई महाराष्ट्राला देण्यास विरोध किती जुना आहे हे यामुळे स्पष्ट होते. बाळासाहेबांच्या भोंगळपणाप्रमाणे मोरारजी देसाईंच्या रोखठोकपणावर प्रकाश टाकणारे एक पत्र आहे. वालचंद हिराचंद यांनी सरदारांना एक पत्र लिहून वालचंदनगरला नगरपालिकेचा कायदा लागू करू नये, असे सुचविले होते. मोरारजींच्या पत्रात यास स्पष्टपणे विरोध केला आहे. ते म्हणतात, की वालचंदनगरच्या रहिवाशांना जाहीर सभांतून भाग घेण्यासही बंदी आहे. बारामती-इंदापूर रस्त्याच्या काही मैलांच्या भागात इतरांची वाहनेसुद्धा जाऊ दिली जात नाहीत. हे कसे चालणार? जमशेटपूरला नगरपालिका आहे. दालमियानगरलाही आहे. मग वालचंदनगरला का नको? यासंबंधी मंत्रिमंडळाचाच निर्णय झाला असून त्यात बदल करता येणार नाही.

काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी स्वातंत्र्याच्या प्रारंभीच्या काळात प्रस्थापित झालेले हितसंबंध फारसे दुखवावयाचे नाहीत, असे ठरविलेले दिसते. डॉ. राजेंद्रप्रसाद यांचे बिहारच्या जमीनदारी निर्मूलनाच्या विधेयकावर टीका करणारे पत्र बोलके आहे. बिहारच्या विधेयकाने मध्यम पातळीवरील जमीनदारांना भरपाई देण्याबाबत झुकते माप देण्याचे ठरविले, पण त्या मानाने बड्या जमीनदारांना कमी भरपाई मिळणार होती. रामगड, दरभंगा वगैरेंच्या महाराजांनी याबाबत राजेंद्रबाबूंकडे तक्रार केली. बड्या जमीनदारांना ज्या प्रमाणात भरपाई दिली, तीच मध्यम पातळीवरील जमीनदारांना दिली असती, तर ६३ ते ६४ कोटी रुपये द्यावे लागले असते. पण बिहार सरकारच्या विधेयकामुळे १३०-१४० कोटी रुपये लागणार होते. राजेंद्रबाबू बड्या जमीनदारांना अधिक भरपाई मागतात, सरदारही त्यांना पाठिंबा

देतात, पण हे भरपाईचे प्रमाण सरसकट कमी करावे, असे दोघेही म्हणत नाहीत, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

सरदार वल्लभभाई हे शासनयंत्रणेची परंपरा टिकविण्याबाबत कटाक्ष ठेवीत. गव्हर्नरने मंत्रिमंडळाच्या बैठकीचे अध्यक्षस्थान स्वीकारावे, असे पंजाबचे गव्हर्नर चंदुलाल त्रिवेदी यांचे मत. नेहरू त्यांना काहीसे अनुकूल. पण वल्लभभाई चंदुलाल यांची भूमिका पूर्णतः चुकीची आहे, असे बजावतात. तथापि जयपूरला भरणाऱ्या काँग्रेस अधिवेशनास काँग्रेसचे अध्यक्ष काँग्रेसवादी गव्हर्नरला बोलावणार आहेत असे तेच एका पत्रात डॉ. काटजू यांना कळवितात त्याचे आश्चर्य वाटते. काँग्रेसवादी गव्हर्नर म्हणजे काय? आणि काँग्रेस अध्यक्षांनी त्यांची बैठक का घ्यावी? हा प्रश्न सरदारांना पडू नये याचे आश्चर्य वाटते.

सत्ता राबविणे हे सरदारांना गौण वाटत नाही. आर. के. पाटील हे मध्यप्रांताचे मंत्री असताना राजीनामा देऊन विधायक कार्य करावे असे ठरवितात. ते सरदारांची परवानगी विचारतात. सरदार लिहितात, शासनयंत्रणेतही कार्यक्षम व सचोटीचे लोक हवे आहेत. सत्तेच्या बाहेर राहून काम करताना मोहाचे क्षण कमी येतात. पण सत्ता राबविणारांना वारंवार मोहाशी मुकाबला करावा लागतो. तेव्हा जे लोक सत्तेवर राहून चोख काम करतात व मोहाला बळी पडत नाहीत ते अधिक मोठे आहेत. तुम्ही जर याप्रमाणे काम करून दाखविलेत तर तो खरा पुरुषार्थ ठरेल.

गेल्या काही वर्षांत बंगाल व बिहार येथील काँग्रेस संघटना, मंत्रिमंडळे यातील मतभेद, बजबजपुरी बरीच अनुभवास आली. पण या पत्रसंग्रहातील पत्रव्यवहार पाहिला तर सरदार व पंडित नेहरू हे दोघेही त्या काळातही या दोन्ही राज्यांतील काँग्रेसजनांच्या भांडणाला कंटाळलेले दिसतील. बंगाल सरकारचे निर्वासितांच्या पुनर्वसनाविषयीचे धोरण नेहरूंना नापसंत होते. केवळ डोल वाटून पुनर्वसन होणार नाही असे ते म्हणतात, पण बंगालच्या सरकारला ते वा सरदार यासंबंधात वठणीवर आणू शकले नाहीत.

टंडन, कृपलानी वगैरेंची काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठी जी लढत झाली तीबाबत नेहरू, सरदार व राजेंद्रबाबू यांचा पत्रव्यवहार पार्श्वभूमी म्हणून लक्षात घेण्यासारखा आहे. राजेंद्रबाबूंनी पुन्हा अध्यक्ष व्हावे असे सरदार व नेहरूंचे मत होते. पण राजेंद्रबाबूंची प्रकृती ठीक नव्हती. तेव्हा पट्टाभी होत असल्यास ठीक असे नेहरू म्हणतात, पण आपण कोणालाच जाहीर पाठिंबा देऊ नये असे ते सरदारांना कळवितात व सरदारांचेही तेच मत होते. या प्रकरणात रफी अहमद किदवई हे नेहरूंना पत्र लिहून सरदारांबाबत अनेक गावगप्पा कळवितात. नेहरू मात्र सरदारांना ते पत्र दाखवितात. या प्रकरणाचा पुढे जो शेवट झाला तो या अशा तिसऱ्या लोकांमुळे झाला असे या पत्रव्यवहारावरून म्हणता येईल.

या संग्रहात पंडित नेहरूंना तेव्हाचे आपले बेल्जियममधील दूत बद्रुद्दिन तय्यबजी यांनी जे पत्र धाडले होते तेही ग्रथित केले आहे व ते बरेच बोलके आहे. नेहरूंनी हे पत्र सरदारांना पाहण्यासाठी धाडले होते. तय्यबजी यांच्याकडे पाकिस्तानचे त्यावेळचे परराष्ट्र सचिव इक्रमुल्ला यांच्या पत्नी भोजनासाठी आल्या होत्या. त्या पाकिस्तानने युनोला धाडलेल्या प्रतिनिधी मंडळापैकी एक प्रतिनिधी होत्या. श्रीमती इक्रमुल्ला तय्यबजींना सांगत होत्या, की पाकिस्तानच्या निर्मितीनंतर लोकांचा भ्रमनिरास होऊ लागला आहे. पाकिस्तानात पंजाबी मुसलमानांचा वरचष्मा असून इतरांना काही स्थान नाही. त्यामुळे हा भ्रमनिरास झाला. या वातावरणात समाजजीवनाचा अध:पात होत असून राजकीय ध्येयेही अध:पतित होत आहेत. मुस्लिम संस्कृतीचा अर्क भारतातच राहिला आणि लेखक व कवी यांना रसिक श्रोत्यांच्या अभावी काही रस वाटेनासा झाला आहे. काश्मीरविषयी भारताची भूमिका श्रीमती इक्रमुल्ला यांना मान्य होती. भारतात गेलेले निर्वासित व दंगलीत होरपळलेले मुसलमान यांच्या पुनर्वसनाचे कार्य भारत सरकार आणि काँग्रेसनेते वाखाणण्याजोगे करतात असेही त्यांनी तय्यबजींना सांगितले. (हेच बद्रुद्दिन तय्यबजी सेवानिवृत्तीनंतर वेगळी भाषा करू लागले!)

सरदार पटेल हे हिंदुमहासभा, रा.स्व. संघ यांचे प्रच्छन्न पाठीराखे होते असा प्रचार केला जातो. महात्मा गांधींच्या खुनानंतर सरदारांवर याबद्दल बरीच टीका झाली. जयप्रकाश नारायण यांच्यासारख्यांचाही तेव्हा तोल सुटला होता. या संग्रहातील जातीय दंगलीबाबतची पत्रे बोलकी आहेत. ग्वाल्हेरच्या महाराजांनी दहा लाख रुपये गांधी निधीला दिले त्याचे स्वागत करताना सरदार पटेल त्यांना लिहितात, मध्यंतरी तुम्ही हिंदुमहासभेची वाढ करण्यास कारणीभूत होत होता, महासभेला तुम्ही पंचवीस हजार रुपये दिलेत. रा.स्व. संघावरील बंदी, महासभा नेत्यांची अटक वगैरेसंबंधात डॉ. शामाप्रसाद मुखर्जी यांनी अनेक वेळा रदबदली केली. पण सरदार पटेल बधलेले दिसत नाहीत.

पंडित जवाहरलाल नेहरू व सरदार पटेल यांचा स्वभाव, वर्तनपद्धती यात फरक होता. त्यापेक्षाही फाळणीनंतर हिंदू-मुसलमानांच्या प्रश्नाला मिळालेले वळण, महात्मा गांधींचा खून, त्यानंतर देशात पसरलेले वातावरण इत्यादींविषयी नेहरू व सरदार यांच्या दृष्टिकोणात फरक होता. नेहरू हे अधिक भावनाप्रधान, तर सरदार अधिक वास्तववादी व संयमी. परंतु वृत्ती व दृष्टिकोण यात तफावत असूनही हे दोघेही ज्येष्ठ व श्रेष्ठ नेते एकमेकांची प्रतिष्ठा सांभाळीत व स्वत:च्या प्रतिष्ठेला धक्का न लावता स्पष्ट बोलत. दोघेही एकमेकांची किंमत, स्थान ओळखून होते. या दोघांच्या अनुयायांनी त्यांच्याबद्दल गैरसमज पसरविण्यास मदत केली असली, तरी दोघांचाही या वादळी काळातील पत्रव्यवहार अभ्यास करण्यासारखा असून, त्यांच्याबद्दलचा आदर दुणावल्याखेरीज राहात नाही.

पत्रसंग्रहाच्या प्रारंभीच नेहरू व सरदार यांच्यातील मतभेदांवर प्रकाश पडतो. अजमेरला हिंदू-मुस्लिम दंगल होते आणि प्राणहानी व वित्तहानी होते. अजमेरचा दर्गा हा मुसलमानांप्रमाणेच अनेक हिंदूंनाही भक्तिभावनेचा बिंदू वाटतो. या दर्ग्याला धोका पोहोचला, तर भारताची अब्रू जाईल, या विचाराने नेहरू अस्वस्थ होतात. त्यातच त्यांना काही अतिरंजित वृत्तांत सांगणारी माणसे भेटतात. त्यामुळे नेहरू अधिकच संतप्त होतात. त्यांचे सरदारांना पत्र याचे निदर्शक आहे. सरदार सर्व बाजूंनी चौकशी करून दर्ग्याला धोका पोहोचलेला नाही; गुंडगिरी करणारांविरुद्ध काय उपाययोजना केली, हे सर्व कथन करतात. नेहरूंचे त्यामुळे पूर्ण समाधान होत नाही. ते स्वत:च अजमेरला जाण्याचे ठरवितात, पण एका नातेवाइकाच्या मृत्यूमुळे ते जाऊ शकत नाहीत. म्हणून त्यांचे चिटणीस अय्यंगार यांना धाडले जाते. अय्यंगार अजमेरला जाऊन भेटीगाठी घेतात. अजमेरचे चीफ कमिशनर शंकर प्रसाद हे कार्यक्षम अधिकारी अय्यंगार यांच्या या भेटीने अस्वस्थ होऊन सरदारांकडे तक्रार करतात. आपल्या कार्यक्षमतेविषयी यामुळे संशय व्यक्त होतो व या रीतीने कारभार करणे शक्य नाही, असेही लिहितात.

सरदार पटेल यांना अय्यंगार यांच्या भेटीची आगाऊ कल्पना दिलेली नसल्याने हे पत्र येताच सरदारांनाही ही आपल्या खात्यात झालेली ढवळाढवळ आहे असे वाटते. ते पत्राद्वारे राजीनामा देण्याची तयारी दर्शवितात. नेहरू उलट पत्रात अय्यंगार यांच्या भेटीचे समर्थन करताना ढवळाढवळ करण्याचा प्रश्न नव्हता, असे सांगतात. पण त्याचबरोबर विचारतात, एखाद्या ठिकाणची तपासणी, भेट इत्यादींबाबत माझ्यावर मी बंधने घालून घेऊ काय? मला हे मान्य नाही व कोणत्याही पंतप्रधानास ते मान्य होणार नाही. मी कोणाला माझ्या अखत्यारात चौकशीसाठी कोठे पाठवू शकत नाही काय? विशिष्ट परिस्थितीत अमुक पद्धतीने वागले पाहिजे, असे मला वाटले तरीही मला यामुळे त्याप्रमाणे कृती करता येणार नाही. पंतप्रधान म्हणून मला राहावयाचे असेल, तर माझ्या स्वातंत्र्यावर बंधन येता कामा नये. हे मान्य नसेल, तर मी राजीनामा दिलेला बरा. तथापि आपण याविषयी घाईगर्दीने निर्णय घेता कामा नये. आपला निर्णय देशाच्या भावी हिताचाही असला पाहिजे. अखेरीस तुम्हाला किंवा मला बाहेर पडणे भाग झाले, तर आपण सन्मानाने बाहेर पडू. मी आनंदाने राजीनामा देण्यास तयार आहे.

यावर सरदार लिहितात, तुमच्या स्वातंत्र्यावर बंधन घालणे, हा माझा हेतू नाही. पण तुमच्या एखाद्या कृतीचे परिणाम राज्यकारभार, लोकभावना वगैरे दृष्टीने जर अनिष्ट असतील तर तसे स्पष्टपणे सांगणे हे माझे कर्तव्य आहे. अय्यंगार यांना अजमेरला धाडण्याचा तुमचा निर्णय चुकीचा होता, असेच माझे मत आहे. आपल्या दृष्टिकोणात फरक असेल, पण ज्या ध्येयासाठी आपण इतकी वर्षे झगडलो, ते समानच आहे आणि देशाचे हित हाही आपल्यातील समान दुवा आहे. आजच्या स्थितीत तुमच्या

राजीनाम्याचा वा सेवानिवृत्तीचा प्रश्नच उपस्थित होत नाही. उलट मलाच मंत्री म्हणून कारभार करणे अशक्य असून, मीच राजीनामा देण्यास तयार आहे.

हे मतभेद वाढले तेव्हा नेहरू सरदारांना सुचवितात, की आपापली बाजू मांडावी व गांधीजींचा निर्णय मानावा. सरदार त्याला तयार होते. या भेटीपूर्वी दोघेही आपापली निवेदने गांधीजींना धाडतात. नेहरू आपल्या निवेदनात म्हणतात, की आर्थिक व जातीय प्रश्नांबाबत सरदार व मी यांच्या दृष्टिकोणात फरक आहे तथापि देशाची नाजूक परिस्थिती लक्षात घेता अधिकारपदावरील व्यक्तींनी मतभेदांना वाव देऊ नये, हेही खरे. पुढे पंतप्रधानांचे स्थान, अधिकार यासंबंधी नेहरू लिहितात, की पंतप्रधानाचे स्थान महत्त्वाचे आहे. त्याला सर्व मंत्रिमंडळात एकसूत्रता ठेवावी लागते. तो मंत्रिमंडळाचा नेता असतो. त्याच्या अधिकारावर बंधन असता कामा नये. विशिष्ट परिस्थितीत कोणती उपाययोजना करावी, हे ठरविण्याचे पूर्ण स्वातंत्र्य त्याला असले पाहिजे. जर याप्रमाणे त्याला स्वातंत्र्य नसेल, तर मला पंतप्रधानपदावर राहता येणार नाही. माझी जागा सरदारांनी घ्यावी. मी आतापर्यंत सर्व महत्त्वाच्या प्रश्नांबाबत त्यांच्याशी विचारविनिमय करीत आलो आहे. पण पंतप्रधानाच्या अधिकारावर बंधन आणणे मला मान्य नाही. आजच्या स्थितीत आम्हा दोघांपैकी कोणी तरी एक मंत्रिमंडळात राहू शकेल आणि मी पंतप्रधानपद सोडण्यास तयार आहे. मी अधिकार सोडला, तरी विरोधक बनणार नाही, काँग्रेसमध्येच राहीन. अर्थात आमच्यापैकी कोणीही मंत्रिपद सोडले, तरी देशाच्या दृष्टीने त्याचे गंभीर परिणाम होतील, हे खरे आहे.

सरदार पटेल गांधींना दिलेल्या निवेदनात म्हणतात, की नेहरूंनी पंतप्रधानपदावरील व्यक्तीच्या अधिकाराबाबत जे विचार प्रगट केले आहेत, ते मला पसंत नाहीत. लोकशाही व मंत्रिमंडळाची जबाबदारी या दोन कसोट्यांवर त्यांचे विचार तपासले पाहिजेत. पंतप्रधानाने त्याला पाहिजे तेव्हा कोणत्याही प्रकारे वागण्याचे स्वातंत्र्य घ्यावे, हा नेहरूंचा विचार मान्य झाला, तर पंतप्रधान हा प्राय: हुकुमशहाच बनेल. लोकशाही व मंत्रिमंडळ पद्धतीचे सरकार यांच्याशी हे विसंगत आहे. समान दर्जाच्या सहकाऱ्यांतील अग्रक्रमाचा मंत्री म्हणजे पंतप्रधान होय. त्याने सर्व मंत्रालयांशी संपर्क ठेवावा, मंत्रिमंडळाचे नेतृत्व करावे, मार्गदर्शन करावे आणि सल्लामसलत करावी; पण एकदा धोरण ठरले, की त्याची अंमलबजावणी करण्याचे काम त्या त्या मंत्रालयाचेच असले पाहिजे. त्यात पंतप्रधानाने हस्तक्षेप करता कामा नये. तसा तो करणे म्हणजे संबंधित मंत्र्यावर अविश्वास दर्शविणे आहे. अजमेरला मला किंवा दुसऱ्या एखाद्या मंत्र्यास पंतप्रधानांनी त्यांच्या बदली धाडले असते तर ते चालण्यासारखे होते. पण अय्यंगार यांना धाडल्याने संशयाचे वातावरण तयार झाले. अखेरीस पंतप्रधान सेवानिवृत्त होण्याचे म्हणतात. पण माझे असे ठाम मत आहे, की त्यांनी सेवानिवृत्त न होता मीच झालेले बरे. कार्यक्षमतेच्या पलीकडे माझे वय

गेले आहे. पंतप्रधान नेहरू हे या देशाचे सर्वमान्य असे नेते आहेत आणि परदेशातही त्यांनी आपले स्थान निर्माण केले आहे. तेव्हा त्यांनी सेवानिवृत्त न होता मीच होणे योग्य ठरेल.

ही निवेदने गांधीजींना दिली गेली तेव्हा ते उपोषण करीत होते. त्यांच्यापुढे दोघांनी चर्चा करण्याचे त्यामुळे लांबणीवर टाकण्यात आले. पण १३ जानेवारी ४८ ला पुन्हा एकदा सरदार पटेलांनी आपला राजीनामा देण्याचा मनोदय गांधींना पत्र लिहून व्यक्त केला. पुढे गांधीजींचा खून झाल्याने नेहरू व सरदार यांच्यातील चर्चा होऊ शकली नाही. (गांधींच्या शवाच्या साक्षीनेच माउंटबॅटन यांनी सरदार व नेहरू यांना हातमिळवणी करावयास लावून एकत्र काम करण्याची शपथ घ्यावयास लावली.) गांधींच्या निधनानंतर नेहरू सरदारांना लिहिलेल्या पत्रात म्हणतात, की आपले कितीही मतभेद असले तरी आपण एकत्र काम केले पाहिजे. गांधीजींचे तेच मत होते.त्यांच्या मृत्यूनंतर तर देशाची परिस्थिती विलक्षणच झाली आहे. अशावेळी जुन्या वादांना काही अर्थ राहिलेला नाही. म्हणून आपण निकटचे सहकार्य करूनच राहिले पाहिजे. तुमच्या व माझ्यातील मतभेदांच्या मालमसालायुक्त कथा सर्वत्र पसरल्याने राज्यकारभारावरही परिणाम होतो. हे आता थांबावे. आपल्यात मतभेद झाले तरी तुमच्याबद्दलचा आदर व स्नेह कधीच कमी झाला नव्हता. तुमच्याशी मला बरेच बोलावयाचे आहे. कामाच्या दडपणाने ते शक्य झाले नाही, पण लवकरच असे बोलून जे काही गैरसमज असतील ते आपण दूर करूया. सरदारांनीही असेच मोकळेपणाने पत्र लिहून प्रदीर्घ चर्चेची आवश्यकता प्रतिपादन केली व गांधीजींच्या निधनानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीला एकोप्याने आपण तोंड देऊ असे प्रतिपादन केले. या दोघांतील संबंधांचे हे स्वरूप लक्षात घेण्यासारखे आहे. २५-३० वर्षांच्या संबंधांमुळे त्यांना एकमेकांच्या सामर्थ्याची कल्पना होती आणि देशहित या दोघांनाही जोडणारा समान दुवा होता याचा विसर पडू देऊन चालणार नाही.

गांधींच्या मृत्यूनंतर दिल्लीतील बिर्ला भवनाचा प्रश्न उपस्थित केला गेला. काहींनी सर्व भवनच ताब्यात घेऊन राष्ट्रपित्याचे स्मारक करावे अशी मागणी केली. काहींना जेथे गांधींना गोळ्या लागल्या तेवढ्या भागात स्मारक हवे होते. पुढे ६९ साली समाजवादी निष्ठेचे प्रदर्शन करण्याची जी काही साधने निर्माण झाली त्यात बिर्लाभवन ताब्यात घेणे हे एक होते. तथापि नेहरू व सरदार पटेल यांनी त्या काळात हा प्रश्न कसा हाताळला व घनश्यामदास बिर्ला यांची भूमिका काय होती हे या पत्रसंग्रहात स्पष्ट झालेले आहे. ती भूमिका काँग्रेसमधील बोलभांड, वाचाळ समाजवाद्यांनी लक्षात घेतलेली नाही.

बिर्ला भवनाच्या एका भागात स्मारक करण्यासंबंधी मागणी होऊ लागली तेव्हा नेहरूंनी बिर्लांना पत्र लिहिले व सरदारांनाही लिहिले. नेहरूंना स्वत:ला याप्रकारे स्मारक करणे तितकेसे मान्य नव्हते. पण ते स्वत: निर्णय घेण्याच्या मन:स्थितीत नव्हते. बिर्ला

आपल्या उत्तरात म्हणतात, की सर्व भवनच ताब्यात घेऊन स्मारक करण्याचे ठरविले तरीही माझी हरकत नाही. तुम्ही व सरदार यांच्यावरच मी हे सर्व सोपवितो. पण माझ्या या निवासस्थानाबाबत काही भावना आहेत. गांधीजींचे दीर्घ काळ वास्तव्य येथेच झाले. तुम्ही, सरदार, राजाजी, राजेंद्रबाबू असे सर्व मान्यवर नेते येथे राहिल्याने मी धन्य झालो आहे. याच बंगल्यात राष्ट्रीय महत्त्वाचे अनेक निर्णय घेतले गेले. येथील प्रत्येक झाड मी माझ्या देखरेखीखाली लावले आहे. हे ऐतिहासिक व अनेक महत्त्वाच्या स्मृतींनी परिपूर्ण असे निवासस्थान माझ्यापाशीच राहावे ही माझी भावना आहे. गांधींनाही ते पसंत पडले असते. पण तुम्हाला हवे असल्यास हे निवासस्थान मी देण्यास तयार आहे. बिर्लांच्या या पत्राने निवासस्थान ताब्यात घेऊ नये असे नेहरूंचे मत झाले. त्यात भर पडली ती सरदारांच्या पत्राची.

सरदार पटेलांचे पत्र रोखठोक आहे. ते म्हणतात, बिर्ला भवन ताब्यात घेऊन तेथे गांधीजींचे स्मारक करणे हे गांधींच्या आत्म्यालासुद्धा क्लेशकारक ठरणार आहे. बिर्ला यांच्या त्यासंबंधीच्या भावना आहेत. त्या पायदळी तुडवून स्मारक करण्यास बापूजींनी संमती दिली नसती. विनोबा भावे व किशोरीलाल मश्रुवाला यांनी याप्रकारच्या स्मारकास विरोध केला आहे. यासंबंधीचे पत्र सर्व संबंधितांना राजेंद्रबाबूंनी पाठवावे असे पूर्वीच ठरले होते. मी याबाबत चौकशी केली तेव्हा पत्र धाडण्यास आपण विसरलो असे राजेंद्रबाबू म्हणाले! आपलेच काही कार्यकर्ते दडपण आणतात, ओरडा करतात म्हणून आपण दबून जाण्याचे कारण नाही. आपणच पुढाकार घेऊन मार्गदर्शन केले असते तर हा आरडाओरडा झाला नसता. आता तो होत असला तरी आपण आपली भूमिका स्पष्टपणे मांडावी म्हणजे बिर्ला-भवन ताब्यात घेण्याची मागणी बंद होईल. (पंचवीस वर्षांनंतर बिर्लाभवन ताब्यात घेणे हा समाजवादाचा झेंडा फडकावण्याचा एक सोपा उपाय आपल्या मंडळींना सापडला!)

असा हा महत्त्वाचा पत्रव्यवहार आहे. या काळात सरदारांची प्रकृती बरीच खालावलेली होती. ते मसुरीला होते. नेहरूंना हरघडी त्यांची सल्लामसलत हवी असे. एका पत्रात नेहरू हताश होऊन म्हणतात, अनेक प्रश्न सोडवावयाचे आहेत. मी एकटा काय करणार? तुमच्या सल्लामसलतीची गरज आहे. तुम्ही दिल्लीत नसल्याने फार अडचण झाली आहे. या एका पत्रानेही या दोन नेत्यांच्या परस्परांविषयीच्या भावनांवर प्रकाश पडतो.

१६-९-१९७३

मतभेद पण एकजूट

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पत्रव्यवहाराच्या दहाव्या खंडाचे प्रकाशन झाल्याने नवजीवन ट्रस्टच्या एका कार्याची सांगता झाली. साधारणत: पाच हजार पृष्ठांचा हा पत्रव्यवहार सुप्रसिद्ध पत्रकार श्री. दुर्गादास यांनी संपादन केला. त्यांची व सरदारांची चांगली जानपेहचान होती. हे काम त्यांनी हौसेने केले व प्रकाशक आणि लेखक यांच्या सहकार्यामुळे दहा खंड ठरलेल्या व थोड्या अवधीत प्रसिद्ध झाले. आज येथे नऊ व दहा अशा दोन खंडांची थोडक्यात ओळख करून द्यावयाची आहे.

नेहमीप्रमाणेच सरदार पटेल यांचा करारीपणा, दरारा यांचा प्रत्यय या संग्रहात येतो. सार्वजनिक जीवनातील शिस्तीबाबत ते काटेकोर होते आणि कोणाचाही मुलाहिजा न ठेवता एकेकाची खरडपट्टी काढण्यास सरदार मागेपुढे पाहात नसत. बंगालचे दिवंगत मुख्यमंत्री डॉ. बी. सी. रॉय हे जवाहरलाल नेहरूंपेक्षा वयाने मोठे व ते जवाहर अशी एकेरी हाकही मारीत. तथापि पं. नेहरूंना रॉय यांनी मुख्यमंत्री या नात्याने लिहिलेल्या एका पत्राची भाषा वल्लभभाईंना उद्धटपणाची वाटली तेव्हा वल्लभभाईंनी रॉय यांना लिहिले, की तुमच्या पत्राची भाषा अशिष्ट व उद्धटपणाची आहे. पं. नेहरू हे देशाचे पंतप्रधान आहेत आणि त्या पदाचा मान राखूनच त्यांना पत्र लिहिले पाहिजे. तुम्ही केंद्र सरकारविरुद्ध तक्रारी केल्या आहेत. तुमची बाजू तुम्ही मांडलीत एवढेच, पण तक्रारीच करावयाच्या तर तुमच्याबद्दल त्या आम्हालाही बऱ्याच करता येतील. केंद्र सरकार यात कमी पडणार नाही.

बंगालसंबंधात शामाप्रसाद मुखर्जी यांनी काही तक्रारी केल्या होत्या, तर दत्त या दुसऱ्या एका काँग्रेसजनाने त्रिपुरा वगैरे भाग बंगालला जोडावा अशी मागणी केली. वल्लभभाईंनी लिहिले, की बंगालचे कार्यकर्ते एकमेकांत भांडत बसण्यात जेवढा रस घेतात तेवढा कामात घेतील तर बरे होईल. बंगालने स्वत:चे असलेले घर सुधारावे, अधिक प्रदेशाची मागणी करण्यापेक्षा आहे त्या प्रदेशाचा कारभार नीट चालवावा हे उत्तम.

आसामचे मुख्यमंत्री श्री. गोपीनाथ बार्डोलाय यांनी तेव्हाच्या पूर्व पाकिस्तानातून येणाऱ्या बंगाली निर्वासितांचे पुनर्वसन आसाममध्ये करणे अशक्य आहे, स्थानिक लोक चिडतील, निवडणुकीवर परिणाम होईल असे सरदारांना कळविले. तेव्हा सरदारांनी त्यांना लिहिले, की निर्वासितांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सोडवलाच पाहिजे. त्यांना जागा दिल्याने लोक चिडतील ही भीती व्यर्थ आहे. तुम्हाला आपले लोक माहीत नाहीत. ते इतके

संकुचित नाहीत. आसामचे मुख्य सचिव श्री. देसाई हे बंगाल्यांच्या विरुद्ध बोलत. त्यांना ताबडतोब सेवानिवृत्त करण्याचा आदेश पटेलांनी बार्डोलाय यांना दिला होता.

पूर्व पंजाबची एक फाइल पश्चिम पंजाब म्हणजे पाकिस्तानात गेल्याचे कळताच वल्लभभाईंनी पंजाबचे मुख्यमंत्री गोपीचंद भार्गव यांना जाब विचारला. त्यांनी चूक कबूल केली व फाइल गुप्त नव्हती असे कळविले.

डॉ. जॉन मथाई यांनी केंद्रीय अर्थमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यावर वल्लभभाईंनी चिंतामणराव देशमुख किंवा जी. एल. मेहता यांना अर्थमंत्री करावे असे नेहरूंना सुचविले व आपली पहिली पसंती देशमुखांची राहील असाही खुलासा केला. नेहरूंनाही देशमुख हवे होते. देशमुख अर्थमंत्री झाल्यावर लोकसभेवर त्यांची निवडणूक करण्याचा प्रश्न आला. पंजाबमधून त्यांना मतदारसंघ द्यावा असे वल्लभभाईंनी गोपीचंद भार्गव यांना कळविले. त्यावर पंजाबच्या काँग्रेस पक्षास पंजाबीच उमेदवार हवा असे वाटत असल्याचे भार्गव यांनी लिहिले. वल्लभभाई लिहितात, पंजाबचाच उमेदवार हवा ही जाणीव तुम्हा लोकांना आत्ताच कशी झाली? जी जागा रिकामी होत आहे ती जयरामदास दौलतराम यांची. ते पंजाबी नाहीत. ते आसामचे गव्हर्नर झाले म्हणून जागा रिकामी झाली, पण त्यांची ही नेमणूक झाली नसती तर बिगरपंजाबी उमेदवार राहिलाच असता. आम्ही देशमुख यांना पंजाबमधून निवडून आणण्याचे ठरविले आहे. तेव्हा योग्य ती व्यवस्था करा. गोपीचंद भार्गव यांची दोन दिवसांनी तार आली की पंजाब काँग्रेसने देशमुख यांची उमेदवारी पक्की करून जाहीरही केली आहे!

मागासलेल्या वर्गासाठी एक कमिशन नेमून त्याचा अध्यक्ष निवडण्याची वेळ आली. सरदारांनी श्रीकंठ यांचे नाव सुचविले. राजाजींनी जगजीवनराम यांना श्रीकंठ यांच्याबद्दल विचारले तेव्हा श्रीकंठ हे चांगले गृहस्थ आहेत पण त्यांना कारभार कसा जमेल याविषयी शंका व्यक्त केली. हाताखालच्या अधिकाऱ्यांना ताब्यात ठेवणे श्रीकंठ यांना जमेल की नाही याची त्यांना शंका होती. वल्लभभाईंनी नेहरूंना लिहिले, की जगजीवनराम यांनी हस्तक्षेप करण्याचे कारण नाही. अनेक मंत्री असे असतात की ज्यांची नेमणूक करताना त्यांची पात्रता श्रीकंठ यांच्याहीपेक्षा कमी असते, पण ते कारभार चालवितातच. पुढे श्रीकंठ यांची नेमणूक झाली व बॅकवर्ड क्लास कमिशनला तितक्या पात्रतेचा अध्यक्ष नंतर काही मिळाला नाही. वल्लभभाईंची निवड अचूक होती.

डॉ. मथाई यांनी राजीनामा दिल्यावर मुलाखतीत काही विधाने केली ती नेहरूंना पसंत नव्हती. नेहरू परदेशी होते. मौलाना आझाद यांनी पत्रक काढून मथाई यांना उत्तर दिले. त्यांनी पत्रक काढू नये, त्या पत्रकातील काही भाग चुकीचा आहे असा निरोप

वल्लभभाईंनी कळविला होता. पण आझादांनी ऐकले नाही. तेव्हा वल्लभभाईंनी आझादांच्या पत्रकातील गफलती त्यांना पुन्हा कळविल्या आणि मी उपपंतप्रधान आहे. माझा सल्ला मानून तुम्ही पत्रक काढावयास नको होते, तुमचे वर्तन चुकले असे बजावले. आझादांनी आदेश मोडण्याचा हेतू नव्हता असे सांगून राजीनाम्याचीही तयारी दर्शविली. राजीनाम्याची गरज नाही असे वल्लभभाईंनी त्यांना नंतर सांगितले.

मोरारजी देसाई यांचा दुराग्रही हट्टी स्वभाव हा सर्वांनाच ठाऊक आहे. मुंबई राज्यात तेव्हा दारूबंदी होती. सलामी घेणाऱ्या संस्थानिकांना मद्यपानाचे परवाने मुंबईत मिळत, अन्य संस्थानिकांना मिळत नसत. वल्लभभाईंकडे याबाबत तक्रार आली. सरदारांनी मोरारजींना लिहिले, "एवढ्या मामुली गोष्टीबाबात तुम्ही एवढी ताठर भूमिका घेतल्याचे पाहून आश्चर्य वाटले. सलामी घेणाऱ्या संस्थानिकांच्याबाबतीत तुम्ही मद्यपानाबाबत सवलत दिलीच असल्याने तत्त्वाचा प्रश्नच येत नाही. ताठर भूमिकेलाही अर्थ असतो, तिचा उपयोग असतो, पण विनाकारण तिची तड गाठली की निष्कारण अडचणी वाढतात. समजूतदारपणा व सौजन्य हेसुद्धा फलदायी ठरतात. आमचे धोरण चुकीचे आहे असे तुम्हाला वाटत असले तरी निर्णय घेण्यापूर्वी माझ्याशी चर्चा केली असती तर काही आकाश कोसळणार नव्हते!"

मास्टर तारासिंग काही दिवस कारावासात होते. त्यांची सुटका करावी की काय असे नेहरूंनी विचारले तेव्हा पटेलांनी नकार दिला. ज्या हालचालींसाठी बंदिस्त केले त्या सोडून देण्याचे आश्वासन दिल्याखेरीज तारासिंगाना आपण सोडणार नाही असे त्यांनी नेहरूंना कळविले.

डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी घटनासमितीचे अध्यक्ष असताना हिंदू कोड बिलाला विरोध चालविला होता. नेहरू त्यामुळे उद्विग्न झाले; पटेलांनी राजेंद्रप्रसादांना कळविले की हिंदू कोड बिलात तुम्ही विघ्न आणू नये हे बरे. कार्यकारिणीने ते मान्य केले आहे. बिहारच्या कमाल जमीनधारणा विधेयकातील तरतुदीही राजेंद्रबाबूंना मान्य नव्हत्या. त्यांना हे विधेयक जमीनदारांना अधिक अनुकूल करून घ्यावयाचे होते. राष्ट्रपती या नात्याने त्यावर सही न करण्याचा विचार ते करीत होते. पण अखेरीस त्यांनी सही केली. राष्ट्रपतीच्या अधिकारावद्दल घटनात्मक प्रश्न उपस्थित करण्याच्या ते विचारात होते. वलभभाई अर्थातच यासंबंधात राजेंद्रांच्या पक्षाचे नव्हते. पण त्यांना हस्तक्षेप करण्याचा प्रसंग आला नाही.

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश कनिया यांचे काही बाबतीतील धोरण नेहरू व वल्लभभाई या दोघानाही पसंत नव्हते. पत्रव्यवहार पाहता कनिया हे फार संकुचित व हट्टी

असल्याचे स्पष्ट दिसते. एका प्रसंगी तर कनिया यांना राजीनामा देण्यास सांगावे येथपर्यंत नेहरू संतापले होते. पण वल्लभभाईंनी त्यांना आवरले. अलाहाबादचे एक न्यायमूर्ती मुख्य न्यायाधिशास डोईजड होऊन गैरव्यवहार करीत होते. मुख्य न्यायाधिशांच्या सांगण्यावरून नेहरूंनी या न्यायाधिशास बोलावून तक्रारी सांगितल्या. यात नेहरूंची चूक नव्हती. पुढे सर्वोच्च न्यायालयाने या न्यायाधिशास दूर केले, पण उच्चपदस्थांनी गैर रीतीने हस्तक्षेप केला असा शेरा मारला. नेहरूंनी सर्व बाजू वल्लभभाईंपुढे मांडली व सरदारांनी ती कनिया यांना समजावून दिली. राजकारणी लोकांप्रमाणे न्यायमूर्तीही आपली पायरी व तोल सोडतात हे कनिया यांनी दाखवून दिले.

रफी अहमद किदवई व सरदार यांची मते कधी जुळली नाहीत. पण अधिकारातिक्रमण करून किदवई जेव्हा वर्तन करीत तेव्हा सरदार त्यांना खडसावीत. 'नॅशनल हेरल्ड' हे नेहरूंच्या प्रेरणेने निघालेले पत्र. पंतप्रधान झाल्यावर नेहरूंनी त्याच्याशी संबंध सोडला. पण मंत्री असतानाही किदवई त्याचे संचालक राहिले. वल्लभभाईंनी हे चुकीचे असल्याचे नेहरूंच्या निदर्शनास आणले. तसेच नेपाळच्या दोघां राणांकडून नॅशनल हेरल्डला देणग्या घेतल्या गेल्या. त्यांना रात्रीची हवाई टपाल सर्व्हिस सुरू करण्याचा परवाना मिळाला होता आणि किदवई वाहतूक मंत्री होते. ज्याच्यातर्फे हा व्यवहार झाला त्याच्याविरुद्ध फौजदारी खटला चालू होता. वल्लभभाईंनी या सर्वांस आक्षेप घेतला. नेहरूंनी किदवई यांना सांगितले ते सरदारांना कळविले. पण सरदारांची माहिती अधिक पक्की होती हे दिसते. सरदार लिहितात, दुसऱ्या एखाद्या प्रांतात याच गोष्टी झाल्या असत्या व माझ्या कक्षेत असत्या तर त्या मी बिलकूल चालू दिल्या नसत्या. तुम्हाला हे गैर वाटत नसेल तर मला काही बोलावयाचे नाही.

नेहरू-लियाकत करार आणि टंडन यांची काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठीची उमेदवारी याबाबत नेहरू आणि सरदार यांच्यात मतभेद होते.नेहरू-लियाकत अली करार झाला असला तरी पाकिस्तान सुधारणार नाही आणि बंगालमध्ये निर्वासितांचा लोंढा येत असल्याने लोकभावना प्रक्षुब्ध झाल्या आहेत, तेव्हा लोकांना संताप येईल अशी वक्तव्ये न करता आपण येथील अल्पसंख्याकांना संरक्षण द्यावे व निर्वासितांचे पुनर्वसन करावे ही वल्लभभाईंची भूमिका होती. उलट नेहरू जाहीर वक्तव्ये करीत होते. वल्लभभाई म्हणतात, जाहीर भाषणे, चर्चा न करता आपण आपले धोरण अमलात आणावे. काँग्रेस पक्षातही चलबिचल झाली होती. तेव्हा निधर्मी लोकशाहीचे तत्त्वच संकटात आले असून आपल्या धोरणाला विरोध होत असल्याने पंतप्रधानपद सोडणे बरे असे नेहरूंनी सरदारांना लिहिले. काही खासदारांची सरदारांनी गाठ घेतली. तेथे सरदार जे बोलले त्याबद्दल तिखटमीठ लावून गोष्टी सांगितल्या गेल्या. नेहरूंनी याचा उल्लेख पत्रात केला. सरदारांनी आपण काय

बोलले हे तपशीलवार कळविले आणि तुमच्यादेखत मी जे बोलणार नाही ते पश्चात कधीच बोलणार नाही असा निर्वाळा दिला. नेहरूंनी हि ते मान्य केले व हे वादळ संपले.

टंडन, कृपालानी व शंकरराव देव ही नावे अध्यक्षपदासाठी आली होती. टंडन यांच्याशी स्नेह असला तरी टंडन हे जातीयवादाचे प्रतीक बनले आहेत असा नेहरूंचा ग्रह होता. ते निवडून आले तर आपण राजीनामा देऊ असे त्यांनी वल्लभभाईंना कळविले. वल्लभभाईंनी लिहिले, राजीनामा देण्याची गरज नाही. कोणताही अध्यक्ष कार्यकारिणीच्या ठरावाशी बांधील असतो. म्हणून ठराव काय करणार यास महत्त्व द्यावे, टंडन जर ठरावाप्रमाणे वागणार नसतील तर त्यांना राजीनामा द्यावयास लावावा. नेहरूंनी या वादात प्रथम शंकरराव देव यांना पाठिंबा दिला, पण कृपलानी अधिक चांगली स्पर्धा करतील असे त्यांना सांगण्यात आले तेव्हा त्यांनी कृपलानींना पाठिंबा दिला. वल्लभभाईंनी कृपलानींच्या भाषणांचे वृत्तपत्रीय वृत्तांतच धाडले आणि टंडन व कृपलानी यांच्या भूमिकेत काय फरक आहे असा सवाल केला. पुढे टंडन निवडून आले, पण त्यांना राजीनामा द्यावा लागला आणि कृपलानीही नेहरूंशी मतभेद होऊन अध्यक्षपदच नव्हे तर काँग्रेस सोडून गेले.

हे दोन प्रसंग नेहरू व पटेल यांच्या प्रवृत्तीतील भिन्नता दाखवितात, पण राजाजींनीच एका पत्रात वल्लभभाईंना लिहिले आहे, की तुमचे काही मतभेद असले तरी तुम्ही दिल्लीत नसला तर नेहरूंना एकाकी वाटते. मतभिन्नता असली तरी देशाच्या हितासाठी एकत्र काम करण्याची पंडितजी व सरदार या दोघांचीही प्रतिज्ञा होती आणि ती त्यांनी पाळली.

९-६-१९७४

स्वातंत्र्याचा उष:काल

भारत ४७च्या ऑगस्टमध्ये स्वतंत्र झाला. त्यानंतर सहा महिन्यात काय परिस्थिती होती याची काहीशी कल्पना के. डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या पत्रव्यवहाराचे जे खंड प्रसिद्ध झाले व होत आहेत, त्यावरून येते. आता आठ व नऊ असे खंड आले आहेत. महात्मा गांधींनी काँग्रेसचे विसर्जन करावे व श्री. जयप्रकाश, आचार्य नरेंद्र देव इत्यादींपैकी कोणाला तरी अध्यक्ष करावे, अशी सूचना केली होती, हे अगोदरच्या खंडात नमूद झाले होते. पं. नेहरू व सरदार पटेल या दोघांनाही हे मान्य झाले नाही. त्यांनी डॉ. राजेंद्रप्रसाद यांना अध्यक्ष होण्याची विनंती केली व त्याप्रमाणे ते अध्यक्ष झाले.

राजेंद्रबाबू केंद्रात अन्नमंत्री होते, तसेच घटना समितीचे अध्यक्षही होते. गांधीजींच्या मते त्यांनी अन्नमंत्रीपद व काँग्रेस अध्यक्षपद घ्यावे आणि घटना समितीचे अध्यक्षपद सोडावे. अखेरीस त्यांनी मंत्रिपद सोडून इतर दोन पदे ठेवली. काँग्रेसचे अध्यक्षपद घेतल्यावर त्यांनी जयप्रकाशना पत्र लिहिले व भेटावयास बोलावले. काँग्रेस कार्यकारिणीत जयप्रकाश यांनी यावे, अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली होती. त्यानंतर आठव्या व नवव्या खंडातील पत्रव्यवहार पाहता काँग्रेसमधील समाजवादी गटाच्या हालचाली व त्याच्या नेत्यांची वक्तव्ये यामुळे सरदार पटेल रुष्ट झालेले दिसतात. जयप्रकाश यांच्या वक्तव्याच्या संबंधात त्यांनी पं. नेहरूंना कडक शब्दांत पत्र धाडले होते.

हिंदू कोड बिल हा डॉ. राजेंद्रप्रसाद व पं. नेहरू यांच्यातील मतभेदाचा विषय होता. या मतभेदाची चर्चा पुढील काळात बरीच झाली. राजेंद्रबाबू राष्ट्रपती झाल्यावर हिंदू कोडासंबंधात त्यांनी वाद उपस्थित केला असा सर्वसामान्य ग्रह आहे. पण ते खरे नाही. घटना समितीच्या अध्यक्षपदावर ते असतानाच याबाबत मतभेदांना सुरुवात झाली. २१ जुलै ४८ रोजी नेहरूंना लिहिलेल्या पत्रात राजेंद्रबाबू लिहितात, "हिंदू कोड बिलाच्या संबंधात नेमलेल्या चिकित्सा समितीचे आठ सभासद बक्षी टेकचंद यांच्या नेतृत्वाखाली मला भेटले. सध्याच्या हिंदू कायद्यात दूरगामी बदल या बिलामुळे होणार आहेत. या बिलाची चर्चा काँग्रेस पक्षात कधी झाली नाही. चिकित्सा समितीच्या बहुसंख्य सभासदांना वाटते की घाई करणे बरोबर नाही. माझे असे मत आहे की घटना समितीने या बिलाचा विचार करू नये. घटना समिती ही कायदे करण्याकरिता नेमलेले विधिमंडळ नव्हे. दुसऱ्या सभागृहाचे नियंत्रण असते. तेही सध्या नाही. लोकात याचा प्रचार झाला

नाही व मते घेतली नाहीत. येत्या निवडणूक जाहीरनाम्यात त्याचा अंतर्भाव करावा व लोकमत घ्यावे.''

नेहरूंनी उत्तर पाठविले की, मंत्रिमंडळात व पक्षाच्या कार्यकारिणीत हिंदू कोड बिलावर चर्चा झाली आहे. देशातही हा चर्चेचा विषय आहे. तेव्हा माघार घेणे बरोबर नाही. राजेंद्रबाबूंनी हे अमान्य केले. ते आपल्या पत्रात लिहितात की चिकित्सा समितीने विधेयकासंबंधी घेतलेला पुरावा प्रामुख्याने विरोधी आहे. काँग्रेस पक्ष, महासमिती व कार्यकारिणी यापैकी कोणीही चर्चा केलेली नाही. नेहरूंनी 'परदेशात प्रतिक्रिया काय होईल', असा प्रश्न विचारला होता. राजेंद्रबाबूंनी उत्तर दिले की, परदेशी मतापेक्षा या देशातील बहुसंख्य हिंदूंचे या विधेयकाबाबत काय मत आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे. लोकभावना आपण दुखवीत आहोत असे आपले स्पष्ट मत झाल्याचे राजेंद्रप्रसाद यांनी नमूद केले आहे. पक्षापुढे विधेयक चर्चेला आले नाही हे नेहरूंनी पुढील पत्रात मान्य केले आहे आणि घटना समिती त्याचे भवितव्य कोणत्याही प्रकारे ठरवू शकेल असे म्हटले. डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी नंतर एक टिपण तयार केले. त्यात हिंदू कोड बिलाबाबत घाई न करण्याची सूचना होती व त्यावर चर्चा करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली होती. हे टिपण विधिमंडळ पक्षापुढे ठेवण्यास त्यांनी सांगितले होते. त्यानंतर या विधेयकाची चर्चा लांबणीवर पडत गेली. अखेरीस अनेक दुरुस्त्यांसह ते मंजूर झाले. त्यामुळे हिंदू समाजात उत्पात झाला नाही.

फाळणीमुळे अनेक प्रश्न निर्माण झाले होते. तेव्हाच्या पूर्व बंगालमधून राजेंद्रबाबूंना काँग्रेस कार्यकर्त्यांनी लिहिलेल्या पत्रात पूर्व पाकिस्तानात खुल्ना वगैरे भागात हिंदूंचे कसे हाल होत आहेत याची कल्पना दिली होती. बंगाली काँग्रेस नेते स्वत: कलकत्त्यात घरदार करून राहतात आणि पूर्व पाकिस्तानातील सामान्य हिंदू बंगाल्यांना पूर्व पाकिस्तानात राहण्यास सांगतात, अशी एक तक्रार करण्यात आली होती. तीबाबत किरण शंकर राय यांचे म्हणणे पटणारे नाही. पुढाऱ्यांनी एक उपदेश करावा व वागावे दुसऱ्या प्रकारे हे पूर्वापार चालू आहे.

हे अनेक बाबतीत होत होते. प्रांतिक नेते केवळ स्वत:च्या प्रांताचा वा स्वत:चा विचार करीत. डॉ. हरेकृष्ण मेहताब यांनी झारखंड इत्यादींचा प्रश्न उपस्थित करून ओरिसाचा काही भाग बिहारमध्ये जाणार असल्याबद्दल बराच पत्रव्यवहार केला. तसेच बंगालच्या मुख्यमंत्रीपदी डॉ. बी. सी. रॉय यांची निवड झाल्यावर मंत्रिमंडळ ठरविताना व पुढे आणखी एक मंत्री घेताना त्यांनी डॉ. राजेंद्रप्रसाद यांना काँग्रेसचे अध्यक्ष या नात्याने विश्वासात घ्यावयास हवे होते. त्यांनी ते न घेतल्याबद्दल राजेंद्रबाबूंनी त्यांची कानउघाडणी सौम्य शब्दांत केली आहे.

आज जी काँग्रेसची हलाखी दिसते तिचा प्रारंभ पूर्वीच झाला आहे, हेही काही पत्रांवरून कळून येईल. २१ जुलै ४८ रोजी पं. नेहरू राजेंद्रप्रसाद यांना लिहितात – "अनेक प्रांतातील आमदार, जिल्हा काँग्रेसचे सभासद इत्यादी प्रांतांच्या सरकारी कारभारात हस्तक्षेप करीत असल्याच्या अनेक तक्रारी माझ्याकडे आल्या आहेत. जिल्हा अधिकाऱ्यांना त्यांचे काम करणे कठीण होण्याइतका हा हस्तक्षेप होत असून ते तक्रारी करतात. काही आमदार, मंत्री व संसदीय चिटणीस त्यांच्या दारात धरणे धरून बसतात व काही लोकांकरिता नोकऱ्या मागतात. या कामी पैशाचीही देवाणघेवाण होत असल्याचे सांगितले आहे. मी कोणा प्रांतासंबंधी लिहीत नाही. सर्व काँग्रेस कमिट्या वा आमदार यांना एक परिपत्रक पाठवून याविरुद्ध इशारा द्यावा अशी माझी तुम्हाला विनंती आहे."

बी. के. ए. देसाई या ५२ वर्षे काँग्रेसचा कार्यकर्ता म्हणून काम केलेल्या गृहस्थांनी राजेंद्रप्रसाद यांच्याकडे आपली मनोव्यथा प्रगट केली आहे. ते लिहितात : "परिस्थिती ठीक नाही. काही गोष्टी अशा आहेत की त्यामुळे हृदय विदीर्ण होते. काहीजणांच्या लोभामुळे काँग्रेस बदनाम होते. जनता व वरिष्ठ नेते यांच्यातील दुवा नष्ट होत आहे. सार्वजनिक नेते म्हणून काहीजण आपल्या अधिकाराचा व्यापार मांडीत आहेत. सर्वजणच काही वाईट नाहीत. पण काही सुधारण्यापलीकडे आहेत. दुःखितांना दिलासा देण्याचा मार्ग शोधला पाहिजे. लोक निराश झाले की कोणताही उपाय योजतात. सध्या भ्रष्टाचाराची झालेली वाढ याचीच द्योतक आहे."

भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न निर्माण झाला होता. नेहरूंनी त्याही वेळी या कल्पनेला विरोध केला. पण राजेंद्रप्रसाद यांनी त्यांना लिहिले की, काँग्रेसने भाषावार प्रांतरचनेचे तत्त्व स्वीकारले असून प्रांताची पुनर्रचना करण्याच्या दिशेने हालचाली करणे भाग आहे.

गुरखा लीग ही सध्या दार्जिलिंग भागात घातपात, हिंसाचार करीत असली तरी हे संकट पूर्वीच निर्माण झाले होते. बंगालचे मुख्यमंत्री या नात्याने डॉ. बी. सी. रॉय यांनी २८ जानेवारी ४८ रोजी राजेंद्रप्रसाद यांना लिहिलेल्या पत्रात गुरखा लीग ही काँग्रेस व भारतीय यांच्याविरुद्ध प्रचार करते. तिने दार्जिलिंग भागात गडबड केली तेव्हा कठोर उपाय योजावे लागले. इंग्रज मळेवाले रेशन बरोबर देतात, पण काँग्रेसच्या राज्यात ते होत नाही, असा प्रचार लीगने केला होता. दार्जिलिंग विभागातील डेप्युटी कमिशनरने सरकारला पाठविलेल्या पत्रात म्हटले होते की, लीगने या प्रकारचा प्रचार थांबविल्याखेरीज तिच्या सभेला काँग्रेसच्या अध्यक्षांनी न गेलेले बरे.

घटना समितीला घटना ठरविताना प्रौढ मतदानपद्धती असावी की नाही हेही ठरवायचे होते. घटना सल्लागार श्री. बी. एन. राव यांना डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी लिहिलेल्या एका पत्रात मतदानाचा हक्क काही प्रमाणात मर्यादित करण्याच्या सूचनेचा विचार करावा असे म्हटले

होते. जिल्हा पातळीपर्यंत प्रौढ मतदानाने निवड व्हावी. अशा निवडलेल्यांनी प्रांताच्या व केंद्राच्या विधिमंडळात प्रतिनिधी पाठवावे अशी राजेंद्रप्रसाद यांची सूचना होती. अ. भा. काँग्रेस समितीचे प्रतिनिधी ज्या प्रकारे निवडतात ती पद्धती केंद्रीय विधिमंडळाकरिता असावी असे त्यांना वाटत होते. हे अर्थातच मान्य झाले नाही.

अकाली व शीख यांची युती झाली होती. ती फारशी कोणाला पसंत नव्हती. पंजाबमध्ये भीमसेन साचार व गोपीचंद भार्गव या दोन गटांत वैमनस्य होते. त्याबद्दल काही पत्रे या खंडात आहेत. पण नेहरू लिहितात की, याचा फायदा अकालींनी घेतला आहे. ते म्हणतात, अकाली खरोखरच काँग्रेसमध्ये आले असतील व त्यांनी काँग्रेसवर प्रभाव टाकला असेल तर गोष्ट वेगळी. पण मास्टर तारासिंग व ग्यानी कर्तारसिंग यांची भाषणे अकालींच्या हेतूवर प्रकाश टाकतात. कर्तारसिंग यांनी काँग्रेसवर टीका केली आहे आणि या दोघांनी अकालींच्या मागण्या मान्य न झाल्यास काँग्रेस सोडण्याची धमकी दिली आहे. सामान्य काँग्रेसजनांवर याचा परिणाम होईल. दुसऱ्या एका पत्रात नेहरू लिहितात, ग्यानी कर्तारसिंग यांना मंत्री करणार अशा बातम्या आहेत. त्यांचे आजवरचे चरित्र पाहता ते विश्वासार्ह गृहस्थ नव्हेत. तसेच ते अराष्ट्रीय आहेत. त्यांना मंत्री केल्यास काँग्रेसच बदनाम होईल. आपण केवळ संधिसाधू आहोत अशी आपल्यावर टीका होते. कर्तारसिंग यांना मंत्री केल्यास ती टीका अधिक प्रमाणात होऊन तिला बळकटी येईल.

म. गांधींच्या खुनानंतर सरदार पटेलांवर गंभीर आरोप झाले. जयप्रकाश यांनीही टीका केली. कालांतराने, आपली चूक झाली हे जयप्रकाश यांनी आपल्या अखेरच्या दिवसांत जाहीररीत्या कबूल केले. गांधींच्या खुनाच्या बाबतीत मोठा कट होता व रा. स्व. संघ त्यात सामील होता असे पं. नेहरूंचे ठाम मत असल्याचे एका पत्रावरून दिसते. सरदारांनी लिहिले की, देशव्यापी कट नव्हता. संघाचा त्यात संबंध नाही. सावरकरांच्या वर्तुळातील सहा ते आठ लोक कटात आहेत. रोजच्या रोज गुप्तहेर यंत्रणा जे अहवाल पाठविते त्यांची छाननी होते व उपाययोजना होते. तुम्हाला कोण काय सांगते यावरून मत न बनविता प्रत्यक्ष पुरावा पाहूनच मत बनविले पाहिजे.

हा सर्व पत्रव्यवहार सध्याच्या काही प्रश्नांचा उगम कोठे होता हे स्पष्ट करतो. तसेच स्वातंत्र्याच्या उषःकाली काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांपैकी एक नेहरू सोडल्यास बाकीचे तिघे-चौघे सतत आजारी असत आणि त्यांच्यात मतभेद असून ते चव्हाट्यावर मांडून जाहीर वाद करावा अशी आजच्या पुढाऱ्यांची कार्यपद्धती तेव्हा नव्हती. या सर्वांना देशाची काळजी होती व व्यापक देशहितासाठी एकत्र राहण्याचे त्यांनी स्ततःवरच बंधन घातले होते. आजचे पुढारी त्या उषःकाली असते तर काय हाल झाले असते त्याची कल्पनाही करवत नाही.

३-४-१९८८

राष्ट्रपतीपदाचा वाद

सरदार पटेल यांच्या पत्रसंग्रहाच्या आठव्या खंडात पहिल्या राष्ट्रपतीची निवडणूक, काँग्रेसची स्थिती येथपासून मेनन, लोहिया इत्यादींबाबतचे वल्लभभाईंचे मत असे विविध विषय आले आहेत. नेहमीप्रमाणेच सरदारांची मते रोखठोक आहेत.

केंद्र सरकारच्या गुप्तचर विभागाचे प्रमुख संजेवी हे लंडनला गेले असता तेव्हाचे हायकमिशनर कृष्ण मेनन यांना भेटले. मेनन यांनी तेलंगणमधील कम्युनिस्टांची धरपकड व देशभर झालेली स्थानबद्धता याबाबत बरेच टीकास्त्र सोडले. मेनन यांची भाषा त्यांच्या दर्जाला न शोभणारी होती. शिवाय हायकमिशनरने सरकारच्या धोरणावर टीका करणे गैर होते. हे अटकसत्र केवळ गृहखात्यामुळे सुरू झाले असा मेनन यांच्या बोलण्याचा रोख होता. वल्लभभाईंनी हा अहवाल नेहरूंकडे धाडला आणि मेनन यांच्या वक्तव्याबाबत आक्षेप घेतला. नेहरूंनाही हे मान्य नव्हते. पण नेहरू लिहितात, की मेनन आजारी असतात, त्याचा परिणाम त्यांच्या या वक्तव्यावर झाला असावा.

अशोक मेहता यांनी एक लेख लिहून चंद्रलेखा पंडित (विजयालक्ष्मींची कन्या) यांच्यावर टीका केली होती. वल्लभभाई नेहरूंना लिहितात, की तुम्हाला या मंडळींबद्दल सहानुभूती आहे, ती अनाठायी आहे. तुम्ही जन्मभर यांना सहानुभूती दाखविली खरी, पण त्या योग्यतेचे हे लोक नाहीत. लोहियांच्याबद्दलही वल्लभभाईचे हेच मत होते. पण लोहिया सुटल्यानंतर खुद्द स्वत:च्याच पक्षाला डोकेदुखी होऊन बसले आहेत असे सरदार पटेल म्हणतात. प्रा. के. टी. शहा यांनी नवा पक्ष काढण्याचे ठरविले होते. त्यांचे सौमेंद्रनाथ टागोर यांना गेलेले पत्र गुप्त पोलिसांनी पकडले होते. ते सरदारांनी नेहरूंना धाडले आणि त्यासंबंधी म्हटले, प्रा. के. टी. शहा यांना घटना समितीवर निवडू नये असे मी तुम्हाला पूर्वीच सांगितले होते. सौमेंद्रनाथ टागोर यांना शहा यांनी धाडलेले पत्र पाहिल्यावर कोणता विषारी साप आपण उराशी बाळगीत होतो याची तुम्हाला कल्पना येईल.

राजस्थानचे जयनारायण व्यास हे बरेच उपद्व्यापी गृहस्थ होते. त्यांना बहुमत मिळाले नाही म्हणून ते मंत्रिमंडळाविरुद्ध कारस्थाने करीत होते. त्यांना वल्लभभाईंनी चांगलेच धारेवर धरले होते तर शेख अब्दुला यांनी आपली नखे दाखविण्यास सुरुवात केली असता सरदारांनी नेहरूंचे त्याकडे लक्ष वेधविले होते. आझाद यांनी शिक्षणमंत्री या नात्याने बनारस विद्यापीठ व त्याचे कुलगुरू यांची चौकशी करण्याचे ठरविले होते. वल्लभभाईंचा त्यास विरोध होता. त्यावेळी बनारस विद्यापीठात नंतर झाला एवढा गोंधळ नव्हता. वल्लभभाई म्हणतात अलीगड, लखनौ, अलाहाबाद या विद्यापीठांतील गोंधळ पाहता

त्यांचीच अगोदर चौकशी करावयास हवी. आकाशवाणीवरील साहित्यिक, संस्कृत-प्रचुर हिंदी सरदारांना पसंत नव्हते. सामान्य लोकांच्या प्रचारातील भाषा वापरली पाहिजे असे ते म्हणतात. तथापि प्रत्यक्षात ही सुधारणा अद्यापही झाली नाही. काळ्या पैशाचा उल्लेख सरदारांनी केला आहे. तेव्हा केवळ सुरुवात होती. आज ते हयात असते तर काय म्हणाले असते याची कल्पना करावी लागेल. संस्थानिकांना तनखे देण्याची कल्पना नेहरूंना मान्य नव्हती.

सरदार पटेल व पं. नेहरू यांची मन:प्रवृत्ती वेगळी असली तरी एकमेकांना एकमेकांचा आधार होता व ती जाणीव दोघांनाही होती. याही खंडातल्या एका पत्रात नेहरू सरदारांच्या अनुपस्थितीने व्यथित झालेले दिसतात. अनेक महत्त्वाच्या प्रश्नांबाबत निर्णय घेणे यामुळे कठीण होत आहे असे ते म्हणतात. दुसरे एक पत्र सरदारांचे नेहरूंना धाडलेले आहे. लाहिरी यांनी सावरकरांना धाडलेले पत्र गुप्तचर खात्याच्या हाती लागले होते व त्यात असे म्हटले होते की एक संन्यासिनी नेहरूंना वारंवार भेटते आणि नेहरूंवर तिचा फार प्रभाव आहे. हे पत्र सरदारांनी नेहरूंना धाडून चिंता व्यक्त केली. नेहरू आपल्या उत्तरात म्हणतात, की शामाप्रसाद मुखर्जी यांनी मला या संन्यासिनीला भेटण्याचा आग्रह केला. मला ती भेटते व हिंदू कोड, हिंदी वगैरेबाबत बोलते. मी तिची व ती माझी मते बदलण्याचा प्रयत्न करते. मला कितपत यश आले हे मला माहीत नाही, पण माझ्याबाबतीत तिच्या मताचा काही प्रभाव पडला नाही हे मात्र खरे.

हाँगकाँग, लालचीन यासंबंधी वल्लभभाई सावधगिरीची भूमिका स्वीकारू इच्छितात. कम्युनिझमच्या प्रसारास आळा घालणे भारतालाच शक्य असल्याचे त्यांचे मत होते.

काँग्रेस मंत्रिमंडळे, काँग्रेस संघटना यासंबंधी नेहरू, वल्लभभाई हे तेव्हाच सचिंत झाले होते. राज्यांचे मुख्यमंत्री, मंत्री व अधिकारी वारंवार दिल्लीत परिषदांसाठी येतात हे बरोबर नाही. त्यामुळे कारभार कसा चालेल? असा प्रश्न नेहरू विचारतात. आज काही मुख्यमंत्र्यांचा तर दिल्लीतच प्राय: मुक्काम असतो व परिषदांना तर ऊतच आला आहे. नेहरू असते तर – ? त्याही वेळी आर्थिक परिस्थिती ठीक नव्हती व नेहमीप्रमाणे आय. सी. एस. अधिकाऱ्यांचे पगार कमी करावे ही सूचना आली. वल्लभभाई म्हणतात, की या अधिकाऱ्यांनी अगोदरच पगार कमी केले आहेत. त्यांना करही बराच द्यावा लागतो. तेव्हा अधिक कपात करून त्यांची कार्यक्षमता कमी करणे योग्य नाही. गोडसेला गांधींच्या खुनाबद्दल फाशीची शिक्षा दिली गेली. गांधींचे चिरंजीव रामदास व इतर काही काँग्रेसजन यांनी फाशी देऊ नये. ते गांधींच्या तत्त्वाच्या विरुद्ध होईल असे म्हटले. त्याप्रमाणे त्यांनी पत्रेही धाडली. वल्लभभाईंनी हे सर्व मोडून काढले आणि रामदास यांनी गोडसेला भेटून चर्चा करण्यात अर्थ नाही असे कळविले.

बंगालचे मंत्रिमंडळ व काँग्रेस ही तेव्हापासून आतापर्यंत भांडणे, गटबाजी व भ्रष्टाचार यांनीच गाजली. नेहरू एका पत्रात भ्रष्टाचाराबद्दल तक्रार करतात आणि पुरवठा खात्याचा कारभार तपासला पाहिजे, पण तत्पूर्वी मंत्र्याला दूर केले पाहिजे असे म्हणतात. सरदार नेहरूंशी सहमत होते. नेहरूंना पाठविलेल्या पत्रात ते एका पत्राचा हवाला देऊन तेव्हाचे बंगालचे मुख्यमंत्री बिधनचंद्र रॉय हे कसे हुकुमशहा झाले आहेत हे सांगतात. त्याचप्रमाणे बी. सी. रॉय हे अविवाहित असले तरी स्त्री-सहवासाचे बरेच भोक्ते असून त्यांनी सरकारी खर्चाने आपल्या एका विवाहित प्रेयसीला (तिच्या नवऱ्यासह) स्वित्झर्लंड व इतर देशांत फिरवून आणली हीही माहिती देतात! आजच्या अध:पाताची सुरुवात ही अशी पंचवीस वर्षांपूर्वीची आहे.

घटना समितीची बैठक अखेरच्या पर्वात होती. त्यानंतर प्रजासत्ताक भारताचा पहिला राष्ट्रपती निवडावयाचा होता. नेहरू व सरदार यांना राजाजी राष्ट्रपती व्हावेत असे वाटत होते. पण त्यांनी तसा निर्णय घेतला नव्हता. उलट आपली निवड व्हावी असे राजेंद्रबाबूंना वाटत होतेच. त्या प्रमाणे घटनासभेतील अनेक सदस्यांना वाटत होते. यासंबंधात नेहरू, राजेंद्रबाबू व सरदार पटेल यांच्यातील पत्रव्यवहार हे तिघेही त्यावेळी कसे पेचात सापडले होते. (पंचवीस वर्षांनंतर राष्ट्रपतीपदाची निवडणूक हीच काँग्रेसमधील दुफळीला कारक ठरली.) राष्ट्रपतीपदासाठी प्रचार व्हावा हे या तिघांनाही मान्य नव्हते.

या संदर्भातील नेहरूंचे पत्र त्यांच्या प्रवृत्तीवर व भूमिकेवर विशेष प्रकाश टाकणारे आहे. राजेंद्रप्रसाद यांना लिहिलेल्या पत्रात नेहरू म्हणतात, "मी जर कशामुळे व्यथित झालो असेन तर ते बापूजींनी उभ्या केलेल्या एका उदात्त वास्तूला अतिशय वेगाने पडत असलेली भगदाडे पाहून. काँग्रेसमध्ये अनेक उणिवा व दोष आहेत. पण तरीही काँग्रेसची जागा घेणारी दुसरी शक्ती नाही. तथापि काँग्रेस ही आपल्या डोळ्यासमोर वितळून जात आहे. नुसती वितळते आहे असेच नव्हे तर त्यापेक्षा अधिक वाईट असे घडत आहे. शिस्त, सहकार्य, विधायक कार्य यापैकी कशाचाही मागमूस नसून, विघटना व विध्वंस यातच सर्व शक्ती खर्ची पडते. सरकार पडले तर दुसरे स्थापन होईल. पण काँग्रेसची छकले उडाली तर तिची जागा कोण घेणार?"

मग नेहरूंनी – ते स्वत:, राजाजी, वल्लभभाई, राजेंद्रबाबू व आझाद अशा पाचजणांनी भेटून चर्चा करावी असे सुचविले. अशी चर्चा झाली की नाही हे स्पष्ट झालेले नाही. पण राष्ट्रपतीपदाचा वाद चव्हाट्यावर आला नाही व राजेंद्रबाबू राष्ट्रपती झाले. काँग्रेसबद्दल नेहरूंची जी भावना होती ती पाहता आजच्या काँग्रेसच्या अवस्थेबद्दल ते काय म्हणाले असते हे वेगळे सांगण्याची गरज नाही. कारण काँग्रेसचा अध:पात नंतर शतमुखांनी झाला.

१३-४-१९७४

नेहरूंचा अखेरचा काळ

पं. जवाहरलाल नेहरू यांच्या श्री. एस. गोपाललिखित चरित्राचा तिसरा खंड म्हणजे नेहरूंच्या जीवनाचा शेवटचा खंड. १९५६ ते १९६४ हा काळ त्यात आला आहे. श्री. चिंतामणराव देशमुख यांच्या ठिकाणी श्री. कृष्णम्माचारी अर्थमंत्री झाले होते. आर्थिक परिस्थिती काळजी करण्यासारखी होती. १९५७ च्या ऑक्टोबरपासून १९६१ च्या मार्चपर्यंत ७०० कोटी डॉलर्सची परकी मदत आवश्यक होती आणि त्यातील बरीच पहिल्या अठरा महिन्यांत हवी होती. या आर्थिक परिस्थितीचा परिणाम सरकारच्या धोरणावर झाला होता. म्हणून आपल्या मूलभूत धोरणात बदल न करताही आंतरराष्ट्रीय क्षेत्रात मोहीम काढण्याच्या भूमिकेला मुरड घालावयास हवी असे पं. नेहरूंनी तेव्हा कृष्ण मेनन यांना लिहिले होते.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय समस्या पं. नेहरूंनी कशा हाताळल्या याचा थोडक्यात आढावा गोपाल यांनी घेतला आहे. आंध्र व महाराष्ट्र या भाषिक राज्यांच्या मागणीसाठी आंदोलने झाली. गोपाल यांनी यास फारसे महत्त्व दिले नाही. दोन्ही राज्ये जणू थोड्याशा आंदोलनाने पण सहज स्थापन झाली असा त्यांच्या लिखाणाचा रोख दिसतो. या दोन्हींच्या बाबतीत नेहरूंची भूमिका बरोबर नव्हती आणि त्यांना ती बदलावी लागली. भाषावार प्रांतरचनेचे तत्त्व मान्य केल्यावर आंध्र व महाराष्ट्र ही राज्ये स्थापन न करण्याच्या धोरणाला अर्थ नव्हता. आंध्रची स्थापना करताना हैद्राबाद या संस्थानाचे विभाजन होईल व त्यामुळे दक्षिणेतील तोल बिघडेल असे नेहरूंनी म्हटले होते. ही भूमिका विलक्षण होती. गोपाल यांना याची दखल घ्यावीशी वाटलेली नाही.

केरळमध्ये कम्युनिस्ट पक्षाचे सरकार होते. त्याविरुद्ध अनेक शक्ती होत्या. पुढे आंदोलनास काँग्रेसनेच पाठिंबा दिला व सरकार बडतर्फ झाले. गोपाल यांनी हेही सर्व सर्व साहजिक होते आणि लोकनियुक्त मंत्रिमंडळ बरखास्त करण्यास नेहरू बऱ्याच नाइलाजाने तयार झाले असे दाखविले आहे. नंबुद्रिपाद मंत्रिमंडळाचे धोरण व वर्तन यांचे समर्थन करता आले नाही तरी काँग्रेसच्याही वर्तनाचे समर्थन होत नाही हे जितक्या ठाशीवपणे म्हणावयास हवे तितक्या ठाशीवपणे ते येथे म्हटले गेले नाही.

आर्थिक परिस्थिती कठीण झाल्याचे पं. नेहरूंनी म्हटले होते. त्यानंतर ती सुधारण्यासाठी अधिक कर व नियंत्रणे यांचा उपयोग करण्यात आला. यातूनच काळा पैसा वाढण्यास मदत झाली. पं. नेहरू हे समाजवादावर श्रद्धा ठेवणारे. त्यांनी म्हणूनच

आर्थिक प्रश्नास प्राधान्य देऊन उत्पादनवाढ व न्याय्य वाटप या दिशेने पावले टाकावयास हवी होती. या देशाचा आर्थिक प्रश्न हाताळावयाचा तर शेतीला प्राधान्य देणे अपरिहार्य आहे. यासंबंधात श्री. गोपाल यांनी दिलेली माहिती उल्लेखनीय ठरेल.

गोपाल सांगतात की, जॉन स्ट्रॅची यांचे कॉन्टेम्परी कॅपिटॅलिझम व गुन्नर मिर्डाल यांचे इकॉनॉमिक थिअरी अँड अंडरडेव्हलप्ड रीजन्स ही दोन पुस्तके वाचून पं. नेहरूंची पाश्चात्य भांडवलशाहीबद्दलची मते बदलली होती. मार्क्सने भांडवलशाहीचे जे स्वरूप वर्णन केले होते त्यापेक्षा ते प्रत्यक्षात वेगळे आहे आणि भांडवलशाहीतही सुधारणा करून सर्वसामान्य लोकांच्या राहणीचा दर्जा सुधारता येतो हे या ग्रंथांच्या वाचनाने नेहरूंच्या लक्षात आले होते. गोपाल हे एवढेच सांगतात. पण सरकारीकरणाचा व्याप करून भांडवलदारीत सुधारणा करण्यासाठी नेहरूंनी निर्धारपूर्वक पावले का उचलली नाहीत याचे उत्तर त्यांनी दिलेले नाही. राजकीय कारणास्तव नेहरूंनी वेगळा पवित्रा घेतला नाही असा एक निष्कर्ष काढावा लागेल. भारतीय लोकांना संधी-समानता मिळवून देणे म्हणजे समाजवाद अशी नेहरूंची कल्पना होती असे गोपाल यांनी म्हटले आहे.

गोपाल यांनी याच अनुषंगाने शेतीविषयक धोरणाची चिकित्सा करताना सहकारी शेतीच्या नेहरूंच्या कल्पनेचा उल्लेख केला आहे. अशी शेती यशस्वी झाली नाही. काँग्रेसमध्ये या कल्पनेला विरोध झाला. गोपाल यांचे म्हणणे असे आहे की स्ट्रॅची व मिर्डाल यांच्याप्रमाणे नेहरूंनी पॉल बारान यांच्याही ग्रंथांचे वाचन करावयास हवे होते. बारान यांनी भारताचा दौरा करून शेतकऱ्यांचे कर्ज माफ करावे व जमिनीचे राष्ट्रीयीकरण करावे असे म्हटले होते. राष्ट्रीयीकरणानंतर सरकार जमिनीचे वाटप करावयास मोकळे राहिले असते. हे झाले नाही. एम. एन. रॉय यांनी जमीनदारी नष्ट करताना रोख रक्कम न देता दीर्घमुदतीचे सरकारी कर्जरोखे द्यावे अशी व्यवहार्य सूचना केली होती. पण जमीनदारांचा पाठिंबा घेणाऱ्या काँग्रेसजनांना ती मानवली नाही. गोपाल यांनी हा उल्लेख केलेला नाही.

माणसांची पारख करताना पं. नेहरूंच्या हातून अनेकदा गफलती झाल्या व त्या या खंडावरूनही स्पष्ट होतात. केरॉं, कृष्णम्माचारी, ओ. पी. मथाई, मेनन यांचा वाजवीपेक्षा अधिक पाठपुरावा नेहरू करीत. केरॉं हे कर्तबगार होते, पण त्यांचा कारभार भ्रष्ट होता. अखेरीस त्यांना जावे लागले. कृष्णम्माचारींना चौकशी समितीने दोषी धरले व त्यामुळे त्यांना पद सोडावे लागले तरी नेहरूंनी हा निर्णय नाइलाज म्हणून घेतला. ओ. पी. मथाई हे नेहरूंचे खाजगी चिटणीस. त्यांनी बराच धुमाकूळ घातला. भ्रष्टाचार तर त्यांनी केलाच, पण नेहरूंकडे जाणारा प्रत्येक महत्त्वाचा कागद त्यांच्यातर्फे सी. आय. ए. ला मिळत होता. मथाई यांच्यावर टीका होत होती तेव्हा नेहरूंनी ती लक्षात घेतली नाही. १९५९ साली

त्यांनी एका वृत्तपत्र परिषदेत सांगितले की मथाईविरुद्ध मोहीम ही एक बोगस मोहीम आहे. लोकांच्या दूधखुळेपणाचे मला आश्चर्य वाटते. पण त्याच वेळी त्यांनी कॅबिनेट सेक्रेटरी विष्णू साहाय यांना चौकशी करावयास सांगितले. त्यांनी चौकशी केली तेव्हा ४६ ते ५९ या काळात मथाईकडून सीआयएला कागद जात असल्याचे दिसून आले. साहाय यांनी पंतप्रधानांच्या बचावार्थ मथाई निर्दोष असल्याचा अहवाल जाहीर करण्याकरिता दिला, पण पंतप्रधानांना मात्र पुराव्यासहित निर्णय दिला. साहाय यांनी ही माहिती गोपाल यांना दिली. मथाई यांनी राजीनामा दिला व तो नेहरूंनी स्वीकारला. तेव्हा टीकाकारांना दूधखुळे म्हणून काय मिळाले?

मेनन यांना नेहरूंनी सतत पाठिंबा दिला आणि चीनच्या आक्रमणाचे वेळी मेनन यांना जावे लागले. गोपाल यांनी चिनी आक्रमणाची चर्चा करण्यात अनेक पाने खर्ची घातली आहेत. ती सर्व वाचल्यावर हा महत्त्वाचा प्रश्न नेहरू व मेनन यांनी कसा हाताळला याची कल्पना येते. या दोघांना चीन आक्रमण करील हे पटणारे नव्हते आणि वस्तुस्थितीकडे दोघेही दुर्लक्ष करीत होते. मेनन यांनी तर भारतीय हद्दीत चीनने आक्रमण केल्याची वा घुसखोरी केल्याची आपल्याला काहीही माहिती नाही अशी ग्वाही दिली तेव्हा प्रत्यक्षात चीनने भारताचा बराच प्रदेश ताब्यात घेतला होता. काश्मीरच्याच नव्हे, तर इतर जागतिक घटनांबाबत युनोत मेनन जी भाषणे करीत व ज्या तऱ्हेने करीत त्यामुळे त्यांनी पाश्चात्य राष्ट्रांचा राग ओढवून घेतला होताच. त्यांच्या या भाषणांमुळे व वर्तनामुळेही काश्मीरचा प्रश्न चिघळला. पण नेहरूंनी त्यांना दूर केले नाही. चीनबाबत तर मेनन यांनी जाणूनबुजून डोळेझाक केली.

परंतु मेनन हे संरक्षणमंत्री होते आणि नेहरू पंतप्रधान होते. मेनन यांनाच दोष देऊन नेहरूंना अलग करता येणार नाही. गोपाल यांनी तसे करण्याचा प्रयत्न केला आहे. जनरल कौल यांची बढती, संरक्षण खात्यात मेनन करीत असलेला गोंधळ, त्यांचा उद्दामपणा याची नेहरूंवर जबाबदारी नव्हती असे मानता येणार नाही. सीमेवरील लष्कराला लागणारे अत्याधुनिक साहित्य पुरवणे भारताला त्यावेळी शक्य नव्हते. पण किमान किती साहित्य हवे हे लष्कराने सहा वेळा कळविले होते, असे गोपालच सांगतात. त्याप्रमाणे उपाययोजना मेनन यांनी केली नसेल, पण पंतप्रधान म्हणून नेहरू व त्यांचे मंत्रिमंडळ यातून सुटका करून घेऊ शकत नाही.

या सर्व प्रकरणाबाबत गेल्या काही वर्षांत बरेच साहित्य उपलब्ध झाले आहे. लेफ्टनंट जनरल थोरात यांचेही आत्मचरित्र प्रसिद्ध होत आहे. गोपाल यांना उपलब्ध असलेला पुरावा पाहता त्यांनी चीनविषयक धोरण अंगाशी आल्याबद्दल मुख्यत: मेनन जबाबदार असल्याचे दाखविण्याचे कारण नव्हते. मेनन यांच्या वर्तनाबद्दल व धोरणाबद्दल काँग्रेसमध्ये

व बाहेर टीका होत होती. तिची गंभीर दखल न घेता नेहरूंनी मेनन यांचा पाठपुरावा केला. दुय्यम अधिकाऱ्यांपुढे वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांना काही समजत नाही, असे जाहीरपणे सांगण्यासही मेनन कमी करीत नव्हते.

चीनचे लष्करी डावपेच नेहरू व मेनन यांनी लक्षात घेतले नाहीतच, पण राजकीयही घेतले नाहीत. प्रथम आक्रमक पवित्र्याकडे दुर्लक्ष केले आणि नंतर चीनचे उद्दिष्ट व्यापक असून फार मोठा भारतीय प्रदेश ताब्यात घेण्याचा त्याचा पवित्रा आहे असे मानले गेले. चीनचे उद्दिष्ट मर्यादित आहे आणि चढाईचा पवित्रा तो मागे घेईल असे काही पाश्चात्य तज्ज्ञ मानीत होते. लंडन टाइम्सचे चीनविषयक तज्ज्ञ रिचर्ड हॅरिस यांनी तसे लेख चीनशी चकमक सुरू झाल्यावर लिहिले होते. म्हणजे याही दृष्टीने चीनच्या डावपेचांची पुरेशी कल्पना नेहरूंना आली नव्हती. यातच मेनन यांची भर पडल्यामुळे सारा खेळखंडोबा झाला.

नेहरूंचा हा शेवटचा कालखंड अपयशाचा आहे. या अपयशाची कठोर मीमांसा करण्यास गोपाल धजावले नाहीत. त्यामुळे चांगल्या इंग्रजी भाषेत लिहिलेले सपक चरित्र असे या खंडाचे स्वरूप झाले आहे.

१९-१-१९८५

पाकिस्तानातील बजबजपुरी

पाकिस्तानात गेले काही महिने बरीच अशांतता निर्माण झाली आहे. आंदोलनाचा जोर मुख्यत: सिंध प्रांतात आहे. परंतु लष्करी राजवटीविरुद्द उठाव करणे सोपे नाही. तो उठाव होऊन शंभराहून अधिक माणसे मृत्यूमुखी पडली आहेत. पाकिस्तानातील सत्तांतर आतापर्यंत मतपेटीच्याद्वारे कधीच झाले नाही. नागरी अंमल यावा व नंतर लष्करी आणि पुन्हा नागरी असे झाले. गेली सात वर्षे लष्करी अंमल आहे. भुत्तो यांनी बनावट निवडणूका घेतल्या व त्यातून झालेल्या संघर्षामुळे लष्कराने हस्तक्षेप केला. या लष्करी राजवटीविरुद्द सर्वत्र असंतोष आहे तर सिंधमध्ये त्याचे रुपांतर आंदोलनात झाले आहे.

पाकिस्तान स्थापन झाल्यापासून तेथे या ज्या सतत उलथापालथी झाल्या त्यांचा अन्वयार्थ लावण्यास स्टॅन्ले कोचनेक यांचा नवा ग्रंथ – 'इंटरेस्ट ग्रुप्स ॲण्ड डेव्हलपमेन्ट' हा उपयोगी ठरेल. कोचनेक हे पेन्सिल्व्हानिया युनिव्हर्सिटीतील राज्यशास्त्राचे प्राध्यापक असून भारतीय भूखंडाचा त्यांचा अभ्यास आहे. यापूर्वी 'काँग्रेस पार्टी इन इंडिया' व 'बिझिनेस ॲण्ड पॉलिटिक्स इन इंडिया' असे दोन ग्रंथ त्यांनी लिहिले आहेत. पाकिस्तानविषयक ग्रंथातही त्यांनी व्यापार, उद्योग क्षेत्रातील हितसंबंध आणि राज्यकर्ते यांच्या परस्परसंबंधाच्या अभ्यासावर विशेष भर दिला आहे. भारताप्रमाणे तेथे मोकळे वातावरण नसल्याने साधनसामग्री मिळविणे व तिचा वापर करणे यावर मर्यादा पडल्या. तरीही त्यांनी कष्टपूर्वक माहिती जमा केली व ती सोप्या, प्रवाही भाषेत मांडली आहे.

पाकिस्तानातील असंतोष व उलथापालथी यांचा विचार करताना मुस्लिम समाज, त्याचे पुढारी, व्यापारी आणि उद्योगक्षेत्रातील व्यक्तींचा इतिहास, स्थानिक परिस्थिती हे सर्व घटक ध्यानात घ्यावे लागतात. भारताचे विभाजन झाले तेव्हा पाकिस्तान आर्थिक व लष्करीदृष्ट्या टिकाऊ ठरेल काय, व्यवहार्य होईल काय, अशी शंका व्यक्त होत होती. लष्करीदृष्ट्या ते व्यवहार्य नाही असे ऑकिन्लेक यांच्यासारख्या सेनाधिकाऱ्याचे मत होते, तर आर्थिकदृष्ट्या ते टिकाऊ ठरणार नाही असे वाटणारे झिन्किन यांच्यासारखे अधिकारी होते. पाकिस्तानचा म्हणून जो मुलूख फाळणीपूर्व मानला जात होता तो मुख्यत: शेतीप्रधान होता. पंजाब हा सधन प्रांत. पण त्याची सधनता उद्योगधंद्यांपेक्षा शेतीवर अधिक अवलंबून होती. पाकिस्तान निर्माण होण्यापर्वीच उद्योगधंद्यात मुसलमानांनी पुढे आले पाहिजे असे इस्फहानी इत्यादी जीनांना सांगत व जीनांना ते पटले होते. तरीही मुस्लिमांची या क्षेत्रात विशेष प्रगती झाली नाही.

फाळणी होताच सर्वात अधिक प्रमाणात व्यापारी व छोटे कारखानदार पाकिस्तानात कोठून गेले असतील तर ते गुजरातमधून. त्यांनी कराचीच्या परिसरात व्यापार सुरू केला. सर्वच प्रकारची टंचाई होती. त्यामुळे त्यांना भरपूर फायदा होत होता. असा व्यापार व व्यवसाय पंजाबच्या एका भागात वाढू लागला. या व्यापाऱ्यांना पंजाबी शेख म्हणतात. त्यांनीच लयलापूर भागात पाकिस्तानची पहिली कापडगिरणी उभी केली. पूर्व पाकिस्तानात व्यापार-व्यवसाय पश्चिमेप्रमाणे वाढला नाही. कारण तेथील बंगाली मुस्लिम व्यापाऱ्यांनी सरकारी धोरणाचा फायदा घेऊन व्यापार वाढविण्याऐवजी आपली मिळकत जमीनजुमला खरेदी करण्यात मुख्यत्वे खर्च केली. पाकिस्तानचे संस्थापक जीना व पहिले पंतप्रधान लियाकत अली यांच्यावर पाश्चात्य विचारांचा पगडा होता. त्यांनी व्यापर व उद्योग यांच्यावर निर्बंध न लादता बरीचशी मुक्त अर्थव्यवस्था पत्करली. पण दोघेही लवकरच काळाच्या पडद्याआड गेले आणि हा प्रयोग होण्यास अवसर मिळाला नाही. पाकिस्तानच्या निर्मितीनंतर कोरियन युद्धाचा परिणाम म्हणून कच्चा मालाला परदेशी बाजारपेठेत मोठी मागणी आली. पण यामुळे जे परकी चलन मिळाले ती गंगाजळी योग्य रीतीने वापरून औद्योगिक पाया घालण्याची दूरदृष्टी ना व्यापाऱ्यांनी दाखविली ना सरकारने.

मुस्लिम समाजाची घडण हाही औद्योगिक प्रगतीच्या मार्गातील अडसर ठरला. हा समाज अतिशय सरंजामदारी आहे. यात गुणवत्ता व कौशल्य यापेक्षा नातेसंबंध, मालमत्ता यांना महत्त्व अधिक. तसेच या समाजात पंथ अनेक आणि त्यांच्यांत दळणवळण बेताचे. त्यापैकी काहीमध्ये तर हाडवैर. एकंदरच व्यापार व व्यवसाय करणारांचा दर्जा हा जमीनजुमला, लष्करातील व सरकारातील हुद्दा यापेक्षा हलका मानण्यात येत आला. राजकारणात या मालमत्तादारांचे व हुद्देदारांचे वर्चस्व होते आणि ते व्यापारी, छोटे व मोठे होऊ पहाणारे कारखानदार यांना तुच्छे लेखीत. तसे पाहिल्यास इस्फहानी, हबीब, रंगूनवाला, दाऊद इत्यादी कारखानदार घराण्यांच्या प्रमुखांचे जीना, लियाकत अली यांच्याशी संबंध जवळचे होते. पण सबंध समाजात त्यांचा काही विशेष प्रभाव नव्हता आणि जीना व लियाकत अली यांच्यानंतर पाकिस्तानी राज्यकर्तेही त्यांना फारसे महत्त्व देत नव्हते.

पाकिस्तानातील आणखी एक गट म्हणजे धर्मगुरूंचा. हिंदू वर्चस्वाच्या विरुद्ध जीनांनी इस्लामी राष्ट्राची योजना मांडली. पण त्याना ते आधुनिक राष्ट्र करावयाचे होते. मुस्लिम उलेमांविषयी जीनांना बिलकूल प्रेम नव्हते. अनेक धर्मगुरु तर बेताचेच शिकलेले व पोपटपंची करणारे होते. ते राजकारणावर प्रभाव पाडण्यास उत्सुक होते, पण त्यात त्यांना यश आले नाही. आताही जनरल झिया यानी इस्लामी राज्याचा पुकारा केला असला तरी उलेमांपेक्षा त्यांची आज्ञा प्रमाण ठरते. इस्लाम धोक्यात आहे ही घोषणा करून पाकिस्तान

झाले, पण त्याच्या स्थापनेनंतर त्यास आधुनिक बनावयाचे होते. समाज सरंजामी, राष्ट्राची उभारणी धार्मिक घोषणेमुळे झालेली आणि प्रत्यक्षात मात्र अर्थव्यवहाराशी गाठ अशा पेचात पाकिस्तान प्रारंभापासूनच सापडले.

अनेक थरांवर विभागलेला पाकिस्तानी समाज हा राजकीयदृष्ट्या संघटित होऊ शकत नव्हता त्याचप्रमाणे पाकिस्तानी व्यापारी व कारखानदार हेही संघटना स्थापून त्याकरवी सरकारकडून आपल्या मागण्या मान्य होतील असे प्रयत्न करू शकत नव्हते. त्यांचा भरंवसा संघटनात्मक प्रयत्नांपेक्षा वैयक्तिक ओळखी, नाती व अन्य संबंध यावर होता. अयुबबरोबर कोण गॉल्फ खेळतो, भुतोंचा वर्गमित्र कोण यावरच कारखानदारीचे प्रश्न सोडविण्यास प्राधान्य प्राप्त झाल्याने व्यापार व उद्योग या क्षेत्रातील व्यक्ती संघटित होऊन एक नव प्रभावकेंद्र तयार होण्याचे दीर्घकाळ टळले आणि जेव्हा तयार झाले तेव्हा ते दुर्बळच राहिले.

मुस्लिम लीगची राजकीय पक्ष म्हणून वाढ झाली नाही. जीना व लियाकत लवकरच वारल्यामुळे पक्षाला भक्कम नेतृत्व नव्हते. जीनांनीही लीगची पक्ष म्हणून कितपत वाढ केली असती याची शंका आहे. कारण तशी वाढ झाली असती तर लोकशाही पद्धतीने त्यांना त्यास वारंवार तोंड द्यावे लागले असते. जीनांना केवळ हुकूम देण्याचीच सवय असल्याने राजकीय पक्षाची वाढ ही त्यांना त्रासदायक वाटली असती. त्यांनी गव्हर्नर जनरलपद घेतले आणि ते घटनात्मक न ठेवता सर्व अधिकार त्यांनी घेतले व पंतप्रधान हा दुय्यम बनविला. पाकिस्तानात यामुळे पंतप्रधान, त्याचे मंत्रिमंडळ आणि विधिमंडळ यांच्यापेक्षा सत्तेचे मुख्य केंद्र गव्हर्नर-जनरल हे झाले. घटना बदलली तेव्हा पार्लमेंटला जबाबदार अशा मंत्रिमंडळाच्या हाती सत्ता राहण्याऐवजी ती अध्यक्षाकडे गेली. लोकनियुक्त प्रतिनिधींपेक्षा कारभारयंत्रणा वरचढ झाली.

याच काळात निरनिराळे अधिकारी हे वर्चस्व गाजवू लागले. गुलाम महंमद व इस्कंदर मिर्झा हे ब्रिटिश काळात ज्येष्ठ अधिकारी होते. ते अध्यक्ष बनताच त्यांनी लोकप्रतिनिधींना कस्पटासमान वागविले. त्यांना व त्यांच्या इतर सहकाऱ्यांना राजकारणी व राजकीय पक्ष यांच्याबाबत कमालीची घृणा होती. म्हणून त्यांनी आपल्या व कारभारयंत्रणेच्या हाती जास्तीत जास्त सत्ता कशी येईल याची काळजी घेतली. त्यांना राजकारण्यांबद्दलच नव्हे तर व्यापारी व कारखानदार यांच्यासंबंधीही तिरस्कार होता. म्हणूनच जीना व लियाकत यांच्या काळातील मुक्त अर्थव्यवस्थेचे धोरण बदलून सरकारच्या हाती आर्थिक नियंत्रण आले. यामुळे व्यापारी व कारखानदार आणि त्यांच्या संघटना अधिकच दुर्बळ झाल्या. वैयक्तिक संबंधांना महत्त्व असल्याने परवाने मिळविण्यासाठी भरपूर लाचबाजी होऊ लागली. वैधानिक उपाययोजनेपेक्षा वटहुकुमांचे राज्य आले – आणि ते आजतागायत कायम आहे. कारभारयंत्रणा वर्चस्व गाजवू लागली की, केंद्रीकरणाकडेच तिचा ओढा

राहतो. या केंद्रीकरणामुळे पंजाबचे फावले व इतर प्रांतांकडे दुर्लक्ष झाले. पूर्व पाकिस्तानवर तर अन्यायच झाला. प्रथम भाषेवरून आंदोलन झाले व पुढे राजकीय सत्ता देण्यास भुत्तो यांनी अडसर घातल्यामुळे पूर्व पाकिस्तान स्वतंत्र होऊन बांगलादेशची स्थापना झाली.

जनरल अयुबखान यांच्या हाती सत्ता आली तेव्हा त्यांनी आर्थिक व्यवहारावरील नियंत्रणे सैल केली. पण छोटे व मध्यम कारखानदार वाढतील एवढेच त्यांनी बघितले. मोठ्या कारखानदारीला त्यांनी उत्तेजन दिले नाही. पाकिस्तानी कारखानदारांना स्वातंत्र्य हवे होते पण कामगार संघटना नको होत्या. अयुब यांनी या संघटना होऊ दिल्या पण त्यांच्यावर कडक नियंत्रण घातले. अयुब यांच्या कारकीर्दीत भ्रष्टाचार वाढला. त्यांचा मुलगा कारखानदार बनला. अयुब यांनी राजकीय पक्ष बरखास्त केले व मूलभूत लोकशाहीच्या नावाखाली नियंत्रित लोकसत्ता आणली. संसदेचे सभासद या पद्धतीने निवडले गेले पण संसदेला अधिकार नव्हते व मंत्री संसदेला जबाबदार नव्हते. या मंत्र्यांपेक्षा अयुब यांना अधिक अधिकार होते. अयुब यांच्या कारकीर्दीत औद्योगिक उत्पादन मात्र तेरा टक्क्यांनी वाढले. पण त्याचबरोबर प्रादेशिक असमतोल वाढला व विषमता वाढली. फार थोड्या कुटुंबांच्या हाती उद्योगधंदे केंद्रित झाले. कोचनेक यांनी १९५९ मध्ये पाकिस्तानच्या उद्योगधंद्यांचा अभ्यास केला होता. त्यांना असे आढळले की, पाकिस्तानात तेव्हा तीन हजार कारखाने होते. त्यापैकी २४ कुटुंबांच्या हाती पन्नास टक्के होते. अयुब यांच्या दहा वर्षांच्या कारकीर्दीत अखेरीस महबूब अल हक यांनी असे दाखवून दिले की, उद्योगधंद्यांपैकी ६६ टक्के, विमा ७० टक्के व बँकिंग ८० टक्के याप्रमाणे मालमत्ता वीस कुटुंबांकडे होती. याह्याखान यांनी फारसे बदल केले नाहीत. बांगलादेशचे युद्ध भुत्तोंच्या दुराग्रहामुळे ओढवले पण नंतर याह्या यांना जावे लागले व त्यांच्या जागी भुत्तो आले.

भुत्तो यांचे सरकार हे पाकिस्तानातील पहिलेच निवडून आलेले सरकार. पण प्रातिनिधिक कारभार चालविण्याची भुत्तो यांची वृत्ती नव्हती. त्यांनी संसदेला किंमत दिली नाही व मंत्र्यांतीलही काहीच विश्वासात ठेवले. लोकनियुक्त कारभाराच्या नावाखाली भुत्तो यांचाच हडेलहप्पी कारभार चालू होता. संसद चालू असताही वटहुकूम जारी होत. पाकिस्तानच्या स्थापनेपासून आतापर्यंत संसद ही निष्प्रभच राहिली. १९४७ ते ५८ या काळात संसद ३३८ दिवस भरली. म्हणजे वर्षाला तीस दिवस. या काळात १६० विधेयके संसदेने पास केली पण ३७६ वटहुकूम निघाले. १९६५ ते ६९ या काळात संसदेचे अधिवेशन २२१ दिवस भरले. भुत्तो यांनी यापेक्षा अधिक महत्त्व दिले नाही.

भुत्तो यांनी राज्यावर येताच दमदाटी सुरू केली. त्यांनी राष्ट्रीयीकरणाचा वरवंटा फिरविला. पण याचे कारण अयुब यांच्या मंत्रिमंडळात मंत्री असता त्यांनी व्यापारी व कारखानदारांकडून स्वत:साठी व पक्षासाठी निधी उभा करण्याचे ठरविले होते आणि त्यास

प्रतिसाद मिळाला नाही म्हणून भुत्तो यांनी कारखानदारांची सभा घेऊन त्यांना भरपूर गालिप्रदान केले. काहींना तुरुंगात टाकले. सर्वंकष राष्ट्रीयीकरण करून त्यांनी आपण समाजवादी असल्याचे जाहीर केले. पण त्यांना वस्तुत: अनिर्बंध आर्थिक राजकीय सत्ता हवी होती. राजकीय विरोधकांविरुद्ध तसेच स्वत:च्या पाकिस्तान पीपल्स पार्टीत शिस्त ठेवण्यासाठी त्यांनी अनेकांविरुद्ध खटले भरले. अनेकांना मारण्याच्या धमक्या दिल्या. अशा रीतीने केवळ दहशतीचे राजकारण त्यांनी आरंभिले. विरोधकांवर खोटे फौजदारी खटले भरले आणि आर्थिकदृष्ट्या ते डबघाईला येतील असे उपाय योजले. वनस्पतीपासून अनेक उद्योगांचे राष्ट्रीयीकरण झाल्यामुळे वृत्तपत्रांना सरकारवर जाहिरातींसाठी अवलंबून राहावे लागले. थोडी विरोधी टीका येताच जाहिराती बंद करण्याचा उपाय भुत्तो वापरीत. डॉन, नवाइ वक्त, पाकिस्तान इकॉनॉमिस्ट यांच्याविरुद्ध त्यांनी तो योजला. त्यांची गैरमर्जी झालेल्या वृत्तपत्रांना खाजगी जाहिराती मिळणार नाहीत हेही त्यांनी पाहिले. अशा वृत्तपत्रांना कागदच दिला जात नव्हता. भुत्तो-राज्य हे गुंडांचे राज्य होते. आता त्यांची पत्नी व कन्या लोकशक्तीच्या, लोकांच्या हक्काच्या गोष्टी करतात; पण भुत्तो यांच्या गुंडगिरीचे सर्व फायदे त्या घेत होत्या व ही गुंडगिरी होती असे आजही त्यांना वाटत नाही. या दोघी कोणी क्रांतिकारक आहेत व त्यांच्या हाती राज्य असल्यास भारताशी पाकिस्तानची मैत्री होईल असे काही भाबड्यांना वाटते. पण भुत्तो घराणे हेच गुंडगिरीवर पोसले आहे.

भुत्तो यांनी कारखानदार व व्यापारी यांच्या नाड्या आवळताच अनेकजणांनी आपले व्यवसाय बंद केले. काहींनी परदेशात भांडवल नेले. ७७ च्या निवडणुकीच्यावेळी भुत्तो यांनी व्यापारी व कारखानदार यांच्याशी जमवून घेण्याचा प्रयत्न केला, पण ते जमले नाही. त्यांच्याविरुद्ध उभ्या राहिलेल्या आघाडीला त्यांनी मदत केली आणि भुत्तो यांची राजवट उलथवून झिया राजवट आली व भुत्तोविरुद्ध त्यांनी कारवाई केली तेव्हा समाजातल्या फार मोठ्या वर्गाचा झियांना पाठिंबा होता. राजकीय खुनांचे तंत्र भुत्तो यांना अमान्य नव्हते. पाकिस्तानचे व त्यांचे राजकारण ज्या रीतीने चालत आले त्याच्याशी भुत्तो यांची फाशी सुसंगत होती.

झिया यांनी हाती सत्ता घेतल्यावर प्रातिनिधिक कारभाराचे आश्वासन मधूनमधून देण्याचा पवित्रा घेतला. पण प्रत्यक्षात त्यांनी काही केले नाही. त्यांनी स्थापन केलेली मजलिस ही प्रातिनिधिक नाही. झिया यांच्या कारकीर्दीत प्रादेशिक समतोल साधण्याचे प्रयत्न झाले नाहीत. त्यांनी भुत्तो यांचे धोरण फिरवून काही कारखान्यांचे राष्ट्रीयीकरण रद्द केले व ते खाजगी मालकीचे केले. पण हे सरसकट उद्योगांबद्दल झाले नाही. त्यामुळे आजही झिया यांच्या सरकारच्या हाती आर्थिक सत्ता केंद्रित झाली आहे. पंजाब सोडल्यास इतर प्रांतांकडे दुर्लक्षच झाले. झिया यांनी लष्करातून विरोध होऊ नये म्हणून

काही अधिकाऱ्यांना गव्हर्नर, काहींना महामंडळांचे प्रमुख बनविले. पण सत्ता केंद्रित ठेविली.

झिया यांचे आर्थिक सल्लागार गुलाम इशाक खान हे आहेत. तेच अर्थमंत्री आहेत. इशाख खान हे कमालीचे उद्धट व दुराग्रही असून त्यांना खाजगी व्यापारी व कारखानदार यांच्याबद्दल कमालीचा राग आहे. खाजगी क्षेत्र वाढू देण्यास त्यांचा विरोध आहे. तेव्हा भुत्तो यांच्याविरुद्ध जो वर्ग होता तो झिया यांचाही विरोधक आहे. अफगाणिस्तानात रशियाने आक्रमण केल्याने झिया यांना जीवदान मिळाले. पण त्यांच्या राजवटीबद्दल लोकांत विश्वास नाही. अर्थात पाकिस्तानात संघटित असा राजकीय पक्ष नाही. त्यामुळे सुरळीतपणे सत्तांतर होणेही कठीण. झिया हे व्यक्तिश: भ्रष्ट आहेत असे कोणी म्हणत नाहीत, पण त्यांचे पंजाबी अधिकारी हे मात्र भ्रष्टाचाराचेच पुरावे आहेत. प्रत्येक जनरल मर्सिडीस वा टोयोटो गाडीतून फिरतो. सरकारी वरिष्ठ हुद्दे निवृत्त लष्करी अधिकाऱ्यांनी बळकावले आहेत.

मुस्लिम लीगने पाकिस्तान होण्यापूर्वी व नंतर प्रत्येक विरोधी मुसलमान व अन्यधर्मीय हा शत्रू मानला. संसदीय लोकशाहीत ही वृत्ती धारण करून चालत नाही. या वृत्तीचे मुस्लिम परंपरावाद्यांनी पोषणच केले. एका पाकिस्तानी ग्रंथात परंपरावाद्यांचे जे म्हणणे आहे ते कोचनेक यांनी उद्धृत केले आहे. त्यात म्हटले आहे की "इस्लामी राज्य हे लोकशाही असूच शकत नाही. कारण लोकशाहीत बहुमताच्या जोरावर कायदे बदलण्याची मुभा असते. मग ते बहुमत चूक का असेना. पण मुस्लिम कायदे हे कुराणाबरहुकूम आहेत, ते परमेश्वराचे कायदे आहेत. तेव्हा ते बदलणार कसे? या कायद्याने स्वातंत्र्यावर बंधन येत नसून स्वातंत्र्याची हमी मिळते."

विरोधक तो शत्रू वा काफिर. कायदे ईश्वराचे व ते बदलता येत नाहीत या मनोभूमिकेमुळे बहुतेक राजकीय पक्ष वाढले नाहीत आणि प्रातिनिधिक कारभारापेक्षा एक व्यक्ती व तिचा गट यांच्याच राजवटी आल्या. फार काळ सामाजिक तणावांना थोपवून धरणे, त्यावर उपाययोजना करणे अशा व्यक्तीस व गटास अशक्य असते. झिया यांना याचा अनुभव येत आहे. तोच त्यांच्या पूर्वीच्या राज्यकर्त्यांना आला. या स्थितीत पाकिस्तानात सत्तांतर झाले तर झियांना परागंदा व्हावे लागेल किंवा फासावर जावे लागेल. पण त्यांची जागा घेणारा संघटित पक्ष नाही. तेव्हा त्यांचाच कोणीतरी भाईबंद येईल. आज जसे उद्रेक होत आहेत, तसेच पूर्वी झाले. त्यातून पाकिस्तानी राजकीय जीवन संघटित झाले नाही. आताही यापेक्षा वेगळे काही होणार नाही.

पाकिस्तानच्या इतिहासावरून संस्थात्मक समाजजीवन दुर्बल व नष्ट करणे कसे घातक असते याचा बोध येथेही घेण्यासारखा आहे.

१६-१०-१९८३

अमृतसर

बी. बी. सी. चे भारतातील प्रतिनिधी श्री. मार्क टली हे एक साक्षेपी वार्ताहर आहेत. त्यांचा जन्मही भारतात झाला आणि गेली सोळा वर्षे ते या देशात असून सर्व महत्त्वाच्या घडामोडी त्यांनी जवळून पाहिल्या. त्यांचे सहकारी सतीश जॅकॉब हेही मेहनती व साक्षेपी आहेत. या दोघांनी श्रीमती इंदिरा गांधी यांच्या जीवनातील अखेरचा लढा 'अमृतसर' या पुस्तकात रंगविला आहे. श्रीमती गांधींचा अखेरचा लढा शिखांशी नव्हता तर सुवर्णमंदिरात मोर्चे बांधून बसलेल्या काही दहशतवादी शिखांविरुद्ध होता असा टली व जॅकॉब यांनी निष्कर्ष काढला आहे आणि अनेक शिखांना आपला हा निष्कर्ष मान्य होत नाही अशी कबुली दिली आहे.

'अमृतसर' हे पुस्तक म्हणजे सुवर्णमंदिरात लष्कर घुसले तेव्हाच्या वा तत्पूर्वीच्या घटनांची जंत्री नाही. लष्कर पाठविले जाईपर्यंतच्या व नंतरच्या घडामोडींचे ते विश्लेषण आहे. ते करताना जास्तीत जास्त काटेकोरपणा लेखकद्वयांनी दाखविला असून आपल्या प्रत्येक विधानाला पुरावा देण्याची काळजी घेतली आहे. या ज्या घडामोडी घडल्या त्यात सामील असलेल्या सर्व प्रमुख व्यक्तींना भेटून त्यांची मते निवेदन केली असली तरी कोणाही एकावर विश्वास न ठेविता विधान तपासून पाहिले आहे. पंजाबची शोकांतिका ही सत्ताधारी पक्ष आणि अकाली दल यांच्या नेत्यांचे अदूरदर्शित्व, वैयक्तिक महत्त्वाकांक्षा, गटबाजी आणि धर्माचा उपयोग करून राजकीय नेतृत्व करण्याचे डावपेच इत्यादी अनेक घटकांच्या क्रियाप्रतिक्रियांमुळे घडली.

मार्क टली व जॅकॉब यांनी केवळ श्रीमती गांधी व काँग्रेस नेते यांनाच जबाबदार धरलेले नाही. अकालींचे धर्माधिष्ठित राजकारण, धार्मिक कडवेपणाला मिळणारा वाव, अतिरेकी व दहशतवादी यांच्यापुढे पड खाणारे अकाली नेते आणि सर्रास दहशतवादाचा अवलंब करणारे भिंद्रनवाले यांनाही त्यांनी तितकेच जबाबदार धरले आहे. श्रीमती गांधी आपले चिरंजीव संजय गांधी व पंजाबचे तेव्हाचे मुख्यमंत्री ग्यानी झैलसिंग यांच्यावर अवलंबून राहिल्या. दोघेही विधिनषेधशून्य. संजय गांधींचा साहसवाद आणि झैलसिंग यांचे स्वार्थी व संकुचित राजकारण यांचा मिलाफ झाला होता. या साहसवादी राजकारणाला अकालींच्या तितक्याच संकुचित व साहसवादी राजकारणाची जोड मिळाली व पंजाबची शोकांतिका घडली.

अकाली पक्षाचा जन्म शीख धर्मगुरूंच्या भ्रष्टाचारास प्रतिबंध घालण्यासाठी झाला. याचा या पुस्तकातील इतिहास उद्‌बोधक आहे. जालियनवाला बागेत हत्याकांड करणाऱ्या डायरला सुवर्णमंदिराच्या तेव्हाच्या धर्मगुरूंनी समारंभपूर्वक सरोपा चढविला होता आणि त्याला शीख होण्याची त्यांनी गळ घातली. आपण सैन्यात आहोत तेव्हा केस वाढविणे, दाढी ठेवणे आपल्याला जमणार नाही, धूम्रपानही सोडता येणार नाही असे डायर म्हणाला तेव्हा या सर्व बाबतीत त्यास सवलत देण्यास धर्मगुरू तयार झाले होते. या डरपोक व लाचार धर्मगुरूंचेच वारस भिंद्रनवाले यांच्यापुढेही हात जोडून उभे राहात आणि त्यांच्या राजकारणाला अप्रत्यक्षपणे हातभार लावीत. त्यामुळे सुवर्णमंदिरात शस्त्रास्त्रे जमा होत होती, मोर्चे बांधले जात होते तरी हे प्रमुख पुजारी गप्प होते. मंदिरात लष्कर घुसल्यानंतर मात्र त्यांची धार्मिक भावना जागृत झाली.

शिरोमणी गुरुद्वाराप्रबंधक समिती वा अकाली दल स्थापन झाल्यानंतर ब्रिटिश सरकारने पंजाबमधील दोनशे गुरुद्वारांचा तावा समितीकडे दिला. आज तिच्याकडे सातशे गुरुद्वारा आहेत. मास्टर तारासिंग हे दीर्घकाळ अकाली दलाचे नेते होते. अकाली दलाने प्रारंभापासून शीख समाजाचे स्वतंत्र व्यक्तित्व टिकविण्याचा निर्धार केला होता. हिंदू व आधुनिकता यांच्या लाटेखाली शीख समाज नष्ट होऊ नये याकरिता त्याचे व्यक्तित्व स्वतंत्र राहिले पाहिजे असे मास्टर तारासिंग म्हणत आणि अकाली दलाचा मूलाधार तोच आहे. म्हणून अगदी १९५२ मध्येही सरदार हुकुमसिंग यांनी पं. नेहरूंवर टीका करताना म्हटले होते, की "पं. नेहरू हे आक्रमक हिंदुत्वाचे नेते आहेत पण ते राष्ट्रवादाची फसवी भाषा करतात. ते हुकुमशहा आहेत पण लोकशाहीच्या गोष्टी करतात. गोबेल्सप्रमाणे ते खोटे बोलतात. राजकीयदृष्ट्या ते बनवेगिरी करणारे आहेत, दुटप्पी आहेत व भारतातील प्रतिगामित्वाचे हस्तक आहेत." जीनांनीसुद्धा नेहरूंवर अशी टीका केली नसेल. सरदार हुकुमसिंग पुढे काँग्रेसमध्ये सामील झाले आणि इंदिरा गांधींच्या कारकीर्दीत लोकसभेचे सभापतीपद त्यांना देण्यात आले.

अकाली दलाने पंजाबी सुभ्याची मागणी केली ती जातीय म्हणून नेहरूंनी अमान्य केली. मास्टर तारासिंग यांचे प्रतिस्पर्धी संत फतेसिंग यांनी श्रीमती गांधींना पंजाबी सुभा हा शीख सुभा होणार नाही असे आश्वासन दिल्यानंतर पंजाब व हरयाणा अशी दोन राज्ये झाली. पंजाबी सुभ्याचे आंदोलन चालू होते. तेव्हा मास्टर तारासिंग, संत फतेसिंग इत्यादी नेत्यांनी अकाल तख्तमध्ये मुक्काम केला होता. पुढे भिंद्रनवाले यांनी हेच केले. पंजाबी सुभा झाला तरी चंदिगढ ही त्याची राजधानी करावी यासाठी आंदोलन झाले, उपोषणाचा मार्ग अवलंबिला गेला. तेव्हा चंदिगढ मिळेल पण अभोर व फाजिल्का हरयाणास दिले पाहिजे असा निर्णय इंदिरा गांधींनी दिला याची अंमलबजावणी मात्र झाली नाही. पुढे

बांगलादेशच्या युद्धाच्या अगोदर व नंतर श्रीमती गांधी यांचे राजकारणावर वर्चस्व स्थापन होऊन इतर पक्षांप्रमाणे अकाली दल निष्प्रभ बनले. ७२ मध्ये झैलसिंग पंजाबचे मुख्यमंत्री झाले आणि त्यांनी श्रीमती गांधींच्या अनुमतीने अकाली दलास नामोहरम करण्याचे ठरविले.

यासाठी झैलसिंग यांनी मार्ग आखला तो जातीयवादी होता. शिखांच्या धर्मभावनेचे कोडकौतुक करण्याची प्रत्येक संधी त्यांनी साधली. यामुळे आपल्या पायाखालची वाळू सरकते आहे असे पाहून अकाली दलाने आनंदपूरसाहेब येथे बैठक घेऊन ठराव केला. या पुस्तकात या ठरावाच्या इंग्रजी भाषांतराचाच आधार घेतला आहे. त्यात संरक्षण, परराष्ट्र खाते, चलन व दळणवळण एवढ्यापुरतेच केंद्राचे अधिकार मर्यादित असावे अशी मागणी होती. कोणतेही सरकार ती मान्य करणार नव्हते व करणार नाही. शिरोमणी अकाली दल हे शीख राष्ट्राच्या आकांक्षेचे प्रतीक असून सर्व शीख समाजाचे प्रतिनिधी आहे असेही ठराव म्हणतो. शीख राष्ट्र हा शब्दप्रयोग त्यात स्पष्ट आहे. आनंदपूरच्या ठरावात देशविघातक कॉही नाही असे चंद्रशेखर प्रभृती म्हणत आले तरी ते खरे नव्हते. अकाली दल हे सर्व शिखांचे प्रतिनिधी मानावयाचे तर निवडणुकीने हे सिद्ध केले नव्हते. शिवाय कॉंग्रेस पक्ष असा कोणत्याही पक्षाला विशिष्ट समाजाचा एकमेव प्रतिनिधी असल्याचे मान्य करणार नाही. इंदिरा गांधीनी आनंदपूरचा ठराव मान्य केला नाही हे योग्यच झाले. पण ७७ साली अकाली दल जनता पक्षाच्या साहाय्याने पंजबात सत्ताधारी झाले तेव्हाही त्याने या ठरावाच्या अंमलबजावणीचा आग्रह धरला नव्हता.

अकाली दल पंजाबात सत्तारूढ झाल्यावर त्याचा कणा मोडण्यासाठी काय करावयाचे याचा व्यूह संजय गांधी व झैलसिंग यांनी रचला. त्याचा या पुस्तकात तपशील दिला आहे तो लक्षात घेण्यासारखा असून भिंद्रनवाले यांचा भस्मासूर या दोघांनी कसा उठविला, श्रीमती गांधींनी त्याकडे कसे दुर्लक्ष केले याची कल्पना येते. हे अतिशय आत्मघातकी राजकारण होते. संजय गांधी व झैलसिंग यांनी असे ठरविले की, अकालींना शह द्यावयाचा तर तो लोंगोवाल, बादल व तोहरा यांच्यापैकी एकाला फोडून दुसऱ्या दोघांची युती दृढ होऊ द्यावयाच्याऐवजी तिसराच धार्मिक शीख पुढारी हाताशी धरणे योग्य. भिंद्रनवाले हे त्यावेळी नुकतेच पुढे येत होते आणि अकाली दलाने झैलसिंग-संजय या युतीला संधी दिली. ७८ सालच्या सुमारास शीख व निरंकारी यांच्यात वाद सुरू झाला होता. निरंकारी हे सुधारणावादी आहेत, ते धर्मभ्रष्ट आहेत असे कर्मठ शीख मानतात. निरंकारींनी एक मेळावा भरविण्याचे ठरविले होते. त्यास अकाली सरकार परवानगी नाकारू शकत नव्हते. सुवर्णमंदिरातील बैठकीत सरकारचा निर्णय महसूलमंत्री समजावून सांगत असताना भिंद्रनवाले उठले व त्यांनी बजावले की, आम्ही निरंकारींचा मेळावा भरवू देणार नाही.

मेळाव्याच्या इथे जाऊन आम्ही त्या लोकांची खांडोळी करू. एवढे बोलून निरंकारींविरुद्ध त्यांनी मिरवणूक काढली. ते व फौजासिंग हे अग्रभागी होते. फौजासिंगने निरंकारी बाबा गुरुबचनसिंग यांच्यावर तरवार उगारली पण त्यांच्या रक्षकाने गोळी झाडून फौजासिंगास ठार केले. अकालींची पंचाईत झाली. सरकारात असल्याने त्यांना बेकायदेशीर चळवळीस पाठिंबा देता येत नव्हता. या प्रसंगातून झैलसिंग व संजय यांना भिंद्रनवाले हा पुढारी गवसला.

या दोघांनी दल खालसा नावाचा पक्ष काढण्यास प्रोत्साहन दिले. अरोमा हॉटेलात पक्षाची पहिली बैठक झाली. तिचे सहाशे रुपयांचे बिल झैलसिंग यांनी दिले. या बैठकीत खलिस्तानची चर्चा झाली. सुवर्णमंदिरात सैन्य पाठविल्यानंतर निघालेल्या सरकारी श्वेतपत्रिकेत म्हटले आहे की, दल खालसाची स्थापना शिखांचे स्वतंत्र सार्वभौम राज्य स्थापन करण्यासाठी झाली. परंतु झैलसिंग व संजय गांधी यांचा दल खालसास सक्रिय पाठिंबा होता हे श्वेतपत्रिका दडवून ठेविते. भिंद्रनवाले दल खालसात उघडपणे सामील झाले नाहीत. ते मरेपर्यंत अकाली दलात होते पण त्यांचा या दल खालसास पाठिंबा होता व तो त्यांचाच पक्ष हे सर्वांना माहीत होते. भिंद्रनवाले यांच्याशी झैलसिंग संबंध ठेवून होते. ८० साली निवडणूक झाली तेव्हा भिंद्रनवाले यांनी दोन तीन काँग्रेस उमेदवारांचा प्रचार केला. त्यापैकी एक म्हणजे आर. एल. भाटिया. (हे नुकतेच लोकसभेवर निवडून आले आहेत.) दुसरा उमेदवार प्रीतमसिंग भिंदर या पोलिस अधिकाऱ्याची पत्नी. पुढे भिंदर हे पंजाबचे पोलिसप्रमुख झाले. भिंद्रनवाले यांच्या दहशतवादाविरुद्ध उपाय योजण्याकरिता भिंदर यांची ही निवड होती. तेव्हा निवडीचे कौतुकच करावयास हवे. भिंद्रनवाले यांनी एका काँग्रेस उमेदवाराचा प्रचार केला हे श्रीमती गांधींनीच नंतर मान्य केले.

निवडणुकीनंतर दरबारासिंग हे झैलसिंग यांचे प्रतिस्पर्धी पंजाबचे मुख्यमंत्री नेमले गेले आणि झैलसिंग हे मुख्यमंत्री असताना जातीय राजकारण करतात व त्यामुळे काँग्रेस पक्षाच्या राजकारणास 'खो' बसतो अशी तक्रार दरबारासिंग यांनी केली होती. पण श्रीमती गांधींनी त्यासंबंधात काही केले नाही.

श्रीमती गांधी पुन्हा अधिकारावर आल्यावर वर्षभरात तीन राजकीय खून झाले. २४ एप्रिल ८० रोजी निरंकारींचे प्रमुख बाबा गुरुबचनसिंग यांचा खून झाला. भिंद्रनवाले यांचे यात नाव घेतले जात होते. याची चौकशी न करता भिंद्रनवाले यांचा संबंध नसल्याचे झैलसिंग यांनी गृहमंत्री या नात्याने जाहीर केले. नंतर ९ सप्टेंबर ८१ रोजी लाला जगतनारायण यांचा खून झाला. पोलिसांनी याबाबत भिंद्रनवाले यांचे नाव कळविले होते. दरबारासिंग भिंद्रनवाले यांना अटक करणार होते. वॉरंट निघाले. भिंद्रनवाले तेव्हा

चंदोकलान या हरयाणामधील गावी होते. पण पोलिसांनी त्यांना अटक केली नाही. ते २०० मैलांचा प्रवास करून गुरुद्वारात दाखल झाले. हरयाणा सरकारच्या गाडीने त्यांनी प्रवास केला. पंजाबचे पोलिस व भिंद्रनवाले यांचे अनुयायी यांच्यात चकमक झाली. जाळपोळ झाली. त्यात भिंद्रनवाले यांच्या धार्मिक प्रवचनांच्या वृत्तांतांच्या चोपड्या जळल्या. भिंद्रनवाले यामुळे झैलसिंग यांचे शत्रू बनले. गुरुद्वारात शिरून भिंद्रनवाले यांना पकडण्याचा आदेश पोलिसांनी दिला होता. पण भिंद्रनवाले यांनी पोलिसांना सांगितले की, आपण प्रथम प्रवचन करतो व मग आपल्याला पकडावे. तथापि प्रवचन करण्याऐवजी त्यांनी सरकारविरुद्ध भाषण केले आणि पोलिसांविरुद्ध काही न करण्याचे सांगून ते पोलिसांच्या स्वाधीन झाले. तेवढ्यात त्यांच्या अनुयायांनी गोळ्या चालविल्या. यात अकराजण ठार झाले. भिंद्रनवाले यांच्या अटकेनंतर पंजाबात ठिकठिकाणी दंगली झाल्या. इंडियन एअर लाइन्सचे विमान पळविण्यात आले. महिन्याच्या आत झैलसिंग यांनी संसदेत घोषणा केली की लाला जगतनारायण यांच्या खुनाच्या संबंधात भिंद्रनवाले यांच्याविरुद्ध सरकारपाशी पुरावा नसल्याने त्यांना सोडून देण्यात आले आहे.

२१ डिसेंबर ८१ रोजी भिंद्रनवाले यांचा विश्वासू सहकारी मारला गेला. त्याच्या शोकसभेत झैलसिंग व भिंद्रनवाले एकत्र आले होते. भिंद्रनवाले झैलसिंग यांची किंमत ठेवीत नव्हते. म्हणून त्या सभेत ते म्हणाले की, खेड्यात एखाद्या स्त्रीची अब्रू घेणाराच्या तोंडावर काळे फासून त्याची गाढवावरून धिंड काढतात. या सभेत स्वत:ची दाढी काळी केलेले काही आले आहेत त्यांनी कोणाच्या बहिणीची अब्रू घेतली हे मला माहीत नाही. झैलसिंग दाढी रंगवितात; त्यांना उद्देशून हा टोला होता.

या रीतीने भिंद्रनवाले यांचा दबदबा आणि मुजोरपणा वाढत होता तेव्हा अकाली दलाचे प्रमुख लोंगोवाल यांनी ४ ऑगस्ट ८२ रोजी सुवर्णमंदिरातून धर्मयुद्धाची घोषणा करून आंदोलन जाहीर केले. एशियाडच्या निमित्ताने केंद्र सरकारने कडक उपाय योजले. महिन्यानंतर लोंगोवाल यांनी बोलावलेल्या परिषदेला हजर असलेल्यांत १७० सेवानिवृत्त लष्करी अधिकारी हजर होते. परिषदेला पाच हजारांचा समुदाय होता. हे सर्व पाहून श्रीमती गांधींनी अकाली दलाशी बोलणी सुरू केली. विरोधी पक्षीय नेत्यांनाही सामील करण्यात आले होते. वाटाघाटीत एखादा तोडगा निघावा पण तो फेटाळला जावा असे वारंवार घडत आले. याची जबाबदारी लेखकद्वय पूर्णत: सरकारवर टाकतात. परंतु अकाली नेते भिंद्रनवाले यांच्या दबावाखाली असल्याने तेही मार्ग काढण्यास धजर नव्हते हे स्पष्ट आहे.

२३ एप्रिल ८३ रोजी डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल श्री. अटवाल यांचा सुवर्णमंदिर परिसरात खून झाला. भिंद्रनवाले यांच्या अंतर्गत वर्तुळात आपला हस्तक पेरण्यात त्यांना यश

मिळाले. त्याचा भिंद्रनवाले यांनी सूड घेतला. त्यावेळी सुवर्णमंदिरात पोलिस पाठवून भिंद्रनवाले व त्यांचे हस्तक यांना अटक करण्याचा दरबारासिंग यांचा मनोदय होता. एव्हापर्यंत झैलसिंग राष्ट्रपती झाले होते. पण दरबारासिंगांची ही सूचना श्रीमती गांधींनी अमान्य केली. त्यानंतर भिंद्रनवाले यांचा सहकारी अमरिकसिंग यांची सुटका झाली. त्याच्या स्वागतार्थ झालेल्या सभेत भिंद्रनवाले यांनी लोंगोवाल यांचा बराच अपमान केला. पण लोंगोवाल यांनी भिंद्रनवाले यांच्या धोरणाला पाठिंबा दिला आणि स्वत:ची बाजू दुर्बळ केली. सरकारबरोबर सहकार्य करून भिंद्रनवाले यांना धडा देण्याचे धैर्य त्यांच्यापाशी नव्हते. या सभेनंतरच्या काळात खून पाडले जात होते. भिंद्रनवाले यांची दहशत सर्वत्र बसत होती. परीक्षकांनी कोणा विद्यार्थ्यास पास करावे याचाही हुकूम ते देत. कोणाचे हातपाय तोडावयाचे याचे आदेश दिले जात. ५ ऑक्टोबरला दहशतवाद्यांनी एक बस अडविली आणि सहा हिंदू उतारूंना ठार करण्यात आले. दुसऱ्या दिवशी दरबारासिंग यांचे मंत्रिमंडळ बरखास्त करण्यात येऊन राष्ट्रपती राजवट आली. श्री बी. डी. पांडे गव्हर्नर झाले आणि भिंदर यांची पोलिसप्रमुख म्हणून नेमणूक झाली.

राष्ट्रपती राजवट आल्यावर ग्रामीण भागात पोलिसांनी कोठे दहशतवादी पकडले इत्यादी तपशील रोजच्या रोज प्रसिद्ध होऊ लागला. पण भिंदर यांच्या त्या थापा होत्या. मार्क टली यांनीच या वृत्तांताप्रमाणे चौकशी केली तेव्हा खोटेपणा उघड झाला. पंजाबात सशस्त्र पोलिस दल होते. पण पोलिस यंत्रणा पूर्णत: पोखरली होती आणि ती अगदी लष्करी कारवाईपर्यंत पोखरलेलीच राहीली. बंदोबस्त वाढत आहे असे पाहून अकाल तख्तमध्ये राहण्याचे भिंद्रनवाले यांनी ठरविले. त्यास धर्मगुरूंनी आक्षेप घेतला पण तोहरा यांनी परवानगी देण्यासाठी खटपट केली. इकडे भिंद्रनवाले यांच्या हस्तकांच्या दहशतवादी हालचाली चालू होत्या. त्यांच्या विषारी भाषणाच्या टेप्स सर्वत्र विकल्या जात असत. सुवर्णमंदिर परिसरात अनेकदा गोळीबाराचे आवाज ऐकू येत. २६ जानेवारी ८४ रोजी सुवर्ण मंदिराच्या जवळच्या इमारतीवर खलिस्तानचा झेंडा लावलेला होता. लोंगोवाल, बादल इत्यादींनी या सर्व प्रकारांपैकी कशाचाही निषेध केला नाही. केंद्र सरकारही द्विधा मन:स्थितीत होते. भिंद्रनवाले यांच्या खिशात असलेल्या अनेक अधिकाऱ्यांची बदली करण्याची राज्यपालांची सूचना श्रीमती इंदिरा गांधींनी मानली नाही. भिंद्रनवाले यांचा फोन केव्हाही बंद पडला नाही. पण सरकारी अधिकाऱ्यांचे पडत. इतकेच नव्हे तर राज्यपालांच्या खोलीतून दिल्लीस जी हॉट लाइन होती तीतसुद्धा दोष निर्माण झाला होता. सरकारी यंत्रणा किती किडलेली होती याची यावरून कल्पना येते.

मार्च व एप्रिलमध्ये ८० लोक ठार झाले. १० मार्च रोजी मार्क टली व सतीश जॅकॉब यांनी सुवर्णमंदिरास भेट दिली. तेव्हा गढ्या उभ्या करून मोर्चे बांधण्याचे काम चालू होते.

उंचावरच्या जागी तरुण शीख बंदुका घेऊन बसले होते. लष्करी तयारी चालू होती आणि वाळूची पोती रचलेली होती. इमारतदुरुस्तीच्या निमित्ताने मालमोटारी येत आणि त्यातून शस्त्रास्त्रे व दारूगोळा येत होता. गुप्तहेर खाते गाफील होते. आणि शीख धर्मगुरूंनी हुकुमनामा काढून भिंद्रनवाले यांना वाळीत टाकले नाही. या वातावरणात चंदिगढ पंजाबला देण्याची सूचना श्रीमती गांधींतर्फे करण्यात आली पण भिंद्रनवाले यांनी ती धुडकाविली. यानंतर मात्र लोंगोवाल सरकारशी अप्रत्यक्ष सहकार्य करू लागले. तोहरांना तडजोडीची सूचना मान्य होती. पण लोंगोवाल व ते पुरते निष्प्रभ झाले होते. गोष्टी इतक्या थराला गेल्या असतानाही पोलिसप्रमुख भिंदर धडधडीत खोटे बोलत होते. मोगा येथे १६ दहशतवादी शरण आल्याचे त्यांनी सांगितले खरे पण मार्क टली यांनी चौकशी केली तेव्हा एकही इसम आलेला नव्हता.

या रीतीने कोंडी झाल्यावर सुवर्णमंदिरात लष्कर पाठविण्याचा निर्णय श्रीमती गांधींनी २ जून रोजी घेतला. सहा जूनला तो अमलात आला. २ ते ५ या दरम्यान केंद्रीय राखीव दलाने गोळीबार केला. भिंद्रनवाले यांची ताकद अजमाविण्याचा यामागे हेतू होता. पण लष्कर घुसण्यापूर्वी भिंद्रनवाले यांच्यापाशी दारूगोळा किती, त्यांचे दहशतवादी कोठे उभे आहेत, ते किती आहेत याची लष्करास कल्पना नव्हती. हेरखात्याचे हे अपयश अनेक जवानांच्या मृत्यूस कारणीभूत ठरले.

मार्क टली व जॅकॉब यांच्या पुस्तकातील अतिशय महत्त्वाचे प्रकरण सुवर्णमंदिरात झालेल्या धुमश्चक्रीच्या वर्णनाचे. लष्करी अधिकारी व इतर अनेक यांच्याकडून माहिती जमा करून, ती पडताळून पाहून हे भीषण नाट्य त्यांनी उभे केले आहे. लष्कराला प्रतिकार किती होईल याची कल्पना नव्हती. सुवर्णमंदिर व अकाल तख्त यांना धक्का पोहोचणार नाही अशा रीतीने हल्ला करण्याचा लष्करास हुकूम होता. त्यामुळे मर्यादा पडल्या. पण भिंद्रनवाले यांनी केलेल्या तयारीविषयी लष्कर अंधारात होते. चिलखती गाडी उडविण्यासाठी लागणारे अस्त्रसुद्धा दहशतवाद्यांपाशी होते. एक वेळ तर अशी आली, की लष्करास संध्याकाळपुरती माघार घेणे भाग होत होते. तसे झाले असते तर लष्कराची बेअब्रू झाली असती. काही तज्ज्ञांच्या मते हेरगिरीच्या अपयशाबरोबरच लष्कराचा वृथा अभिमान, अहंकार कारणीभूत ठरला. त्याने व्यूहरचना जेवढ्या चाणाक्षपणे करावयास हवी होती त्याप्रमाणे केली नव्हती. म्हणून पुढे असे आढळले की सुवर्णमंदिराच्या परिसराचा तपशीलवार नकाशा नव्हता. शाहबेगसिंग हे भिंद्रनवाले यांचे हस्तक माजी लष्करी अधिकारी. त्यांनी व्यूहरचना पक्की केली होती व शीख तरुणांना कडक शिक्षण दिले होते. शिवाय हे सर्व जिवावर उदार झाले होते. नामुष्कीचा प्रसंग आला तेव्हा अकाल तख्तवरही

टँकमधून मारा करण्यास दिल्लीहून अनुमती मिळाली आणि मग प्रतिकाराचा बीमोड झाला. भिंद्रनवाले इत्यादी ठार झाले.

नंतरच्या लष्करी राजवटीत अनेक ठिकाणी अत्याचार झाले. शीख समाजात धर्माच्या नावावर राजकारण चालू होते. अकाली दलाचा तोच आधार होता. पण याची परिणती शीख पुनरुज्जीवनवादात, कडवेपणात झाली. पण पुनरुज्जीवनवाद लेखकांनी म्हटल्याप्रमाणे एखाद्या पोकळीत निर्माण होत नाही. इराणच्या शहांमुळे खोमेनींचा उदय झाला. श्रीमती गांधी, संजय गांधी व झैलसिंग यांच्यामुळे भिंद्रनवाले यांचा प्रभाव वाढला. अकाली दलाच्या सर्व नेत्यांचीही जबाबदारीतून सुटका होत नाही. त्यांनी धार्मिक राजकारणाचे बीज पेरले आणि दुटप्पी राजकारण केले. भिंद्रनवाले यांना त्यांनी विरोध केला नाही व सरकारने पकडले नाही. याची फार मोठी किंमत द्यावी लागली. पंजाबमध्ये कधी नव्हे एवढा असंतोष वाढला. दहशतवाद बोकाळला आणि सुवर्णमंदिर कारवाईचा सूड म्हणून श्रीमती गांधींचा भीषण खून झाला.

अशी ही भयानक शोकांतिका आहे.

१-१२-१९८५

परराष्ट्र सचिवाच्या आठवणी

श्री. वाय. डी. गुणदेविया हे परराष्ट्र खात्यात परराष्ट्र सचिव या पदापर्यंत चढले होते. त्यांची तीस वर्षे सरकारी सेवेत गेली. प्रारंभ झाला तो उत्तर प्रदेशच्या पूर्व भागात. गुणदेविया हे मुंबईचे पारशी, पण उत्तर प्रदेशात नोकरीला सुरुवात करून ब्रह्मदेश, रशिया, स्वित्झर्लंड, इंग्लंड, श्रीलंका अशा निरनिराळ्या देशांत विविध अधिकारपदे भोगून ते परराष्ट्र सचिव व नंतर डॉ. राधाकृष्णन राष्ट्रपती असता त्यांचे सचिव या नात्याने निवृत्त झाले. त्यांनी आपल्या आठवणी लिहिल्या असून, त्या मुख्यत: नेहरूंच्या संबंधातील आहेत. कारण गुणदेविया यांच्या नोकरीचा काळ हा नेहरूंच्या कारकीर्दीचा होता आणि ते त्यांच्या सहवासातही बरेच आले.

आपल्याकडे सरकारी कागदपत्रे प्रसिद्ध करण्याचे नियम वेगळे आहेत. शिवाय तीस वर्षांचा जो नियम इंग्लंडमध्ये लागू आहे तो येथे लागू केला तरीही गुणदेवियांना त्यांची कागदपत्रे मिळाली नसती. तेंव्हा स्वत:ची रोजनिशी व स्मरणशक्ती यावर ते अवलंबून राहणे साहजिक आहे. या आठवणींच्या संग्रहातील काही आठवणी पाहता गुणदेविया यांची विनोदबुद्धी त्यांना नेहमीच साथ देत होती असे दिसते. यामुळे अनेक विनोदी प्रसंग त्यांनी त्यांच्या तितक्याच विनोदी शैलीत वर्णन केले आहेत. किंबहुना पं. नेहरूंना गुणदेविया यांच्या स्वभावातील ही झलक आवडत होती आणि त्यांना हसते करण्यात गुणदेविया यशस्वी होत. माझ्या वडलांना तुम्हीच सर्वात अधिक हसवीत होता तेव्हा तुम्हाला शक्य असेल तेव्हा भेटायला येत जा, असे नेहरूंच्या अंत्ययात्रेनंतर निरोप घेताना श्रीमती इंदिरा गांधींनीही गुणदेविया यांना सांगितले होते.

गुणदेविया यांच्यापुढे पहिला प्रश्न होता तो ब्रह्मदेशातून इकडे परत आलेल्या बिनकुशल हिंदी कामगारांचा. युद्धामुळे गोदी व इतर भाग बेचिराख झाल्याने या कामगारांना काम नव्हते व ब्रह्मदेशाला ते नको होते. भारत सरकारच्या अधिकाऱ्यांना हे मान्य होत नव्हते. परंतु डेप्युटी सेक्रेटरी पदावर असलेल्या गुणदेवियांनी पं. नेहरूंना पत्र पाठवून भेट मागितली व आपले म्हणणे पटवून दिले. पुढे गुणदेविया सांगतात की, राष्ट्रकुल सचिव म्हणून ते दिल्लीत असता थाकिन नू यांनी दिल्लीस भेट दिली. आयत्या वेळी नेहरूंचे बोलावणे आले तेव्हा गुणदेविया पोहावयास निघाले होते व हाफ पँटमध्ये होते. नेहरूंनी त्यांना तसेच विमानतळावर नेले आणि थाकिन नू यांची व नेहरूंची ओळख अशा पोषाखात त्यांना करून द्यावी लागली.

ब्रह्मदेशातून मॉस्को व नंतर स्वित्झर्लंड येथे गुणदेविया यांची बदली झाली. मॉस्कोत डॉ. राधाकृष्णन राजदूत होते. त्यांच्याबरोबर स्टालिनलाही भेटावयास ते गेले होते. भारत आमचा शत्रू नाही असे स्टालिन म्हणाला होता. त्याच्या वेळी दोन देशांचे संबंध फारसे जवळचे नव्हते. त्यावेळी काश्मीरचा प्रश्न युनोत व सुरक्षा समितीत बऱ्याच जोरात चर्चिला जात असे. पण रशिया त्यात भाग घेत नसे. राधाकृष्णन यांनी पाश्चात्यांना रशियनांनी याबाबतीत विरोध करावा म्हणून खटपट केली व ती यशस्वी झाली. स्टालिनच्या वेळच्या रशियाबद्दल गुणदेविया विशेष काही सांगत नाहीत. त्यांनी अनेक व्यक्ती, देश व प्रसंग यासंबंधात बराच स्पष्टवक्तेपणा दाखविला आहे. पण रशियाबाबत ते हा त्यांचा स्वभाव प्रगट करीत नाहीत.

स्वित्झर्लंडमध्ये गुणदेविया राजदूत होते. त्यावेळी हिंदी राजदूतांची एक परिषद झाली व नेहरू तिला हजर होते. भारताने त्याही काळात चाळीस देशांत राजदूत नेमले होते. ही नेमणूक वा ही परिषद हा खर्चिक मामला. पण जागतिक राजकारणात वाजवीपेक्षा जास्त रस घेण्याचा जो पायंडा नेहरूंनी घातला त्याचा हा अपरिहार्य परिणाम होता. स्वित्झर्लंडची नेहरूंची ही भेट ५४-५५ सालातील. या भेटीच्या वेळी स्वित्झर्लंडच्या अध्यक्षांना नेहरू भेटले. ही केवळ औपचारिक भेट होती. अध्यक्षांनी चीनसारख्या देशाला भिडलेली सीमा पाहता भारताला चिंताच असणार असे मत व्यक्त केले. त्यावर नेहरूंनी वीस मिनिटे या अध्यक्षांना चीनची चिंता आपण कशी करत नाही याबद्दल व्याख्यान दिले. पुढे पाच-सहा वर्षांनीच अध्यक्षांची चिंता खरी ठरली! इतकेच नव्हे तर त्याच वर्षी काही महिन्यात चीनने आपले नकाशे वादग्रस्त ठरविले.

इंग्लंडमध्ये विजयालक्ष्मी पंडित राजदूत व त्यांचे दुय्यम गुणदेविया. विजयालक्ष्मींचा सारा थाट दरबारी. त्यांनी स्वत:चे निवासस्थान सुशोभित करून घेतले. पण भारतीय दूतावासाच्या लंडनच्याच उपनगरात असलेल्या कचेऱ्यांची दुरवस्था सुधारण्याचा विचारही त्यांच्या मनाला शिवला नाही हे गुणदेविया यांनी केलेल्या वर्णनावरून स्पष्ट दिसते. राजदूत म्हणून विजयालक्ष्मींनी काय विशेष कामगिरी बजावली हे गुणदेविया सांगत नाहीत. सांगण्यासारखे काही नाहीही. पण विजयालक्ष्मी लंडनमध्ये असता कृष्ण मेनन ब्रिटिश सरकारशी परस्पर संबंध ठेवण्याचा प्रयत्न करीत हे या पुस्तकावरून दिसते आणि त्या कोणालाही कृष्ण मेनन यांच्याबद्दल प्रेम नव्हते हेही कळते.

इंग्लंडनंतर श्रीलंका व नंतर दिल्लीत प्रथम राष्ट्रकुल सचिव व पुढे परराष्ट्र सचिव म्हणून गुणदेविया काम पाहात होते. कम्युनिस्टांपेक्षा हिंदू उजवे जातीयवादी हे या देशापुढील संकट आहेत असे नेहरूंचे मत त्यांनी उद्धृत केले आहे. नेहरूंचे हे मत पूर्वी कधी प्रसिद्ध झाले नव्हते असे नव्हे. त्यामुळे हे वाचल्यानंतर नवल वाटणार नाही. पण जनता पक्षाचे

राज्य हे या प्रवृत्तीचे द्योतक होते, ते प्रतिगामी होते अशी मल्लिनाथी करून गुणदेविया यांनी पक्षपाती वृत्ती प्रगट केली आहे. हे सरकार एका विशिष्ट परिस्थितीत आले. जयप्रकाश यांची यामागे प्रेरणा होती. आणीबाणीची पार्श्वभूमी मिळाली होती. याबद्दल चकार शब्द न बोलता जनता सरकारला जातीयवादी व प्रतिगामी ठरवून टाकणे हे पूर्वग्रहदूषित वृत्तीचे आहे. त्या काळात जातीय दंगली झाल्याचा उल्लेख गुणदेविया करतात. काँग्रेसच्या कारकीर्दीत त्यापूर्वी व नंतर झाल्या नाहीत काय? पण याबद्दल गप्प बसून नंतर झालेल्या दंगली म्हणजे जनता पक्षाने जे पेरले ते उगवले असे ते म्हणतात. तेव्हा मोठमोठी अधिकारपदे भूषविलेल्या व्यक्तीही पूर्वग्रहदूषित झाल्यावर कशी अवास्तव भूमिका घेतात हे यावरून स्पष्ट होते. ७१ साली भिवंडीतच दंगल झाली होती. अहमदाबादही पेटले होते. त्यावेळी सरहद्द गांधींनी निर्भर्त्सना केली होती. तेव्हा जनता पक्ष कोणाच्या स्वप्नातही नव्हता.

शेख अब्दुल्लांच्या संदर्भातही गुणदेविया यांनी अर्धवट माहिती देऊन निष्कारण त्यांची भलावण केली आहे. सरदार पटेल यांना शेख अब्दुल्ला यांच्याबद्दल आत्मीयता नव्हती व त्यात काहीही चूक नव्हते. गुणदेविया यांनी असे दाखविले आहे की शेख अब्दुल्ला हे त्यांचे कारस्थानी सहकारी आणि दिल्लीतील नेहरूंचे प्रतिगामी सहकारी यांच्यामुळे पकडले गेले व नेहरूंना म्हणे या अटकेची माहिती नव्हती. पण शेख अब्दुल्ला यांच्या अटकेत रफी अहमद किदवईंचा भाग मोठा असे अनेकांनी लिहिले आहे. शिवाय नेहरूंना जर ही अटक मान्य नव्हती तर शेख अब्दुल्लांना सोडावयास थोडीथोडकी नाहीत तर पाच-सहा वर्षे त्यांना का लागली? अटकेपूर्वी शेख अब्दुल्ला कोणती भाषणे करीत होते याबद्दलही गुणदेविया यांनी मौन पाळून अब्दुल्ला यांच्यावरच सर्व अन्याय झाला असे दाखविले आहे.

चीनच्या आक्रमणाच्या वेळची हकीगतही नेहरूंच्या कृष्ण मेनन यांच्यावरील व चीनवरील आंधळ्या विश्वासाची निदर्शक आहे. चिनी फौजा आपल्या सीमेजवळ येत असता कृष्ण मेनन पाकिस्तानी फौजांची जमवाजमव चालल्याच्या कथा रचीत होते. पाकिस्तानातील आपल्या राजदूतास याची माहिती नव्हती तर कृष्ण मेनन त्यांना धारेवर धरीत होते. गुणदेवियांनी हे थांबविले. शत्रू दाराशी आला असता श्रीलंकेच्या दौऱ्यावर नेहरू गेले आणि ते कशासाठी तर आयुर्वेदाच्या इस्पितळाच्या उद्घाटनासाठी! गुणदेवियांनी म्हटले आहे की मेनन यांची नेहरूंवर निष्ठा होती. ती नसती तर जो संरक्षणमंत्री चीनच्या फौजा आक्रमण करीत असता पाकिस्तानी फौजांची जमवाजमव चालू असल्याचे सांगून त्यास तोंड देण्याच्या योजनांचा विचार करतो त्यावर देशद्रोहाखाली इतर देशात खटलाच झाला असता.

चीनच्या आक्रमणाच्या निमित्ताने भारताची नामुष्की झाली. याचा फायदा घेऊन पाकिस्तानला काश्मीरबाबत काही सवलती देऊन तडजोड करण्यासाठी दडपण वाढले. अमेरिका व ब्रिटन यांनी बरेच दडपण आणले. गुणदेवियांनी दिलेली माहिती नवी नाही पण ते हे घडत असता त्याचे साक्षी असल्याने त्यांच्या हकीगतीस महत्त्व आहे. पाकिस्तानबरोबर पाचसहा बैठका झाल्या. त्याचा बराच तपशील गुणदेविया यांनी दिला आहे तोही उल्लेखनीय आहे. पाकिस्तानला सर्व काश्मीरच हवे होते. आपल्या प्रतिनिधींनी पाकिस्तानला दाद दिली नाही. पुढे शेख अब्दुल्ला सुटल्यावर त्यांनी दोन देशांचे महासंघराज्य करण्याची कल्पना अयुबखान यांच्यापुढे मांडली होती. अयुब यांनी ती धुडकावली, पण शेख अब्दुल्ला यांच्या अव्यवहार्य राजकारणाचाही त्यावरून बोध होतो. ते पुन्हा काश्मीरच्या वेगळेपणाच्या गोष्टी करू लागले आणि नेहरूंप्रमाणे नेहरूकन्येलाही त्यांना तुरुंगात घालावे लागले.

परराष्ट्र खात्यातील इतर काही अधिकाऱ्यांप्रमाणे गुणदेविया यांनीही पाश्चात्य देशांबाबत स्पष्टवक्तेपणा आणि रशियाबाबत मौन पत्करले आहे. कोरियाच्या लढाईचा उल्लेख करून पाश्चात्यांच्या तथाकथित लोकशाहीच्या नावाखाली सिंगमन ह्यीला पाठिंबा मिळाला असे ते म्हणतात. पण उत्तर कोरियाच्या किम या सर्वाधिकाऱ्याबद्दल ते अवाक्षर काढीत नाहीत. आपल्या तटस्थतेचे स्वरूप यामुळे स्पष्ट होते इतकेच.

९-६-१९८४

ब्रिटनचा अध:पात

जगाचा कारखाना – वर्कशॉप म्हणून इंग्लंडची ख्याती होती. औद्योगिक क्रांती प्रथम ब्रिटनमध्ये झाली. पण आज औद्योगिक आघाडीवर ते मागे पडलेले राष्ट्र आहे. अमेरिकेच्या बरोबरीने येण्यास त्यास अनेक वर्षे लागतील. प. जर्मनी व जपान हे अमेरिकेनंतरचे समृद्ध देश. त्यांच्याही मागे ब्रिटन आहे. उत्पादकतेत त्याचा क्रम खाली जातो आणि सामाजिक सुरक्षिततेच्या योजनांचा विचार केला तर स्वीडनने त्याच्यापुढे मजल मारली आहे. सध्या तर ब्रिटनची आर्थिक परिस्थिती हलाखीची असून बेकारांची संख्या २५ लक्ष झाली आहे. अर्थव्यवहारात सरकारी पैसा कमी ओतावा, अनेक योजना व कार्यक्रम यांच्यावरील खर्च कमी करावा या रीतीने थॅचर यांनी आपली धोरणे आखली. वर्षभरात चलनवाढीचा वेग त्या कमी करू शकल्या, पण बेकारी वाढली. ब्रिटन अशा रीतीने आर्थिक चक्रात सापडले आहे.

याची अनेकजण अनेक कारणे देतात आणि उपाय सुचवितात. पण मार्टिन वेनर यांनी वेगळ्याच दृष्टीतून या आर्थिक अध:पाताचा अभ्यास केला आहे. त्यांचे म्हणणे असे आहे, की समाजाचे जे धुरीण आहेत, त्यांच्यावर प्रभाव टाकणाऱ्या वर्गांपाशी आधुनिक उद्योगांची वाढ करण्याची वा औद्योगिक संस्कृतीसाठी लागणारी वृत्तीच नाही. ही वृत्ती केवळ लेखक, प्राध्यापक यांच्यात नसेल तर समजू शकते; पण राजकारणीच नव्हे तर खुद्द उद्योगधंद्यात वावरणारेही या वृत्तीस पारखे आहेत. ब्रिटनच्या औद्योगिक अध:पाताचा विचार करताना कामगार संघटनांचा परंपरावाद व त्यांच्यापाशी असलेली अमाप सत्ता यांचा दाखला दिला जातो. तो बरोबर असला तरी केवळ यामुळेच मागासलेपण आलेले नाही. मुख्य प्रश्न वृत्तीचा आहे आणि औद्योगीकरणासाठी, आधुनिकीकरणासाठी लागणारी वृत्ती ब्रिटिशांपाशी नाही. याची वेनर यांनी अनेक उदाहरणे अनेकांच्या साहित्यातून व वक्तव्यातून दिली आहेत. शिवाय एखादाच राजकीय पक्ष औद्योगिक वृत्तीला पारखा आहे असे नव्हे, तर सर्वच पक्ष तसे आहेत.

वेनर यांनी हे दाखवून दिले आहे, की सरंजामशाहीतून औद्योगिक वा यंत्रयुगात ब्रिटनने प्रवेश केला तेव्हा प्रचंड उत्पात झाला नाही. सरंजामशाहीविरुद्ध फ्रान्समध्ये उत्पात झाला. तसा उत्पात ब्रिटनमध्ये झाला नाही. यंत्रयुगात त्याने शांतपणे प्रवेश केला. त्याने तसा प्रवेश केला तेव्हा जीवघेण्या स्पर्धेला त्यास तोंड द्यावे लागत नव्हते. तसेच भांडवलशाहीचा पहिला आवेग अनेकांना उद्वेगजनक वाटला. कारखानदारीच्या पहिल्या

पर्वातील कामगारांचे जीवन कष्टाचे होते. शहरे विद्रूप व गलिच्छ बनली होती. डिकन्ससारख्यांनी याची चित्रे रंगवून सुंदर इंग्लंड विद्रूप झाल्याची खंत व्यक्त केली. या स्थितीत कारखाना काढणारा व चालविणारा हा कोणी क्रांतिकारक वाटत नव्हता. औद्योगिक क्रांतीतून मध्यमवर्ग वाढीला लागला. परंतु या वर्गाला व्यापार उद्योगाचे प्रेम तर नव्हतेच तर एक प्रकारची घृणा होती.

मध्यमवर्गाची मुले व्यापार उद्योगापेक्षा सनदी नोकरी, लष्कर हे अधिक प्रतिष्ठित मानू लागली. पब्लिक स्कूल्स ज्यास म्हणतात त्यांची वाढ झाली. वरिष्ठ मध्यमवर्ग होता तोही शेती असणे हे प्रतिष्ठेचे मानू लागला. लंडन हे व्यवसाय, राजकारण व करमणूक यांचे ठिकाण मानले जाई पण वरिष्ठ मध्यमवर्गीयांचे लक्ष आपल्या मालकीच्या मळ्यांवर असे, विद्यापीठातून व्यावसायिक शिक्षणापेक्षा ग्रीक व लॅटिन भाषांचे शिक्षण प्रतिष्ठित होते. तसे पाहिल्यास मिल, रिकार्डो वगैरे अर्थशास्त्रज्ञ हे ब्रिटिश. पण अर्थशास्त्राची चिकित्सा ही तात्त्विक बाब झाली. अर्थव्यवहार हा यापेक्षा वेगळा. त्याला प्रतिष्ठा दिली गेली नाही. अमेरिकेत फोर्ड या मोटारच्या कारखानदाराचा केवढा गौरव होत होता. पण विल्यम मॉरिस हा जो मॉरिस या सुंदर मोटारीच्या कारखान्याचा मालक त्याचे ब्रिटिशांनी कौतुक केले नाही. पैसा, पैशाचे व्यवहार, व्यापार, कारखानदारी ही सर्व आपद्धर्म आहेत, मुख्य प्रश्न सांस्कृतिक विकास हा आहे अशी भावना ब्रिटिश समाजात रूढ झाली. तेथे शास्त्रज्ञ, वैज्ञानिक झाले, पण त्यांच्या शोधांचा प्रत्यक्ष व्यवहारात उपयोग करून कारखानदारी वाढविण्यास महत्त्व दिले गेले नाही. आधुनिक यंत्रांचा उपयोग करून उत्पादन वाढवावे, हे मान्य असले तरी त्यास गौण स्थान आहे असेच मानले जात होते व अद्याप जाते. शेवटी उत्पादन तरी किती वाढवावयाचे? दर माणशी पोलादाचा अमुक खप, सिमेंटचा अमुक खप यावरून त्या देशाचे स्थान काय हे ठरवणेच चूक आहे अशी ब्रिटिश समाजाच्या धुरिणांची कल्पना आहे. त्यामुळे कारखानदाराबद्दल लिहिले बोलले जाते तेव्हाही त्याचे अन्य छंद काय याला अधिक प्राधान्य देण्यात येते.

अमेरिका, जर्मनी, जपान इत्यादी देशांत व्यापार व उद्योगातील कर्तबगार व्यक्ती उच्च राजकीय पदे भूषवितात आणि त्या पदावरून निवृत्त झाल्यावर त्या पुन्हा आपल्या जुन्या व्यवसायात शिरतात. ब्रिटनमधील राज्यकर्ता वर्ग यापेक्षा वेगळा आहे. कारखानदारी, बँकिंग, व्यापार यातून राज्यकर्त्या वर्गात जाणारे फारच थोडे. महत्त्वाची राजकीय पदे भूषविलेल्या अनेकांना व्यापार उद्योगाचे ज्ञान नाही व ते करून घ्यावयाची त्यांना आवश्यकता वाटली नाही. हुजूर पक्षीयांचा व कारखानदारांचा संबंध जवळचा. पण त्यांना खरी ओढ आपल्या मळ्यांची. समाजवाद्यांनीही कारखानदारी, यंत्रयुग यांना दुय्यम स्थान दिले. हॉनी हा समाजवादी विचारवंत. त्याला यंत्रयुगाचे फारसे प्रेम नव्हते. चर्च हा

समाजाला बांधणारा घटक असल्याच हा मानीत असे. ज्यास ब्लूम्सबरी गट म्हणतात तो या शतकाच्या प्रारंभानंतर उदयाला आलेला गट अनेक क्षेत्रात नवविचारांचा प्रवर्तक. पण त्यालाही करखानदारीबद्दल घृणाच होती. याला सी. पी. स्नो यांच्यासारख्या लेखकाचा अपवाद. तो अर्थात या गटात बसणारा नव्हे. १९५९ मध्ये त्यांनी एका भाषणात ब्रिटिश समाजाची व्हेनिशियन प्रजासत्ताकाच्या अखेरच्या अर्धशतकातील समाजाशी तुलना केली होती. त्यांनी हे दाखवून दिले, की त्या समाजाप्रमाणेच ब्रिटिश समाज अपघाताने श्रीमंत झाला. या समाजाने व्हेनिशयन समाजाप्रमाणेच राजकीय कौशल्य पैदा केले. त्यांच्या जीवनाचा एक साचा झाला होता आणि तो मोडण्याची गरज होती. त्यांनी तो मोडला नाही. ब्रिटिश समाजही त्याचा साचा मोडावयास तयार नाही. यंत्रयुगाला साजेशी त्याची वृत्ती नाही. शांत, हिरवागार ग्रामीण भाग, तेथील नदी, हिरवी कुरणे, गायींची खिल्लारे, चर्च याचेच त्यास जबरदस्त आकर्षण आहे. वेनर यांनी केलेले हे विश्लेषण व त्यासाठी दिलेले भरपूर दाखले हे उद्‌बोधक आहेत. भारतीय समाजास आधुनिक यंत्रयुगात जावयाचे असेल तर त्यालाही आपला साचा मोडावा लागेल.

१८-७-१९८१

शेती व औद्योगिक क्रांती

इंग्लंडमधील औद्योगिक क्रांती ही मानवी इतिहासातील फार मोठी घटना आहे. 'द फर्स्ट इंडस्ट्रियल नेशन' हे पीटर मॅथियास यांचे पुस्तक या विषयावरील प्रमाणभूत म्हणून मानले जाते. तथापि त्यानंतर उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे इतरही ग्रंथ लिहिले गेले. आता पीटर लेन यांनी नवे पुस्तक लिहिले आहे. या ग्रंथाच्या नावाचा खुलासा करताना आधुनिक युगाचा जन्म असे लेखकाने म्हटले आहे ते खरे आहे. या औद्योगिक क्रांतीचा जन्म इंग्लंडने वसाहतींचे शोषण केल्याने झाला असा एक युक्तिवाद करण्यात येतो. वस्तुस्थिती मात्र असे सांगते, की वसाहती ताब्यात घेण्यापूर्वी इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली.

या क्रांतीला शेतीने हातभार लावला. युरोपात शेतमजूर फार होते; मालकीची जमीन नसताना शेती करणारांचा विशेष भरणा होता. तशी स्थिती इंग्लंडमध्ये नव्हती. जमीनमालकांचे वर्चस्व होते आणि ते मजुरीने लोक कामाला लावीत. त्या काळात प्रथम साथीच्या रोगाने बरेच लोक मेले; पण साथीचा जोर ओसरला आणि लोकसंख्या वाढली. यामुळे शेतीसाठी अधिक मजूर उपलब्ध झाल्याने मजुरी कमी होऊन शेती किफायतशीर होऊ लागली. ती तशी होऊ लागताच शेतीच्या सुधारणेचा विचार जमीनमालक करू लागले. यातूनच नवीन अवजारांचा शोध सुरू झाला. शेतीतील सुधारणेमुळे शेतकऱ्यांचे व शेतमजुरांचेही उत्पन्न वाढले. १६८८ मध्ये ते दरडोई आठ पौंड होते. १९७० मध्ये मागासलेल्या देशातील दरडोई उत्पन्नाच्या मानाने हे अधिक होते आणि हे वाढीव उत्पन्न हेही हातमाग वगैरेंना उत्तेजन देणारे ठरले. बाजारपेठ वाढली तेव्हा शेती व छोटे उद्योग यांना चालना मिळू लागली. शेतीत फायदा मिळू लागला तेव्हा अधिकाधिक जमीन लागवडीखाली येऊ लागली आणि त्याप्रमाणात लोकांचे उत्पन्न वाढले. औद्योगिक क्रांतीला ही अनुकूल भूमी होती. वाढत्या व सुधारलेल्या शेतीमुळे पशुसंवर्धनासही चालना मिळाली. गोधन वाढले आणि मेंढ्यांचीही वाढ मोठ्या प्रमाणात झाली. हा एक नवा उद्योग लोकांना मिळाला. वाढीव प्रमाणातील पैशामुळे व्यापार वधारला व ईस्ट इंडिया कंपनी, हडसन बे कंपनी अशा कंपन्या स्थापन होऊ लागल्या. त्यांनी आयात-निर्यात व्यापार बराच वाढविला आणि त्यामार्गे बाहेरून इंग्लंडमध्ये पैसा येऊ लागला.

अठराव्या शतकात लोखंड, जस्त, तांबे इत्यादी अलोहित धातू वाढत्या प्रमाणात निघू लागले व उद्योग वाढले. फ्रान्स वगैरेंशी जी दीर्घकालीन युद्धे झाली त्यामुळेही उद्योगधंद्यांना चालना मिळाली. प्रथम कापडधंदा भरभराटीत आला. केवळ हातमागावर कापड निघत होते. या मागांत सुधारणा झाली. वाफेच्या शक्तीचा शोध लागल्यावर माग या शक्तीवर

चालू लागले. कापडधंद्याने इंग्लंडला फारच मोठा हात दिला. यासाठी लागणारा कापूस अमेरिका व इतर देशांतून येत होता. ब्रिटिशांनी वसाहती केल्या तेव्हा त्यांची बाजारपेठ आयती मिळाली. या वसाहती ब्रिटनची अर्थव्यवस्था बळकट करण्यास उपयुक्त ठरल्या खऱ्या; पण वसाहती अगोदर व मग औद्योगिक क्रांती असे झाले नाही. औद्योगिक क्रांती होऊन विकण्यासाठी माल तयार झाला त्याचप्रमाणे या मालाच्या विक्रीतून भंडवल तयार झाले. हे भांडवल गुंतविण्यास वसाहती उपयोगी ठरल्या. कापडधंद्यात त्यामानाने कमी प्रमाणात भांडवल लागत होते. पण पुढे जेव्हा वाफेची इंजिने व त्यापाठोपाठ रेल्वे आली तेव्हा कोळसा, लोखंड यांच्या खाणी व पोलादाचे कारखाने यासाठी आणि रेल्वेसाठी प्रचंड प्रमाणात भांडवल आवश्यक होते. नवी यंत्रे आली आणि या यंत्राबरोबर इंजिनियर, फिटर्स, टर्नर्स असा नवा वर्ग तयार झाला. या वर्गाने नवी संस्कृती आणली. ही संस्कृती विज्ञानसन्मुख होती. नवे शोध या काळात लागले. एक यंत्र केले, की त्यात सुधारणा करण्याचे प्रयत्न होत आणि त्यातून नवी सुधारलेली यंत्रसामग्री निर्माण होई. या वाढत्या उद्योगातून वाढता व्यापार सुरू झाला आणि इंग्लंड हा व्यापाऱ्यांचा देश बनला. व्यापार वाढण्यासाठी नियंत्रणे उपयुक्त नव्हती. खुल्या व्यापारासाठी खुला समाज आवश्यक होता आणि यातून इंग्लंडमध्ये स्वतंत्र विचाराचे वारे वाहू लागले, तो समाज स्वातंत्र्यवादी विचार आत्मसात करू लागला असे व्हॉल्टेअरने म्हटले आहे. १८३० मध्ये रेल्वेचा बराच मोठा प्रसार झाला आणि इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीचे पहिले पर्व तेथे संपले असे लेखक म्हणतो.

प्रथम कापडधंद्याला बरकत आली, पण नंतर खाणउद्योग, वाहतूक यांची वाढ झाली व औद्योगिक क्रांतीचा पाया भक्कम आणि विस्तारित झाला. ही क्रांती होण्यापूर्वी आर्थिक व्यवहारात शिस्त नव्हती. हा व्यवहार वाढल्यावर बँका स्थापन झाल्या, बँक ऑफ इंग्लंडची स्थापना झाली. अर्थात अनेक बोगस रेल्वे व इतर कंपन्या स्थापन होऊन अनेकांचे पैसे बुडाले. परंतु अनुभवाने शहाणे होऊन लोक पैसे गुंतवू लागले. तथापि अठराव्या शतकात इंग्लिश समाजात जो युयुत्सुपणा होता तो पुढे व्हिक्टोरियन काळात टिकला नाही. नव्या शोधांऐवजी आहे त्यावरच समाधान मानण्याची वृत्ती बळावली. शास्त्रीय शोधांऐवजी बुद्धिमान वर्ग वाङमय, संगीत इत्यादीत रमू लागला. लेखक म्हणतो, व्हिक्टोरियन काळात एक प्रकारचे ज्ञानविरोधी, बुद्धिमंतविरोधी वातावरण तयार झाले. म्हणून एकोणिसाव्या शतकात अमेरिका यंत्रसामग्रीच्या बाबतीत पुढे गेली. आजही तीच परिस्थिती आहे. आधुनिक यंत्रसामग्री अमेरिका, प. जर्मनी, जपान इत्यादी देशांत ज्या प्रमाणावर प्रचारात येते तेवढी ती इंग्लंडमध्ये येत नाही. व्हिक्टोरियन काळाचा वारसा अद्याप चालू आहे. औद्योगिक क्रांतीचा मागोवा घेताना लेखकाने हे मार्मिकपणे दाखवून दिले आहे.

६-१-१९७९

शेतकऱ्यांचे प्रश्न

केंब्रिज विद्यापीठातर्फे भारतासंबंधी अनेकविध ग्रंथ गेल्या काही वर्षांत प्रसिद्ध झाले व काही प्रसिद्धीच्या मार्गावर आहेत. यापैकी दोन ग्रंथांचा येथे परिचय करून द्यावयाचा आहे. एक आहे नील चार्लस्वर्थ यांचा मुंबई प्रांतातील १६५० ते १९३५ या काळातील शेतीसंबंधी प्रश्नाविषयी तर दुसरा कालव्यामुळे शेतकरी जीवनात काय बदल झाला याची चर्चा करणारा. दुसरा ग्रंथ उत्तरप्रदेशाबाबत आहे. दोन्ही लेखकांनी अनेक ग्रंथ, प्रबंध, कागदपत्रे यांचा उपयोग केलेला आहे.

ब्रिटिश सत्ता आल्यावर देशाच्या सर्व भागात एकाच पद्धतीची जमीनमालकी नव्हती. काही ठिकाणी जमीनदारी टिकवून धरण्यात आली. तेव्हाच्या मुंबई प्रांतात रयतवारी पद्धती होती. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध व युरोपातील घडामोडी यामुळे येथील शेतीमालाला काहीकाळ चांगले दिवस आले. पण ही परिस्थिती बदलताच त्यात फरक पडला. शेतीची वाढ झाली खरी, पण शेतीव्यवस्थेत आमूलाग्र क्रांती वा बदल झाला नाही. तसा तो करावा असे सरकारचे धोरण नव्हते. विन्गेट व गोल्डस्मिड इत्यादींनी शेतसाऱ्याची फेरतपासणी केली. तत्पूर्वी प्रिंगल यांनी साऱ्याची पद्धती ठरविली होती. पण ही पद्धती अमलात आणताना प्रिंगल यांनी घालून दिलेल्या तत्त्वांना मुरड दिली गेली. त्यामुळे प्रिंगल यांना यश आले नाही. नंतर विन्गेट व गोल्डस्मिड यांनी पाहणी करून सारापद्धतीचे नवे नियम ठरविले. १८४० ते ५० या काळात हे झाले.

या दोघांच्या प्रयत्नांना यश आले. १८५२ पर्यंत दहा लाख अधिक एकरात लागवड होऊ लागली. ही वाढ पुणे, सोलापूर, अहमदनगर व धारवाड या जिल्ह्यांत झाली. अधिक जमीन लागवडीखाली आल्यामुळे सरकारी तिजोरीत अधिक महसूल जमा होऊ लागला. यामुळे मुंबई प्रांतातील महसुलाची पद्धती ही आर्थिकदृष्ट्या सर्वात लाभदायक आहे असा तिचा लौकिक झाला. विन्गेटच्या पद्धतीमुळे पाटील हा जरी गावाचा प्रमुख झाला तरी आर्थिकदृष्ट्या हे पद किफायतशीर ठेवले गेले नाही. सर्वसाधारण जमीनमालकांवर बोजा वाढलेला नव्हता. त्यामुळे शेतीचा विस्तार झाला.

पण विन्गेटचा विषय अल्पजीवी होता. त्याने खानदेशात जमिनीची फेरपाहणी केली. तेथे कपाशीचे पीक घेतले जात होते. विन्गेटला बाकीच्या चार जिल्ह्यांत स्थानिक शेतकऱ्यांचे सहकार्य मिळाले तसे खानदेशात मिळाले नाही. महसूल अधिकाऱ्यांना घेराव

घातला जाऊ लागला व दंगल झाली. पोलिसांची मदत घ्यावी लागली. रत्नागिरी जिल्ह्यातही विरोध झाला. विन्गेट हा खोतीपद्धतीच्या विरुद्ध होता. खोतीपद्धती ही उत्पादनवाढीला पोषक नाही असे त्याचे मत होते व त्याने ते आपल्या अहवालात व्यक्त केले होते. पुढे स्वराज्य येण्यापूर्वीच खोतपद्धती नष्ट झाली व विन्गेटचे मत चूक नव्हते हेही सिद्ध झाले. खोतांनी साऱ्याच्या फेरपाहणीत विरोध केला. ६८२ खेड्यांपैकी ४१७ खेड्यांच्या खोतांनी ही फेरपाहणी अमान्य केली. पुढे यात तडजोड झाली. कारवारमध्ये खानदेशप्रमाणेच विरोध झाला.

मुंबई प्रांतात रयतवारीचे प्राधान्य होते पण इनामदारी नगण्य नव्हती. १८८० मध्ये २ कोटी ८० लक्ष एकर जमीन रयतवारी पद्धतीखाली होती तर ८० लाख इनामदारी वगैरे पद्धतीखाली. अशा स्थितीत पूर्णत: बदल होणे अपेक्षित नव्हते.

१९२० च्या सुमारास नगदी पिकांची थोडी वाढ झाली. परंतु एकंदरीत मोठ्या प्रमाणावर बदल झाले असे म्हणता येणार नाही. अनेक गरीब शेतकऱ्यांच्या मालकीच्या जमिनी गेल्या, पण ते कूळ बनले. शेतीमालाच्या किंमती खाली गेल्या तेव्हा कर्जबाजारीपणा वाढला. सरकारने त्यासाठी कर्जनिवारण कायदा केला. पण हा कायदा अपुरा होता. कर्जबाजारी शेतकऱ्याला जमीन विकण्यास व सावकाराला ती घेण्यास बंदी नव्हती. यासाठीच कर्जनिवारण कायदा हा सावकारी कायदा ठरला अशी त्याची संभावना डॉ. धनंजयराव गाडगीळांनी नंतर केली.

याचा उपयोग करून राजकीय पक्षांनी लोकांची आंदोलने उभी केली असे मात्र झाले नाही. व्यापारी पिके आणि एकंदर व्यापारीकरण यामुळे शेतीमधील हितसंबंध दृढ झाले. येथे कोणत्या क्षेत्रात आमूलाग्र बदल झाले नाहीत तसे ते याही क्षेत्रात झाले नाहीत.

दुसरा ग्रंथ ब्रिटिश काळातील पाटबंधाऱ्यांवरलचा आहे. १९३० मध्ये लागवडीखाली जेवढी जमीन होती त्यात प्रत्येक सहा एकरमागे एक एकर ओलिताखाली होती. १८१७ मध्ये पाटबंधारे बांधण्यास प्रारंभ झाला. १८५७ पर्यंत गंगा कालवा तयार झाला. हरद्वार ते कानपूर असा ३५० मैलांचा टापू त्याखाली आला. लॉर्ड डलहौसी या गव्हर्नर-जनरलला विकासकामांची ओढ होती. त्याने कालव्यांच्या बांधणीस चालना दिली. त्यानेच प्रत्येक स्थानिक सरकारात मुख्य इंजिनियर ही जागा तयार केली. कालवे कोठे बांधावे, शेतीसाठी कालवे व विहिरींसाठी कालवे असे प्रकार असावे की नाही असे अनेक वाद त्या काळात झाले. उत्तर प्रदेशात त्यावेळी कालवा झाला होता. १८६०-६१ मध्ये दुआबात ७० हजार पक्क्या व २ लाख ८० हजार कच्चा विहिरी बांधून झाल्या व या दोन्ही विहिरींचे पाणी पंधरा लाख एकर जमिनीस मिळत होते. पण विहिरींचेही पाणी

मिळण्यास अडचण पडेल असे क्षेत्रही मोठे होते. कालवा तयार झाल्यावर विहिरींवर बरेवाईट परिणाम झाले. काही ठिकाणी पाण्याची पातळी वाढून विहिरी वाहून गेल्या. पण त्या पूर्णत: नष्ट झाल्या असे नव्हे. कालवा व विहीर यांची शेतकरी तुलना करू लागले आणि त्यांचा कल कालव्याकडे वळणे अपरिहार्य होते. कालवा आल्यावर शेतकऱ्यांच्या जीवनात फरक पडला. विहिरीचे पाणी उपसण्यासाठी लागणारे त्याचे बैल मोकळे झाले. कालव्यावर अधिक पीक येऊ लागले. यामुळे काम वाढले व रोजगारी वाढली.

कालव्याचे काही अनिष्ट परिणामही झाले. काही भागातील जमिनीत क्षार झाल्याने त्या निकामी झाल्या. यासाठी जमिनीतील पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था करावी लागली. कालव्याच्या भागातील लोकांत हिवतापाचा आजार बळावला. १८८० पासूनच्या दशकात उत्तरप्रदेशातील चारपंचमांश मृत्यू या हिवतापाने झाले. १८९१ हे वर्ष हे त्यामानाने आरोग्यदृष्ट्या चांगले म्हणावे लागेल. तरीही मेरठ जिल्ह्यातील ९५ टक्के मृत्यू त्या वर्षात हिवतापाने झाले. १८८० ते १८९० या दहा वर्षांत हिवतापाने आजारी पडणारांचे व मरणारांचे प्रमाण वाढल्यामुळे मजुरांची वाण भासू लागली. हिवतापावर संशोधन होऊन उपचार होऊ लागल्यावर कालवा भाग सुधारला.

पाण्याचे दर, कमी दर ठेवण्याची कारणे, त्याचे परिणाम याची तपशीलवार चर्चा लेखकाने केली आहे. कालव्यामुळे जमीन-मालकांकडे शिलकी धान्य राहू लागले. त्यांच्या हाती पैसा अधिक आला. मध्यम आणि मोठे असे जमीन-मालकांचे वर्ग निर्माण होऊन ते रूढ झाले. ते अधिक प्रमाणात खतांचा वगैरे उपयोग करू लागले. जाट शेतकरी हा शेतीत कुशल होता. त्यास पाण्याची जोड मिळाल्यामुळे त्याच्या मेहनतीचा व कौशल्याचा त्याला खरा फायदा होऊ लागला. उत्तरप्रदेशचा पश्चिम भाग बदलून गेला आणि पाटबंधारे नसलेल्या पूर्व भागापेक्षा तो वेगळा दिसू लागला. दोन्ही भागांत अगोदरच विषमता होती, ती वाढली. याचे पुढे राजकीय परिणामही झाले. पण हा या पुस्तकाचा विषय नव्हे.

१४-९-१९८५

इंग्रजांचा इतिहास

श्री. पॉल जॉन्सन यांनी लिहिलेला इंग्रजांचा इतिहास भाषा, विश्लेषण व माहिती या अनेक दृष्टींनी अतिशय रोचक झाला आहे. इतिहासकारांच्या पठडीतील आपण नाही; पत्रकार म्हणून व्यवसाय केला; पण चालू घडामोडींचा अर्थ लावावयाचा तर इतिहासाचा अभ्यास हवा असे जॉन्सन म्हणतात. यामुळे त्यांनी इतिहासाचे अवलोकन केले आणि ते केल्यावर आपल्याला हा इतिहास कसा दिसतो ते त्यांनी लिहून काढले. ए. जे. पी. टेलर यांच्यासारख्या नामवंत इतिहासकाराने जॉन्सन यांचा इतिहास प्रशंसनीय ठरविला आहे. चारशे पानांत जॉन्सन यांनी बराच मोठा काळ अवलोकिला असून, निरनिराळ्या युगातील ठळक वैशिष्ट्ये नमूद केली आहेत. ते करताना काही रूढ समजुतींना धक्काही दिला आहे.

इंग्लंडवर रोमन लोकांचे राज्य साडेतीनशे वर्षे होते. अशा वेळी नेहमी घडते तेच झाले. मालमत्तादार व अधिकारी वर्गाने रोमनांच्याप्रमाणे आपली वर्तनपद्धती बदलली. पण निदान दीडशे वर्षे तरी यापैकी कोणाला रोमन नागरिकत्व मिळाले नाही व पुढे ते मिळण्या न मिळण्याला किंमत नव्हती. जॉन्सन जेव्हा सांगतात की, या साम्राज्यात कोणाही ब्रिटिशास अत्युच्च अधिकारपदे मिळत नव्हती तेव्हा ब्रिटिश साम्राज्यात पुढे जे वसाहतीतील लोकांचे झाले त्याचेच हे अगोदरचे वर्णन ठरते. रोमनांच्यामुळे इंग्लंडचा युरोपशी संबंध आला. व्यापार वाढला, परंतु रोमन संस्कृती इंग्लंडमध्ये रुजली नाही. त्या संस्कृतीचा मूलाधार नगर व शहर हा होता आणि इंग्लंडच्या लोकांची मदार ग्रामीण भाग, शेती यावर होती. रोमनांप्रमाणे इंग्लिशांनी वाडे बांधले. पण ते ग्रामीण परिसराशी संवादी होते. या साम्राज्यामुळे जी साधनसंपत्ती वाढली तीमुळे साम्राज्यसत्तेला विरोध निर्माण झाला. रोमनही इतक्या दूरवरून राज्य करू शकत नव्हते. अखेरीस विरोधाचे प्रतिकारात रूपांतर होऊन रोमनांचे साम्राज्य संपुष्टात आले. पण ते आल्यावर आपल्या स्वतंत्र सरकारला कायदेशीर मान्यता मिळावी अशी इंग्रजांनी रोमन सम्राटाकडे मागणी केली, ती त्यांना मिळाली. अशाप्रकारे कायद्याने राज्य स्थापन झाले हे उल्लेखनीय वैशिष्ट्यच आहे.

इ.स. ६०० ते ११५४ हा इंग्लंडच्या दृष्टीने एकता, स्थैर्य व सातत्य यांचा काळ होता. रोमन धर्मपीठापेक्षा इंग्लिश धर्मपीठाला या काळात महत्त्व येऊ लागले. शेतीप्रधान समाजाला अनुरूप अशा सामाजिक व राजकीय संस्थांची स्थापना झाली. जमिनीची मालकी हे केवळ संपत्ती मिळविण्याचेच साधन बनले नाही तर समाजातील स्थान, राजकीय अधिकारपद इत्यादी या मालकीवर अवलंबून राहू लागली. खानदानपणा जमिनीच्या मालकीवर ठरू लागला. हे दीर्घकाळ म्हणजे या शतकाच्या प्रारंभीच्या काही

दशकापर्यंत चालू होते. कारखानदारीत संपत्ती मिळवण्यावर समाधान न मानता जमिनीची मालकी मिळविल्याशिवाय कोणी स्वस्थ राहात नव्हते. उमराव व्हावयाचे तर जमीन हवी आणि खानदानही यावरच ठरत होते. याचे मूळ हजारएक वर्ष पूर्वीपर्यंत जाते.

इतर अनेक राष्ट्रांप्रमाणे इंग्लंडचा इतिहास दीर्घकाळ राजांभोवती फिरत होता. त्यांच्यावर तो अवलंबून होता. इ.स. ८०० नंतर स्कॅन्डिनेव्हियनांनी इंग्लंड पादाक्रांत केले. पण त्या काळात आल्फ्रेड या नावाच्या राजाने चांगले राज्य केले. समाजात जर देवाणघेवाण, सामंजस्य असेल, त्यावर समाजाचा व्यवहार चालत असेल तर असा समाज संकटांना तोंड देऊन मार्ग काढू शकतो. इंग्लिश समाजाने आल्फ्रेडसारख्या राजाच्या नेतृत्वाखाली असा मार्ग काढला. पण त्याचा खून झाला. त्याच्या भावाचा कारभार योग्य नव्हता. त्याच्याविरुद्ध बंड झाले आणि राजाला आपल्या उमरावांबरोबर करार करावा लागला. मॅग्ना कार्टाच्या पूर्वी दोनशे वर्षांची ही कथा आहे. पुढे १३०८ मध्ये पोपने इंग्लंडच्या राजाला जेव्हा अनेक धर्मगुरू व इतर उमराव यांना शिक्षा करण्याची आज्ञा दिली तेव्हा त्यांनी गुन्हा काय केला हा प्रश्न आला. त्यांच्यावरील आरोपाची कबुली यावी याकरिता यातना देण्याचे, छळण्याचे तंत्र होते. इंग्रज अधिकाऱ्यांनी यास विरोध केला. शारीरिक यातनेचा मार्ग त्यांना नापसंत होता.

पुढे निरनिराळ्या राजांच्या कारकीर्दीत फ्रान्स वगैरेबरोबर लढाया होऊ लागल्या. यासंबंधात जॉन्सन यांनी दिलेला अभिप्राय नमूद करण्यासारखा आहे. ते म्हणतात, लढाईसंबंधात इंग्रजांच्या मनात गोंधळ असतो. त्यांना युद्धाची खुमखुमी असते पण त्याबरोबर पैसा खर्च करण्याची तयारी नसते. अनेकदा पैसा खर्च न करण्याच्या प्रवृत्तीचा प्रभाव पडतो आणि युद्ध टळते. इंग्रजी राजकीय व्यवस्थेची निर्मिती यातून झाली आहे. मॅग्ना कार्टा ही स्वातंत्र्याची सनद म्हणून इतकी वर्षे गौरविली आहे. त्यावेळी जॉन हा राजा राज्य करीत होता. फ्रान्सविरुद्धच्या लढाईत त्याला यश आले नाही. तेव्हा त्याचे सरदार, उमराव त्याच्याविरुद्ध गेले. १२१४ मध्ये त्या दोघांतील वाद विकोपाला जाऊन पोपकडे गाऱ्हाणे गेले. पोपने उमरावांना कटकारस्थाने बंद करण्यास सांगितले, पण त्याचबरोबर त्यांच्या न्याय्य मागण्या मान्य करा असा जॉनला आदेश दिला. दोघांत वाटाघाटी झाल्या. एका करारास दोघांची संमती मिळाली पण तरीही वाद उफाळला आणि यादवी माजली. तत्पूर्वी राजाने बंडखोर उमरावांना वाळीत टाकले होते. बंडखोरांना परकीय भूमीवर लढाईसाठी जावयाचे नव्हते किंवा अशा युद्धासाठी कर द्यावयाचा नव्हता. सरकारी कामकाज मंडळात चर्चा करून व्हावे असेही त्यांचे म्हणणे होते. या मागण्या एका करारनाम्याच्या रूपाने मान्य झाल्या.

वस्तुत: उमराव, सरदार हे परिवर्तनाच्या बाजूने नव्हते. त्यांना बदल नको होता. पण हेन्री, रिचर्ड वगैरे राजांनी बदल घडवून आणले होते. त्यास सरदारांचा विरोध होता. तेव्हा

मॅग्ना कार्टाची स्वातंत्र्याची सनद म्हणून ख्याती झाली खरी, पण तत्कालीन मालमत्तादार वर्गाला आपले हक्क शाबीत करावयाचे होते. करार करणाऱ्या दोन्ही बाजूंना यात काहीना काही दोषास्पद दिसत होते आणि त्यावर ते नाराज होते. तेव्हा मॅग्ना कार्टाची कहाणी ही यशाची नाही तर अपयशाची आहे. त्यानंतर या सनदेत ३२ वेळा बदल झाला. पॉल जॉन्सन म्हणतात, प्रत्येकजण मॅग्ना कार्टाचा उल्लेख करतो पण फार थोड्यांनी तो वाचला आहे. तथापि वाद हा तडजोड करून, चर्चा करून मिटवावयाचा हे इंग्लिश लोक यापासून शिकले. पार्लमेंट हेसुद्धा काही शतके राजाच्या अधिकारावर नियंत्रण घालणारी संस्था म्हणून वागत नव्हते.

चौदाव्या शतकात प्लेगने इंग्लंड हैराण झाले. शेतीसाठी लोक मिळेनात. यामुळे मजुरी वाढली. परिस्थितीच्या दडपणाखाली हे व असे बदल होत गेले. पण आमूलाग्र बदल, त्यासाठी रक्तपात, हिंसाचार याची इंग्लिश समाजास गोडी नाही. मुळात मात्र तो स्थितीवादी नाही.

एलिझाबेथ राणीच्या कारकीर्दीत इंग्लंडची अनेक रीतीने भरभराट झाली. तिच्या स्वभावाचे, राजकीय दूरदृष्टीचे जॉन्सन यांनी मार्मिक विश्लेषण केले आहे. एलिझाबेथच्या काळात कोणत्याही कलाकृतीवर तसेच ज्ञान, विज्ञान, शिक्षण यांची चर्चा करणाऱ्या पुस्तकावर नियंत्रण नव्हते. तिच्यानंतर जेम्स राज्यावर आला आणि ग्रंथप्रकाशन कठीण होऊ लागले. १६४० च्या सुमारास मिल्टनने इंग्लंडचे वर्णन केले. त्यावेळी इंग्लंड हे नैतिकदृष्ट्या व आर्थिकदृष्ट्या दिवाळखोर बनले होते. अंतर्गत स्थैर्य राहिले नाही.

अठराव्या व एकोणिसाव्या शतकात नवे शोध, नवी उत्पादनपद्धती यामुळे इंग्लंड संपन्न बनले. सप्त समुद्रावर सत्ता प्रस्थापित झाली. साम्राज्याचा विस्तार झाला. सामाजिक सुधारणा होऊ लागल्या. नव्या उद्योगधंद्यांबरोबर संपत्ती वाढली पण कामगारांचे जीवन कष्टाचे होते. साध्या सुधारणांना विरोध होत होता. पण त्यांचा आग्रह धरणारेही निष्ठावान होते. यामुळे सुधारणा होत होत्या.

पहिल्या महायुद्धाच्या अगोदरपासूनच अमेरिका, जर्मनी यांनी उत्पादनात आघाडी मारली होती. त्यांची यंत्रसामग्री अद्यावत होती. इंग्लंड तेव्हापासून मागे पडले. जॉन्सन यांचे म्हणणे असे आहे की इंग्लंडने फ्रान्स व रशिया यांच्याशी हातमिळवणी करून जर्मनीशी वैर करण्याचे व नंतर युद्ध करण्याचे कारण नव्हते. पहिल्या महायुद्धाच्या बाबतीत त्यांची ही भूमिका आहे. दुसऱ्या महायुद्धाबाबत नाही. आर्थिकदृष्ट्या मागे पडत चाललेल्या इंग्लंडला साम्राज्याचा भार झेपणे अशक्य होते. दुसऱ्या महायुद्धानंतर तो भार उतरला गेला आणि त्यामुळे इंग्लंडचीच सुटका झाली.

५-१०-१९८५

युद्धपूर्व इंग्लंड

युद्ध, युद्धापूर्वीचा व नंतरचा काळ हा अनेकांच्या संशोधनाचा विषय आहे. ॲन द कर्सी या लेखिकेने, १९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू होण्याच्या अगोदर काही महिने इंग्लंडचे सामाजिक वातावरण कसे होते, याचे रसाळ भाषेत वर्णन केले आहे. जर्मनीशी समझोता होईल आणि युद्धाचा प्रसंग येणार नाही, अशी इंग्लंडमध्ये सर्वसाधारण समजूत होती. ब्रिटनमध्ये तेव्हा हुजूर पक्षाचे राज्य होते आणि नेव्हिल चेंबर्लेन हे पंतप्रधान होते. युद्ध टाळावे असे चेंबर्लेन यांना प्रकर्षाने वाटत असल्याने, हिटलरच्या आक्रमक वक्तव्यांची गंभीर दखल घ्यावयाची नाही आणि युद्ध जवळ आले आहे, असे आपल्या देशबांधवांना वाटू नये याची काळजी घ्यावयाची, असे धोरण त्यांनी ठेवले होते. युद्धाला तोंड देण्यास त्यांची तयारी नव्हती व युद्धाचे नेतृत्व करण्यासाठी जे व्यक्तित्व लागते, तेही त्यांच्यापाशी नव्हते. यामुळे १९३९ साली हिटलरच्या चढाईच्या धोरणाची चाहूल लागली होती, तरी चेंबर्लेन यांनी आभासात्मक वातावरण तयार केले होते.

चेंबर्लेन हे शांततावादी होते. आपले खाते ते नीटपणे सांभाळीत. पण युद्धनेतृत्व हे वेगळेच असते. चेंबर्लेन हे पक्षीप्रेमी होते. त्यांनी शिकारीत कधी रस घेतला नाही. पण मासेमारी त्यांना आवडत असे. ब्रिटनचे अर्थमंत्री असताना ते अनेकदा 'टेलिग्राफ'मध्ये पक्ष्यांवर लिहीत असत. नवा पक्षी दिसला की, त्यावर लेख वा पत्र लिहिण्याची त्यांना हौस होती. पंतप्रधान झाल्यावरही ते रोज सकाळी सार्वजनिक उद्यानात फेरफटका मारीत आणि एखादा नवा पक्षी दिसला, पक्ष्याचा वेगळा सूर ऐकला की, टाइम्सला पत्र लिहीत. आंतरराष्ट्रीय पेचप्रसंग त्यांना त्रासदायक वाटत असे. रॅब बटलर यांनी एकदा आठवण दिली आहे. ते एकदा चेंबर्लेन यांना अल्बानियामधील पेचप्रसंगाची माहिती देण्यासाठी गेले असताना, चेंबर्लेन यांनी त्यांना घरी जाऊन स्वस्थ झोपण्याचा सल्ला दिला. बटलर लिहितात, ईडन यांना चेंबर्लेन यांनी दुसऱ्या एका प्रसंगी ॲस्पिरिन घेण्यास सांगितले होते, तसे मला सांगितले नाही, हे नशीब.

युद्ध टाळण्याची वा ते येईल असा विचार न करण्याची प्रवृत्ती सार्वत्रिक होती. डफ कूपर यांनी एक लेख लिहून, युद्धासाठी कसे सज्ज राहावयास हवे, इत्यादीचा ऊहापोह केला होता. पण त्यातल्या त्यात नौदल हेच काही प्रमाणात सज्ज होते. डफ कूपर यांचे म्हणणे होते की, आपण चढाईचा अगदी योग्य क्षण निवडला पाहिजे. पण असा आदर्श क्षण कोणताच नसतो, असे लष्करी विषयावर लिहिणारे तज्ज्ञ लिडेल हार्ट यांनी म्हटले होते. तथापि मुख्य प्रश्न राज्यकर्ते व लोक यांची मानसिक ठेवण काय होती हा आहे. ती शांततावादी होती. वास्तविक चार वर्षांपूर्वीच मुसोलिनीने ॲबिसिनिया व नंतर

अल्बानिया यांच्यावर स्वारी केली होती. दोन्हींकडे ब्रिटिशांनी दुर्लक्ष केले. मुसोलिनी हा तर बहुतेकांचा आवडता होता. त्याने काप्री या बेटावर पक्षांसाठी अभयारण्य तयार केले, याचे वाजवीपेक्षा अधिक कौतुक होत होते. चर्चिल यांनी हिटलरबद्दल इशारे दिले असले, तरी मुसोलिनीबाबत त्यांना ते द्यावेसे वाटले नाहीत. तथापि युद्धाचे ढग जमत आहेत, असे पाहून चर्चिल यांनी पंतप्रधान चेंबर्लेन यांना साहाय्य करण्यासाठी मंत्रिमंडळात येण्याची तयारी दर्शविली होती. चेंबर्लेन यांना मात्र याबद्दल फारशी उत्सुकता व निकड वाटत नव्हती.

शरणागतीपर्यंत पोहोचेल असा शांततावाद वा युद्धविरोध इंग्लंडमध्ये त्या काळात होता आणि चेंबर्लेन हे त्याचे प्रतीक होते. यामुळे चेकोस्लोव्हाकियावर स्वारी झाली, म्हणून सक्तीची लष्करभरती करण्याचे सरकारने ठरविले असताना, मजूर पक्षाचे नेते यास कॉमन्समध्ये विरोध करताना आढळत होते. एकटे चर्चिल हिटलरविरोधी सावधगिरीचे इशारे देत.

बहुतेक नेत्यांनी युद्ध टाळण्याची व युरोपमधील बदलत्या परिस्थितीची दखल न घेण्याचे ठरविल्यामुळे सर्वसाधारण समाज एका गुंगीत होता. त्याची अवस्था काय होती? लेखिकेने याची सविस्तर माहिती दिली आहे. एकंदर स्वस्ताई होती. लोकसंख्या चार कोटी ७० लक्ष होती. पुरुषांचे विवाहाचे वय साधारणत: २७-२८ होते आणि स्त्रियांचे २४-२५. घटस्फोटांचे प्रमाण फार नसे. १९३८ साली सहा हजार २५० घटस्फोट झाले. बेकारी बरीच होती. विवाहित स्त्रियांना कामावर ठेवण्यास बहुतेक मालक नाखूष असत. म्हणून अनेक विवाहित स्त्रिया आपण अविवाहित आहोत, असे सांगत.

लहान मुलांना घटसर्प होणे, हे नित्याचे असे. त्याविरुद्ध उपाययोजना करण्याबाबत वृत्तपत्रांतून चर्चा होत होती. क्षय हा असाच एक सार्वत्रिक रोग होता. १९३८ साली अडीच हजारावर मृत्यू क्षयाने झाले. याचे एक कारण म्हणजे तेव्हा दुधाचे निर्जंतुकीकरण होत नसे. यामुळे रोगी गाईंपासून क्षयाचा फैलाव होत होता. युद्धानंतर इंग्लंडमधून क्षयाचे पूर्णत: उच्चाटन झाले.

युद्ध सुरू होण्याच्या अगोदर मध्यमवर्गीय व श्रीमंत कुटुंबात नोकरचाकर असत. घरातील कामे मालकीण या नोकरांकडून करीत असे. पण युद्धात भरती झाल्यामुळे व अनेक नोकऱ्या उपलब्ध झाल्यामुळे नोकरांची टंचाई निर्माण झाली. तेव्हा घरातील कामे यंत्रांच्या द्वारे सुलभ करण्याचे प्रयत्न सुरू झाले. अशा यंत्रांची व साधनसामग्रीची वाढ युद्धोत्तर काळात झाली आहे.

शेतमजुरांची संख्या १९२१ सालापासूनच्या १७ वर्षांच्या काळात तीन लाखांनी कमी झाली होती. साडेचार कोटी एकर जमीन लागवडीयोग्य असली तरी आयात धान्य हे स्वस्त असल्यामुळे, यापैकी बरीच जमीन पडीक ठेविली जात असे. उत्तम जमीनीत गहू घेतला जात होता. लहान शेतकऱ्यांची स्थिती चांगली नव्हती. अवर्षण पडल्यास त्यांचे

हाल होत. चार लाख शेतांपैकी केवळ ३५ हजारांना विजेचा पुरवठा होत असे. आधुनिक अवजारे युद्धानंतर आली. तत्पूर्वी घोड्यांचा वापर करून शेतीची नांगरणी केली जात होती. शेतमजूर तसेच शहरात काम करणारे हमाल यांचे वेतन कमी होते. किमान वेतन हे विभागवार वेगळे होते. डोक्यावरून माल वाहून नेण्याची पद्धती होती. हिवाळ्यात गरिबांसाठी लंडनमध्ये स्वस्तात सूप विकले जात असे.

निश्चित मिळकत असलेल्या वर्गाला ही स्वस्ताई स्वागतार्ह वाटत होती आणि या वर्गाचे व उमराव वर्गाचे जीवन आरामशीर होते. वसंतऋतु आला की, सुखवस्तू वर्गातील उपवर मुलींसाठी सामूहिक नृत्याचे कार्यक्रम होत असत आणि उमरावांच्या घरी होणाऱ्या या कार्यक्रमांना राजा व राणी हजर राहात. त्यांच्याशी या मुलींची ओळख करून देणे, हाच एक समारंभ असे. लेखिकेने अशा काही कार्यक्रमांची रसभरीत वर्णने केली आहेत. आज हे वाचताना ते जीवन कृत्रिम वाटते. समारंभ यशस्वी व्हावा, राजा व राणी यांनी यावे म्हणून आणि समारंभाकरिता खास पोषाख तयार करण्यासाठी जे कष्ट घेतले जात, ते आज निरर्थक वाटत असले, तरी बराच मोठा वर्ग त्या काळात यात गुंतला होता.

पंतप्रधान चेंबर्लेन यांच्या सरकारी निवासस्थानी राजा व राणी भोजनासाठी आले होते. त्याचेही वर्णन वाचण्यासारखे आहे. युद्धाच्या छाया उघडपणे दिसत असताना, राजा व राणी यांनी कॅनडाचा दौरा केला. आजही राजघराणे हा ब्रिटिश वृत्तपत्रांचा आवडीचा विषय आहे. तेव्हा तर तो फारच होता. तेव्हा युद्धाच्या छाया भेडसावीत असल्या, तरी या दौऱ्याची विस्तृत वर्णने वृत्तपत्रांत येत होती.

ब्रिटन युद्धात उतरले, ते १९३९ च्या सप्टेंबरमध्ये. पण जून, जुलैमध्येही उमरावांच्या घरच्या पार्ट्या चालू होत्या आणि डर्बी रेसकडे सर्वांचे डोळे लागले होते. या उमरावांच्या शाही निवासस्थानांची व्यवस्था, तेथील उत्सव इत्यादींची माहिती लेखिका देते. युद्धानंतर हीच निवासस्थाने तशी टिकविणे अशक्य होऊन बसले.

युद्ध सुरू झाल्यानंतर बॉम्बवर्षावात किती लोक मरण पावतील, याचा हिशेब करण्यात आला होता. पहिल्याच आठवड्यात ८३ हजार लोक मरतील, असे सांगण्यात येत होते. पण युद्धाच्या सर्व काळात बॉम्बवर्षावात एकूण ५१ हजार लोक मरण पावले. मार्चमध्ये हिटलरने चेकोस्लोव्हाकियावर स्वारी केली आणि ब्रिटिश पत्रांनी पहिल्या पानावर यास प्रसिद्धी दिली. पण एवढे होऊनही जून-जुलैत असे समारंभ चालूच राहावे, यावरून इंग्लंडचे सरकार व लोक कसे कृत्रिम वातावरणात राहात होते आणि आभास हेच त्यांना कसे सत्य वाटत असे, याची कल्पना या पुस्तकावरून येते. समाजाचा इतिहास लिहिण्याचे अनेक प्रकार असतात. लेखिकेने हाताळलेला हा प्रकार व तिची हातोटी लक्षणीय आहे.

१२-१०-१९९०

ब्रिटिश मजूर पक्ष

ब्रिटिश मजूर पक्षाचा इतिहास जी. डी. एच. कोल व हेन्री पेलिंग यांनी लिहिला असला तरी नवी माहिती बाहेर येत आहे आणि तिचा आधार घेऊन रॉजर मूर यांनी आता १८८० ते १९२४ येथपर्यंतचा इतिहास कथन केला आहे. रॉजर मूर यांनी महत्त्वपूर्ण तपशीलाकडे दुर्लक्ष केले नाही; पण तपशीलाचे जंगलही ते उभे करीत नाहीत.

मजूर पक्षाची स्थापना व वाढ या प्रारंभीच्या काळात झाली त्यावेळी लिबरल पक्षाचा प्रभाव जसा ब्रिटिश राजकारणावर होता त्याचप्रमाणे तो कामगारांवरही होता. त्यामुळे दीर्घकाळ या दोन पक्षांत सहकार्य होत होते. तसे पाहिले तर मजूर पक्षाची स्थापना होण्यासाठी ज्या प्रवृत्ती कारणीभूत झाल्या त्या अठराव्या शतकाच्या अखेरीच्या काळापासून अस्तित्वात होत्या. तथापि मानवाच्या हक्कांची चर्चा करून त्यांचे महत्त्व प्रतिपादन करणारा टॉम पेन हा या पक्षाचा एक स्फूर्तिदाता म्हणावा लागेल. पेन हा अर्थातच मोठा सखोल विचार करणारा तत्त्वचिंतक नव्हता. कोणताही प्रश्न फार सुलभतेने सोडविता येईल अशी त्याची समजूत होती. परंतु समाजात धार्मिक परंपरा व समजुती यांचा प्रभाव न वाढता लोकशक्तीला प्राधान्य मिळावे हा त्याचा आग्रह असे. त्याचप्रमाणे त्याने सामाजीकरणाचा पुरस्कार केला होता. फ्रान्समध्ये क्रांती झाली होती व इंग्लंडमध्ये तिचे पडसाद उमटत होते. याचे एक उदाहरण म्हणजे धर्मगुरूंविरुद्ध वाढत चाललेला असंतोष. यातूनच १७९२ मध्ये लंडन कॉरस्पॉंडिंग सोसायटी या नावाची सोसायटी स्थापन झाली. प्रौढ मतदान, गरिबांसाठी कल्याणकारी कार्यक्रम वगैरे या सोसायटीच्या मागण्या होत्या. ही संघटना म्हणजे मजूर पक्षाची गंगोत्री असे काही मानतात. मूर यांना मात्र तसे वाटत नाही.

पुढे रॉबर्ट ओवेन यांनी १८२०-२१ च्या सुमारास आपली मते प्रतिपादन करावयास सुरुवात केली. पेनप्रमाणे त्यांचाही धर्मावर हल्ला चालू असे. पण ब्रिटिश मजूर पक्ष स्थापन होण्यापूर्वी व नंतरही त्यावर धार्मिक परंपरेचा पगडा टिकून राहिला. केर हार्डी यांना तर ख्रिस्ती धर्म व समाजवाद यांचे नातेच आहे असेच वाटे. तेवढेच नव्हे तर ते स्वत: धार्मिक प्रवचने देत आणि कामगारांच्या सभेतही भाषणाचा प्रारंभ प्रार्थनेने करीत. धार्मिक प्रभावामुळे गरिबांची सेवा करावी, त्यांची स्थिती सुधारण्यासाठी विधायक काम करावे एवढेच नव्हे, तर त्यांची संघटना करावी अशी भावना ब्रिटिश मजूर नेत्यांत दीर्घकाळ असल्याचे आढळून येईल. इतर काही देशांत मालक-विरोधी वर्गलढ्यातून मजूर पक्ष

जन्माला आले असतील. पण इंग्लंडमध्ये या पक्षाची प्रेरणा धार्मिक होती आणि ख्रिश्चन धर्माचा पगडा अद्यापही या पक्षाने पूर्णपणे झिडकारला आहे असे म्हणणे कठीण होईल. मूर यांनी हे पुराव्यानिशी दाखवून दिले आहे.

औद्योगिक क्रांतीमुळे कारखानदारी वाढून नवी शहरे वाढली. या शहरांतून जास्तीत जास्त नागरी सोयी कराव्या अशी एक चळवळ वाढत होती. याला म्युनिसिपल सोशॅलिझम असे म्हणतात. यातूनच सरकारने समाजजीवनाच्या अनेक क्षेत्रात हस्तक्षेप करावा अशी मागणी होऊ लागली. तथापि सर्व कामगारवर्ग या मागणीला पाठिंबा देत होता असे नव्हे. किंबहुना कारखानदारांप्रमाणेच कामगारांनाही सरकारी हस्तक्षेप पसंत नसे. उदाहरणच द्यावयाचे तर सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे. याप्रकारच्या सक्तीमुळे मुलांना कामावर पाठवून घरात अधिक पैसे आणणे अशक्य होईल यासाठी कामगारांचा विरोध होता. कारखानदारी जशी वाढत गेली तशी शहरांतील दाटीही वाढत गेली. यामुळे रोगराई पसरत होती. यासंबंधी अनेक अहवाल तयार झाले. यावर एक वेगळा उपाय रॉबर्ट ओवेन यांनी सुचविला होता. त्यांना मोठ्या शहरांपेक्षा लहान लहान गावे स्थापन व्हावी; त्यात पाचशेपासून दीड हजारापर्यंत लोक असावे, त्यांच्यासाठी हजार-दीडहजार एकर जमीन पोषणार्थ असावी असे वाटे. ओवेन यांची ही स्वप्नाळू योजना होती आणि ती कोणी स्वीकारली नाही. पुढे हा प्रयोग करण्यासाठी ते अमेरिकेत गेले.

ब्रिटिश मजूर पक्षाच्या स्थापनेपूर्वी व स्थापनेनंतर जे पुढारी निर्माण झाले ते धार्मिक सुधारणावादी होते आणि म्हणून त्यांना श्रमजीवी जनतेच्या जीवनात सुधारणा व्हावी असे वाटे ते दयाबुद्धीमुळे. या त्यांच्या वृत्तीमुळेच त्यांचे व लिबरल पक्षाचे सहकार्य होत होते. विशेषत: ग्लॅडस्टन यांच्या धोरणाबाबत बरीचशी एकवाक्यता असल्यामुळे मजूर पक्षाचे पुढारी याप्रमाणे सहकार्य करीत. तथापि याप्रकारचा स्वतंत्र पक्ष स्थापन करण्याची पार्श्वभूमी १८८० मध्ये निर्माण झाली व पुढे वीस वर्षांच्या काळातील अनेकविध घडामोडी मजूर पक्षाच्या स्थापनेला कारणीभूत ठरल्या. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाने शिक्षणाचे वातावरण तयार झाले. याबाबतचा कायदा १८५० मध्ये अमंलात आला. कामगारवर्गात आपल्या हक्काबद्दल जाणीव वाढू लागली. परंतु १८६७ मध्ये घटनात्मक सुधारणेचा कायदा होऊन शहरातील कामगारवर्गाच्या एका विभागास मतदानाचा हक्क मिळाला. ७२ मध्ये गुप्त मतदान आले. यामुळे निवडणूक कमी खर्चाची झाली व मतदानाच्या वेळी होणारी गुंडगिरी आटोक्यात आली. ८४ च्या कायद्याने निरनिराळ्या परगण्यातल्या लोकांना आपले प्रतिनिधी पाठवणे शक्य झाले. याचा फायदा खाणींच्या विभागातल्या लोकांना मिळू लागला. ८३ सालच्या कायद्याने लाच देऊन मते घेण्यास बंदी झाली. ८८ सालच्या कायद्याने स्थानिक स्वराज्य संस्थेचा पाया अधिक विस्तृत बनला. तथापि, १९११ पर्यंत

पार्लमेंटच्या सभासदांना वेतन वा भत्ता नव्हता. त्यामुळे कामगार प्रतिनिधींची अडचण होत असे. पुढे मात्र ती दूर झाली. या प्रकारच्या वातावरणात लंडन व इतर शहरांत कामगारांचे अनेक क्लब स्थापन झाले आणि या सर्वांची एक संघटना करावी या उद्देशाने १८८१ मध्ये डेमॉक्रटिक फेडरेशनची स्थापना झाली. तथापि हिंडमन यांनी या फेडरेशनचे पुढारीपण घेईपर्यंत त्यास समाजवादी स्वरूप आले नव्हते. ते येऊन १८८३ मध्ये सोशल डेमॉक्रटिक फेडरेशन असे नामांतर झाले. एव्हांपासून या संघटनेची सूत्रे मध्यमवर्गाच्या हाती गेली. हिंडमन व मॉरिस हे याचे प्रमुख. याच सुमारास फेबियन सोसायटीची स्थापना झाली. शॉ., वेब दांपत्य वगैरे तिचे अध्वर्यू. ते अर्थातच बुद्धिवंत होते व व्यावसायिक राजकारण्यांना आपण अनेक योजना आणि कल्पनांचा पुरवठा करू असा त्यांचा विश्वास होता. याच काळात केर हार्डी यांची स्कॉटिश सोशॅलिस्ट पार्टी स्थापन झाली होती. त्यांनी कामगार संघटना वाढविण्याचे प्रयत्न स्वतंत्रपणे चालविले होते. मजूर संघटना या स्वतंत्रपणे चालवाव्या, लिबरल पक्षाशी संबंध येऊ नये असे मानणारा यावेळी एक गट होता; पण मजूर व लिबरल यांच्यातील सहकार्य चालूच राहिले. स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन करावा असेच हार्डी यांचे प्रयत्न होते व ते सफल होऊन १८९३ मध्ये इंडिपेंडंट लेबर पार्टीची स्थापना झाली. याप्रकारे सोशल डेमॉक्रटिक फेडरेशन, फेबियन सोसायटी व इंडिपेंडंट लेबर पार्टी अशा समाजवादाचा पुरस्कार करणाऱ्या तीन संघटना त्या काळात वावरू लागल्या होत्या आणि निवडणुकीच्या राजकारणात भाग घेत होत्या. तथापि १९०० च्या सुमारासच फेबियन सोसायटीचा भर ओसरू लागला. उरलेल्या दोन पक्षांची वाढ निरनिराळ्या भागात निरनिराळ्या स्वरूपाची होत होती.

१८८० च्या फेब्रुवारीत लेबर रिप्रेझेंटेशन कमिटी या नावाने एक संघटना स्थापन झाली. मजूर पक्ष स्थापन करावा असाच यावेळी विचार होता. पण नाव वेगळे ठेवले गेले. हा पक्ष स्थापन होत असतानाच निवडणूक आली व तीत या पक्षाला फारसे यश आले नाही. केर हार्डी यांच्या बरोबरीने आता रॅम्से मॅक्डोनल्ड हे पुढे झाले होते. त्यांनी व फ्रेडरिक रोजर्स यांनी कामगार संघटनांना एकत्र येऊन राजकीय आघाडी स्थापन करण्याचे आवाहन केले. याचा परिणाम झाला. निरनिराळ्या कामगार संघटना लेबर रिप्रेझेंटेशन कमिटीला सहकार्य देऊ लागल्या. मॅक्डोनल्ड, हेन्डर्सन, केर हार्डी हे भिन्न प्रवृत्तीचे होते. पण निवडणुकीच्या राजकारणाचा विचार करता त्यांना लिबरल पक्षाशी सख्य ठेवणे उपयुक्त वाटत होते. याचा फायदा पार्लमेंटमध्ये अधिक मजूर प्रतिनिधी निवडून येण्यात दिसून आला.

पार्लमेंटमध्ये मजूर पक्षाचे बळ वाढल्याने एक नवे संसदीय नेतृत्व तयार होऊ लागले. अर्थात मजूर पक्षाचे बळ कामगार संघटनांवर अवलंबून होते. १९०८ ते १४ या काळात

निरनिराळ्या क्षेत्रातील कामगार संघटना मजूर पक्षाला पाठिंबा देऊ लागल्या. मॅक्डोनल्ड यांचे पुढारीपण या काळात सिद्ध झाले होते. पण त्यांच्या समाजवादाबद्दल व राजनैतिक नैपुण्याबद्दल अनेकांना संशय होता.

पहिले महायुद्ध झाले तेव्हा अनेक मजूर पक्षीय हे शांततावादी होते. पुढे त्यांनी युद्धाला पाठिंबा दिला पण ते लवकर संपवावे असे त्यांचे मत होते. युद्धाच्या अखेरच्या पर्वात राष्ट्रीय मंत्रिमंडळ स्थापन करण्यात येऊन मॅक्डोनल्ड वगैरे मंत्रिमंडळात सामील झाले. परंतु ते मंत्रिमंडळ फार प्रभाव टाकू शकले नाही.

पहिल्या महायुद्धानंतर निवडणूक झाली. ती युद्ध थांबल्यावर महिन्यात झाल्याने खाकी निवडणूक असे तिचे वर्णन झाले. पण ती थोडी लांबली असती तरी मजूर पक्षाच्या हाती राज्य आले नसते. लॉइड जॉर्ज हे युद्धकालीन पंतप्रधान होते आणि त्यांना युद्ध जिंकणारा वीर म्हणून मतदारांनी निवडून दिले. दुसऱ्या महायुद्धानंतर उलट झाले. मजूर पक्ष प्रचंड मतांनी निवडून आला. पण पहिल्या महायुद्धानंतरच्या निवडणुकीत लॉइड जॉर्ज व त्यांचा लिबरल पक्ष विजयी ठरला. दोन्ही युद्धांनंतरच्या सामाजिक प्रवृत्तीही वेगळ्या होत्या. लॉइड जॉर्ज यांनी अनेक समाजकल्याणाच्या योजना हाती घेतल्या खऱ्या, पण भांडवलदारांना त्यांनी मोकळीकही दिली. त्यामुळे मजूर पक्षाचा आर्थिक व सामाजिक धोरणांवर प्रभाव राहिला असेही म्हणता येणार नाही.

तथापि १९२२ च्या निवडणुकीत पार्लमेंटमध्ये मजूर पक्षाला चांगले प्रतिनिधित्व मिळाले. तेव्हा नेता निवडण्याचा प्रश्न आला. मॅक्डोनल्ड यांच्याएवढा राष्ट्रीय पातळीवरील नेता त्या पक्षात नव्हता व म्हणून त्यांची निवड झाली. पार्लमेंटमधील त्यांच्या संयमी भाषणांचाही परिणाम होऊ लागला. पण पुढे २३ च्या अखेरीला पुन्हा निवडणूक घेणे अपरिहार्य ठरले आणि त्या निवडणूकीत मजूर पक्ष विजयी ठरला आणि मॅक्डोनल्ड हे पहिले मजूर पक्षीय पंतप्रधान झाले. या पक्षाचे हे यशच पुढे त्याला दीर्घकाळ वनवासात पाठविण्यास कारणीभूत ठरले. मूर यांचे पुस्तक मॅक्डोनल्ड पंतप्रधान होतात तेथे संपते. त्यामुळे मजूर पक्षाच्या पुढील वाटचालीचे विवेचन त्यांच्याकडून अपेक्षित आहे.

१-७-१९७८

केंब्रिज मुद्रणालय

केंब्रिज व ऑक्सफर्ड या विद्यापीठांचा इतिहास हा त्या दोन्ही विद्यापीठांच्या ज्ञानसाधनेचा एक भाग आहे. केंब्रिज विद्यापीठाच्या मुद्रणालयास १५३४ मध्ये राजाचा परवाना मिळाला आणि १५८४ पासून त्याचे मुद्रणाचे काम सतत चालू आहे. हा चारशे वर्षांचा इतिहास प्रा. ब्लॅक यांनी सादर केला आहे. ते प्रकाशक आणि प्राध्यापक आहेत. या चारशे वर्षांत मुद्रणालयाने अनेक चढउतार पाहिले आणि आज ते एक अग्रेसर मुद्रणालय आहे व प्रकाशनसंस्थाही आहे.

विद्यापीठास मुद्रणालय स्थापन करण्याचा परवाना मिळाल्यावर पहिले मुद्रक म्हणून थॉमस यांची नेमणूक झाली. कोणताही व्यवसाय व कोणतीही संस्था स्थापन केल्यावर प्रारंभीच्या काळात अनंत अडचणी उभ्या राहतात तशा त्या याही मुद्रणालयापुढे उभ्या राहिल्या. प्रारंभीच परवाना देताना बायबल, धार्मिक गीते, पाठ्यपुस्तके इत्यादी प्रकाशित न करण्याचा निर्बंध होता. तो पुढे रद्द झाला आणि बायबलचे प्रकाशन हा मुद्रणालयास फार मोठा आधार ठरला. राजाचा शिरच्छेद होऊन क्रॉमवेल प्रमुख बनला तेव्हा मध्यंतरीच्या काळात या मुद्रणालयाने बायबल छापून त्याचा साठा केला. पण क्रॉमवेलने हुकूम काढून एका खाजगी व्यक्तीस बायबल छापण्याची मिरासदारी दिली. तीच पुढे संपुष्टात आली. यावरून बायबलचे प्रकाशन हे केंब्रिज विद्यापीठास व इतर प्रकाशकांनाही कसे महत्त्वाचे वाटत होते याची कल्पना येईल. विसाव्या शतकात मात्र बायबलच्या प्रकाशनावर केंब्रिज विद्यापीठ मुद्रणालयाची भिस्त राहिली नाही. तरीही ते बायबल प्रसिद्ध करते आणि त्याचा निर्यातीसाठीच प्राय: उपयोग होतो.

केंब्रिज विद्यापीठाने ज्ञानमार्गी प्रकाशन मुद्रणालय चालविण्याचे ठरविले तेव्हा त्याने ज्ञानाच्या अनेक क्षेत्रातील पुस्तकांच्या प्रकाशनासाठीच हा उद्योग करावयाचा असे धोरण होते. किंबहुना विद्यापीठाचा तसा ठरावच आहे. हे ग्रंथ प्रसिद्ध करताना प्रकाशकांनी ज्ञानमार्गी सल्लागार जवळ केले. अशा पुस्तकांचे प्रकाशन हे विशिष्ट प्रकारे झाले तरच ते शोभून दिसते. मुद्रकांनी व प्रकाशकांनी याबाबत गेल्या चारशे वर्षांत अनेक प्रयोग केले. त्यापैकी कोणाची वैशिष्ट्ये काय होती याचा तपशील या इतिहासात आहे. पुस्तकासाठी टाइप तयार करून घेणे, मुद्रणाबाबत नवे प्रयोग करणे असे अनेक उपक्रम या मुद्रणालयाच्या मुद्रकांनी केले आहेत.

आजकाल अनेक देशांतील अनेक विद्यापीठे मुद्रणालय व प्रकाशन व्यवसाय करतात. पण याचा प्रारंभ केंब्रिज व ऑक्सफर्डने केला. खाजगी प्रकाशकांना कादंबऱ्या, रहस्यकथा, तात्कालिक राजकीय वा सामाजिक विषयावरील वादग्रस्त पुस्तके प्रसिद्ध करता येतात आणि ही एक फायद्याची बाब असते. विद्यापीठाच्या प्रकाशकांना या क्षेत्रात उतरता येत नाही. पण त्यांच्याकडून ज्या प्रकारचे ग्रंथ प्रकाशित होतात ते नफा मिळवून देणारे नसतात. तरीही या इतिहासावरून हे दिसून येईल, की केंब्रिज विद्यापीठाने या खर्चाची तरतूद केली आहे. खाजगी प्रकाशन संस्थांनी विद्वत्ताप्रचुर ग्रंथांचे प्रकाशन अगदीच कमी केल्याने वा थांबविल्याने ऑक्सफर्ड व केंब्रिज या विद्यापीठांच्या प्रकाशन विभागावर मोठी जबाबदारी पडली. यात वैशिष्ट्य स्थापन होऊन तज्ज्ञता प्राप्त झाल्याने जर्मनी, इटली इत्यादी देशांतील संशोधक, वैज्ञानिक हे इंग्लंडमधील या दोन विद्यापीठांकडे प्रकाशनासाठी वळतात. काही असे विषय आहेत, की त्यावरील ग्रंथांचा ग्राहक जगभर थोडाच असतो. पण त्याही वर्गाची मागणी या विद्यापीठांच्या प्रकाशनांनी भागते.

केंब्रिज विद्यापीठाने ऑक्सफर्डप्रमाणेच संशोधनात्मक, विद्वत्ताप्रचुर ग्रंथांचे प्रकाशन करण्याचेच धोरण जाणीवपूर्वक अवलंबिल्यामुळे विविध क्षेत्रांतील संशोधनास मोठी चालना मिळाली. तसेच विद्यापीठाने काही क्षेत्रातील संशोधनास चालना दिली. लॉर्ड ॲक्टन यांच्या संपादकत्वाखाली जगाचा इतिहास तयार करण्याचे ठरले. त्यांनी यानिमित्ताने इतिहास म्हणजे काय यावर दिलेली व्याख्याने अभिजात वाङ्मयातच समाविष्ट होतील. ॲक्टन आजारी झाल्यावर दोन वर्षांत ए. डब्ल्यू. वॉर्ड हे मुख्य संपादक म्हणून नेमले गेले. १९०२ मध्ये जगाच्या इतिहासाचा पहिला खंड प्रसिद्ध झाला आणि १२ सालपर्यंत बारा खंड निघाले होते. केंब्रिजचा जागतिक इतिहास हा प्रमाणभूत ग्रंथराज मानला जातो.

याच विद्यापीठाने चीनचा सोळा खंडात्मक इतिहास प्रसिद्ध केला आहे. इंग्रजी वाङ्मयाचा इतिहास हाही सर्वमान्य आहे. अर्थशास्त्र, पदार्थविज्ञान, रसायन, जीवशास्त्र यापासून इलेक्ट्रिसिटीपर्यंत अनेक विषयांतील संशोधनात्मक ग्रंथ प्रसिद्ध करून ज्ञानाची ज्योत तेवत ठेविली. केंब्रिज विद्यापीठात अनेकविध विषयांची अभ्यासमंडळे आहेत. त्यांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे जे संशोधन झाले ते ग्रंथरूपाने पुढे आले. भारताच्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासावर अत्यंत मौलिक ग्रंथ केंब्रिज मुद्रणालयाने प्रसिद्ध केले आहेत. भारताचा आर्थिक इतिहास हा दोन खंडांतील इतिहास लक्षणीय असून त्यातील पहिला खंड विशेष मोलाचा आहे.

विद्यापीठाच्या विधिसंस्थेचे मुद्रणालयावर नियंत्रण असले तरी कोणते व कोणाचे ग्रंथ घ्यावे याबद्दल तिचा हस्तक्षेप नाही. ज्ञानाच्या क्षेत्रात अशी ढवळाढवळ चालू शकत नाही

आणि तसे करण्याचे कोणाच्या मनातही नाही. त्यामुळे प्रकाशकांना भरपूर स्वातंत्र्य आहे. संशोधनात्मक, विद्वत्ताप्रचुर ग्रंथांऐवजी दुसरीच काही पुस्तके मुद्रणालय प्रसिद्ध करीत नाही ना एवढाच कटाक्ष ठेवला जातो. या रीतीने संस्था उभ्या होतात व वाढतात. ज्या समाजात लोकांनी चालविलेल्या संस्था स्वतंत्रपणे चालतात व त्यांचा पाया पक्का असतो त्या समाजात खऱ्या अर्थाने लोकशाही व स्वातंत्र्य टिकते आणि वाढते. केंब्रिज विद्यापीठाच्या प्रकाशन विभागाचा व मुद्रणालयाचा याही दृष्टीने विचार केल्यास त्याचे महत्त्व लक्षात येईल.

६-७-१९८५



डिकन्स व प्रकाशक

चार्ल्स डिकन्स हा अनेक दृष्टीने लोकशाहीचा लेखक मानला पाहिजे. तो अत्यंत दारिद्र्यातून वर आला; त्याने सर्वसामान्य लोकांचे जीवन त्यांच्याशी समरस होऊन रंगविले; त्याच्या पुस्तकांचा वाचकवर्ग फार मोठा होता आणि यात नवशिक्षित होते. अशा या अनेक अर्थाने लोकशाहीचा लेखक बनलेल्या डिकन्ससंबंधी अनेक प्रकारे आजवर लिहिले गेले आहे; पण त्याचे व त्याच्या प्रकाशकांचे संबंध कसे होते यावर एक संपूर्ण पुस्तक फार तपशीलात जाऊन लिहिले गेले नव्हते. या विषयाची चर्चा लेखात वगैरे आली होती. आता मात्र रॉबर्ट पॅटन यांनी अत्यंत तपशीलवार याची चर्चा केली आहे. यासाठी त्यांनी डिकन्स व इतर संबंधितांचा पत्रव्यवहार पाहिलाच, पण त्याचबरोबर प्रकाशकांबरोबर झालेले करारमदार यांचीही त्यांनी तपासणी केली. अनेक करारपत्रे त्यांनी आपल्या पुस्तकाच्या अखेरीस उद्धृत केली आहेत.

डिकन्सने वार्ताहर म्हणून आयुष्याला सुरुवात केली. पार्ल्मेंटमधील भाषणांचे विस्तृत वृत्तांत तो देत असे. त्यावर त्याला फार थोडे पैसे मिळत आणि हलाखीत राहावे लागे. या काळापासूनच त्याला भ्रमंती करण्याची सवय होती. लंडन शहरावर त्याचे प्रेम होते आणि त्याचे जीवन तो फार जवळून न्याहाळत होता. त्याच्या भ्रमंतीचे एक फलित म्हणजे त्याने लिहिलेल्या व्यक्तिरेखा. ब्रॉझ या टोपण नावाने त्याने त्या लिहिल्या व लगेच लोकप्रिय झाल्या. पण पिकविक पेपर्स या क्रमशः प्रसिद्ध झालेल्या कादंबरीने डिकन्स लेखक म्हणून प्रथम लोकप्रिय झाला आणि त्यानंतर त्याची लोकप्रियता वाढत गेली. पिकविक पेर्पसनी अमाप लोकप्रियता मिळवली; पण त्याचबरोबर या कादंबरीला नावे ठेवणारेही होते आणि आहेत. पिकविक पेपर्सनंतर निकोलस निकलबी ही कादंबरी अशीच क्रमशः प्रसिद्ध झाली व पुढे त्याच्या बहुतेक कादंबऱ्या ह्याच रीतीने प्रसिद्ध होत गेल्या.

पिकविक पेपर्समुळे डिकन्सला आपल्या लोकप्रियतेची कल्पना येऊ लागली. मग त्याने प्रकाशकाकडून प्रत्येक प्रकरणासाठी अधिक पैसे घेतले आणि पुस्तकरूपाने कादंबरी प्रसिद्ध करताना रॉयल्टीचा वेगळा करार केला. युरोपात त्या काळात लेखक पुस्तकाचे सर्व हक्क विकून ठोक रक्कम घेत. बाल्झॅकसारखा लेखक हा सदैव पैशाच्या अडचणीत असे व त्यामुळे तो याप्रकारे ठोक रक्कम घेई. पण डिकन्स व इतर ब्रिटिश मात्र प्रकाशकांकडून रॉयल्टीच्या रूपाने पैसे घेत. ट्रोलॉप यांच्यासारख्या लेखकाचे म्हणणे असे होते, की रॉयल्टीची व्यवस्था नसेल तर इंग्लंडच्या साहित्यावरच आघात होईल. अर्थात त्या

काळातही डिझरायलीसारखे काही लेखक ठोक रक्कम घेत. एका पुस्तकाचे दहा हजार पौंड त्याला मिळाले तेव्हा त्याला आनंद झाला.

डिकन्सच्या काळात शिक्षणाचा नव्याने प्रसार होऊ लागला होता. त्या वेळी टी. व्ही. वगैरे करमणुकीची साधने नव्हती आणि म्हणून कुटुंबात एकत्र वाचन हे करमणुकीचे साधन होते. लोकप्रिय लेखकांच्या कादंबऱ्यांना मागणी असली तरी एका वेळी किती प्रती छापून होणार यावर दोन निर्बंध होते. एक मर्यादित कागद उत्पादन आणि दुसरा छपाईची अडचण. १८०३ मध्ये कागद गिरण्यांनी कागद उत्पादनात थोडी सुधारणा केली व पुढे १८३७ नंतर आधिक सुधारणा झाली. छपाईतही सुधारणा झाली. १६ पानांच्या फॉर्मऐवजी ३२ पानांचा फॉर्म छापणे शक्य झाले. यामुळे डिकन्ससारख्यांच्या कादंबऱ्यांच्या काही हजारांनी व पुढे लाखांनी प्रती निघू लागल्या. डिकन्समुळे या सुधारणेला चालना मिळाली त्याचप्रमाणे त्याने लेखकांच्या रॉयल्टीबाबत कायदा करून घेतला. तथापि त्याला अमेरिका ही मोठी बाजारपेठ आहे याची कल्पना नव्हती. त्यामुळे त्याच्या कादंबऱ्या अमेरिकेत कशाही रीतीने प्रसिद्ध होत आणि त्याला कपर्दिकही मिळत नसे.

याचा त्याला फार राग होता. म्हणून अमेरिकेत त्याने पहिल्यांदा पाऊल ठेवले तेव्हा तेथील प्रकाशक व पुस्तक विक्रेते यांना बदमाश, लुटारू याप्रमाणे सपाटून शिव्या दिल्या.

डिकन्सची लोकप्रियता वाढत गेली त्या प्रमाणात प्रकाशकाकडून तो पैसेही अधिकाधिक घेऊ लागला. तो व त्याचे प्रकाशक यांनी कायद्याचा कीस काढून करारमदार केलेले दिसतात. डिकन्स केवळ रॉयल्टी घेऊन थांबत नव्हता, तर पुस्तक विक्रीच्या नफ्यातही त्याचा वाटा असे. पुस्तकविक्रीचा ताळेबंद तो वारंवार मागवी. जाहिरात कशी करावयाची हे ठरवी. पुस्तक चांगले खपत आहे असे पाहिले की पुढच्या आवृत्तीच्या वेळी तो अधिक रक्कम मागे व ती त्याला मिळे. यात प्रकाशकांशी भांडणे होत आणि त्यांचे पुन्हा जुळत असे. कारण डिकन्सचे पुस्तक हा प्रकाशकांनाही फायद्याचा धंदा होता. काही वेळा प्रकाशक डिकन्सशी वाईट वागले आहेत, तर डिकन्सही प्रकाशकांशी काही वेळा नीट वागलेला नाही. डिकन्स हा अतिशय खर्चिक होता. त्याचे कुटुंब मोठे होते आणि राहणी चैनीची होती. यामुळे भरपूर पैसे मिळूनही डिकन्स पैशाच्या अडचणीत असे. मग तो प्रकाशकाला अधिक कडक अटी घाली. आपण साहित्यनिर्मिती सुरू केली तेव्हा लेखकाची जी परिस्थिती होती त्यापेक्षा आपल्या मरणसमयी ती सुधारलेली दिसते असे तो म्हणे. डिकन्सने साहित्याला व्यापक आश्रय मिळवून दिला आणि लेखकांना

आर्थिकदृष्ट्या आधारही मिळवून दिला. अमेरिकेत त्याच्या २३ पुस्तकांच्या मिळून एका वर्षात दहा लाखावर प्रती विकल्या गेल्या यावरून डिकन्सची लोकप्रियता कळून येईल.

एवढ्या मोठ्या प्रमाणावर डिकन्सची पुस्तके खपत होती आणि त्या प्रमाणात त्याचे आर्थिक व्यवहारही वाढत होते. अनेक वेळा डिकन्स हा पैशाबाबत कठोर दिसतो, पण दिवंगत प्रकाशकाच्या विधवेला आपल्या पुस्तकाच्या विक्रीतून रक्कम देण्याची माणुसकीही त्याच्यापाशी होती.

डिकन्स व प्रकाशक हा ग्रंथ लेखक आणि प्रकाशक यांच्यातला नित्याचा सामना रंगवितो. या सामन्यात एकच जण सदैव योग्य रीतीने वागत होता असे म्हणता येणार नाही. पण हे वाद इतिहासजमा झाले. डिकन्सच्या साहित्याचा आनंद टिकून राहिला.

२२-१०-१९८०

हॅरॉल्ड मॅकमिलन

हॅरॉल्ड मॅकमिलन हे ब्रिटनचे एक लोकप्रिय पंतप्रधान होते. बऱ्याच प्रमाणात यशस्वी पंतप्रधान असेही त्यांना म्हणता येईल. एखादी व्यक्ती विशिष्ट खाते वा कोणतेही खाते चांगले चालवून तेवढ्यापुरती यशस्वी मंत्री म्हणून कीर्ती मिळविते. पण पंतप्रधानपद यशस्वीरीत्या तिला हाताळता येईलच असे नव्हे. युद्धनेतृत्वामुळे चर्चिल हे नामवंत पंतप्रधान झाले. पण ते एरव्ही यशस्वी ठरलेच असते असे नव्हे. आधुनिक ब्रिटनच्या इतिहासात लॉइड जॉर्ज यांच्यानंतर पंतप्रधानपदाचे अधिकार कौशल्याने व यशस्वी रीत्या वापरलेले म्हणजे हॅरॉल्ड मॅकमिलन. काहींपाशी हे कौशल्य आणि नेतृत्वाचे गुण उपजतच असतात. मॅकमिलन यांच्यापाशी ते होते.

वास्तविक ॲन्थनी ईडन यांना मंत्रिपदाचा दीर्घ अनुभव. चर्चिल यांचे दुय्यम म्हणून ते वावरले. पण ते पंतप्रधान होताच सुवेझ प्रकरण घडले. त्यासंबंधात त्यांची प्रतिक्रिया विवेकाच्या मर्यादा सोडून झाली व त्यांना अधिकार सोडावे लागले. एकतर चर्चिल यांनी अधिकारपद सोडून ईडन यांना गादीवर बसवण्यास वेळ लावला आणि दीर्घकाळ परराष्ट्रमंत्री म्हणून वावरलेल्या ईडन यांचा देशांतर्गत राजकारणावर असावा तसा प्रभाव व पगडा नव्हता. ते एक दुर्दैवी पंतप्रधान ठरले.

ईडन यांच्या अपयशाच्या पार्श्वभूमीवर मॅकमिलन यांची निवड झाली. सुवेझवरून झालेल्या पराभवामुळे हुजूर पक्ष खचला होता. पण मॅकमिलन यांनी दोन वर्षातच या पक्षाला त्याचा आत्मविश्वास पुन्हा मिळवून दिला आणि स्वत:च्या सरकारचा दबदबा त्यांनी वाढविला. यामुळे हुजूर पक्ष निवडून आला. मॅकमिलन यांची सहा-सात वर्षे या पक्षाच्या दृष्टीने व इंग्लंडच्या दृष्टीने उल्लेखनीय ठरली. या कारकीर्दीचा मार्मिक आढावा जॉर्ज हचिन्सन यांनी घेतला आहे. तो घेताना त्यांनी मॅकमिलन यांची सुरेख व्यक्तिरेखा रंगविली आहे. हचिन्सन हे पत्रकार व मॅकमिलन यांचे जवळचे स्नेही. हुजूर पक्षाचे ते प्रचारप्रमुख होते आणि 'स्पेक्टेटर'मधील त्यांचा स्तंभ लोकप्रिय होता. गेल्याच वर्षी ते वारले.

हॅरॉल्ड विल्सन यांच्यापुढे मॅकमिलन यांचा पंतप्रधान म्हणून आदर्श होता. पण मॅकमिलन यांच्या वागण्याबोलण्यातील व कारभारातील सहजता विल्सन यांना गाठता आली नाही. पहिल्या महायुद्धात मॅकमिलन जबर जखमी झाले होते. ते त्या स्थितीत

स्वदेशी वैद्यकीय उपचारार्थ आले तेव्हा त्यावेळच्या व्यापारी व उद्योगपतींचे वागणे-बोलणे त्यांना चीड आणीत असे. यातूनच त्यांच्या मनात सामान्य लोकांबद्दल कणव निर्माण झाली. २९-३० सालात जेव्हा अमेरिका व पाश्चात्य देशांत आर्थिक मंदी आली तेव्हा किन्स या अर्थशास्त्रज्ञाने सार्वजनिक कामे काढून बेकारी हटवून संपत्ती निर्माण करण्याचा पुरस्कार केला. अमेरिकेने याचा प्रत्यक्ष उपयोग केला. ब्रिटन याबाबतीत मागे राहिले. पण मॅकमिलन किन्सचे चाहते होते. यामुळे त्यांचे विचार हुजूरपक्षीय नेत्यांपेक्षा प्रगत होते. युद्धपूर्व काळात त्यांच्या व मजूर पक्षीयांच्या बैठकी होत. ॲटली यांनी टाइम्सच्या प्रतिनिधीला सांगितले होते, की युद्ध झाले नसते तर मॅकमिलन मजूर पक्षात आले असते व ते त्याचे पुढारीच झाले असते. मॅकमिलन यांच्याइतका प्रगत जहाल विचारांचा नेता मजूर पक्षातही नसल्याचे मत ॲटलींनी दिले होते.

पंतप्रधान झाल्यावर मॅकमिलन यांनी भांडवल गुंतवणुकीला चालना दिली आणि सरकारी हस्तक्षेपही केला. त्यांच्या कारकीर्दीत ब्रिटनची अर्थव्यवस्था सुधारली. याचा उपयोग सामाजिक सुरक्षिततेच्या योजना अमलात आणण्याच्या कामी मॅकमिलन यांनी केला. मजूर पक्षाच्या राजवटीत सुरू झालेल्या समाजकल्याणाच्या योजनांत त्यांनी भर घातली. ब्रिटनला इतके चांगले दिवस कधी आले नव्हते. पण त्यांनी वेळीच सरकारी हस्तक्षेपास मर्यादा घालावयास हवी होती आणि कारभारविषयक खर्च कमी करावयास हवा होता. तो त्यांनी कमी केला नाही. थॉर्निक्रॉफ्ट हे तेव्हा अर्थमंत्री होते. त्यांना मॅकमिलन यांचे धोरण अमान्य असल्याने त्यांनी राजीनामा दिला. काळाने थॉर्निक्रॉफ्ट बरोबर होते असा निर्णय दिल्याचे नमूद करण्यास हचिन्सन विसरत नाहीत.

मॅकमिलन यांनी आफ्रिकी देश ब्रिटिश साम्राज्यातून मुक्त करण्याचे धोरण अवलंबिले व त्याचे स्वागत झाले. रशिया व पाश्चात्य राष्ट्रे यांच्यातील तणाव कमी करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. पण मॅकमिलन रशियाच्या दौऱ्यावर असतानाच क्रुश्चॉव यांनी पाश्चात्य देश आणि त्यातही अमेरिका यांच्यावर झोड उठविली. परंतु सहकार्याचे धोरण अवलंबिले पाहिजे याची जाणीव रशियनांत निर्माण झाली.

युरोपीय सामायिक बाजारपेठेत ब्रिटनने सामील व्हावे असे मॅकमिलन यांचे मत होते व त्यादृष्टीने त्यांनी बरेच प्रयत्न केले.

कार्यक्षमता हे मॅकमिलन यांचे वैशिष्ट्य. त्यांच्यापुढील कामाचा ते फडशा पाडीत. रात्री कितीही उशिरा झोपले तरी पहाटे लवकर उठून फायलींचा ते निकाल लावीत आणि त्यांचे चिटणीस सकाळी येईतो त्यांच्या टेबलावर मॅकमिलन यांच्या निर्णयासह फायली जात. मॅकमिलन यांच्या मंत्रिमंडळात एकाच वेळी जेवढे कार्यक्षम, कर्तबगार मंत्री होते

तेवढे ते ब्रिटिश मंत्रिमंडळात क्वचितच दिसले. तथापि मंत्र्यांना दूर करण्यातही मॅकमिलन अगदी कठोर बनत. त्यांच्या कारकीर्दीच्या शेवटी याचा अतिरेक झाला. त्याचप्रमाणे कर्तबगार मंत्री नेमल्यामुळे त्यांना स्वातंत्र्यही मॅकमिलन यांनी दिले. या स्वातंत्र्याचाही अतिरेक होऊन प्रोफ्युमो-प्रकरण झाले.

हचिन्सन यांनी रेखाटलेली मॅकमिलन यांची व्यक्तिरेखा ही त्यांच्यासंबंधीची आत्मीयता वाढविणारी आहे. मॅकमिलन हे वाङ्मयाचे भोक्ते. त्यांची भाषणे व संभाषणे म्हणूनच आल्हाददायी ठरली व अजून ठरतात. दीडएक वर्षापूर्वी त्यांनी बजहट या 'इकॉनॉमिस्ट'च्या जवळ जवळ संस्थापकाचाच दर्जा असलेल्याबद्दल केलेले भाषण हे याचे ताजे उदाहरण. त्यांना पंतप्रधान म्हणून राणीकडून बोलावणे आले त्यावेळी ते जेन ऑस्टिनची कादंबरी वाचीत होते. अनेक विषयांवरील ग्रंथ ते वाचीत असतात आणि या आनंदास ते मंत्री व पंतप्रधान असताना वंचित झाले नव्हते व आजही झालेले नाहीत. हचिन्सन म्हणतात, त्यांच्या ग्रंथालयातील कोणते पुस्तक कोठे आहे व कोठे ठेवावयाचे हे त्यांना पुरेपूर माहीत असते. पंतप्रधान असताना त्यांनी एक पेटी केली होती. त्यांच्या कर्मचाऱ्यांपैकी कोणाला चांगली वाक्ये सुचली, वाचताना काही चांगले आले, काही आठवणी व कल्पना सुचल्या तर त्या कागदावर लिहून या पेटीत टाकल्या जात. मॅकमिलन सोयीप्रमाणे त्यांचा उपयोग करीत. आजकालच्या अर्थशास्त्रज्ञांबद्दल वा प्राध्यापक वर्गाबाबत त्यांची तक्रार आहे. ते म्हणतात की ही मंडळी एकारलेली आहेत. अर्थशास्त्र म्हणजे केवळ आकडे नव्हेत, तर ते माणसांचा विचार करणारे शास्त्र आहे. किन्स हा एकारलेला अर्थशास्त्रज्ञ नव्हता. मॅकमिलन हेही एकारलेले पंतप्रधान नव्हते. आज तर त्यांना ब्रिटनच्या समाजजीवनात अतिशय वैशिष्ट्यपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे.

६-६-१९८१

दूरचित्रवाणी व राजकारणी

आकाशवाणी व दूरदर्शन या प्रसार माध्यमांचा सत्ताधारी पक्षानेच उपयोग करण्याची प्रथा येथे कायद्याने रूढ आहे. आता काँग्रेस व विरोधी पक्षांनी या दोन्ही माध्यमांसाठी स्वायत्त महामंडळ स्थापन करण्याचे आश्वासन आपल्या जाहीरनाम्यात दिले आहे. ही मागणी जुनी आहे. जाहीरनाम्यांप्रमाणे वर्तन झालेच, तर राजकीय पक्षांना या दोन्ही माध्यमांकडून न्याय मिळेल, अशी अपेक्षा केली जाते. यासंबंधात बी. बी. सी. चे उदाहरण नेहमी देण्यात येते. बी. बी. सी. ने आपल्याला मिळालेले स्वातंत्र्य टिकविण्यासाठी केवढा झगडा केला व अजूनही तिला तो कसा करावा लागतो, याची ज्यांना माहिती आहे, ते केवळ स्वायत्त महामंडळ स्थापन झाले की सर्व अडचणी संपतील, असे मानणार नाहीत.

या संदर्भात श्री. मायकेल कॉक्रेल यांचे 'लाइव्ह फ्रॉम नंबर टेन' हे पुस्तक अभ्यासण्यासारखे आहे. ते बी. बी. सी च्या 'पॅनोरमा' या गाजलेल्या कार्यक्रमाचे तेरा वर्षे निर्माते होते आणि हॅरॉल्ड मॅकमिलन यांच्यापासून मार्गारिट थॅचर यांच्यापर्यंत अनेक पंतप्रधानांशी दूरचित्रवाणीसंबंधी चर्चा करण्याची त्यांना संधी मिळाली असून, 'नंबर टेन अँड टेलिव्हिजन' हा कार्यक्रमही त्यांनी निर्माण केला होता. त्यांनी दिलेली माहिती अनेक दृष्टीने उद्‌बोधक आहे.

इंग्लंडमध्ये दूरचित्रवाणीस सुरुवात होऊन साठ वर्षे होत आहेत. तीस सालात प्रथम रॅम्से मॅक्डोनल्ड हे पंतप्रधान असताना अगदीच प्रायोगिक तत्त्वावर दूरचित्रवाणीस आरंभ झाला. ब्रिटिश पंतप्रधानांच्या १० डाऊनिंग रस्त्यावरील निवासस्थानात मॅक्डोनल्ड यांनी एक संच बसविला आणि ज्यास क्लोज सर्किट टी. व्ही. म्हणतात, तशी प्रक्षेपणाची व्यवस्था करण्यात आली. मॅक्डोनल्ड यांना या नव्या माध्यमास फार मोठे भवितव्य आहे, हे पटले होते. यामुळे काळाच्या पुढे पाहणारे पंतप्रधान असे त्यांच्या बाबतीत म्हणता येईल. तथापि दूरचित्रवाणीचा प्रसार होण्यापूर्वीच युद्ध आले आणि तिच्यावर गदा आली. पंतप्रधान नेव्हिल चेंबर्लेन यांनी बंदी घालताना असे कारण दिले की, दूरचित्रवाणीच्या प्रकाशामुळे शत्रूच्या विमानांना लक्ष्य सापडेल. मग ग्रेटा गार्बो व मिकी माऊस असा एक कार्यक्रम करून ब्रिटिश दूरचित्रवाणीने अर्धविराम घेतला.

युद्धकाळात ब्रिटिश राजकारण्यांनी नभोवाणीचा भरपूर उपयोग केला आणि चर्चिल हे तर नभोवाणीवर प्रभावी ठरले. पुढे १९४६ साली दूरचित्रवाणीचे पुनरुज्जीवन करताना, तिचा राजकारणाशी संबंध राहता कामा नये, याबद्दल पंतप्रधान ॲटली, विरोधी नेते

चर्चिल आणि बी. बी. सी. चे संचालक हेली या तिघांचे एकमत झाले. राजकीय विषयांची चर्चा दूरचित्रवाणीवरून करून, पार्लमेंटमधील चर्चेमधील हवा काढून घेणे ॲटली व चर्चिल यांना बिलकूल मान्य नव्हते. तेव्हा एक नियम करण्यात आला होता. त्याप्रमाणे पार्लमेंटमध्ये चर्चेस येणाऱ्या विषयांवर बाहेर पंधरा दिवस अगोदर चर्चा होऊ देण्यात येत नसे. दूरचित्रवाणीवर राजकीय विषय यावयाचे की नाही, हा वाद निघाला तेव्हा हा नियम पुढे करण्यात आला. निवडणुकीसंबंधीही हे माध्यम या दोन्ही नेत्यांनीच नव्हे, तर लिबरल पक्षाच्या नेत्यानेही वर्ज्य ठरविले. यामुळे १९५० सालच्या निवडणुकीच्या वेळी, दूरचित्रवाणीवर प्रचार मोहिमेचा काहीच भाग दिसला नाही. या निवडणुकीत मजूर पक्षास केवळ सहाचे बहुमत मिळाले आणि वर्षभरात पुन्हा निवडणूक झाली. त्यावेळी तिन्ही पक्षांनी आपला कार्यक्रम विषद करणारी भाषणे करावी, असे ठरले. दूरचित्रवाणीवर अशा रीतीने पक्षीय पातळीवर प्रथमच राजकारण आले. यात हुजूर पक्षाचे ॲन्थनी ईडन यांचे भाषण चांगले झाले.

चर्चिल यांचा विरोध काही प्रमाणात कमी होण्यास राज्यारोहण समारंभ कारणीभूत ठरला. दूरचित्रवाणीवरून त्याचे प्रक्षेपण करण्यास त्यांचा विरोध होता. मंत्रिमंडळाने तसा ठराव केला. पण चर्चिल जेव्हा राणीस भेटावयास गेले व हा प्रक्षेपणाचा विषय निघाला, तेव्हा राणी एलिझाबेथ यांनी प्रक्षेपण व्हावे, अशी इच्छा प्रगट केली. हे जाहीर झाल्यावर शेकडो संच खपले. प्रक्षेपणाचे प्रचंड स्वागत झाले.

मग चर्चिल यांनीही दूरचित्रवाणीवर कसे बोलावयाचे, याविषयी काही वस्तुपाठ घेतले. त्यांचे एक भाषण तेव्हा ध्वनिफितीवर घेण्यात आले. ते बी. बी. सी. कडे आहे. तीस वर्षे हे गुप्त ठेवण्यात आले. या सुमारास चर्चिल अमेरिकेस गेले, तेव्हा ते व त्यांचे कुटुंबीय यांचे चित्रण अमेरिकन दूरचित्रवाणीने बोटीवर केले. ते त्यांना फार आवडले होते. काही वर्षांनी चर्चिल यांचा ८० वा वाढदिवस कॉमन्सने साजरा केला, तेव्हा व हुजूर पक्षाच्या अधिवेशनास ते हजर होते, तेव्हा प्रक्षेपण करण्यात आले व त्याने चर्चिल खूष झाले होते. पण त्यांनी नभोवाणीप्रमाणे या माध्यमावर प्रेम केले नाही. तीच स्थिती ॲटली यांची. त्यांच्या मुलाखती साफ पडल्या; कारण या माध्यमाविषयी त्यांना नावड होती आणि ते उत्तरे एकेका वाक्यात देत असल्याने मुलाखत पार कोसळली.

दूरचित्रवाणीसंबंधी हुजूर, मजूर व लिबरल पक्षांच्या नेत्यांना अप्रीती असली, तरी त्यांचे पक्ष मात्र या नव्या माध्यमाचा कसा वापर करावा, याचा अभ्यास करू लागले होते. ईडन पंतप्रधान झाले आणि त्यांना हे माध्यम चांगल्यापैकी हाताळता येऊ लागल्याने पक्षाचा दृष्टिकोण बदलू लागला. ईडन हे देखणे होते आणि त्यांची बोलण्याची पद्धती या माध्यमास अनुकूल होती. पण ते आत्मसंतुष्ट राहिले नाहीत. त्यांनी दूरचित्रवाणीवर कसे

बोलावे, मुलाखत द्यावयाची असल्यास चेहरा कसा ठेवावा, येथपासून तेव्हाच्या काही तज्ज्ञांशी विचारविनिमय केला. चष्मा लावून बोलण्यास त्यांचा विरोध असे. टेलिप्रॉम्पटरचा उपयोग करणारे ईडन हे पहिले पंतप्रधान. चष्मा लावून बोलण्यास तसे पाहिले, तर मॅकमिलन यांचाही विरोध असे. ईडन पंतप्रधान असतानाच सुवेझचे प्रकरण पेटले आणि पार्लमेंटमध्ये चर्चेस येणाऱ्या विषयाची १५ दिवस अगोदर चर्चा दूरचित्रवाणीवर होऊ नये, हा दंडक कोसळून पडला. आपला पराभव होण्यास दूरचित्रवाणी कारणीभूत झाली, असा ईडन यांनी नंतर चुकीचा ग्रह करून घेतला.

या सुमारास दोन्ही प्रमुख पक्षांचा दूरचित्रवाणीसंबंधीचा दृष्टिकोण बदलत चालला होता. यामुळे हुजूर पक्षातर्फे प्रोफ्युमो व मजूर पक्षातर्फे वेजवूड बेन यांनी, अमेरिकेत राजकीय पक्ष आपल्या मोहिमांसाठी दूरचित्रवाणीचा कसा उपयोग करतात, याचा अभ्यास केला. तसेच या दोन्ही पक्षांनी आपल्या कचेरीत एक स्वतंत्र विभाग काढला. त्यात दूरचित्रवाणीचे माध्यम हाताळण्याचे तंत्र ज्यांना चांगले माहीत आहे, अशांची नेमणूक केली. त्यांच्याकडून महत्त्वाचे पुढारी धडे घेत आणि ते गिरवीत. प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम असो वा मुलाखतीचा, त्याची पूर्वतयारी करण्यात येऊ लागली. हे ईडन यांच्यापासून मार्गारेट थॅचर यांच्यापर्यंत प्रत्येक पंतप्रधानाने केले व त्यांच्या प्रमुख सहकाऱ्यांनीही केले.

काही कार्यक्रम तर हे पक्ष वा त्यांचे तज्ज्ञ सुचवीत आणि ते कार्यक्रम बी. बी. सी. वा आय. टी. व्ही. यांच्या सहकार्यने त्यात आवश्यक ते बदल करून सादर होत. प्रत्येक गोष्ट शास्त्रशुद्ध पद्धतीने करण्याचा पाश्चात्यांचा जो गुण आहे तो यात दिसतो. एखाद्या नाटकात ज्याप्रमाणे प्रसंगांची गुंफण होते, तशी करून दूरचित्रवाणीवर नेते आले आहेत. निवृत्त होण्यापूर्वी चर्चिल आजारी होते आणि बरे झाल्यावर हुजूर पक्षाच्या अधिवेशनास हजर राहिले. ते भाषणाला उभे राहताना त्यांना त्यांच्या दोन जावयांनी हातास धरून ध्वनिक्षेपकापाशी नेले. मग भाषणाला आरंभ करण्यापूर्वी त्यांना पाणी देण्यात आले. पेला उंचावून चर्चिल यांनी श्रोत्यांना विचारले, 'मी हे पिईन असे तुम्हाला वाटले काय?' पुढे हे स्पष्ट झाले की, हे सर्व अगोदर ठरवूनच करण्यात आले होते. लाखो प्रेक्षकांनी हे दृश्य जेव्हा दूरचित्रवाणीवरून पाहिले, तेव्हा त्यांच्या मनात सहानुभूती दाटून आली.

मॅकमिलन म्हणत की, आपले आता वय झाले. त्यावेळी दूरचित्रवाणी आली. तिचे तंत्र शिकणे म्हणजे म्हाताऱ्या कुत्र्याला नव्या युक्त्या शिकविण्यासारखे आहे. पण मॅकमिलन यांचा हा विनय होता. ते हे तंत्र आत्मसात करणारे पहिले पंतप्रधान म्हणून ओळखले जातात. ते अगदी सहजपणे बोलत आणि राजकीय उपयोगासाठी या साधनाचा कसा व केव्हा वापर करावा हे त्यांना चांगले माहीत होते. त्यांनी रशिया, अमेरिका व राष्ट्रकुलातील देश यांचे जे दौरे केले, त्यांचे चित्रण झाले होते. त्याचे प्रक्षेपण झाल्यावर

मॅकमिलन यांची लोकप्रियता एकदम वाढली. अमेरिकेचे तेव्हाचे अध्यक्ष आयसेनहॉवर लंडनला आले असताना, त्यांना डाऊनिंग रस्त्यावरील पंतप्रधानांच्या निवासस्थानी आमंत्रण देण्यात आले. मग मॅकमिलन व आयसेनहॉवर यांची मुलाखत दूरचित्रवाणीवरून प्रक्षेपित करण्यात आली. तिला प्रचंड प्रतिसाद मिळाला.

याच काळात वार्ताहर परिषद हा कार्यक्रम प्रक्षेपित होऊ लागला. त्यातही मॅकमिलन यांचे कौशल्य दिसून आले. जर्मनीत राजकीय विडंबन करणारे कार्यक्रम होत. त्या धर्तीवर बी. बी. सी. ने 'दॅट वॉज द वीक दॅट वॉज' हा एक विडंबनात्मक कार्यक्रम सुरू केला. त्यात राजकीय व सार्वजनिक व्यक्तीचे विडंबन असे. एकदा या कार्यक्रमात मॅकमिलन यांचे विडंबन झाले. तेव्हा हा कार्यक्रम आपण बंद करू, असे त्यांच्या सचिवाने सांगितल्याचे कळताच, मॅकमिलन यांनी चिठ्ठी पाठविली, 'नाही. कार्यक्रम बंद होता कामा नये.'

मॅकमिलन यांच्यानंतर ॲलेक ह्यूम हे पंतप्रधान झाले. त्यांचा चेहरा, बोलण्याची पद्धती हे काहीच दूरचित्रवाणीला अनुकूल नव्हते. त्यांना हे माध्यम आवडत नसे आणि आपले काम बरोबर होत नाही, असे पाहून त्यांना या माध्यमाचा तिरस्कारच वाटत होता. याच्या उलट त्यांचे मजूर पक्षीय प्रतिस्पर्धी हॅरॉल्ड विल्सन. त्यांच्यापुढे आदर्श होता केनेडींचा. अमेरिकेत केनेडी व इंग्लंडमध्ये आपण नव्या पिढीचे प्रतिनिधी आहोत, अशी प्रतिमा ते तयार करीत होते. विरोधी नेता असताना ते अमेरिकेत केनेडी यांच्या अंत्ययात्रेला हजर राहिले. दूरचित्रवाणी व वृत्तपत्रे हा विल्सन यांचा नाजूक कोपरा होता. त्यांनी दूरचित्रवाणीचे तंत्र आत्मसात केले. प्रथम ते आपला मुद्दा ठासून मांडताना हाताची मूठ दाखवीत. प्रेक्षकांवर याचा चांगला परिणाम होणार नाही, हे पाहून त्यांच्या सल्लागारांनी त्यांना पाइप हातात घेण्यास सांगितले. मुलाखतीच्या वेळी कठीण प्रश्नाला उत्तर देण्यास अवधी मिळावा, म्हणून ते पाइपचा झुरका मारीत.

विल्सन निवडणूक प्रचार मोहिमेत दूरचित्रवाणीवर किती प्रभावी ठरत होते व त्यांच्या तुलनेत ॲलेक ह्यूम कसे कमी पडत, हे मला १९६३ साली इंग्लंडमधील निवडणुकीच्या वेळीच पाहावयास मिळाले होते. त्यामुळे कॉक्रेल यांचे विवेचन अगदी बरोबर आहे. विल्सन यांच्या कारकीर्दीचे पहिले दीड वर्ष दूरचित्रवाणी व ते यांच्यातील चांगल्या संबंधांचे होते. पुढे त्यांच्या सरकारपुढे अनेक कठीण समस्या उभ्या झाल्या. आर्थिक परिस्थिती ढासळली.

बी. बी. सी. ने सरकारची बाजू समर्थपणे मांडण्यास हातभार लावावा, अशी विल्सन यांची अपेक्षा. ती व्हावी तितकी पुरी होईना. तेव्हा ते गरम झाले. त्यांनी दोन उपाय

योजिले. बी. बी. सी. च्या फीमध्ये वाढीव खर्चामुळे वाढ करणे आवश्यक होते. त्यास त्यांनी परवानगी नाकारली. दुसरा उपाय म्हणजे अध्यक्षाची नेमणूक. लॉर्ड हिल यांची ते आपल्याला अनुकूल होतील, अशा अपेक्षेने त्यांनी नेमणूक केली. पुढे त्यांच्याशीही विल्सन यांचे मतभेद झाले. बी. बी. सी. त हुजूर पक्षास अनुकूल असलेल्यांचा भरणा आहे, असा त्यांचा ग्रह झाला होता. तो अधिक दृढ करण्याचे काम त्यांच्या सल्लागारांनी केले. मग बी. बी. सी. पेक्षा आय. टी. व्ही. ला ते जवळ करू लागले. तिला मुलाखती मिळत. चार-चार महिने ते बी. बी. सी. ला दादच देत नसत. अध्यक्ष व मुलाखत घेणारे रॉबिन डे यांच्यासारख्यांशी विल्सन यांचे जेवढे खटके उडाले, तेवढे कोणाही पंतप्रधानाचे उडाले नाहीत.

जे शस्त्रांनी जगतात, ते शस्त्रांनी मरतात. त्याप्रमाणे प्रसिद्धी माध्यमांवरच जे भिस्त ठेवतात, त्यांची या माध्यमांमुळेच हानी होते. विल्सन यांचे हे झाले. प्रतिपक्षाच्या अधिवेशनाच्या अगोदर महत्त्वाची मुलाखत देणे, वाद उपस्थित करणे असले तंत्रही त्यांनी अवलंबिले व त्याचा तात्पुरता परिणामही झाला. निवडणुकीच्या अगोदर आपल्या कुटुंबियांसह सुटीचा काळ घालवीत असताना, दूरचित्रवाणीस चित्रण करण्यास त्यांनी मुभा दिली. सरकारी निवासस्थानातही चित्रण झाले. या सर्वामागे राजकीय हेतू होता.

विल्सन यांच्यानंतर कॅलॅहान हे पंतप्रधान झाले. तेही हे दूरचित्रवाणीचे तंत्र कौशल्याने वापरीत. त्यांची बोलण्याची पद्धती अनुकूल होती. तरीही त्यांनी धडे घेतले व आपला प्रभाव या माध्यमाच्या द्वारे अधिक पडावा, अशी खटपट केली. त्यांचेही विल्सन यांच्याप्रमाणे बी. बी. सी. शी किती खटके उडाले, याची नोंद या पुस्तकात आहे. त्यांनीही या महामंडळास वेसण घालण्याचे उपाय योजिले. मजूर पक्षाचा पराभव होऊन हुजूर पक्षाचे राज्य आले व एडवर्ड हीथ हे पंतप्रधान झाले. त्यांना दूरचित्रवाणीचे तंत्र अवगत होते. पण विल्सन यांच्याप्रमाणे त्यांनी यावर भर दिला नाही. त्यांचेही खटके उडाले आहेत.

मार्गारेट थॅचर यांनी 'सॅची अँड सॅची' या गाजलेल्या जाहिरात कंपनीलाच हाताशी धरले. आपण स्वत: व आपला पक्ष यांचा प्रभाव वाढविण्याचे अनेक उपाय या दूरचित्रवाणीच्या द्वारे थॅचर यांनी योजिले. त्यांचे राजकीय बळ वाढले, त्याप्रमाणात त्या दूरचित्रवाणीवर मुलाखत देताना आक्रमक पवित्रा घेऊ लागल्या. रॉबिन डे यांना सर ही पदवी मिळाली असताना, त्यांना 'सर रॉबिन' असे न संबोधिता, नुसतेच 'मिस्टर डे' असे त्या म्हणत. पुढे त्यांनी हे बदलले. प्रश्न पुरा होण्याच्यापूर्वीच उत्तर देऊन, त्या अनेकदा प्रश्न अर्धवट ठेवतात. यावर रॉबिन डे यांनी केलेला विनोद नमूद करण्यासारखा आहे. ते म्हणाले की, मी एकदा थॅचर यांना मुलाखत सुरू होताच विचारणार की, माझ्या पहिल्या

प्रश्नाचे उत्तर काय? विल्सन यांना बी. बी. सी. त उजव्या प्रवृत्तीचे हुजूर पक्षीय भरले असल्याचा संशय होता, तर थॅचर यांना वाटते, या संघटनेत डाव्या प्रवृत्तीचे लोक भरले आहेत. त्यांनी बी. बी. सी. चे नियंत्रण करणारे अनेक उपाय योजिले आहेत.

अशा रीतीने दूरचित्रवाणी हे एक प्रभावी माध्यम असून, ते हाताळणे कौशल्याचे आहे. आपल्याकडे ते सरकारी मालकीचे असल्याने राजकीय वाद वगैरे होत नाहीत. पण आज ना उद्या असे वाद होऊ लागतील. त्यासाठी आजच्याप्रमाणे गलथानपणे बोलून चालणार नाही. आज अनेकजण आपल्यापुढील लिहून ठेवलेला मजकूरही धड वाचीत नाहीत. अनेक निर्मात्यांना निर्माते का म्हणावयाचे, असा प्रश्न पडतो. सरकारी नोकरीत सेवाजेष्ठता आहे, म्हणून दूरचित्रवाणी या माध्यमाचा काही अभ्यास नसताना व करण्याची बुद्धीही नसताना, काही जणांना निमति, वृत्तसंपादक नेमण्यात येते. पण ज्या वेळी स्पर्धा येईल, तेव्हा सर्वांनाच ब्रिटिश राजकारणी व्यक्तींप्रमाणे या माध्यमाच्या तंत्राचा अभ्यास करावा लागेल. इतके जरी असले व महामंडळाची स्थापना झाली, तरी सरकार नियंत्रण ठेविण्याचे प्रयत्न करणारच. हा झगडा कसा व का होतो व त्यावेळी दूरचित्रवाणीच्या चालकांनी कसे वागावयास हवे, याची कल्पना कॉक्रेल यांनी करून दिली आहे.

१८-११-१९८९

संपादकाचे अनुभव

हॅरॉल्ड एव्हन्स हे संडे टाइम्स व नंतर लंडन टाइम्सचे संपादक. त्यांच्या कारकीर्दीत त्यांनी वादळे उठविली आणि अखेरीस ते वादळात सापडले व त्यांना संपादकपद सोडावे लागले. हॅरॉल्ड एव्हन्स हे धाडसी, कर्तबगार संपादक म्हणून नावाजले गेले. संडे टाइम्सची मालकी रॉय थॉमसन यांच्याकडे गेली आणि एव्हन्स हे तरुण संपादक नेमले गेले. त्यांना संपादकप्रमुख या नात्याने डेनिस हॅमिल्टन यांचा पूर्ण पाठिंबा होता. रॉय थॉमसन संपादकीय धोरणात व लिखाणात हस्तक्षेप करीत नसत. आपल्या पत्रांचा खप वाढतो की नाही आणि आर्थिकदृष्ट्या ती फायदेशीर ठरतात की नाही एवढीच त्यांची काळजी असे. एव्हन्स यांच्या कारकीर्दीत संडे टाइम्सचा खप वाढत गेला; आर्थिकदृष्ट्या त्याची भरभराट झाली; पाने वाढली व त्यामुळे नवी-नवी सदरे सुरू झाली. खपाप्रमाणेच संडे टाइम्सचा दबदबा, प्रतिष्ठा यांच्यातही वाढ झाली.

एव्हन्स यांनी हे जे यश मिळविले ते अनेक नव्या कल्पना व धाडसी उपक्रम हाती घेऊन. ते स्वत: वृत्तपत्राचे मुद्रण, त्याची सजावट याचे तज्ज्ञ आहेत. त्यांनी आपल्या कल्पना यासाठी राबविल्या. पण त्यांनी काही घटनांच्या मागील कारणपरंपरेचा शोध घेऊन रहस्यभेद केला. यामुळे पत्राची लोकप्रियता वाढत गेली.

रिचर्ड क्रॉसमन हे विल्सन यांच्या मंत्रिमंडळातील मंत्री. त्यांनी आपल्या मंत्रिपदाच्या वेळची रोजनिशी ठेविली होती. मंत्रिमंडळातील चर्चा, खाजगी बोलणी इत्यादी त्यांनी नोंदून ठेवले होते. क्रॉसमन हे स्वत: लेखक होते. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांची ही रोजनिशी एव्हन्स यांनी प्रसिद्ध केली. मंत्रिमंडळाची गुपिते बाहेर काढली जातील म्हणून सरकारने निर्बंध घातला. त्यास एव्हन्स यांनी आव्हान दिले. या रोजनिशीने सरकारी गुपिते फुटणार नाहीत असा त्यांचा दावा होता. त्याप्रमाणे त्यांनी लेखमाला प्रसिद्ध केली.

पॅरिसजवळ डी.सी.१० हे विमान कोसळून प्रवासी व कर्मचारी मिळून ३४६ जण ठार झाले. अपघातस्थळापासून जवळच संडे टाइम्सच्या वार्ताहरांना विमानाच्या दरवाजाचा भाग सापडला. त्यावरून तपासणीसाठी फ्रान्स, अमेरिका व इंग्लंडमध्ये या पत्राच्या वार्ताहरांचा गट सतत राबत होता. ब्रूस पेज या वार्ताहराने तर विमानबांधणीची शास्त्रीय माहितीही आत्मसात केली. अमेरिकन घटनेप्रमाणे वृत्तपत्रांपासून माहिती दडविता येत नाही. यामुळे डी.सी.१० विमान बनविणाऱ्या कंपनीकडील कागदपत्रांचे पेटारेच्या पेटारे तपासता आले. त्यातून असे दिसून आले की तुर्की विमान कंपनीने केलेल्या घाईमुळे

विमानात सामान ठेवण्याच्या भागाचा दरवाजा बरोबर तयार झाला नव्हता. विशिष्ट उंचीवर विमान गेले की हवेच्या दाबाने तो तुटणार होता. तसा इशारा तपासनीसांनी दिला, पण कंपनीने तो जुमानला नाही. यातूनच अपघात झाला. हे सर्व संडे टाइम्सने बाहेर आणले. म्हणून अपघातातील मृतांच्या नातेवाइकांना बरीच नुकसानभरपाई मिळाली.

इंग्लंडमध्ये अल्कोहोल तयार करणाऱ्या काही कंपन्यांनी एकत्र येऊन औषधनिर्मिती सुरू केली होती. याचाच एक भाग म्हणून त्यांनी झोपेच्या गोळ्या तयार केल्या. त्या ज्या गर्भवती स्त्रियांनी घेतल्या त्यांची मुले अपंग निपजली. कोणाला हात नाही, तर कोणाचे पाय गेलेले. याची ओरड झाली. कारखानदारांनी गोळ्या बाजारातून काढून घेतल्या व थोडीफार नुकसानभरपाई दिली. ज्यांच्या सर्व आयुष्याचा निकाल लागला त्यांच्या दृष्टीने ही रक्कम क्षुल्लक होती. तेव्हा या दुर्दैवी लोकांची बाजू घेऊन हे प्रकरण धसास लावण्याचा निर्णय एव्हन्स यांनी घेतला. कंपन्यांनी कोर्टाचा आश्रय घेऊन काहीही प्रसिद्ध करण्यास बंदी आणली. याविरुद्ध निरनिराळी कोर्टे करीत उमराव सभेपर्यंत दाद मागण्यात आली. सर्वत्र संडे टाइम्सला नकार मिळाला. यात हजारो पौंड खर्च झाले. अल्कोहोल कारखानदारांनी जाहिरात बंद केल्याने तिकडून नुकसान झाले. अखेरीस संडे टाइम्सच्या कायदेसल्लागाराने मानवतेच्या दृष्टीने या अपंगांना न्याय मिळावा असा लेख लिहिला. तो कोर्टाचा मनाईहुकूम मोडणारा नव्हता. परंतु एवढ्यावर न थांबता युरोपियन मानवी हक्क आयोगाकडे संडे टाइम्सने दाद मागितली. तीत यश आले व या पत्राकडे असलेली माहिती प्रसिद्ध करण्यास परवानगी मिळाली. हा लढा दहा वर्षे चालला होता. पण ज्या दिवशी 'संडे टाइम्स'ला विजय मिळाला व लेखमाला प्रसिद्ध करण्याचे ठरले त्या दिवशी कामगारांनी काम मंदपणे करण्याचे ठरविले. पंधरा लाख प्रतींऐवजी दहा लाख प्रती छापल्या गेल्या. ही लेखमाला प्रसिद्ध करण्याच्या मार्गातील अडथळे दूर झाल्याने वृत्तपत्राला यश मिळाले आहे तेव्हा मंदगतीने काम करू नका असे एव्हन्स यांनी कामगारांना विनविले. पण कोणी ऐकले नाही. संघटित कामगारांना सामाजिक जबाबदारीची जाणीव राहिलेली नाही. याची उदाहरणे येथेही वृत्तपत्रांच्या व इतर क्षेत्रांत दिसतात. इंग्लंडमध्ये याचा कळस झाला आहे.

ब्रिटिश हेरखात्यात व इतर महत्त्वाच्या खात्यांत काम करणारांची एक मोठी टोळीच रशियाच्या हस्तकाचे काम करीत आली आहे. अद्याप ही प्रकरणे बाहेर येत आहेत. वीस वर्षांपूर्वी फिल्बी याचे प्रकरण गाजले. त्याचा प्रदीर्घ तपास करून 'संडे टाइम्स'ने यावर प्रकाश टाकला.

अशा रीतीने 'संडे टाइम्स' एकेक विक्रम करीत असल्याने त्याचा प्रसार व दबदबा वाढला. तथापि संडे टाइम्स ज्या थॉमसन कंपनीच्या मालकीचा होता तिच्याच

मालकीखाली 'लंडन टाइम्स'ही होता. त्याचा तोटा सतत वाढत होता. खप कमी व खर्चाचा बोजा अशी त्याची स्थिती. त्यातच थॉमसन कंपनीच्या कामगारांनी संप केला. आधुनिक पद्धतीची यंत्रसामग्री आणून कर्मचाऱ्यांची संख्या कमी केल्याखेरीज ब्रिटिश वृत्तपत्रांचे भागणार नाही. जगभर आधुनिक यंत्रसामग्री आली आहे. पण ब्रिटिश कामगार संघटना अत्यंत आडमुठ्या व परंपरावादी आहेत. संडे टाइम्स व टाइम्स यांच्याकरिता आधुनिक सगणकयंत्राचा उपयोग करण्यास विरोध झाला आणि अकरा महिने ही पत्रे बंद राहिली. यामुळे लाखो पौंडांनी नुकसान झाले. या काळात दोन्ही पत्रांच्या पत्रकारांना पगार मिळत होता. पण वृत्तपत्र सुरू झाल्यावर त्यांनी संप केला. तेव्हा थॉमसन यांनी पत्रे विकण्याचा निर्णय घेतला.

एव्हन्स यांनी हा सारा इतिहास कथन केला आहे. त्याचप्रमाणे सध्याचे मालक मरडॉक हे येऊ नयेत याकरिता त्यांनी व इतरांनी काय प्रयत्न केले याचा तपशील दिला आहे. मरडॉक हे थॉमसन यांच्याप्रमाणे संपादकांना स्वातंत्र्य देणारे नाहीत हे सर्वांना ठाऊक होते. म्हणून त्यांना विरोध झाला. परंतु पर्यायी व्यवस्था करण्यात एव्हन्स यांना अपयश आले आणि मरडॉक हे मालक झाले.

नव्या राजवटीत एव्हन्स यांना संडे टाइम्सऐवजी टाइम्सचे संपादक करण्यात आले. दैनिकाचे संपादन करण्याची त्यांचीही इच्छा होती. एव्हन्स यांनी त्यांच्या स्वभावाप्रमाणे टाइम्समध्ये सजावटीपासून बदल केले. नवी सदरे आली. अर्थात खर्च वाढला. पण टाइम्सच्या खपातही वाढ होऊ लागली. असे असले तरी एव्हन्स व मरडॉक यांचे जमणारे नव्हते. खर्चात कपात करण्यावर मरडॉक यांचा भर असला तरी संपादकीय धोरणाबाबतही ते हस्तक्षेप करू लागले. एव्हन्स बधत नाही असे पाहून त्यांची अडवणूक सुरू झाली. वर्षभरात किती मयदिपर्यंत खर्च करावयाचा ते निश्चित करा व तेवढ्या मयदित मी राहतो असे एव्हन्स यांनी सांगितले. पण हे मान्य झाले नाही. अपमान वाटावा असे वर्तन होऊ लागले व अखेरीस राजीनामा मागण्यात आला. आपल्याला बडतर्फ करावे, राजीनामा देणार नाही असा जबाब एव्हन्स यांनी दिला. पण अखेरीस त्यांनी राजीनामा दिला. हे सर्व विस्ताराने एव्हन्स यांनी सांगितले आहे. मरडॉक यांच्या छायेखालील टाइम्स आर्थिकदृष्ट्या सुधारला आहे, पण त्याची पूर्वीची शान नाही हे दीर्घकाळ टाइम्स वाचणारांच्या लक्षात आलेच आहे.

एका यशस्वी, कर्तबगार व स्वतंत्र बाण्याच्या संपादकाचे हे अनुभव आधुनिक जगातील पत्रव्यवसायातील समस्यांची चांगली कल्पना देणारे आहे.

२५-११-१९८४

आस्वादक समीक्षा

श्री. व्ही. एस. प्रिचेट हे कथाकार म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी काही निवडक इंग्रजी कथांचे संग्रह संपादित केले आहेत. ऐंशीच्या पुढे गेलेले प्रिचेट हे जसे सर्जनशील लेखक आहेत त्याचप्रमाणे ते समीक्षक व प्रवासवर्णने लिहिणारे लेखक आहेत. स्पेनवरील त्यांचे पुस्तक गाजले आणि लंडनवरील त्यांचे पुस्तक हे एखाद्या शहराबद्दल किती सुंदरपणे लिहिता येते याचा नमुना आहे. या प्रिचेट यांनी टाइम्स लिटररी सप्लिमेंट, न्यू स्टेटस्मन, न्यूयॉर्क रिव्ह्यू ऑफ बुक्स अशा नियतकालिकांत आजवर शेकडो समीक्षालेख लिहिले. अद्यापही त्यांचे लेख प्रसिद्ध होत असतात. प्रिचेट यांच्या समीक्षालेखांचा एक लेखसंग्रह 'मॅन ऑफ लेटर्स' या नावाने आला आहे.

प्रिचेट व व्हर्जिनिया वूल्फ हे एका वर्गात बसतील. दोघेही कथा-कादंबरीकार आणि समीक्षक. त्यांची समीक्षा आस्वादात्मक आहे आणि कलाकृती कशी जन्माला येते, याचा त्यांना अनुभव असल्यामुळे एखाद्या कलाकृतीसंबंधी लिहिताना ते निर्मितीप्रक्रियेचीही जाणीव ठेवतात.

या संग्रहात हेन्री फिल्डींग आहे, तसा डोस्टोव्हस्कीही आहे. हेन्री जेम्स, बाल्झॅक, डिकन्स, प्राऊस्ट यांचीही हजेरी लागली आहे. हे वृत्तपत्रांतील समीक्षालेख असल्याने ते विस्तृत नाहीत. जागेच्या आटोपशीरपणाचा आपल्याला त्रास झाला नाही. उलट वृत्तपत्रांत व त्यातही युद्धकालीन वृत्तपत्रांत हजार-दीड हजार शब्दांची मर्यादा पाळावी लागत होती आणि त्यानंतर ती अंगवळणी पडली, असे प्रिचेट म्हणतात. विशिष्ट शब्दमर्यादा पाळून समीक्षा करताना संबंधित लेखक व लेखिकांच्या कृतींचा गाभाच वाचकांपुढे मांडावा लागतो. यामुळे नेमकेपणा लेखात येतो. प्रिचेट यांच्या समीक्षालेखांचा हा गुण आहे. या नेमकेपणाच्या बरोबरीने ते साहित्यविषयक काही मते व्यक्त करतात, ती विचारार्ह ठरतात. सॅम्युअल रिचर्डसन हा जुन्या काळचा कादंबरीकार. प्रिचेट म्हणतात, की एखादा लेखक शब्दवेल्हाळ असेल तर लिखाणाची गती मंद वाटते, असे नव्हे. गतीचा मंदपणा हा तो लेख जास्तीत जास्त विश्लेषण करू लागला, पिंजू लागला की येतो.

वॉल्टर स्कॉट, फिल्डींग, जेन ऑस्टिन हे जीवनास सामोरे जाऊन ते स्वीकारणारे प्रौढ वा प्रगल्भ लेखक आहेत व ते तसे का आहेत याचे मार्मिक विवेचन प्रिचेट करतात. स्कॉटच्या कथानकाचा शेवट काय होणार हे आपण ओळखू शकू; पण या अखेरीस तो

ज्या मार्गाने जातो ते आपणास ओळखता येत नाही आणि या मार्गावर वा साधनांवर स्कॉटचे प्रभुत्व आहे.

बायरन व लुईस कॅरॉल हे जबर पत्रलेखक. कॅरॉलची ९८ हजार पत्रे उपलब्ध आहेत. या दोघांच्या पत्रांचे वैशिष्ट्य व त्यातून व्यक्त होणारे व्यक्तित्व याची प्रिचेटकृत मीमांसा लक्षणीय ठरेल. बायरनच्या शैलीत द्वंद्व करण्याची वृत्ती आहे. बोलघेवड्या माणसासारखा तो वाटतो आणि ज्याच्याशी पत्रव्यवहार होत असतो त्याच्याकडे तो एका अर्थाने मिष्किलपणे पाहात आहे, असे वाटते. लुईस कॅरॉल हा गणिती. त्याचा तर्कशास्त्राचा अभ्यास होता आणि फोटोग्राफीचा त्याला अतोनात नाद होता. कॅरॉलचा बाप हा धर्मगुरू होता आणि तोही कल्पनाविलासात दंग होई. कॅरॉल स्वत: चारचौघांत मिसळावे, प्रसिद्धीच्या झोतात राहावे या वृत्तीचा नव्हता. तो स्वत:च्याच कोशात राहात असे व कल्पनाविलासात दंग असे. ॲलिस इन वंडरलँडचा जन्म या वृत्तीत झाला असावा.

पुष्किनचे काव्य व कथादी साहित्य याची प्रिचेट यांनी सुंदर उकल केली आहे. यासाठी त्यांनी क्वीन ऑफ स्पेड या कथेचे मर्म समजावून सांगितले. ही कथा ही परीकथा नव्हे, ती खरी आहे. पुष्किन हा एक चित्रकार आहे. तो लहान सहान तपशीलही चित्रात भरतो. ही चित्रे स्थिर आहेत असे वाटते, पण त्याचबरोबर त्यांना गती आहे असेही वाटते. रशियन कादंबरीकार सत्याकडे इतक्या तीव्रतेने पाहतात की काही वेळाने ते सत्य हे सत्यच नसून ते एक अनाकलनीय वा अज्ञात आहे असे वाटते.

व्हर्जिनिया वुल्फच्या कथा-कादंबऱ्यांबद्दल लिहिताना प्रिचेट म्हणतात की, हिंसा ही व्हर्जिनियाच्या स्वभावातच दिसते; पण ती जेव्हा पत्र लिहिते तेव्हा विनोद, हास्य हे गुण प्रगट होतात. व्हर्जिनिया वूल्फच्या रोजनिशांचे खंड हे क्विन्टिन बेल यांच्याप्रमाणेच प्रिचेट यांनाही एक श्रेष्ठ कलाकृती वाटतात.

बाल्झॅकच्या कादंबऱ्यांतील नाट्यमयतेवर प्रिचेट बोट ठेवतात. ते म्हणतात, बाल्झॅकच्या काळात नाटकाची जागा कादंबरीने घेतली होती; पण कादंबऱ्यांतच नाट्य होते. बाल्झॅकच्या कादंबऱ्यांत ते पदोपदी दिसते. मार्क ट्वेनची हकलबरी फिन ही कादंबरी जगाच्या वाङ्मयातील एक हास्यकारक, विनोदी कादंबरी गणली जाते. पण ती वाचत असताना आपले मनोविनोदन झाले आहे, गंमत वाटली आहे असे होत नाही. तर आपण हेलावले जातो. ही केवळ सहानुभूतीची भावना आहे काय? प्रिचेट यांना तसे वाटत नाही. स्मृतिविलास हा अमेरिकन वाङ्मयाचा विशेष होता आणि ही भावना हकलबरी फिन व्यक्त करते असे ते सांगतात.

कामूबद्दल प्रिचेट म्हणतात की त्याची नाटके निर्जीव आहेत. तत्त्वज्ञ म्हणून तो सामान्य असून राजकीय क्षेत्रातही तो मोठा विचारवंत नाही; पण तो उत्तम कादंबरीकार

आहे. शिवाय स्वत:बद्दल दंतकथा तयार करण्याची कला त्यास अवगत आहे. डिकन्सच्या ऑलिव्हर ट्विस्टच्या निमित्ताने प्रिचेट म्हणतात की त्याची धार्मिकता ही वरवरची आहे. सर्वसामान्य लोकांच्या भावनांना डिकन्स आवाहन करतो आणि तसे ते करण्याचे त्याने ठरविलेले असते. गुणाचा व सत्याचा विजय होणार अशी भावना तो निर्माण करतो; पण गुणाचे चित्रण करणे असंख्य कादंबरीकारांना वाटते तितके सोपे नसते.

असे हे अनेक लेख. प्रिचेट यांनी ज्यांच्याबद्दल लिहिले त्यांच्या गुणवैशिष्ट्यांची आपल्याला ओळख होते आणि साहित्याचा आस्वाद कसा घ्यावा याचा एक नमुना आपण पाहिला याचा आनंद मिळतो.

१७-५-१९८६

गाल्ब्रेथ यांचा लेखसंग्रह

प्रा. केनेथ गाल्ब्रेथ यांचे पुस्तक शैलीमुळे आकर्षक व विचारांना खाद्य पुरविणारे असते. त्यांना अनेक विषयांना रस आहे. शिवाय केवळ विद्यापीठाच्या क्षेत्रातच न वावरता त्यांनी अमेरिकन सरकारात काही अधिकारपदावर कामे केली व भारतात ते अमेरिकेचे राजदूत होते. या अनुभवात त्यांच्या प्रवासाची भर पडलेली आहे.

गेल्या पन्नास वर्षांत त्यांनी अनेक पुस्तके लिहिली व त्यातली बरीचशी गाजली. याखेरीज विविध व्यक्ती, ग्रंथ, संस्था यासंबंधी त्यांनी विपुल लिखाण केले. त्यातील काही 'ए व्ह्यू फ्रॉम द स्टॅन्डस' या पुस्तकात समाविष्ट झाले आहे. आवश्यक तेथे त्यांनी लेखाची पार्श्वभूमी दिली आहे आणि तळटिपाही आहेत. यामुळे या पुस्तकास ताजेपणाही आलेला दिसेल.

गाल्ब्रेथ हे अणुयुद्धाबाबत सचिंत असले तर नवल नाही. अनेक लेखांतून त्यांनी ही चिंता व्यक्त केली. नोकरशाही ही गोंधळ घालण्यात पटाईत असल्याने गोंधळामुळेच अणुबॉम्ब वापरला जाईल, असेही ते म्हणतात. अर्थात अमेरिका व पाश्चात्य राष्ट्रे यांनी एकतर्फी अणुसंन्यास घ्यावा, अशी त्यांची भूमिका नाही. रशियाबरोबरच वाटाघाटी करून हा प्रश्न सोडवावा, असे ते आग्रहपूर्वक प्रतिपादन करतात. सध्या यासंबंधात काहीसे आशावादी वातावरण आहे.

रेगन यांच्या आर्थिक व अन्य धोरणांचे गाल्ब्रेथ त्यांच्या पद्धतीने वाभाडे काढतात. गरीब, दुर्बल घटकांविषयी कसलीही अनुकंपा न बाळगता रेगन धोरणे आखतात, याबद्दल त्यांना विषाद वाटतो. युद्धोत्तर काळात जगभरच्या उत्पादनात लक्षणीय वाढ झाली आणि संपत्तीत फार मोठी भर पडली असे असले तरी सधन देशांतही गरीब आहेत. गाल्ब्रेथ यांचे म्हणणे असे आहे की आर्थिक व्यवहारात जे सामील आहेत त्यांची स्थिती निश्चितच सुधारली. ज्या प्रमाणात हा व्यवहार वाढला त्याप्रमाणात अधिक लोक या व्यवहारात सामील होऊ लागले हे खरे. तरीही सधन देशांत एक अल्पसंख्य गट या व्यवहाराच्या बाहेर आहे आणि त्याची हलाखी आहे. अविकसित देशांत बहुसंख्य लोक हलाखीत आहेत. या लोकांचे काय करावयाचे, याविषयी गाल्ब्रेथ वारंवार पृच्छा करतात.

कोणत्याही क्षेत्रात नोकरशाही तयार झाली की ती गोंधळ घालू लागते व कार्यक्षमतेत ती कमी पडते. नोकरशाही हा गाल्ब्रेथ यांच्या चेष्टेचा विषय आहे. याच संदर्भात त्यांनी

सी. आय. ए. वर टीका केली आहे की, गुप्तहेर संघटना खास गुपिते बाहेर आणतात ही चुकीची कल्पना आहे. जी काही माहितीं बाहेर येते ती त्या त्या राष्ट्रांच्या सरकारांना गोपनीय ठेवावयाची नसते. यातूनही जी अधिक माहिती मिळत असेल ती जमविण्याकरिता होणारा खर्च, मेहनत हे सर्वच हिशेबापलीकडे असते.

या पुस्तकातील निरनिराळ्या राजकीय व्यक्ती व लेखक यांच्यासंबंधीचा विभाग विशेष वाचनीय आहे. बार्बारा वॉर्ड, डेव्हिड निव्हेन, चेस्टर बौल्स यांच्यासंबंधी गाल्ब्रेथ यांनी अगदी जिव्हाळ्याने लिहिले आहे. लेखकांत ट्रोलाप, हेमिंग्वे इत्यादी आहेत. श्लेशिंगर व केनान यांच्या बौद्धिक सामर्थ्याचे यात केलेले मूल्यमापन उल्लेखनीय वाटेल. केनेडी, मिसेस इलिनॉर रुझवेल्ट यांची व्यक्तिचित्रेही ठसठशीत आहेत. श्रीमती रुझवेल्ट या मनस्वी होत्या आणि त्यांची मते ठाम होती. गाल्ब्रेथ यांनी हे फार चांगल्याप्रकारे दाखविले आहे.

गाल्ब्रेथ हे जन्माने कॅनेडियन, पण अमेरिकेचे नागरिक. त्यांना इंग्लंड व इंग्लिश संस्कृती याबद्दल जिव्हाळा आहे. रुझवेल्ट व चर्चिल यांच्या पत्रव्यवहाराच्या खंडांचे परीक्षण करतानाही तो व्यक्त होतो. ते म्हणतात की, चर्चिल यांची भाषाशैली प्रभावी व जिवंत होती. त्यांच्या पत्रांवर शैलीचे संस्कार आहेत. याउलट रुझवेल्ट यांची पत्रे रोखठोक, व्याकरणदृष्ट्या अचूक पण निर्जीव.

गाल्ब्रेथ हे केनेडींप्रमाणे लिंडन जॉन्सन यांच्याही जवळ होते. जॉन्सन यांनीच समाजसुधारणेचे अनेक कायदे केले, हे त्यांनी दाखवून दिले आहे. जॉन्सन यांच्या व्हिएतनाम युद्धाविषयीच्या भूमिकेबद्दल मात्र ते नाराज होते.

ॲव्हरिल हॅरिमान हे राजनीतीत निपुण होते. रशियात अमेरिकेचे वकील म्हणून त्यांनी मोलाची कामगिरी केली. काही वेळा खास दूत म्हणून ते वावरले. गाल्ब्रेथ म्हणतात की, अमेरिकेत परराष्ट्रमंत्रीपदावर चुकीच्या व्यक्तीस नेमण्याची प्रथा असल्यामुळे हॅरिमान हे कधीच या पदावर नेमले गेले नाहीत. वास्तविक ते या पदास लायक होते आणि ते त्यांना मिळाले असते तर परराष्ट्र राजकाराणास वेगळे वळण लागले असते.

डलस व निक्सन यांना गाल्ब्रेथ यांच्या लेखणीचे फटके बसावे हे अपेक्षितच होते. ॲलन व जॉन फोस्टर हे डलसबंधू म्हणजे एक महासंकट होते, असे गाल्ब्रेथ म्हणतात. परमेश्वराच्या कृपेनेच त्यांच्यापासून अमेरिकेची सुटका झाली असेही लिहिण्यास ते कमी करीत नाहीत.

निक्सनसंबंधी गाल्ब्रेथ म्हणतात, 'आपण सद्गुणी आहोत अशी निक्सन यांची समजूत होती. पण त्यांना अतिशयोक्तीचे आकर्षण होते. अमेरिकेच्या सार्वजनिक जीवनात काही

सज्जन होते, तर काही इरसाल चोर होऊन गेले. निक्सन या दोन्हीमधील असतील. पण त्यांना या दोन्हीमधील फरक कळत नसे.

अणुयुद्ध, आर्थिक सिद्धान्त, परराष्ट्र राजकारण इत्यादी गंभीर विषयांवर लिहिणाऱ्या गाल्ब्रेथ यांच्यात खट्याळपणाही आहे. या संदर्भात हॉर्वर्ड विद्यापीठाच्या डीनबरोबर झालेला त्यांचा पत्रव्यवहार पाहण्यासारखा आहे. विद्यापीठाच्या मंडळाने असा ठराव केला की, प्राध्यापक व अधिकारीवर्ग यांनी विद्यार्थिनींचे प्रणयाराधन करू नये. शिक्षक व विद्यार्थिनी वा अधिकारी व विद्यार्थिनी असेच संबंध राहावेत. ते न राहिल्याने अवघड परिस्थिती निर्माण होते. गाल्ब्रेथ यांनी यावर डीनला कळविले की मंडळाचा ठराव वाचला. तो चांगला आहे. पण आपल्यापुढे पेचप्रसंग उभा राहिला आहे. कारण ४५ वर्षांपूर्वी हॉर्वर्डमध्येच आपण प्राध्यापक असताना एका विद्यार्थिनीच्या प्रेमात पडलो व पुढे तिच्याशी लग्न केले. हे वैवाहिक जीवन सुखाने व सुरळीत चालू आहे. पण परिपत्रकाप्रमाणे वागावायाचे झाले तर ४५ वर्षांपूर्वी झालेल्या प्रेमसंबंधांचे काय करावयाचे? डीनने कळविले की, 'तुम्हाला या परिपत्रकामुळे प्रश्न पडला हे समजू शकते. तथापि इतक्या वर्षांच्या सुखी व सुरळीत वैवाहिक जीवनाबद्दल अभिनंदन. यासाठी एखादे अध्यासन तयार करावे काय?'

१-५-१९८७

आधुनिक जगाचा इतिहास

पॉल जॉन्सन हे एक विद्वान आहेत. काही काळ ते न्यू स्टेटस्मन या साप्ताहिकाचे संपादक होते. पण त्यांचा समाजवादावद्दलंच भ्रमनिरास झाला. जॉन्सन यांचे ए हिस्टरी ऑफ द मॉडर्न वर्ल्ड हे पुस्तक वादळी आहे. कारण बऱ्याच लोकांच्या पूर्वग्रहांना त्यांनी जोरदार धक्का दिला आहे. त्यांनी हा जो आधुनिक जगाचा इतिहास लिहिला आहे त्याचा कालखंड १९१७ ते १९८० असा आहे. कालानुक्रमाने सर्व जगातल्या घडामोडींचा परामर्श घेणे हा या ग्रंथाचा हेतू नाही. या काळात कोणत्या प्रवृत्ती निर्माण झाल्या, वाढल्या व अस्ताला गेल्या वा विकृत बनल्या यांचा हा धावता आढावा आहे. लेखकाची तात्त्विक बैठक पक्की असून अनेक विषयांत त्यास रस आहे. प्रत्येक प्रकरणातील माहिती व उपस्थित केलेले मुद्दे यांचा विचार केल्यास जॉन्सन यांच्या ज्ञानाच्या कक्षा किती व्यापक आहेत याची कल्पना येते. यास जोमदार व ओघवत्या भाषेची जोड मिळाली आहे. कै. शेजवलकरांचे जॉन्सन हे भाऊ शोभावेत.

पहिल्या महायुद्धाच्या अखेरीस एकीकडे रशियात क्रांती होऊन बोल्शेव्हिकांची सत्ता प्रस्थापित झाली आणि एका साचेबंद व आक्रमक विचारसरणीचा प्रभाव वाढला. दुसरीकडे आइन्स्टाइनच्या सापेक्षतावादामुळे तसेच फ्रॉइडच्या सिद्धान्तामुळे वैचारिक व व्यक्तिगत जीवनात अस्थिरता निर्माण झाली.

रशियन क्रांतीचे जॉन्सन यांना कौतुक नाही. स्टालिनने केलेल्या सर्व दुष्कृत्यांचा उगम लेनिनच्या धोरणात व वर्तनात कसा होता हे त्यांनी दाखवून दिले आहे. तसेच ट्रॉटस्कीने स्टालिनवर मात केली असती तरी स्टालिनप्रमाणे त्यानेही लाखो लोक मारले असते असे दाखवून दिले आहे. कामगारांकडे नेतृत्व देण्याऐवजी कामगारांचे नेतृत्व लेनिनने कम्युनिस्ट पक्षाला दिले. कारण कामगार हे क्रांतिकारकच असतात यावर त्याचा काडीमात्र विश्वास नव्हता. कम्युनिस्ट पक्ष कामगारांचे नेतृत्व करणारा असला तरी हा पक्ष केवळ आपल्याच विचारानुसार चालेल असा त्याचा आग्रह होता. यास विरोध करणारांना त्याने खतम केले. दहशतीशिवाय राज्य शक्य नाही हा त्याचा सिद्धान्त होता आणि म्हणून जॉन्सन यांनी असे दाखवून दिले आहे की, झारशाहीपेक्षा अधिक क्रूर अशी राजवट लेनिनने आणली आणि स्टालिनने हे पराकोटीला नेले. झारच्या काळात पंधरा हजार गुप्त पोलिस होते तर लेनिनच्या वेळी ही संख्या अडीच लाख झाली. झारच्या वेळी सर्व प्रकारच्या गुन्ह्यांसाठी वर्षाला साधारणत: सतरा फाशी दिले जात. पण क्रांतीनंतर १९१८ ते १९१९ या दरम्यान केवळ राजकीय गुन्ह्यासाठी महिन्याला एक हजार याप्रमाणे फासावर लटकाविले गेले. १९२० पर्यंत पन्नास हजारांना फासावर चढविले गेले होते.

दहशतवाद, एकछत्री राजवट, सर्वाधिकारशाही यांची उदाहरणे इटली व जर्मनीत दिसली. मुसोलिनी व हिटलर यांनी फासिस्ट राजवट आणली. दोघांनीही राष्ट्रीय समाजवादाचा पुरस्कार केला होता. जर्मनीत पार्लमेंटला काही महत्त्व राहिले नव्हते. राजकीय वाद हे रस्त्यावरच सोडविण्याचे तंत्र अवलंबिण्यात आले. जर्मनीत उदारमतवादाविरुद्ध जी प्रवृत्ती वाढली होती तिला धनिक, धर्मगुरू, शासनकर्ते इत्यादींनी खतपाणी घातले होते. जॉन्सन म्हणतात, लेनिन व स्टालिनप्रमाणे हिटलर हा समाज आपल्या मनाप्रमाणे घडविता येतो असे मानणारा होता. काँक्रीट ज्याप्रमाणे तयार करता येते तसा समाजही तयार करता येतो या विचाराने तिघांनाही पछाडले होते आणि त्यापायी त्यांनी अमानुष राजवटी आणल्या. पण या तिघांच्याही राजवटीचा अमानुषपणा प्रारंभीच फार थोड्यांनी जाणला. अनेक रथीमहारथी मात्र खूष होते.

जपानमध्ये औद्योगीकरणास वेग देण्याचे धोरण या काळात स्वीकारले गेले; पण त्याचबरोबर आक्रमक राष्ट्रवादाचा स्वीकार केला गेला. शिंतो धर्माची जोड ही आक्रमकतेला पूरक होती. वृत्तपत्रांवर बंधने होती. राजकीय जीवन मुक्त नव्हते. साहजिकच जपानमध्ये राजकीय पक्ष हे माफियाप्रमाणे बनले. भ्रष्टाचार हा त्यांचा स्थायीभाव झाला. अद्याप राजकीय पक्षांचे हे स्वरूप आहे. राजकीय कारणास्तव खून झाले तरी त्यास कडक शिक्षा जपानमध्ये नव्हती.

अमेरिकेत वेगळी समाजरचना उभी झाली. आजपर्यंत अनेकांनी रुझवेल्ट यांच्या नव्या आर्थिक धोरणाची प्रशंसा केली असून त्यामुळे अमेरिकेची आर्थिक परिस्थिती कशी आश्चर्यकारक रीतीने सुधारली हे दाखवून दिले आहे. जॉन्सन यांचा मतभेद आहे. ते अध्यक्ष कुलीज यांना अधिक महत्त्व देतात. हार्डिंग व कुलीज या दोन अध्यक्षांच्या कारकीर्दीत अमेरिका अधिक संपन्न होती. रुझवेल्ट यांच्या आर्थिक कार्यक्रमानंतरही ३७ साली बेकारीचे प्रमाण १४.३ टक्के होते तर ३८ साली ते १९ टक्क्यांवर गेले. राजकीय दृष्ट्या मात्र रुझवेल्ट यशस्वी होते. गर्भश्रीमंत घराण्यात जन्मलेल्या रुझवेल्टना श्रीमंतांपेक्षा मध्यमवर्गीय, गरीब यांचा पाठिंबा मिळत होता. वृत्तपत्रांचे मालक विरुद्ध तर पत्रकार बाजूचे अशी परिस्थिती होती.

दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया व आफ्रिकेतील अनेक देश स्वतंत्र झाले. साम्राज्य टिकविणे साम्राज्यसत्तांना कठीण होते व ते फायद्याचेही नव्हते. पण स्वातंत्र्यानंतर या देशांची वाटचाल कशी झाली? नेहरू, सुकार्नो, नासेर व टिटो हे बांडुंग परिषदेचे शिल्पकार. यापैकी टिटो सोडून बाकीच्या तिघांचा विचार जॉन्सन यांनी एकत्रपणे केला आहे. तिघेही नवजात राष्ट्रवादाचे प्रतीक. पण तिघांनाही आर्थिक प्रश्नांच्या तपशीलात जाण्याची ओढ नव्हती. यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले. यातही सुकार्नो हे अतिशय भंपक आणि नैतिकदृष्ट्या अधःपतित. या तीन नेत्यांच्या कारकीर्दीचे विश्लेषण जॉन्सन यांनी अतिशय कठोरपणे केले आहे. आपल्याकडे प्रशंसा किंवा गुळमुळीत

लिहिण्यावाचण्याची सवय असल्याने हे विवेचन काहींना प्रक्षुब्ध करील. पण टीकाही ऐकण्याची व सहन करण्याची सवय हवी.

आफ्रिकी देश स्वतंत्र झाले त्यानंतर तेथे किती अनन्वित अत्याचार नव्या राजकर्त्यांनी केले व अद्याप करीत असतात याची जॉन्सन यांनी दिलेली हकीगत वाचण्यासारखी आहे. या राज्यकर्त्यांनी परकीयांना नव्हे तर स्वकीयांनाच अमानुषपणे वागविले. त्याच्या कहाण्या अंगावर शहारे आणणाऱ्या आहेत. न्येरेरे यांचे आपल्याकडे बरेच कौतुक होते. त्यांचा इतिहास काय आहे? ६४ साली ते म्हणाले की, तान्झानियाचे सैन्य बंड करणार नाही. पण त्याने ते केले. ब्रिटिश फौजांच्या साहाय्याने त्यांनी काळ्या सैन्याच्या बंडाचा बीमोड केला. मग न्येरेरे यांनी स्वत:च्या पक्षाच्या लोकांची रिक्रूटभरती केली आणि अशा रीतीने पक्षीय सैन्य उभे केले. युगांडामधील राज्यकर्ती जमात ही शिकलेली. हाती सत्ता आल्यानंतर तेथे बराच संहार झाला. युगांडातील जमाती आपल्या शत्रूचे रक्त पितात आणि लिव्हर खातात! युगांडात अमीनने कहर केला. पण बाकीचे आफ्रिकी राज्यकर्ते कमी नाहीत. आफ्रिकी देश स्वतंत्र झाल्यावर वीस वर्षांत यादवी वा दोन राष्ट्रांतील अशी तीस युद्धे झाली. ७० साली युनोच्या माहितीप्रमाणे या आफ्रिकी देशांत दहा लाख लोक निर्वासित बनले होते. ७८ साली ही संख्या ४५ लाखांवर होती. याखेरीज २० लाख लोकांना धड ठिकाण नव्हते.

माओच्या चीनमधील अत्याचार, सांस्कृतिक क्रांतीमुळे झालेली उलथापालथ यावर इतर ग्रंथांतून प्रकाश पडलेला आहे व जॉन्सन यांनी या माहितीला दुजोरा मिळेल असे एक प्रकरण लिहिले आहे.

आपल्या या विचारप्रक्षोभक ग्रंथाचा शेवट करताना पॉल जॉन्सन यांनी काढलेला निष्कर्ष सर्वमान्य होण्यास हरकत नाही. ते म्हणतात, ज्या निरनिराळ्या सिद्धान्तांचा, विचार-संप्रदायांचा एक काळ आग्रह धरला गेला ते सर्व फोल ठरले. भांडवलशाही असो वा साम्यवाद. दोन्ही अयशस्वी ठरलेच; पण राष्ट्रवादही फोल ठरला. केवळ विज्ञानाने आपल्याबाबतच्या अपेक्षा पुऱ्या करून नवे यश प्राप्त करून घेतले. सर्व प्रकारच्या समुदायवादी वा सामुदायिक तत्त्वज्ञानाच्या अपयशांमुळे राज्यसंस्था ही लोकहितकारी होऊ शकत नाही व झाली तरी तिच्या मोठ्या मर्यादा आहेत हे स्पष्ट झाले. विज्ञानाच्या क्षेत्रात मात्र नवे प्रयोग होत आहेत. नवी क्षितिजे दिसू लागली आहेत. यामुळे पुन्हा माणूस, व्यक्ती हीच प्रधान बनली असून तिचा अभ्यास हा आवश्यक झाला आहे. मानवजातीचा खरा अभ्यास करावयाचा तर मानवाचा अभ्यास हवा हे पोप कवीचे वचन जॉन्सन यांना विचारात घ्यावेसे वाटते आणि तसे ते घेणे योग्यही आहे.

२५-५-१९८५

जपानची घोडदौड

युद्धोत्तर कालात जपानने केलेली प्रगती हा सर्वांच्या आश्चर्याचा विषय असून अनेक तज्ज्ञांनी तो संशोधनाचाही बनविला आहे. श्री. ॲलन यांनी लिहिलेल्या आधुनिक जपानच्या संक्षिप्त आर्थिक इतिहासाची ही तिसरी आवृत्ती आहे. यावरून या पुस्तकाची व विषयाची लोकप्रियता स्पष्ट होते. ॲलन यांनी केवळ युद्धोत्तर जपानचा विचार केलेला नाही. युद्धपूर्व जपानचाही केला आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जपानच्या आर्थिक विकासाला प्रारंभ झाला. त्यावेळी छोट्या प्रमाणावरील शेतीलाच प्राधान्य होते. तसेच लहानलहान घरगुती उद्योग चालत असत. युरोपात एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात शिक्षण, दळणवळण व उत्पादन यांची जशी आधुनिक साधने होती तशी ती त्या काळात जपानमध्ये नव्हती. किंबहुना आधुनिक स्वरूपाच्या औद्योगीकरणास अनुकूल अशी जी परिस्थिती लागते तीही नव्हती. परंतु केवळ सात वर्षांच्या अवधीत आधुनिक जपानचा भक्कम पाया घातला गेला. आधुनिक ज्ञानविज्ञान, तंत्रकौशल्य यांचा प्रसार होऊन अत्यंत कार्यक्षम रीतीने औद्योगिक उत्पादन सुरू झाले. युद्धपूर्व काळात जपान हा केवळ पाश्चात्य राष्ट्रांतील औद्योगिक मालाची नक्कल करीत होता हा समज चुकीचा आहे असे ॲलन यांचे म्हणणे आहे. उलट वैज्ञानिक व तांत्रिक क्षेत्रात जपान स्वत:ची भर घालीत होता. तसेच त्याने आर्थिक व सामाजिक संघटना स्वत:चे वैशिष्ट्य ठेवून उभ्या केल्या होत्या.

सत्ताधारी वर्ग हा चाकोरीतील नव्हता. बुद्धिमान, हुशार अशा व्यक्तींना या वर्गात प्रवेश मिळत असे. या वर्गाचा प्रभाव, बुद्धिमत्ता व कौशल्य यापुढे सर्वसाधारण समाज दबलेला राही. त्या काळात अत्यंत प्रभावशाली व्यक्तित्वाच्या व्यक्ती अग्रभागी आल्या. त्यांनी वैयक्तिक हितापेक्षा गटाचे वा देशाचे हित अधिक प्रमाण मानले. त्या राजवटीत शेतीचे उत्पादन अनेक पटीने वाढले आणि उद्योगधंद्यांची भरभराट झाली. मैजींच्या राजवटीत सरंजामशाही नष्ट झाली आणि सरंजामशहांकडे जाणारे अतिरिक्त धन हे सरकारी खजिन्यात जाऊन तेथून ते शेती व उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी उपयोगात येऊ लागले. जगभर जेव्हा तीस सालनंतर मंदी झाली, तिचा फायदा घेऊन जपानमध्ये वेतनाचे प्रमाण खाली आणण्यात आले आणि याचा परिणाम म्हणून जपानी उद्योगधंद्यांना बराच फायदा होऊन तो नफा पुन्हा कारखान्यांत गुंतविला गेला.

जपानने पाश्चात्यांकडून आधुनिक तंत्रज्ञान, विज्ञान घेतले पण पाश्चात्यांची संस्कृती आत्मसात केली नाही. एवढेच नव्हे, तर पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावाखाली आपली

संस्कृती बदलू वा नष्ट होऊ नये याची काळजी जपानी नेत्यांनी घेतली. परंतु जपानने हे जे आधुनिक तंत्रकौशल्य प्राप्त करून घेतले होते त्याचा उपयोग त्याने युद्धाभिमुख अशी अर्थव्यवस्था तयार करण्यासाठी केला. म्हणून शस्त्रास्त्रांच्या कारखान्यांना प्राधान्य मिळाले. पुढचा इतिहास ताजाच आहे.

युद्धात जपानची अतोनात हानी झाली. ४८-४९ सालचे जपानचे जेवढे एकंदर राष्ट्रीय उत्पन्न होते त्याच्या दुपटीने हे नुकसान झाले असा अंदाज केला जातो. पण पंचवीस वर्षांत चित्र पालटले. अमेरिकेने मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत केली. लष्कराचा खर्च जपानला सोसावा लागला नाही हे सर्व खरे असले, तरी त्याची आजची प्रगती ही केवळ या जोरावर झालेली नाही. १९३० मध्ये जपानचे जे उत्पन्न होते त्याच्या सहापट ते आज आहे. युद्धोत्तर काळात अमेरिकनांनी जपानचे युद्धनेते घरी बसविले, काहींना शिक्षा दिल्या. ज्या मोठमोठ्या कंपन्यांची साखळी निर्माण झाली होती ती तोडली. शेतीची पुनर्रचना करून कसणाऱ्याच्या हाती शेती दिली. परंतु अमेरिकेने हेही ओळखले, की दीनदुबळा जपान हा तिचे आशियातील हितसंबंध सुरक्षित राहण्यास पूरक नाही. रशिया व चीन या दोन कम्युनिस्ट राष्ट्रांच्या कैचीत तो सापडला आहे आणि तो जर संपन्न झाला नाही तर ते आपल्याला धोक्याचे ठरेल हे अमेरिकेने ओळखले व जपानच्या विकासाचा मार्ग मोकळा करून दिला. युद्धोत्तर काळात जपानला कोरियाच्या युद्धाचा फायदा प्रचंड प्रमाणावर मिळाला. पण त्यानंतर त्याचा निर्यात व्यापार वाढतच गेला.

युद्धपूर्व काळात कोरिया व फोर्मोसातून जपान काही प्रमाणात तांदूळ आयात करीत असे. पण ५० सालच्या सुमारास २५ टक्क्यांनी लोकसंख्या वाढूनही तांदळाची सर्व अंतर्गत गरज जपान भागवू लागला. ६० ते ७० या दशकात दुपटीने उत्पन्न वाढविण्याची योजना जपानने स्वीकारली आणि याचा फायदा उद्योगधंद्यांना होऊन ते चारी बाजूने वाढले. उपभोग्य मालाची पैदास मोठ्या प्रमाणावर होऊ लागली आणि या आर्थिक विकासाचे फायदे व्यापक प्रमाणावर लोकांत विभागले गेले. ज्यावेळेला लोकसंख्या अतिरिक्त झाली असल्याचे दिसले तेव्हा तिला आळा घालण्याची प्रचंड मोहीम निघून त्यातही जपान यशस्वी ठरला. विकासाची गती वाढते तेव्हा किंमतीही काही प्रमाणात वाढतात. जपानने भावपातळी नियंत्रित ठेवली. ती प्रमाणाबाहेर वाढू दिली नाही. ६० सालच्या पूर्वी सात वर्षे उपभोग्य मालाच्या किंमतीचा निर्देशांक दहा टक्क्यांपेक्षाही कमी वाढला.

६२ सालानंतर घाऊक किंमती वाढत गेल्या, पण इतर अनेक देशांच्या मानाने त्या कमीच होत्या. यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठांत जपानची स्पर्धा वाढली. शेतीचा विकास झाला म्हणजे एकरी उत्पादन वाढले, यांत्रिकीकरण झाले व शेतीवर गुजराण करणारांची संख्या घटून उद्योगधंद्यांत ती गुंतली.

कापडधंद्यात युद्धपूर्वकाळातही जपान प्रगत होता. पण युद्धोत्तर काळात त्याने कृत्रिम धाग्यापासून कापड बनविण्याच्या कलेत विशेष प्राविण्य मिळवून कापसासारख्या कच्चा मालाच्या आयातीवरील परावलंबित्वच नष्ट केले. रेयॉन, इलेक्ट्रॉनिक्स, जहाजबांधणी, पोलाद, खत, मोटारी या धंद्यांत जपानने घोडदौडीने प्रगती केली. आज जपानचा मोटार उत्पादन क्षेत्रात जगात दुसरा क्रमांक लागतो आणि इंग्लंडपेक्षा त्याचे उत्पादन दुपटीने आहे. पोलादाचे त्याचे उत्पादन ब्रिटनपेक्षा चौपट असून ते प. जर्मनीपेक्षाही अधिक आहे. रासायनिक खते, प्लास्टिक्स, इत्यादींचीही हीच स्थिती आहे. जपानचा निर्यात व्यापार हा प्राथमिक स्वरूपाच्या उपभोग्य मालाचा नाही. मोटारी, खते, पोलाद, इलेक्ट्रॉनिक्स, जहाजे यांचा आहे.

आयात व्यापारातही त्याने बदल केला. कापूस, कापड वर्गेरेंची आयात घटली. उलट दूध व दुधाचे पदार्थ, इतर सत्त्वयुक्त खाद्यपदार्थ यांची आयात वाढविण्यात आली आहे. लोकांच्या राहणीचा वाढता दर्जा त्यावरून स्पष्ट होतो. एक उल्लेखनीय विशेष असा, की प्राथमिक स्वरूपाचा उपभोग्य माल जपानला निर्यात करणारा देश म्हणजे अमेरिका आहे. अमेरिका हा सर्वात उद्योगप्रधान देश, पण काही बाबतीत जपान पुढे आहे. जपानच्या औद्योगीकरणासाठी लागणारा माल पुरविण्यात अर्धविकसित देश मात्र पुढे नाहीत.

जपानमधील मोठमोठ्या मिरासदार कंपन्यांच्या साखळ्या मोडल्या. पण आता नव्या प्रचंड कंपन्या स्थापन झाल्या आहेत. त्या युद्धपूर्व काळाप्रमाणे युद्धोपयोगी माल तयार करणारे कारखाने उभे करीत नाहीत एवढेच. जपानची वेतनश्रेणी, कामगार संघटना, बँकिंगची व्यवस्था ही सारीच वैशिष्ट्यपूर्ण असून या साऱ्यांचा परिणाम जपानच्या आश्चर्यकारक प्रगतीत झाला आहे. औद्योगिक तंटे दीर्घकाळ चालावयाचे, संप व टाळेबंदी इत्यादींनी उत्पादनात व्यत्यय यावयाचा हे ब्रिटनचे देणे भारताने घेतले आहे. जपान ब्रिटनचा याबाबतीत अनुयायी नाही. नफ्यावर पाणी सोडून कामगारांचे वेतन वाढविण्याचा उफराटा व्यवहार येथे होत नाही.

ही सर्व प्रगती केवळ खाजगी मालकीमुळे झाली हे खरे नव्हे. सरकारचा या प्रगतीत मोठा भाग आहे. देशातील एकंदर भांडवलसंचयापैकी ३० टक्के भांडवल ५० ते ६० च्या दरम्यान सरकारमुळे जमा झाले होते यावरून सरकारचा प्रभाव औद्योगिक प्रगतीवर किती आहे ते स्पष्ट होईल. अर्थात सामाजिक सुरक्षितता, कल्याणकारी योजना, याबाबतीत जपान हा स्वीडन, इंग्लंड, अमेरिका, प. जर्मनी यांच्या मागे आहे. निवासस्थानांच्या बाबतीत तीच स्थिती आहे. पण आता या क्षेत्रातही त्याने मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्याचे ठरविले आहे. जपानच्या या प्रगतीचा इतिहास रोमहर्षक आणि उद्‌बोधक आहे.

२४-३-१९७३

अविकसित देश

अमेरिका, प. जर्मनी, स्वीडन, जपान इत्यादी औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या देशांत अवाढव्य आणि निरनिराळ्या देशांत ज्यांच्या व्यवहाराचा पसारा पसरला आहे अशा कंपन्या आहेत. या कंपन्यांचे व्यवहार, त्यांची धोरणे, राजकारणावर होणारा परिणाम यासंबंधी अनेक अभ्यासक पुस्तके प्रसिद्ध करीत आहेत. लुई टर्नर या ब्रिटिश प्राध्यापकाचे 'मल्टीनॅशनल कंपनीज अँड थर्ड वर्ल्ड' हे यापैकी एक ताजे पुस्तक. लेखकाने अनेकविध कंपन्यांच्या व्यवहारावर भरपूर आकडेवारीसह प्रकाश टाकला असून या कंपन्यांच्या बाबतीत तिसऱ्या जगातील अविकसित देशांनी सावधगिरीचे व व्यवहार्य धोरण स्वीकारावे असा निष्कर्ष काढला आहे.

ईस्ट इंडिया कंपनी या संदर्भात फार जुनी आंतरराष्ट्रीय कंपनी ठरते. पण तिच्या व्यवहारावर सरकारचे नियंत्रण होते आणि पुढेही ब्रिटिश साम्राज्य पसरल्यावर ब्रिटिश कंपन्यांवर सरकारचे नियंत्रण होते. परंतु विशेषत: गेल्या महायुद्धानंतर अमेरिकादी देशांत ज्या आंतरराष्ट्रीय व्यवहार करणाऱ्या कंपन्या स्थापन झाल्या त्यांच्यावर असे नियंत्रण राहिले नाही. याबाबतीत तेल कंपन्यांचे व्यवहार अधिक टीकार्ह झाले आहेत. या कंपन्यांना गडगंज नफा मिळतो. पण त्यांनी निरनिराळ्या देशात तेलाचे साठे अधिकाधिक शोधण्याचा विशेष प्रयत्न केला नाही. मागणी पुरवण्याचे गणित बनवून त्यांनी भरपूर नफा काढण्याची दृष्टी ठेवली. याला इराणच्या मुसादिकने प्रथम धक्का दिला. तथापि टर्नर यांच्या मते तेल कंपन्यांनी मध्यपूर्वेत राजकारण केल्याचा विशेष पुरावा नाही. दक्षिण अमेरिका, काँगो किंवा इतर अविकसित देश यामध्ये आयटीटी किंवा अन्य कंपन्यांनी बरेच राजकारण केले. तेलाचाच विचार केला तर व्हिएतनामपाशी तेल मिळण्याचा संभव असल्याने अमेरिकेने त्याही दृष्टीने व्हिएतनाम युद्धात स्वत:ला इतके गुंतवून घेतले, असे टर्नर यांचे म्हणणे आहे.

अविकसित देशांचा विकासाचा मार्ग हा अतिशय बिकट आहे. औद्योगिक विकसासाठीच नव्हे तर शेतीच्या विकासासाठीसुद्धा या देशांना पुढारलेल्या देशांकडे, तेथील प्रचंड कंपन्या-कारखान्यांकडे पाहावे लागते. त्यातच परदेशी मदतीचे करार होतात तेव्हा या मदतीच्या कराराने अविकसित देश बांधले जातात आणि म्हणून त्यांना या मदतीतून यंत्रसामग्री विशिष्ट विकसित देशातून घ्यावी लागते. त्यामुळे साहजिकच त्या देशांच्या कंपन्या अधिक नफा घेऊन माल विकतात. तसेच नफा काढण्याचा दुसरा मार्ग

म्हणजे अविकसित देशात कारखाने काढणे. आंतरराष्ट्रीय व्यवहार करणाऱ्या कंपन्यांपाशी भांडवल, यंत्रसामग्री, तज्ज्ञ यावाबतीत कमतरताच नसल्याने त्यांच्या स्पर्धेपुढे अविकसित देशातील कंपन्या टिकू शकत नाहीत. भारतात स्थानिक कंपन्यांच्यापेक्षा आंतरराष्ट्रीय कंपन्या वीस टक्के अधिक नफा मिळवीत होत्या असे एका पाहणीतच आढळले आहे. या रीतीने मुक्तपणे व्यवहार करणे जेथे अशक्य होते त्या देशाची या कंपन्या एकतर आर्थिक उपासमार करतात किंवा राजकीय उलथापालथी करतात. दक्षिण अमेरिकेत याचा अनुभव अधिक वेळा आला. अर्थात भांडवल, यंत्रसामग्री, सुटे भाग यासाठी ज्या देशांना इतरांवर अवलंबून राहावे लागते त्यांच्या भोवती पाश आवळण्याचे धोरण केवळ पाश्चात्य देशच स्वीकारतात असे नव्हे. टर्नर यांनी यासंबंधात रशियाचे उदाहरण दिले आहे. नासर यांनी रशियाकडे युद्धसाहित्याची मागणी केली. ती पुरी होईना तेव्हां त्यांनी कडक उपाय योजण्याची धमकी दिली. तेव्हा क्रुश्चॉव म्हणाले; 'सुट्या भागांचाही विचार करून ठेवा!' म्हणजे या प्रकारचे व्यवहार सर्वच मदत देणारी राष्ट्रे करतात.

तथापि आता परिस्थितीला वेगळे वळण लागत आहे. तेल उत्पादक देशांनी तेलाच्या किंमती वाढवून आपल्या हातात एक नवे शस्त्र असल्याचे दाखवून दिल्यामुळे कच्च्या मालाच्या किंमतीचा प्रश्न पुढे आला आहे. तसेच आर्थिक राष्ट्रवादही वाढीला लागला आहे. आर्थिक राष्ट्रवादाचे उदाहरण म्हणजे जपान. जपानने पाश्चात्यांकडून तंत्रज्ञान घेतले. पण पाश्चात्य कंपन्यांचे आर्थिक जाळे पसरू दिले नाही. आता तर तो एक आर्थिकदृष्ट्या समर्थ देश बनला आहे. आर्थिक राष्ट्रवादाची लाट निर्माण झाली असली तरी अविकसित देशांनी याहीबाबतीत अतिरेक न करता जास्तीत जास्त फायदा मिळेल अशा प्रकारचे करार आंतरराष्ट्रीय कंपन्यांशी करावे असे टर्नर यांचे म्हणणे आहे.

तेलाचे उत्पादन, खते, निरनिराळी अवजड यंत्रसामग्री इत्यादींसाठी प्रचंड भांडवल लागते. आधुनिक तंत्रज्ञान लागते. पण यासाठी करारमदार करताना अविकसित देशांनी जर व्यावहारिक चातुर्य दाखविले तर त्यांना फायद्याचे करार होऊ शकतात. तथापि अनेक वेळा अविकसित देशातील राजकारणी, नोकरशहा आणि उद्योगपतीही आधुनिक तंत्रज्ञानात अज्ञ असल्यामुळे आंतरराष्ट्रीय कंपन्यांशी करार करताना घोटाळे होतात. यासंबंधात जर जागरूकता वाढली तर आंतरराष्ट्रीय कंपन्यांतच स्पर्धा लावून फायद्याचे करारमदार करून घेणे सोपे जाते. टर्नर यांनी यासंबंधी काही उदाहरणे दिली आहेत.

आर्थिक राष्ट्रवादाचा स्वीकार केला तरीही अविकसित देशांना भांडवल, तंत्रकौशल्य आणि परदेशी चलन यांची गरज आहे. तेव्हा आंतरराष्ट्रीय कंपन्यांवर बहिष्कार टाकून चालणारे नाही. तसेच या कंपन्यांनाही आपला पसारा वाढवून नफा काढण्यासाठी

अविकसित देशात भांडवल-गुंतवणूक करणे आवश्यक आहे. म्हणजे दोघांनाही एकमेकांची गरज आहे. तथापि असे असतानाही या कंपन्या किंमती वाढवून, जुनी यंत्रसामग्री गळ्यात मारून वगैरे अनेक प्रकारे फसवणूक करतात. काही ठिकाणी राजकारणातही हस्तक्षेप करतात. याबद्दल सावध राहिले पाहिजे. आर्थिक राष्ट्रवादामुळे ही सावधानता आली तर आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या गैरव्यवहारानाही आळा बसेल हा टर्नर यांचा निष्कर्ष बरोबर आहे.

१-११-१९७५



अमेरिकेपुढील मूलभूत प्रश्न

गेल्या दोन तीन वर्षांत अमेरिकेचे अध्यक्ष निक्सन यांनी अमेरिकेच्या परराष्ट्र राजकारणाला वेगळे वळण दिले. हे निराळे वळण लागले तेव्हा प्रारंभी सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला. परंतु अमेरिकेच्या धोरणातील परिवर्तनाची पूर्वतयारी चार वर्षांपूर्वी होत होती. प्रिन्स्टन विद्यापीठात अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, स्वीडन वगैरे देशांतील काही विचारवंत ६८ सालच्या डिसेंबरमध्ये जमले होते. त्यांनी अमेरिकेला सतावणाऱ्या अंतर्गत व बाह्य प्रश्नांची सर्वांगीण व परखड चर्चा केली. या विचारवंतांत प्रा. गाल्ब्रेथ, जॉर्ज केनान, इलेशिंगर, डॉ. किसिंजर इत्यादींचा समावेश होता. त्यांनी केलेल्या चर्चेवर आधारित असा ग्रंथ 'द एन्डलेस क्रायसिस' या नावाने प्रसिद्ध झाला असून आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या जिज्ञासूंना तो उपयुक्त वाटेल. अमेरिकेचे प्रश्न जरी या परिसंवादात चर्चिले गेले असले, तरी ते केवळ अमेरिकेचेच नाहीत. त्यानिमित्ताने आधुनिक जगाला सतावणाऱ्या प्रमुख प्रश्नांची चर्चा झाली आहे.

व्हिएतनामचे युद्ध, शहरांतून वाढलेली गुन्हेगारी, पुढाऱ्यांचे खून इत्यादींमुळे अमेरिकेची प्रतिमा पूर्वीची राहिली नाही. अशा वेळी अमेरिकेच्या अंतर्गत व परराष्ट्रविषयक प्रश्नांची चर्चा या विचारवंतांनी अतिशय मोकळेपणाने केली. यासंबंधात लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही की, आपल्याकडे विचारवंत म्हणून मानले गेलेल्यांपैकी एकतर सरकार किंवा समाज यांची खुषामत करताना परिसंवादातून दिसतात, तशी या परिसंवादाची स्थिती झालेली नाही. तरीही एकजण प्रश्न करतोच की विचारवंत हा वर्ग कितपत स्वतंत्र आहे? त्यांचे संशोधन, त्यांची ज्ञानसाधना या सर्वांसाठी या ना त्या विद्यापीठातर्फे मोठ्या आर्थिक संघटनेचे पाठबळ मिळते, सरकारी अनुदाने मिळतात. त्यामुळे सर्वच विचारवंतांना त्यांना हवी त्या रीतीने ज्ञानसाधना करता येईलच असे नाही. सर्वसाधारण रीत्या हे तत्त्व ग्राह्य मानले तरीही ज्या रीतीने प्रिन्स्टन विद्यापीठाच्या तर्फे झालेल्या या परिसंवादात जी आत्मटीका, जे आत्मपरीक्षण अमेरिकन विचारवंतांनी केले व काही परकी विचारवंतांनी आपली मते अत्यंत निर्भीडपणे मांडली तो स्पष्टपणा खरोखर वाखाणण्यासारखा असून अमेरिकन समाज आज तरी सर्वात अधिक मोकळा, स्वातंत्र्यवादी आहे हे स्पष्ट होते. एका वक्त्याने तर अध्यक्ष जॉन्सन हे एक जंगली गृहस्थ असल्याचा शेरा मारला होता. अशा या परिसंवादात भारतातर्फे मिनू मसानी व नुराणी यांनी भाग घेतला होता. या दोघांची वक्तव्ये अगदीच सुमार आहेत.

अमेरिकेच्या अंतर्गत प्रश्नांपैकी एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे निग्रोंचा. एका वक्त्याने हे दाखवून दिले की, अमेरिकेतील निग्रोंचा प्रश्न हा केवळ आर्थिक, वर्गीय स्वरूपाचा आहे हे मानणे चूक आहे. हा प्रश्न वांशिक आणि सांस्कृतिक आहे. हे निग्रो युरोपातील काही देशांमधील गोऱ्या लोकांपेक्षाही अधिक सुस्थितीत असतील. तरीही एकंदर अमेरिकन समाजात ते समाविष्ट होऊ शकत नाहीत. दुसरे असे की, आर्थिक व राजकीय क्षेत्रात मोक्याच्या जागा त्यांना मिळतात काय? तर त्याचे उत्तर नकारार्थी द्यावे लागेल. कितीही मोठी जागा मिळाली तरी अखेरीस समाजाचे नियंत्रण करणारी आर्थिक व राजकीय शक्ती त्यांना प्राप्त होऊ शकत नाही. यासाठी काही निग्रो वक्त्यांनी निग्रो समाजासाठी वेगळा मुलूख तोडून द्यावा, त्यांना त्यांचे सरकार वगैरे स्थापन करू द्यावे असे सुचविले. अमेरिकेचे कॅनडाशी आहेत त्यापेक्षाही जवळचे संबंध या नव्या देशाशी असावेत. या देशाला आपला विकास करून घेण्यास मोकळीक मिळाली की, कालांतराने दोन्ही देशांचे नैसर्गिक पातळीवरील संबंध स्थापन होतील. हा अतिरेकी विचार बहुतेक वक्त्यांनी मान्य केला नाही. जॉर्ज केनान यांच्यासारख्यांनी अमेरिकन उदारमतवादाला आवाहन करून हा निग्रोंचा प्रश्न हाताळावा असे सुचविले. निग्रोंचे स्वतंत्र राष्ट्र हे नवे प्रश्न उपस्थित करील.

अमेरिकेतील दुसरा महत्त्वाचा प्रश्न अतिशय संघटित समाजाचा. मोठमोठ्या तेलकंपन्या, बँका, पोलाद कारखाने, जहाजबांधणीचे कारखाने इत्यादींमुळे औद्योगिक व आर्थिकदृष्ट्या हा समाज अतिशय संघटित झाला आहे. सत्तर टक्के लोक शहरात राहतात. सतत वाढत जाणारी शहरे, स्पर्धाशीलता आणि आर्थिक विकासाचा वाढता वेग इत्यादींमुळे सामान्य माणूस स्वत:ला हरवून बसला आहे. अशा या देशात कित्येक प्रकारचा माल हा निष्कारण मोठ्या प्रमाणावर पैदा होतो आणि जाहिरातीच्या प्रचंड मोहिमेच्या दबावाखाली खपतो. पण एवढ्या मोठ्या कारखान्यांची, एवढ्या वेगाची व स्पर्धाशीलतेची गरज आहे काय? हा गाल्ब्रेथ यांच्या टीकेचा रोख असतो. या परिसंवादात त्यांनी आपल्या भूमिकेचा पुनरुच्चार केला आहे. औद्योगिक, आर्थिक व राजकीय संघटना पूर्णत: नष्ट करावी असे गाल्ब्रेथ सुचवीत नाहीत. तर ते या संघटनेशी कसा अधिक सुसंवाद राखता येईल, याचा विचार करू पाहतात. ते म्हणतात की, औद्योगिकदृष्ट्या पुढारलेला समाज असो की, हुकुमशाहीखाली वावरणारा समाज असो, त्यात व्यक्ती गुदमरू लागते. या व्यक्तीची मुक्तता करणे आवश्यक आहे. एक काळ असा येईल की, पुढारलेल्या अमेरिकेसारख्या देशातील आर्थिक व राजकीय संघटनांचे प्रमुख आणि रशियासारख्या देशातील त्यांचे भाऊबंद हे विद्यार्थी, कामगार, विचारवंत यांना बंधनात जखडून टाकण्याच्या तंत्राबाबत एकमेकांशी गुप्तपणे संबंध ठेवून माहितीची देवाणघेवाणही करतील. या स्थितीत गाल्ब्रेथ व इतर वक्त्यांची भूमिका अशी की,

आधुनिक तंत्रज्ञानाचा कितीही विकास झाला, तरी ते अधिक संवेदनाशील बनावे यासाठी प्रयत्न करावे लागतील. कम्युनिझमला मानवी चेहरा मिळवून देण्याचा प्रयत्न चेकोस्लोव्हाकियात ड्युबचेक यांनी केला. औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या समाजालाही मानवी चेहरा प्राप्त करून द्यावयास हवा.

यावर मार्क्सवादी किंवा स्वत:ला डावे म्हणविणारे एकच उपाय सुचवितात. तो म्हणजे उत्पादनाच्या साधनांची मालकी आज जी व्यक्तींच्या हाती आहे, ती बदलून समाजाच्या हाती देणे. भांडवलदारी समाजात उत्पादनाचे मुख्य लक्ष्य नफा हे असते. म्हणून ते बदलून सामाजिक न्याय, कल्याण ही उद्दिष्टे ठेवून सामाजिक मालकी स्थापन करावयास हवी. या संदर्भात ब्रिटिश व चेक वक्त्यांनी या परिसंवादात व्यक्त केलेली मते व सांगितलेले अनुभव भारतातील राज्यकर्त्यांनी आणि स्वत:ला डावे म्हणविणारांनी लक्षात ठेवण्यासारखे आहेत.

डेव्हिड मार्क्वॉंड हे ब्रिटिश मजूर पक्षाचे सभासद आहेत. ते म्हणतात की, उत्पादनाच्या साधनांच्या मालकीच्या स्वरूपास मजूर पक्षाने अवास्तव महत्त्व दिले व त्यातच तो गुरफटून राहिला. नॅशनल कोल बोर्डाचे उदाहरण देऊन त्यांनी सांगितले की, हे बोर्ड कामगार व समाज यांच्याबाबत भांडवलदारांइतकेच बेफिकीर आहे. सामाजिक मालकीच्या उद्योगांबाबतही कोणते धोरण स्वीकारावयाचे याचा विचार करावा लागेल.

दुसरा प्रश्न वेतनाचा. मार्क्वॉंड म्हणतात, जे कुशल कामगार आहेत त्यांचे वेतन, सुखसोयी, सवलती वाढतच जातात. ते संप वगैरे करून नाकेबंदीही करतात. या लोकांनी थोडा स्वार्थत्याग करून जे अकुशल कामगार आहेत, त्यांचे जीवन सुधारण्यास मदत करावयास हवी. पण तसे होत नाही. त्यामुळे अकुशल, असंघटित आणि कुशल व संघटित यांच्यातली तफावत वाढतच जाते. पूर्वी श्रमजीवी जनतेच्या एकजुटीचे आवाहन करून कुशल कामगारांना त्याग करण्यास प्रवृत्त करता येत होते. आता ते तसे करता येत नाही. मार्क्वॉंड यांनी निवेदन केलेली ही परिस्थिती येथे तर अधिकच उग्र स्वरूपात आहे. कामगार, बँकांतील कर्मचारी व इतर संघटित कर्मचारी आपले वेतन सतत वाढवून घेत आहेत. त्यासाठी त्यांचे संप, सत्याग्रह, मोर्चे चालूच आहेत. पण जो असंघटित व अकुशल असा बहुसंख्य समाज आहे, तो आहे तेथेच आहे. त्यासाठी फारसे काही होतच नाही. उत्पादनाच्या साधनांची मालकी बदलल्याने यात फरक पडतो असे नव्हे. बँका राष्ट्रीय मालकीच्या झाल्या म्हणून त्यांतील कर्मचारी अधिक काम करू लागले नाहीत. उलट बेशिस्त व बेफिकिरीच वाढली.

हाच अनुभव चेकोस्लोव्हाकियाचे लोबेल यांनी प्रतिपादन केला. (आता ते अमेरिकेत राहतात.) ते म्हणाले, चेकोस्लोव्हाकियाने उत्पादन साधनांच्या मालकीवर फार भर दिला

व समाजाची मालकी स्थापन केली. पण त्यामुळे फक्त भांडवलशाहीतील अनिष्ट प्रवृत्ती बंळावल्या व चांगल्यांची मात्र उणीव राहिली. राजकीय पक्षाच्या हाती राजकीय व आर्थिक सत्ता आली आणि सामान्य नागरिकाला काही हक्कच उरला नाही. म्हणून उत्पादनाच्या साधनांच्या मालकीचा केवळ प्रश्न नाही, तर एकंदर सामाजिक व्यवस्थेचा आहे.

सामाजिक व्यवस्थेचा विचार केला, तर समाजवादाची ध्येये अमेरिकेसारख्या समाजात अधिक साध्य होतात, असे लोवेल यांचे मत आहे. आर्थिकदृष्ट्या विचार केला, तर विशिष्ट समाजात विज्ञानाची वाढ किती झाली आहे, हा प्रश्न उपस्थित होतो. विज्ञान अतिशय प्रगत अवस्थेत असेल, तर भांडवलदारी समाजातही लोकांना अधिक सामाजिक न्याय मिळतो, त्यांचे जीवन अधिक समृद्ध होते.

अमेरिकन समाजात व्यक्तीला अधिक स्थान प्राप्त व्हावे, या समाजातील विषमता व इतर अनेक उणिवा दूर कराव्या अशी आच अनेकांना लागली आहे. राज्यकर्त्यांची अनेक धोरणे लोकांना आवडली नाहीत. विशेषत: व्हिएतनाम युद्धामुळे या समाजात दोन तट पडले. यातून निषेध-मोर्चे वगैरे निघून लोकांच्या भावना ताणल्या गेल्या. हिंसा, अत्याचार वाढले. याबद्दल केनान यांनी आपली व्यथा व्यक्त केली. त्यांचे म्हणणे असे की, विद्यार्थी, व्हिएतनाम-युद्धाचे विरोधक, निग्रो इत्यादी भडक भाषणे करून व मोठमोठे मोर्चे काढून वातावरण बिघडवीत आहेत. अखेरीस मोर्चे काढणारे अल्पसंख्य असतात आणि त्यांच्याविरुद्ध अधिक मोर्चे उजव्या प्रवृत्तीचे लोक काढू शकतील. यातून फासिझम वाढेल. यावर उपाय म्हणून ते अमेरिकन उदारमतवाद अधिक प्रभावी व्हावा असे सुचवितात. या उदारमतवादामुळेच सामाजिक न्याय व कल्याण साधून व्यक्तीची जी मुस्कटदाबी होते तीही थांबू शकेल असा केनान यांचा विश्वास आहे.

अमेरिकेचे युरोपात सैन्य असावे की नसावे; चीन, आशिया, पश्चिम व आग्नेय आशिया, लॅटिन अमेरिकी देश यांच्याशी अमेरिकेचे काय संबंध असावेत या प्रश्नांचीही प्रस्तुत परिसंवादात चर्चा झाली.

युरोपातून अमेरिकेने पूर्णत: काढता पाय घ्यावा असे कोणाही वक्त्याला वाटले नाही. एवढेच नव्हे तर ब्रेत्रे या फ्रेंच वक्त्याने द गॉल यांच्या अमेरिका-विरोधी धोरणांवर टीका केली. प. युरोपात ब्रिटन सामील होऊन ही संघटना अधिक मजबूत झाली व अमेरिकेशी तिचे चांगले संबंध राहिले तर लोकशाही व स्वातंत्र्यवादी देशांचा पक्ष बळकट होईल असा अभिप्राय काहींनी व्यक्त केला. या संदर्भात अण्वस्त्रांची चर्चा झाली व लष्करी करारही विचारात घेतले गेले. आता अमेरिका आणि रशिया यांच्यापाशी अण्वस्त्रे इतपत आहेत

की दोघेही एकमेकांचा पाडाव करू शकत नाहीत. तांत्रिक, वैज्ञानिक प्रगती इतकी झालेली आहे की, लष्करी तळ व करार अनावश्यक बनले. याचमुळे चीनशी अमेरिकेने फटकून न वागता जमवून घ्यावे, चीनच्या कम्युनिस्ट सत्तेचे अस्तित्व मान्य करावे असे अनेक वक्त्यांनी प्रतिपादन केले. अण्वस्त्रे, लष्करी तळांची मर्यादा इत्यादींचा विचार डॉ. किसिंजर यांनी 'द नेसेसिटी फॉर चॉइस' या ग्रंथात बऱ्याच विस्ताराने केला आहे.

या परिसंवादात व्हिएतनाम युद्ध, अमेरिका व चीन, अमेरिका व परराष्ट्र धोरण यासंबंधात सामान्यत: एकमत झाले होते आणि अध्यक्ष निक्सन यांची धोरणे यासंबंधात पुढे बदलली हेही लक्षात घेण्यासारखे आहे. म्हणून गाल्ब्रेथ यांनी म्हटल्याप्रमाणे विचारवंतांना या कमालीच्या संघटित, स्पर्धाशील समाजात स्थान नाही असे नव्हे. अर्थात राजकारण त्यांच्याच विचाराप्रमाणे चालते वा चालावे असेही नव्हे. कारण अखेरीस विचारवंत हे अलिप्त राहूनच विचार करू शकतात, त्या विचारांची अंमलबजावणी करण्याचे जे परिणाम होतात त्यांची जबाबदारी मात्र ते घेत नाहीत. तरीही विचारवंतांनी आपली मते निर्भीडपणे मांडली पाहिजेत. म्हणजे एक प्रकारचे बौद्धिक वातावरण तयार होण्यास मदत होते. असे वातावरण अधिकाधिक प्रमाणात निर्माण होण्याने आपला समाज अधिक मुक्त व सहिष्णूही होईल. आपण या परिसंवादापासून आत्मटीका, आत्मपरीक्षण यांचे महत्त्व लक्षात घ्यावयास हवे.

जागतिक परिस्थितीचा संदर्भ आता बदलला आहे. तांत्रिक, वैज्ञानिक, भौतिक आणि आर्थिक क्षेत्रांत अमेरिका आज अग्रेसर असून रशियालाही तिच्याकडून तांत्रिक कौशल्य प्राप्त करून घ्यावयाचे आहे. विज्ञान व तंत्रज्ञान यांत झालेली आश्चर्यकारक प्रगती पाहता आर्थिक व सामाजिक क्षेत्रांत आपण जे जुनाट, पंचवीस तीस वर्षांपूर्वीचे सिद्धान्त उराशी बाळगतो त्यांचा फेरविचार करण्याची वेळ आली आहे. राजकीय व आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण सामाजिक न्याय व कल्याण यांच्या दृष्टीने उपकारक ठरत नाही आणि व्यक्तीचे व्यक्तित्वही लोप पावते. या मूलभूत समस्यांचा अनेक दृष्टीने विचार करणाऱ्या जगातल्या काही प्रमुख विचारवंतांचे हे मंथन अनेक दृष्टीने उद्‌बोधक आहे.

१-४-१९७३

कलकत्ता

कलकत्ता या शहरास तीनशे वर्षे पूर्ण झाली म्हणून अनेक समारंभ झाले. याच निमित्ताने ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस या प्रकाशन संस्थेने दोन सुंदर खंडांत कलकत्ता शहराचे तीनशे वर्षांतील जीवन व त्यात झालेले परिवर्तन चित्रित केले आहे. प्रा. सुकांत घोष हे या खंडांचे संपादक असून अनेक लेखकांनी विविध विषय निवडून लेख लिहिले आहेत. लेख फार मोठे व म्हणून कंटाळवाणे होणार नाहीत हे पाहण्यात आले आहे. साधारणत: एक हजार चित्रे, रेखाचित्रे आणि अनेक नकाशे यात असून त्यामुळे ग्रंथाची शोभा व उपयुक्तता वाढली आहे. जुन्या काळात रंगीत छायाचित्रांची सोय नव्हती. यामुळे कृष्णधवल चित्रे आहेत. पण त्यांची गोडी वेगळी असते. या छायाचित्रांची व रेखाचित्रांची निवड चोखंदळपणे करण्यात आली आहे.

कलकत्ता या शहरास तीनशे वर्षे झाली. जॉब चारनॉक याच्याकडे शहरास नाव देण्याचे श्रेय दिले जाते. असे असले तरी कलकत्ता हे गाव फार पूर्वीपासून अस्तित्वात होते असे सांगण्यात येते. ते कसेही असले तरी आधुनिक कलकत्त्याचा शोध चारनॉकने लावला हे खरे आहे. तो ईस्ट इंडिया कंपनीचा एक अधिकारी होता. त्यावेळी सर्वत्र अस्थिरता होती. विलायती कापडामुळे येथील विणकरांवर विपरीत परिणाम होत होता. याची झळ चारनॉक यासही लागली होती. अखेरीस तो कलकत्त्यात आला, त्यावेळी त्याचे वय झाले होते. त्याने हिंदी रीतीरिवाज आत्मसात केले होते. त्याने एका हिंदी स्त्रीशी संबंध ठेविला होता आणि तिच्या मृत्यूनंतर तिच्या समाधीवर तो कोंबडे मारीत असे. कलकत्ता या शहराचे नाव अलीवर्दीखानाने अलीनगर असेही ठेविले होते. पण मोगल सत्ता गेली आणि हे नावही गेले. कलकत्ता हेच कायम झाले.

ईस्ट इंडिया कंपनीचे अधिकारी येथल्या जीवनात बराच रस व भाग घेत. ते हिंदूंच्या पूजासमारंभातही सामील होत. तथापि त्याही वेळी इंग्रजांच्या वस्तीचा भाग व हिंदी लोकांच्या वस्तीचा भाग यात फरक होता. पुढे शहराचे नागरी प्रश्न निर्माण झाले. यासाठी पैसा हवा. मग इम्प्रूव्हमेंट ट्रस्टची स्थापना झाली आणि घरबांधणी, रस्ते इत्यादींची सोय होऊ लागली. शहराची अशी उभारणी होत असताना निश्चित सीमा नव्हती. त्यावेळच्या विविध भागांची माहिती नकाशासह देण्यात आली असून कलकत्तावासीयांना ती विशेष आवडेल. आज चितपूर हा एक रस्ता आहे. पण त्या भागात एक काळ लहानसे खेडे होते. मंदिर होते व त्याच्या परिसरात जत्रा वगैरे भरत असे. नाचगाणे होत असल्याने

अनेक हौशी लोक या भागात येत. चितपूरचा नबाब हा रसिक होता आणि कंपनी सरकारचे अधिकारी त्याच्याकडे पाहुणचारासाठी येत. शहरात नव्या प्रकारे बांधकाम करण्याचे पद्धतशीर प्रयत्न वॉरन हेस्टिंग्ज व वेलस्ली यांनी केले. ईस्ट इंडिया कंपनीचा व्याप प्रथम बंगालमध्ये वाढल्यामुळे व्यापारव्यवहारही कलकत्त्यात इतर कोणत्याही हिंदी शहरापेक्षा अधिक होता. सरकारच्या महसुलापैकी चाळीस टक्क्यांपर्यंतचा महसूल कलकत्त्यातून मिळत होता. तेव्हाच्या मुंबईपेक्षा हा कितीतरी अधिक होता.

इंग्रजांनी नवी शिक्षणपद्धती आणली आणि अनेक संस्थाही स्थापन झाल्या. कलकत्ता विद्यापीठ ही यात अग्रगण्य संस्था. शिक्षणाप्रमाणेच कलागुणांचे संवर्धन तेथे होत होते. याच सुमारास हिंदी लोक आपल्या वेगळ्या संस्था काढू लागले. यात सामाजिक विषयांची चर्चा करणाऱ्या होत्या त्याचप्रमाणे आर्थिक व राजकीय विषयही काही संस्था हाताळू लागल्या. मिशनऱ्यांचा जोर वाढत होता. यामुळे हिंदू समाजात धार्मिक सुधारणेचे विचार बळावू लागले आणि उलट टोकाला जाऊन सनातनी विचारांनाही चालना मिळाली. सर्व बाजूने विचारमंथन होऊ लागले होते. इंग्रजी शिक्षणाने कारकुनांचा वर्ग वाढला असला तरी याच शिक्षणाने हक्काची जाणीव होऊ लागली होती. यातूनच स्वदेशीची चळवळ होऊ लागली. महात्मा गांधी राजकारणात येण्यापूर्वी बंगालमध्ये स्वदेशीचा प्रसार होत होता. पुढे बंगालच्या फाळणीने स्वदेशीला जोर आला. पण बंगालच्या लोकांची तक्रार अशी की, स्वदेशीमुळे बंगालचा फायदा होण्यापेक्षा मुंबई, अहमदाबाद अशा ठिकाणी कापड गिरण्या व इतर कारखाने स्थापन झाले. यामुळे कलकत्त्याचे आर्थिक प्रभुत्व कमी होत गेले. स्वातंत्र्यानंतर ते चांगलेच कमी झाले. याचाही तपशील या पुस्तकात मिळेल. तथापि इंग्रजांच्या पुस्तकी शिक्षणाबरोबर व्यावसायिक शिक्षण घेतले पाहिजे, व्यापारव्यवहार केला पाहिजे, केवळ बाबूगिरी करून चालणार नाही असे आवर्जून सांगणारे लोक त्याही वेळी होते. याचा फार उपयोग झाला असे नाही. यामुळे कलकत्त्याच्या आर्थिक व्यवहारात बाहेरच्या लोकांचा प्रभाव सतत वाढलेला दिसतो. कारखानदारीत बाहेरचे लोक आणि कारखान्यात मजूर म्हणूनही बाहेरच्या लोकांची भरती. याचा परिणाम कलकत्ता हे शहर मुंबईप्रमाणेच मिश्र झाले आणि बंगाली लोकांचा प्रभाव राहिला नाही. वाढत्या शहरामुळे घरांचा प्रश्न बिकट होत गेला आणि चाळीस टक्के लोक झोपडपट्टीत राहात असतात.

घरांवरून निघाले म्हणून काही जुन्या भव्य घरांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. कलकत्त्यात जमीनदारांनी जुन्या काळात देखणी निवासस्थाने बांधली. त्यातील काही अद्याप आहेत. देखभाल करणे कठीण असल्याने अनेक नष्ट झाली. नवश्रीमंतांनीही निवासस्थाने बांधली. त्यांना या जुन्या वास्तूंची शान नाही. या वास्तूंची छायाचित्रे व त्यांच्यासंबंधीचे विवेचन जुन्या काळात घेऊन जाते.

कलकत्त्यातील शास्त्रीय संशोधनाची परंपरा जुनी आहे. यासंबंधीचे लेख दोन्ही खंडांत असल्यामुळे यासंबंधातील अद्ययावत् माहिती मिळू शकते. डासांमुळे मलेरिया कसा होतो याचा शोध लावण्यात रोनाल्ड रॉस यांचे संशोधन उपयोगी पडले.

बंगाल व त्यातही कलकत्त्याची सांस्कृतिक परंपरा फार मोठी व जुनी आहे. संगीतात अलाउद्दिनखाँ, रविशंकर, अमीरखाँ असे मातब्बर झाले व आहेत. रंगभूमी व चित्रपट या क्षेत्रात तसेच चित्र व शिल्प अशा क्षेत्रात कलकत्त्याचे नाव मोठे आहे. न्यू थिएटर्सपासून सत्यजित रे यांच्यापर्यंत चित्रपटांची दुनिया गाजविणारे झाले आहेत. नवे दिग्दर्शकही पुढे येत आहेत. साहित्याची परंपराही अखंड आहे. बंकिमचंद्रांच्या अंत्ययात्रेत बोलताना रवीन्द्रांनी एका युगाचा अंत झाला असे म्हटले होते. अंत झाल्याचे वाटावे अशी ती भव्य यात्रा होती. पण एक युग संपत असतानाच दुसऱ्याचा आरंभ झाला. ते युग रवीन्द्रांचे होते. त्यांचा बंगालच्या सांस्कृतिक जीवनावरील प्रभाव विलक्षण आहे. या ग्रंथांत या सर्वांचा परामर्ष घेतला आहे. विश्वकोषाच्या नावे रस्ता असलेले कलकत्ता हे एकमेव शहर असावे. बंगाल्यांचे साहित्यप्रेम हे सभांत भाषणे करण्यापुरते नाही. म्हणूनच दरवर्षी भरणाऱ्या ग्रंथप्रदर्शनात एक कोटीहून अधिक रुपयांची पुस्तके विकली जातात. वाचनपरिषदा भरविण्याची गरज पडत नाही.

कलकत्त्याचा प्रश्न अर्थातच बकालपणाचा आहे. रोजगार मिळावा म्हणून राज्यातून लोकांचा ओघ येत असतो. जेव्हा ग्रामीण भाग शेती व लहान मोठ्या उद्योगांनी सुधारेल तेव्हा ही गर्दी कमी होईल आणि कलकत्त्याचे जीवन सुधारेल. पण हे जीवन होते कसे व कसे आहे याची माहिती देणे हा या दोन खंडांतील लेखांचा उद्देश होता व तो सफल झाल्याबद्दल संपादक व प्रकाशक यांचे अभिनंदन.

२१-१२-१९९०

नेत्यांची व्यक्तिचित्रे

ट्रेव्हेलियन हे कुटुंब ब्रिटनमधील एक नामवंत व गुणी कुटुंब मानले जाते. प्रशासक, लेखक, कवी, इतिहासकार असे या कुटुंबात जन्माला आले. जी. एम्. ट्रेव्हेलियन यांनी इंग्लंडचा चार खंडांत सामाजिक इतिहास लिहिला आहे. तो एखाद्या कादंबरीसारखा सुरस व सरस आहे. हम्प्रे ट्रेव्हेलियन हे त्यांचे भाऊ. ते आय. सी. एस. त्यांनी परीक्षा पास झाल्यावर हिंदुस्थानात अनेक जागांवर काम केले. ते मद्रासमध्ये होते. तसेच दिल्लीत होते. रेसिडेंट म्हणून त्यांनी राजेमहाराजांचे जीवनही पाहिले होते. दुय्यम कलेक्टर वगैरे असताना मद्रासमधील कलेक्टराचे अरेरावी वर्तन त्यांना घृणास्पद वाटले होते. वरिष्ठ पातळीवर सरकारी अधिकारी लाच घेत नसत. पण व्हाइसरॉयच्या भेटीसाठी राजेमहाराजे दारवानांनाही लाच देत हे ट्रेव्हेलियन यांच्या लक्षात आले. हिंदुस्थानातील नोकरी संपल्यावर त्यांनी इजिप्त, इराक, रशिया व चीन येथे ब्रिटनचे वकील म्हणून काम केले आणि अशा या बहुविध क्षेत्रातील अनुभव त्यांनी लेखरूपाने ग्रथित केले आहेत. या लेखांचा संग्रह लेखकाच्या बहुरंगी जीवनाची ओळख करून देतो. ट्रेव्हेलियन यांना त्यांच्या घराण्यातूनच मिळालेली लेखणीची देणगीही या लेखांतून दिसून येते.

हम्प्रे ट्रेव्हेलियन यांनी डाग हॅमरशील्ड, चौ एन लाय, नासेर इत्यादींची व्यक्तिचित्रे मार्मिकपणे रेखाटली आहेत. हॅमरशील्ड याच्या सौजन्यशीलतेने सर्वचजण प्रभावित होत तसे ट्रेव्हेलियनही झाले होते. नासेर यांची तऱ्हा वेगळी. ते फार स्पष्टपणे बोलत. एका ब्रिटिश पत्रकाराला मुलाखत देताना त्यांनी स्पष्टच सांगितले होते की, ब्रिटनने आपल्याविरुद्ध कट करून जर पर्यायी सरकार स्थापन केले तर ते दोन दिवसही टिकणार नाही व पंतप्रधानाचा खून होईल. सुदानमध्ये लाचलुचपतीच्या आधारे इजिप्त राज्यक्रांती करील काय याची चर्चा ट्रेव्हेलियन यांच्याशी नासेर करत होते तेव्हा नासेर यांनी सांगितले, की लाचलुचपतीवर आपला विश्वास नाही. पत्रकारांसारख्या दुय्यम दर्जाच्या लोकांना लाच देता येते; पण त्याने राज्यक्रांती घडवून आणता येत नाही. शिवाय लाच घेणारांचे मुख्य लक्ष पैशावरच असते.

•

क्रुश्चॉव यांची कारकीर्द संपण्याच्या सुमारास ट्रेव्हेलियन रशियात ब्रिटिश वकील म्हणून गेले. क्रुश्चॉव यांच्या अनिर्बंध वागण्या-बोलण्याची अनेक उदाहरणे त्यांना यावेळी कळली. क्रुश्चॉव हे आपल्या भावना लपवून ठेवू शकत नव्हते; पण त्यामुळे त्यांचे व्यक्तित्त्व रंगदार

बनले होते. त्यांना आधुनिक चित्रकलेचे प्रदर्शन दाखविण्यात आले तेव्हा ते संतप्त झाले आणि प्रमुख चित्रकारांची त्यांनी मॉस्कोतून हाकालपट्टी केली.

क्रुश्चॉव यांच्यासंबंधी अनेक विनोदी चुटके त्यावेळी प्रचलित होते. ट्रेव्हेल्यिन यांनी ते दिले आहेत. एक असा : क्रुश्चॉव यांनी कझाकस्तानमध्ये गहू पेरला खरा, पण पीक आले कॅनडात. दुसरा : एकदा क्रुश्चॉव यांना कॅन्सरवर बोलण्यास सांगितले तेव्हा ते म्हणाले मला कॅन्सरची काही माहिती नाही. त्यावर त्यांना सांगण्यात आले, की तुम्ही दुधासंबंधी बोलला आणि दुधाचा तुटवडा निर्माण झाला, तुम्ही डबल रोटीबद्दल बोलला तर तीच गडप झाली. तेव्हा तुम्ही कॅन्सरवर बोला, म्हणजे कॅन्सर नष्ट होईल. तथापि विनोदी चुटके कितीही सांगितले जावोत; स्टालिनच्या राक्षसी राजवटीवर प्रकाश टाकून क्रुश्चॉव यांनी फार मोठी ऐतिहासिक कामगिरी बजावली व त्यामुळे त्यांचे नाव इतिहासात राहणार.

दुसरा महत्त्वाचा ऐतिहासिक पुरुष ट्रेव्हेल्यिन यांना भेटला तो म्हणजे चौ एन लाय. चौ यांची कार्यक्षमता, तीव्र बुद्धिमत्ता, चातुर्य याची इतरांनीही पावती दिली आहे. ट्रेव्हेल्यिनही देतात. माओबद्दल चिनी लोकांत आदर होता तर चौ एन लाय यांच्याबद्दल आत्मीयता, प्रेम होते. ट्रेव्हेल्यिन व ते यांची काही वर्षांनी भेट झाली असता मधल्या काळात चीनने बरीच प्रगती केली असल्याचे ट्रेव्हेल्यिन म्हणाले. पण आम्ही प्रगती केलेली नाही, मागेच राहिलो अशी कबुली चौ एन लाय यांनी दिली.

ब्रिटिश म्युझियमचे ट्रेव्हेल्यिन हे एक विश्वस्त होते. या निमित्ताने त्यांनी म्युझियमच्या कार्यपद्धतीवर प्रकाश टाकला आहे. मोठमोठ्या संस्था उभ्या करणे व त्या चालविणे यावरून कोणत्याही समाजाच्या सांस्कृतिक पातळीची कल्पना येते. ब्रिटिश म्युझियमसारख्या संस्था या ब्रिटिश समाजाच्या सांस्कृतिक पातळीची कल्पना आणून देतात. ट्रेव्हेल्यिन यांच्यासारख्यांमुळे अशा संस्था टिकतात व वाढतात.

एका सुसंस्कृत व संवेदनाशील गृहस्थाचे लेख या दृष्टीने हे पुस्तक वाचनीय झाले आहे.

१७-१-१९८१

चीनवर प्रकाशझोत

चीनसंबंधी आता अनेक ग्रंथ येऊ लागले आहेत. 'चायना आफ्टर द कल्चरल रेव्होल्यूशन' या ग्रंथात 'लंडन टाइम्स'चे चीनविषयक तज्ज्ञ श्री. रिचर्ड हॅरिस यांनी चीनविषयक काही महत्त्वाच्या पुस्तकांची यादीच दिलेली आहे. एकूण पाच पुस्तकांचा येथे परिचय करून द्यावयाचा आहे. त्यापैकी 'जर्नी थ्रू चायना' या ग्रंथाचे लेखक हे अल्जीरियात जन्मलेले फ्रेंच पत्रकार आहेत. त्यांचे नाव ज्यूल्स रॉय. अल्जीरियाच्या स्वातंत्र्यलढ्यावर त्यांनी पुस्तक लिहिले होते. चीनला भेट देऊन आल्यावर त्यांनी चीनचे प्रवास-वर्णन लिहिले आहे. 'चायना टुडे' याचे लेखक क्लॉस मेहनर्ट हेही पत्रकार आहेत. ते जर्मन, पण जन्म झाला मॉस्कोत. गेल्या ४२ वर्षांत त्यांनी चीनला अनेकदा भेटी दिल्या. त्यांचे वास्तव्य अमेरिकेत असते. चीनमधील सांस्कृतिक क्रांती संपुष्टात आल्यावर तेथे जाणारे मेहनर्ट हे पहिले पाश्चात्य पत्रकार. ते तेथे ७१ साली गेले होते.

'चायना कम्स ऑफ एज' या पुस्तकाचे कर्ते जिआँ पिएरे ब्रूले हेही फ्रेंच आहेत. त्यांनीही चीनला भेट दिली होती. चीन, जपान व अमेरिका येथे असलेल्या अनेक संदर्भ-ग्रंथांचा त्यांनी अभ्यास केला व नंतर हे छोटे पण विश्लेषणात्मक पुस्तक लिहिले. त्यातील आकडेवारी, तक्ते हे सर्व संदर्भ म्हणून उपयोगी पडण्यासारखे आहेत. 'चायना इन द इयर २००१' हा ग्रंथ हान सुयिन या लेखिकेचा आहे. तिचा जन्मच बीजिंगमध्ये झाला होता. ब्रुसेल्स, लंडन इत्यादी ठिकाणी तिचे शिक्षण झाले. हाँगकाँग, मलाया, सिंगापूर येथे ती वैद्यकीय व्यवसाय करीत होती. ६२ सालानंतर तिने तो सोडून दिला व लेखन-व्यवसाय सुरू केला. 'मेनी स्प्लेन्डर्ड थिंग' वगैरे तिच्या कादंबऱ्या आहेत. पं. नेहरूंना या लेखिकेची पुस्तके आवडत. चीनविषयी तिला फार आत्मीयता आहे. त्यामुळे तिचे लिखाण पूर्णत: वस्तुनिष्ठ नसले तरीही तिने दिलेली माहिती व तिचे विश्लेषण हे लक्षात घेण्यासारखे आहे. 'चायना आफ्टर द कल्चरल रेव्होल्यूशन' हे पुस्तक म्हणजे अनेक चीनविषयक तज्ज्ञांच्या लेखांचा संग्रह आहे. ऑक्सफर्डमधील इतिहासाचे प्राध्यापक डिक विल्सन यांनी ते संपादित केले असून, मार्मिक प्रस्तावना लिहिली आहे. चीनचे राजकारण, अर्थकारण, परराष्ट्र धोरण, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांची चर्चा या संग्रहात विविध लेखकांनी केली आहे.

या पाच ग्रंथांपैकी ज्यूल्स रॉय यांचा ग्रंथ चीनवर अनेक दृष्टींतून टीका करणारा आहे. हान सुयिन यांच्या ग्रंथाच्या वाचनानंतर तो वाचला, की दोन बाजू कळतात. हान सुयिन

यांना चीनमध्ये जवळजवळ काहीच दोष दिसत नाही. डिक विल्सन यांनी संपादित केलेला ग्रंथ हा सर्वात अधिक समतोल आहे.

या सर्व लेखकांचे लिखाण वाचल्यावर काही गोष्टींबाबत त्यांचे एकमत दिसते. एकतर चीनने विकासाचा आपला स्वत:चा मार्ग आखला व तो निर्धारपूर्वक पार पाडला जात आहे. मेहनर्ट यांच्यासारखे पत्रकार गेल्या ४० वर्षांत अनेकदा चीनला जाऊन आले. त्यांनाही चीनमध्ये झालेले परिवर्तन हे दुर्लक्ष करण्यासारखे नाही, हे मान्य आहे. रशियात क्रांती झाल्यावर लेनिन व नंतर स्टालिनने कामगारांना प्राधान्य दिले. रशियन नियोजनाचा केंद्रबिंदू कामगार होता. त्यामुळे कारखानदारी वाढली, नवी शहरे निर्माण झाली. शेतकऱ्यासही मजूर करण्यात आले. कारण शेतकरी हा स्वभावत:च प्रतिगामी अशी रशियन कम्युनिस्टांची समजूत. उलट माओने शेतकरी हा केंद्रबिंदू केला. मोठी शहरे वसवणार नाही, हे धोरण त्याने प्रथमच जाहीर केले. माओने जे विविध उपाय योजले, उलथापालथी केल्या त्यांचा रोख उत्पादनवाढ हा होता. चीनमधील प्रचंड मनुष्यबळ त्याने उपयोगात आणले.

याचे दृश्य परिणाम या पाच ग्रंथांच्या बहुतेक लेखकांनी मान्य केले आहेत. सांस्कृतिक क्रांतीने जी उलथापालथ झाली, माओचे विचारच अभ्यासण्यावर भर दिला जाऊन शेती व कारखानदारीचे उत्पादन मंदावले, त्यामुळे चीनला माघार घ्यावी लागली, पण सांस्कृतिक क्रांतीही संपुष्टात आली व पुन्हा उत्पादनाचा मोठा कार्यक्रम अमलात येऊ लागला. माओने मनुष्यबळाचा वापर उत्पादक कामासाठी करावयाचे ठरवून मोठमोठ्या नद्यांना येणारे पूर थांबविण्याची योजना अमलात आणली. नद्यांचे प्रवाह बदलून नुकसान होत होते त्यासाठी धरणे बांधली, प्रवाह वळविले. यामुळे एकट्या ताचाई प्रांतात ३० हजार एकर जमीन लागवडीस आली. ही जमीन पूर्वीच्या लागवडीखालील जमिनीच्या चाळीस पट होती हे लक्षात घेण्याजोगे आहे. खेड्यापाड्यांतील विद्यार्थ्यांनी जमीन कसून तांदूळ, भाजीपाला वगैरे पिकवून स्वावलंबन साधले. एकट्या ५८ ते ६० या तीन वर्षांत एक कोटी एकर जमीन बागायती झाली. ४९ सालापूर्वी क्वाँटुंग प्रांतात तीस टक्के जमीन बागायत होती. हान सुयिन सांगते की आता हे प्रमाण ९० टक्क्यांवर आहे. ४९ साली चीनमध्ये पाच टक्के जंगल होते. पण कम्युन्सनी ५८ ते ५९ या दोन वर्षांत तीनशे कोटी झाडे लावली. ज्या रीतीने जंगलवाढीचा कार्यक्रम चीनमध्ये अमलात येत आहे तो पाहता पुढील ५० वर्षांत २० टक्के भूभाग हा जंगलाचा बनेल. अन्हवेई प्रांतात तीन नद्या अडवून नऊ वर्षांत धरणे बांधण्यात आली. यामुळे साडेतीन लाख एकर जमिनीला पाणी मिळाले. यासाठी चार लाख लोक खपत होते. आणखी साडेचार लाख लोकांनी १६४ किलोमीटर नदीतील गाळ काढला. यामुळे तेरा लाख एकर जमिनीला पाणी व वीज मिळू लागली

आणि नदी नौकानयनाला उपयुक्त होऊन मच्छिमारीही वाढली. दुसऱ्या एका ठिकाणी ४८० लोकांनी आपल्या फावल्या वेळात १ लाख फळझाडे लावली आणि मिळकतही वाढविली. ३४० किलोमीटरचा कालवा स्वयंसेवक या नात्याने लोकांनीच तयार केला. साहजिकच सरकारला खर्च पडला नाही.

ही जी उत्पादनवाढ झाली, तिला भावपातळीचे नियंत्रण हे पुरक ठरले. चीनमध्ये जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती व घरभाडी माफक आहेत. तांदूळ साधारणत: आठ आणे शेर याप्रमाणे पडतो. चिनी शेतकरी व मजूर यांस महिन्याला साधारणत: ५५ पौंड धान्य मिळते. कारकुनास २८ पौंड मिळते. कापडाच्या बाबतीत चीनने प्रगती केली असली, तरी चिनी जनतेच्या कापडविषयक वाढत्या मागण्या पुरविण्याइतका कापूस पिकविणे त्यास कठीण आहे. म्हणून कृत्रिम धाग्याचे कापड बनविण्याचे कारखाने त्यास काढावे लागतील. ज्यूल्स रॉय यांना सर्वसाधारण चिनी इसमास थंडीमध्ये पुरेसे गरम कपडे घालणे अशक्य असल्याचे स्पष्ट दिसले. सर्वसाधारण माणसाचे घरही त्यांस अगदी सामान्य आढळले. पण चीनमध्ये पूर्वी जे भीषण दुष्काळ पडत होते, तसे आता पडत नाहीत आणि असंख्य लोकांना राहण्यास घरेच नव्हती, तशी आता स्थिती नाही. तथापि चीनमधील सांस्कृतिक क्रांतीने जी उलथापालथ झाली, तीमुळे शेती व कारखाने यांचे उत्पादन घटले. ब्रूले यांनी याची आकडेवारी दिली आहे. यामुळे चीन आज धान्य आयात करतो; पण ही आयात चीनला लागणाऱ्या धान्याच्या तीन टक्के आहे. शिवाय रशियाने दिलेल्या मदतीच्या बदल्यात चीनला मांस व तेल रशियास द्यावे लागे, पण कर्जाची फेड झाल्यामुळे चीनमध्ये मांस मुबलक आहे, असे ऑस्ट्रेलियन मांस निर्यातदार कबूल करतात.

हनुमान उडी (ग्रेट लीप), सांस्कृतिक क्रांती यामुळे चीनमध्ये उलथापालथ झाली. या आंदोलनांची कारणमीमांसा व उद्देश काय? निरनिराळ्या लेखकांनी निरनिराळी कारणे दिली असली तरी बहुतेकांचे एकाबाबत एकमत आहे. ते म्हणजे माओच्या उद्देशाबाबत चिनी लोक, पक्षाचे कार्यकर्ते सुखासीन बनू नयेत यावर माओचा कमालीचा कटाक्ष होता. तो केवळ चिनी समाजच नव्हे तर चिनी माणूसच बदलू पाहतो. यात भर पडली ती चीनचा इतिहास, रशिया व चीन यांचे संबंध आणि चीन व इतर जगाचे, विशेषत: अमेरिकेचे संबंध यांची. चीन हा पूर्वीपासूनच शेतीप्रधान देश. क्रांती झाल्यावर रशियाचा आदर्श पुढे ठेवावा अशी भूमिका लिऊ शाओ ची यांनी घेतली होती. या मताचा पुरस्कर्ता वर्ग चिनी कम्युनिस्ट पक्षात होता व आजही आहे. याचीच दुसरी बाजू म्हणजे रशियाचे कम्युनिस्ट जगातले पुढारीपण मानून त्याच्याशी सहकार्य करावे अशी मागणी करणाराही वर्ग हा लिऊ शाओ ची यांचा पाठीराखा होता. आजही रशियाशी जमवून घेण्याची तरफदारी अल्प प्रमाणात करणारा गट आहे. व्हिएतनामबाबत दोन्ही देशांबाबत समान भूमिका घेऊन अमेरिकन 'साम्राज्यवादा'विरुद्ध आघाडी करावी असे क्रुश्चॉवच्या पाडावानंतर

रशियन नेत्यांचे म्हणणे होते. त्यांना प्रतिसाद देणारा मोठा गट चीनमध्ये होता. माओनंतर रशियाशी जमवून घेण्याचे प्रयत्न चीनकडून होणारच नाहीत असे नव्हे, असे या काही लेखकांचे म्हणणे आहे. पण माओने ही भूमिका मान्य केली नाही. त्याने स्वत:चा स्वतंत्र मार्ग काढण्याचा आग्रह धरला आणि रशियाशी सख्य केले नाही. अमेरिका आणि रशिया या दोन्हींविरुद्ध त्याने प्रचार आघाडी उघडली. त्यानंतर आता परिस्थिती बदलली असून चीन व अमेरिका यांचे संबंध प्रस्थापित झाले आहेत.

चीन व रशिया यांच्या संघर्षाची व चीन-अमेरिका यांच्यातील वादंगाची मीमांसा करताना भारत सरकारातील एका सेवानिवृत्त झालेल्या व केंद्रीय सत्तास्थानाशी जवळ असलेल्या अधिकाऱ्याने सांगितले होते की, चीनने रशियास विरोध जाणूनबुजून केला. यामुळे त्याने रशियाला आग्नेय आशियात पायबंद घातला. कम्युनिस्ट देशांत दुफळी निर्माण करून रशियाच्या तेथील प्रभावास शह दिला. पण तिकडे अमेरिकेविरुद्धही त्याने आकांडतांडव चालूच ठेवले होते. परंतु व्हिएतनामला मर्यादितच मदत केली, अमेरिकेशी प्रत्यक्ष संघर्ष होऊ दिला नाही. तिकडे अमेरिकनांना वाटू लागले की, चीन रशियाविरुद्ध आहे तेव्हा याचा फायदा घेऊन चीनशी जमवून घ्यावे आणि या दोन कम्युनिस्ट देशांतील फाटाफूट वाढवावी म्हणजे रशियाही आपल्याशी नीट वागेल. पुढे झाले तसेच. पण चीनचा अमेरिकेला विरोध हा एक देखावा होता. चीनला अमेरिकेशी व्यापार-व्यवहार वाढवावयाचा आहे. अमेरिकेचे तंत्रकौशल्य व जमल्यास आर्थिक सहकार्यही त्यास हवे होते. ते त्यास आता मिळाले. या अधिकाऱ्याची ही मामांसा मान्य केली तर चीन व रशिया यांचे पुढे जमणारच नाही असे नव्हे. माओ हा सध्याच्या रशियन राज्यकर्त्यांपेक्षा ज्येष्ठ आहे आणि तो रशियाचे पुढारीपण मान्य करू शकत नाही. हा व्यक्तिगत अभिमान आणि एकंदरच नव्या समाजरचनेविषयी वेगळी कल्पना यामुळे माओने रशियाशी भांडण मांडले. याने त्याचा तोटा झाला. नाही. आज जागतिक राजकारणाची अमेरिका व रशिया ही दोनच केंद्रे राहिली नसून तिसरे चीन हेही केंद्र तयार झाले आहे.

माओच्या मते रशिया हा क्रांती स्थिरावल्यानंतर सुखासीन बनू लागला. मोठमोठे कारखाने, उपभोग्य मालाची वाढती मागणी इत्यादीही त्याच्या दृष्टीने या सुखासीनतेची लक्षणे होती. माओला हे मान्य नाही. त्याला व्यक्तिगत जीवन नष्ट करावयाचे आहे; व्यक्ती ही समष्टीत विलीन झाली पाहिजे हा त्याचा आग्रह आहे. प्रत्यक क्रांतिकारकाला वा समाज आमूलाग्र बदलून नवी रचना करू पाहणाऱ्याला सत्ता हाती आल्यावर सतावणारा हा नेहमीचा प्रश्न आहे. लेनिनलाही रशियन कम्युनिस्ट पक्ष नोकरशाहीकडे वळल्याची जाणीव झाली होती. पण काही बदल करण्यापूर्वीच तो निधन पावला. महात्मा गांधींना काँग्रेसचे विसर्जन हवे होते. त्यांनाही ते जमले नाही. माओने संपूर्ण यश मिळविले नसले

तरी गेल्या वीस वर्षांत त्याने चिनी कम्युनिस्ट पक्षास दोन हादरे दिले. नोकरशाहीचा वरचष्मा होऊ न देण्याचा त्याने प्रयत्न केला व चालविला आहे. त्याने शिक्षणपद्धती बदलली. स्टालिनच्या राजवटीतही पीटर राजाचा इतिहास शिकविला जात होता, पण माओने चीनचा पूर्वीचा इतिहास शिकविण्यास मनाई केली. जुनी वस्तुसंग्रहालयेसुद्धा बंद केली. माओचे म्हणणे असे की, पाटी कोरी असली की तिच्यावर उत्तम कविता लिहिता येईल. याच उद्देशाने त्याने लष्करातील अधिकारही रद्द केले. मेहनर्ट म्हणतात की, रशियात सरकारी कचेऱ्यांमध्ये फायलींचे डोंगर असतात. चिनी सरकारी कचेऱ्यांत फायली अगदीच कमी. नोकरशाहीचे साम्राज्य कमी करण्याचा हा प्रयोग आहे.

माणूस पूर्णत: बदलण्यासाठी चाललेल्या या प्रयोगाची किंमत काय? किंमत मोठी द्यावी लागली. अनेकजण मृत्यू पावले. शिक्षणक्रमच बंद पडला. मालमत्ता नष्ट झाली. आर्थिक, सामाजिक व राजकीय जीवन खिळखिळे बनले. माओची पत्नी या क्रांतीची मोठी पुरस्कर्ती. लिन पिआओ हाही त्यातलाच होता. पण आता लिन पिआओ हा साहसवादी ठरला आहे. ज्या न्यायाने लिन पिआओ हा साहसवादी त्याच न्यायाने माओच्या पत्नीलाही साहसवादासाठी शासन हवे. पण माणूस बदलण्यासाठी निघण्यास सिद्ध झालेल्या माओच्या राज्यातही सर्वजण समान नाहीत हाच याचा अर्थ.

या सांस्कृतिक क्रांतीच्या काळात माओचे विभूतिकरण मोठ्या प्रमाणावर सुरू झाले. सध्या ते थोडे मंदावले आहे. एडगर स्नो हा माओचा मित्र. त्याने माओला या विभूतिकरणाबद्दल प्रश्न केला होता तेव्हा त्याने स्पष्टच सांगितले की, समाजपरिवर्तन करताना याची गरज असते. याबाबतीत काही वेळा अतिरेक झाला. पण इलाज नव्हता असे सांगून माओ म्हणाला, अखेरीस भक्ती करणे वा करून घेणे याची प्रत्येकालाच इच्छा असते. (मानवी स्वभाव बदलण्यास निघालेल्या माओला याबाबतीत बदल करावासा वाटला नाही!)

मेहनर्ट यांनी विभूतिपूजेची अनेक उदाहरणे दिली आहेत. ऑपरेशन करण्यापूर्वी डॉक्टरने माओचे स्मरण करणे हे क्रांतीचे लक्षण नसून केवळ विभूतिपूजा आहे. माओने बौद्धिक बंडखोरीचा पुरस्कार केला. पण प्रत्यक्षात मात्र लोकांना बौद्धिक गुलाम बनविले.

या क्रांतीच्या काळात लिऊ शाओ चीविरुद्ध वातावरण पेटले. लिन पिआओ पुढे आला. तोही खतम झाला. पण चौ एन लाय यांनी समतोल कायम टिकविला व त्यांचे वर्चस्व आता वाढले आहे. सरकारी राज्ययंत्रणा अगदीच मोडकळीला येऊ न देण्यास चौ एन लाय हे कारणीभूत आहेत. या क्रांतिकाळात चीनने मोठा क्रांतीचा पवित्रा घेतला. समाजवाद्यांविरुद्ध प्रचार आघाडी उघडली, पण हाँगकाँगवर हल्ला केला नाही. हाँगकाँगमधून

परदेशी चलन चीनला मिळते. तेव्हा ही पाइपलाइन बंद करण्याचा त्याचा इरादा नाही. तसेच इतर देशांतले चिनीही मोठ्या प्रमाणावर परकी चलन धाडतात. या सांस्कृतिक क्रांतीच्या काळात चीनने लढाऊ पवित्रा घेतला होता तरीही 'साम्राज्यवादी' म्हणून ठरविलेल्या देशांशीही चीनचे व्यापारी संबंध चालूच होते. ब्रूले लिहितात की, प. जर्मनीतील क्रप, डेमाग वगैरेसारख्या मोठमोठ्या कारखानदारांचे चीनमध्ये व्यापारी एजंट होते. एका वर्षात चीन व प. जर्मनी यांचा व्यापार ५ कोटी डॉलर्सनी वाढला. ऑस्ट्रेलिया, इटली यांच्याशीही चीनचे आर्थिक संबंध वाढले. ब्रिटनचा व्यवहारही असाच मोठा आहे. चीनने अविकसित देशांशी आर्थिक मदतीचे करार केले व तांत्रिक मदतही दिली. तांत्रिक क्षेत्रात चीनची प्रगती बरीच झाली असून त्यास लागणाऱ्या यंत्रसामग्रीपैकी ९० टक्के सामग्री स्वदेशी असते. रशियाचे सर्व कर्ज त्याने फेडले असले तरी रशियाची आर्थिक व तांत्रिक मदत चीनला अतिशय मोठ्या प्रमाणात झाली. विशेषत: वैज्ञानिक क्षेत्रात चीन रशियावर अवलंबून होता. पण रशियाशी बिनसल्यावर त्याने पूर्व युरोप, जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड येथून वैज्ञानिक वाङ्मय आयात करण्यास सुरुवात केली.

असा हा चीन या शतकाच्या अखेरीस एक प्रचंड औद्योगिक व लष्करी सत्ता होईल असा निष्कर्ष या पाच ग्रंथांचे लेखक काढतात. पण माओने जे हे परिवर्तन घडवून आणले त्यासाठी व्यक्तिगत स्वातंत्र्याची किंमत द्यावी लागली. चीनमध्ये व्यक्तीला काही स्वातंत्र्य नाही. स्वत:च्या आईला आपल्या घरी राहावयास आणावयाचे असले तरी सरकारी परवानगी लागते. त्यातही सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो. माओने उत्पादनवाढीचे आंदोलन यशस्वी केले. पण माणूस सुखासीन होऊ नये, त्याने सुख, आराम यांची इच्छाच धरू नये ही जी त्याची अपेक्षा आहे व त्या दृष्टीने त्याने जे प्रयत्न चालवले ते त्याच्या हयातीत नाही, पण नंतर फोल ठरणार हे उघड आहे. मानवी स्वभाव असा बदलता येणार नाही. पण मागासलेल्या देशातील मनुष्यशक्तीचा उपयोग आर्थिक विकासासाठी कसा करावा याचे माओ याने उदाहरण घालून दिले आहे. व्यक्तिस्वातंत्र्याची किंमत न देता हा प्रयोग आपणही करू शकतो. पण त्यासाठी वरपासून खालपर्यंत एका ध्येयाने प्रेरित असे नेतृत्व लागते.

२२-७-१९७३

चिनी प्रचारयंत्रणा

आकाशवाणी, दूरचित्रवाणी, वृत्तपत्रे इत्यादी प्रचाराच्या साधनांचा उपयोग कम्युनिस्ट तसेच फासिस्ट राष्ट्रांत अत्यंत मोठ्या प्रमाणावर होत असतो. हिटलरने या साधनांचा उपयोग करून घेतला. तसाच स्टालिननेही. आज माओ तेच करीत आहे. परंतु या प्रचारमोहिमेने अखेर काय साधले? या प्रश्नाचे उत्तर श्री. लिऊ यांनी आपल्या चीनविषयक अभ्यासात देण्याचा प्रयत्न केला आहे.

कोठल्याही समाजाच्या उत्पादनाच्या साधनांची जी पातळी वा अवस्था असेल त्याच्याशी सुसंगत होईल अशी त्या समाजातील व्यक्तींची जाणीव असते. समाजाची भौतिक व बौद्धिक पातळी यात सुसंवाद असतो, असे मार्क्सच्या सिद्धन्ताचे सार सांगता येईल. लेनिनने यापेक्षा वेगळा मार्ग पत्करला. मानवी जाणीव ही राजकीय प्रभावाखाली बदलता येते, असे लेनिनचे मत होते. म्हणून त्याने व नंतर स्टालिनने प्रचारावर विलक्षण भर दिला. प्रचाराची सर्व साधने सरकारच्या हाती ठेविली गेली. साहित्य व नाट्य यांनासुद्धा सरकारी प्रचारयंत्रणेला जुंपण्यात आले. स्टालिनच्या ऐवजी ट्रॉटस्की आला असता, तरी फरक पडला नसता; कारण साहित्य हे हत्यार आहे व शत्रूच्या हाती ते असता कामा नये, असे त्याचेही मत होते. माओने हाच पंथ स्वीकारून चीनमध्ये सत्ता हाती आल्यावर प्रचाराचा धूमधडाका उडविला.

प्रचाराच्या बाबतीत नोकरशाही विशिष्ट गतीने जात असते, पण माओला ही गती मान्य नव्हती. त्याने खेड्यापाड्यापासून प्रचार सुरू केला व तो मोठ्या प्रमाणावर होऊ लागला. वृत्तपत्रे, आकाशवाणी, सभासंमेलने, परिषदा यातून हे होत होते. याचा उपयोग आर्थिक क्षेत्रात हनुमान उडी घेताना होईल, असा माओचा अंदाज होता. पण तो फसला. त्यानंतर सांस्कृतिक क्रांतीच्या काळात माओने प्रचारयंत्रणेचा अत्यंत व्यापक स्वरूपात उपयोग केला. माओच्या विचारांनी चीन भारून गेला. पण सांस्कृतिक क्रांतीही यामुळे यशस्वी झाली असे नव्हे.

या स्थितीत चीनने एवढा उग्र, व्यापक प्रचार सातत्याने करून काय साधले? प्रचार-साधनांचा उपयोग काय झाला? लिऊ यांनी याचा तपशीलात विचार करून काही निष्कर्ष काढले आहेत. त्यांचे म्हणणे असे की रशिया व चीन यांत क्रांती होऊन कम्युनिस्ट सत्ता प्रस्थापित झाली, तेव्हा दोन्ही देश मागासलेले होते. त्यांच्यात एकसंधता नव्हती. चीनमध्ये तर निरनिराळे प्रांत अगदी स्वतंत्रपणे वागत. पण कम्युनिस्ट सत्ता

स्थापन होऊन प्रचाराची साधने मोठ्या प्रमाणात वापरण्यात येऊ लागली व नियंत्रित केली गेली तेव्हा साऱ्या देशभर एकसाची विचार पसरू लागले. एकाच प्रकारची माहिती प्रसृत होऊ लागली. रशिया व चीन या दोन्ही देशांत केंद्रसत्ता कधी प्रबळ नव्हती तेवढी ती कम्युनिस्टांनी केली. त्यांनी राजकीय सत्ता व प्रचारयंत्रणा यांच्याद्वारे देशात एकसंधता आणली. कॉकेशस पर्वताच्या भागातील माणूस जे वाचणार वा ऐकणार तेच युक्रेनमधील वाचणार व ऐकणार. चीनच्याही निरनिराळ्या विभागात असेच घडले व घडते. यामुळे दोन्ही देशांत एकसंधता आली.

परंतु लिऊ यांचा चीनबाबत निष्कर्ष असा, की ही एकसंधता येऊनही चीनमध्ये ज्या बोली आहेत त्या टिकूनच आहेत. सांस्कृतिक क्रांतीच्या काळात निरनिराळ्या प्रांतातील लोक एकत्र येत तेव्हा ते बोलीभाषा वापरीत व त्यामुळे भाषिकदृष्ट्या तो समाज एक झाला नाही. अजूनही तीच परिस्थिती आहे. सर्व चीनची एकच एक लेखी व बोलीभाषा अशी अवस्था अद्याप निर्माण व्हावयाची आहे.

चिनी प्रचाराचा आणखी एक परिणाम झाला व तो म्हणजे उग्र व तीव्र स्वरूपाची राष्ट्रवादी भावना वाढीला लागली. चीनमध्ये सतत अमेरिकन 'साम्राज्यवादा'विरुद्ध विलक्षण प्रचार चालू होता. हा साम्राज्यवाद चीनमधील कम्युनिस्ट राजवट नष्ट करणार आहे, तो चीनविरोधी आहे इत्यादी प्रचार होत असे. यामुळे चिनी जनतेचे राष्ट्रावरील प्रेम वाढण्यासच नव्हे तर राष्ट्रीय अहंकार वाढण्यास मदत झाली. रशियातही हेच झाले. रशिया व चीन हे दोन्ही देश कम्युनिस्ट राजवटीत सर्वात अधिक राष्ट्रवादी बनावे हे लक्षात ठेवण्याजोगे आहे.

लिऊ यांनी चिनी प्रचारतंत्राचा केलेला हा अभ्यास चीनच्या मानसिक ठेवणीची कल्पना देण्यास उपयुक्त ठरेल.

७-४-१९७३

सांस्कृतिक क्रांती

चीनमधील सांस्कृतिक क्रांती हा अनेकांच्या अभ्यासाचा विषय आहे. अमेरिकेत यासंबंधी झालेल्या परिसंवादानंतर विविध प्रश्नांसंबंधी दहा अभ्यासकांनी आपले निबंध लिहिले व लिंडवेक यांनी ते संपादित करून हा ग्रंथ तयार केला. अर्थात लिन पिआओ व लष्कर, तसेच चीन आणि जागतिक संबंध इत्यादी विषयांवरील निबंध आता कालबाह्य झाले आहेत. परंतु त्याही विषयांची पार्श्वभूमी समजण्यास या ग्रंथातील निबंध उपयुक्त आहेत.

चिनी कम्युनिस्ट पक्षाचा विशेष हा, की चीनमध्ये राष्ट्रीय प्रतिकार मोहीम व यादवी झाली तेव्हा कम्युनिस्ट पक्ष आघाडीवर होता. जनतेत इतका मिसळलेला पक्ष रशियालाही मिळाला नव्हता. साहजिकच युद्धोत्तर काळात माओने चँग कै शेकचा पाडाव केला तेव्हा तो व त्याचा पक्ष हा कोणी उपटसुंभ असून रशियाच्या मदतीवर तो राज्य करतो अशी भावना चिनी जनतेत निर्माण झाली नाही.

माओ व त्याची धोरणे ठरविण्याची पद्धती याविषयींचा या ग्रंथातील निबंध विशेष उल्लेखनीय ठरेल. माओ हा त्याच्या सर्व सहकाऱ्यांपेक्षा उच्चासनावर आहे. तो जसा वास्तववादी आहे त्याचप्रमाणे विशिष्ट ध्येयाने झपाटलेला आहे. त्याचे सहकारी, लोक आणि नोकरशहा या तीन घटकांशी त्याचे संबंध जवळचे असतात, पण त्याचवरोवर तो अलिप्तही असतो. या तिन्ही घटकांपैकी एक वा दोघांना जवळ करून तो तिसऱ्या घटकाला धक्के, हादरे देत असतो. पण यात सर्वात अधिक धक्के बसतात ते नोकरशहांना आणि त्यानंतर लोकांना. तसे पाहिले तर राष्ट्रीय व प्रांतिक पातळीवरील कम्युनिस्ट पक्षाचे नेतृत्व हे साधारणत: टिकाऊ आहे. त्यात फार मोठे बदल क्वचित झाले. नोकरशहांना हादरे बसत असल्याने ते मात्र माओने वारंवार बदल करू नयेत अशी अपेक्षा करतात. माओ हा एक स्वप्नवादी आहे आणि देशातल्या गरिबातल्या गरिबाशी आपले काही नाते आहे अशी त्याचीं भावना असून या गरीब जनतेसाठी तो निरनिराळ्या घटकांना हादरे देतो. नोकरशाहीवर नियंत्रण ठेवण्यासाठी माओला सर्व क्षेत्रातील फार मोठी माहिती सतत मिळवावी लागते. तरीही अनेक बाबतीत आपल्याला माहिती कळविलेली नाही, अनेक निर्णय आपल्याला माहीत नसतात अशी तक्रार तो करतो. सर्वच वेळा माओ यशस्वी झाला असे नव्हे. पण लोकांशी आपला संबंध तुटणार नाही, सामान्य जनतेच्या हिताचा

विचार करणारा व त्याप्रमाणे उपाय योजणारा नेता ही आपली प्रतिमा डागळणार नाही अशी काळजी तो घेत असतो.

कम्युनिस्ट पक्षाच्या हाती सत्ता आल्यावर माओने सर्व समाज व जुने व्यक्तित्त्व बदलण्याचा प्रयोग सुरू केला. पण देशाच्या अर्थव्यवस्थेत बदल करतानाही त्याने धाडसाबरोबरच व्यवहारी दृष्टी ठेवली आहे. अनेक उद्योग, अनेक वस्तूंचा व्यापार सरकारने ताब्यात घेतला खरा; पण त्यांचे व्यवस्थापन हे जुन्या भांडवलदारांकडे व व्यापाऱ्यांकडे ठेवले हे येथल्या बोलघेवड्या जहालांनी लक्षात ठेवावयास हवे. साठ सालपर्यंत पन्नास टक्क्याहून अधिक उद्योग व व्यापार या रीतीने जुने भांडवलवाले व व्यापारी यांच्याच व्यवस्थापनेखाली होता. याचा परिणाम व्यापार व उद्योग वाढण्यात व लोकांना उद्योग मिळण्यात झाला.

शेतीला माओने प्राधान्य दिले त्याचप्रमाणे हस्तव्यवसायाला. याचा अर्थ मोठे उद्योग तेथे नाहीत असे नव्हे. तेही मोठ्या प्रमाणावर आहेत. पण शेतीची सुधारणा करून जास्तीत जास्त लोकांना त्याने शेतीत, कामात गुंतवून ठेवले आहे. याविषयी अनेक लेखकांनी तपशीलवार माहिती अनेक ग्रंथांतून दिली असून या ग्रंथात नाविन्यपूर्ण माहिती या संबंधात आहे असे नव्हे. चीनमधील हस्तव्यवसाय व ग्रामोद्योग यांचे वैशिष्ट्य हे की ते किफायतशीर आहेत व त्यातून भांडवल तयार होते. येथल्याप्रमाणे सरकारी मदतीवर खादी, ग्रामोद्योग चालून काही जणांची चंगळ चालत नाही.

समतेचे ध्येय माओने पत्करून त्यासाठी सांस्कृतिक क्रांतीचा धक्का त्याने दिला असला तरी अशी समता साध्य करणे त्यालाही जमलेले नाही. शिक्षणाचेच उदाहरण घेतले तर याची कल्पना येईल. शिक्षण मोफत आहे, सार्वत्रिक आहे हे खरे. पण म्हणून माध्यमिक शाळा, महाविद्यालये व विद्यापीठे यात झुंबड उडाली असे नव्हे. हजारो विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षणापलीकडे शिक्षण नाही. उठेल तो विद्यापीठाचे शिक्षण घेतोच असे नव्हे. शिक्षणक्रमातही चीनने आमूलाग्र सुधारणा केली असून केवळ पुस्तकी शिक्षण घेऊन पदवी घेण्यास महत्त्व ठेवलेले नाही. डॉक्टरांचे उदाहरण घेतले तर असे दिसेल की डॉक्टरीचे शिक्षण घेण्यास वेळ व पैसा लागतो. म्हणून वैद्यकीचे किमान शिक्षण देऊन खेड्यापाड्यात वैद्यकीय उपचारांची सोय सार्वत्रिक करण्यात आली. विद्यार्थ्यांना व्यवसाय व लोकांची सोय अशी दुहेरी व्यवस्था झाली.

माओने मागे एक लेख लिहून रशियात विषमता मोठ्या प्रमाणावर असल्याची टीका केली होती. म्हणून त्याने निरनिराळे विभाग, गट यात समता स्थापन करण्याचे धोरण स्वीकारले. पण त्यात तो पूर्णतः यशस्वी झालेला नाही. या संदर्भात या ग्रंथातील

चीनमधील प्रांतिक नेतृत्व हा निबंध पाहण्यासारखा आहे. त्यावरून असे दिसेल, की चीनमध्ये केंद्रसत्ता बदलली असली, तरीही प्रांतांना अधिकार द्यावेच लागतात. तथापि तेवढ्याने स्थानिक नेतृत्वाचे प्रश्न सुटत नाहीत. त्या नेतृत्वाकडून आर्थिक व राजकीय क्षेत्रात अधिकाधिक सत्तेची मागणी चालू असते आणि केंद्राकडे ती सतत नोंदविली जाते. आपल्या विशिष्ट विभागात धरण, उद्योगधंदे इत्यादी प्रकल्प कसे येतील, याविषयी स्थानिक नेतृत्व जागृत व प्रयत्नशील असते. काही राज्ये तर परदेशांशीही व्यापारव्यवहार करण्याची मागणी करतात. एखाद्या राज्यात समजा भुईमुगाचे उत्पादन वाढले, तर त्याला अन्नधान्य व कापड कमी उत्पन्न करता येते. मग केंद्र सरकारकडे ते राज्य या वस्तूंची सतत मागणी करते. कारखानदारी व शेती या दोन्ही बाबतीत पुढारलेली राज्ये आहेत, तर काही राज्यांत ही दोन्ही पूर्वापार मागासलेली असून, त्यांची सुधारणा करणे हे एक आव्हानच आहे. ही पुढारलेली राज्ये मग केंद्रसत्तेवर प्रभाव गाजवू पाहतात. अर्थात हे एका मर्यादिपर्यंत शक्य होते. माओचे जबरदस्त व्यक्तित्त्व आणि त्याने निर्माण केलेली केंद्रीभूत सत्ता ही या अलगतावादी प्रवृत्तींना पायबंद घालणारी मोठी शक्ती आहे. शिवाय राज्यातील कम्युनिस्ट पक्षाचे नेतृत्व हे साधारणत: टिकून असल्याने त्याच्यातर्फे केंद्रसत्ता अधिक सुसूत्रता आणू शकते. तरीही अधिक घटक राज्यांनी स्पर्धा करणे, स्वत:च्या मागण्या पुढे करून इतरांची अडवणूक करणे हे सर्व येथे चालू आहे तसे ते चीनमध्येही आहे. पुढारलेल्या राज्यांच्या अनेक मागण्या मान्य होण्यास तसा विलंब लागत नाही. तसेच धान्य व मीठ यांच्या रूपाने शेतीवरील कर वसूल केला जात असल्याने सार्वजनिक वाटपासाठी सरकारपाशी या जीवनावश्यक वस्तूंचा निश्चित साठा राहतो.

नोकरशाही व पुढारी यांच्यात मतभेद होऊन वातावरण तंग होण्याचे प्रमाणही कमी नाही. सांस्कृतिक क्रांतीची कल्पना यामुळेही जोर धरू लागली. शिवाय चीनमध्ये विकासाच्या योजना अमलात येऊन लोकांची स्थिती सुधारू लागताच काही तणाव उत्पन्न होऊ लागले. प्रांतिक नेतृत्वात स्पर्धा वाढली व त्याचबरोबर व्यक्तिगत अपेक्षा वाढून महत्त्वाकांक्षा निर्माण झाल्या. यावर उपाय म्हणूनही चीनने सांस्कृतिक क्रांतीचा आश्रय घेतला.

पक्षातील जहाल व मवाळ यांच्यातल्या संघर्षात आपण जहालांच्या बाजूचे असल्याची प्रतिमा माओने तयार केली असली तरी या संघर्षापायी कम्युनिस्ट पक्षच मोडकळीस येईल, दुर्बल बनेल असे धोरण माओ स्वीकारीत नाही. परंतु एवढे करूनही सांस्कृतिक क्रांतीचा शिक्षणक्षेत्रावर चांगला परिणाम झाला असे नव्हे असे एक निबंधलेखक म्हणतो. वारंवार अभ्यासक्रम, पद्धती व शिक्षक बदलल्यामुळे शिक्षणक्षेत्रात पुढाकार न घेण्याकडे प्रवृत्ती वाढली. निर्णय घेण्यास सहसा कोणी तयार होत नाहीत. यामुळे चीनने

शिक्षणपद्धती बदलली असली तरीही शिक्षणविषयक नवे प्रश्न मात्र त्याने निर्माण केले आहेत.

आधुनिक काळात एवढ्या प्रचंड लोकसंख्येच्या देशाच्या आधुनिकीकरणाचे प्रश्न नव्या मागनि माओ सोडवीत असताना त्याने अर्थातच विरोध व विरोधक यांना वाटेला लावले आहे. त्याचा भर जनतेच्या उत्स्फूर्त सहकार्यावर होता व आहे. जनतेची आंदोलने घडवून आणणे, मोठ्या प्रमाणावर जनतेने एखाद्या प्रकल्पात सहभागी होणे याची माओला हौस फार. पण उत्स्फूर्ततेचे प्रदर्शन महत्त्वाचे बनून प्रत्यक्ष कार्यसिद्धी, फलप्राप्ती गौण ठरली. शिवाय इतपत लोकांची उत्स्फूर्त निदर्शने, आंदोलने होऊनही माओ हा सतत जनतेत राहणारा नेता बनला असे नव्हे. जनआंदोलनावर माओचा इतका विश्वास असूनही तो जनतेपासून अलिप्त राहू शकतो हे एक विलक्षण दृश्य आहे. सरकारची सत्ता अधिक सर्वंकष होते त्याप्रमाणात ही सत्ता राबविणारा सत्ताधीश हा अलग व एकाकी पडावा ही एक मानवी व्यवहारातील विसंगती आहे.

अशा रीतीने चीनच्या सांस्कृतिक क्रांतीचे नियंत्रण कशा रीतीने झाले, तीमधून कोणते प्रश्न उपस्थित झाले याची विविध दृष्टीतून चिकित्सा करणारा हा ग्रंथ अभ्यसनीय बनला आहे.

१५-६-१९७४

सांस्कृतिक क्रांतीची पूर्वपीठिका

मॅकफारकर पतिपत्नी ही चीनविषयक तज्ज्ञ आहेत. श्री. मॅकफारकर यांनी चीनमधील सांस्कृतिक क्रांती हा गेली दहा वर्षे अभ्यासाचा विषय केला आणि त्यावर तीन खंड लिहिण्याचा संकल्प त्यांनी सोडला. त्यापैकी १९५६-५७ हा सांस्कृतिक क्रांतीच्या पूर्वतयारीचा कालखंड असून पहिल्या खंडाचा तोच विषय आहे. सांस्कृतिक क्रांतीची पूर्वपीठिका त्यांनी या खंडात निवेदन केली असून अगदी बारीकसारीक तपशीलही दिला आहे.

या पहिल्या खंडात मॅकफारकर यांनी ५६-५७ सालातील चीनचा परिपूर्ण इतिहास सादर केला असे नव्हे. पण या काळातील घडामोडींचा चीनच्या नेत्यांच्या विचारावर, कृतीवर काय परिणाम झाला आणि या नेत्यांच्या विचारांचा चीनच्या इतिहासावर काय परिणाम झाला याचा ऊहापोह लेखकाने केलेला आहे. चीनचे अनेक नेते दीर्घकाळ एकमेकांची साथ करीत आले आहेत. पण सांस्कृतिक क्रांतीच्या कालखंडात या नेत्यांनी चिनी क्रांतिकार्यात जो भाग उचलला तोच नाकारण्यात आला. अनेकांच्या भूमिकांचा विपर्यास होऊन ते राजकारणाच्या पटावरून दूर फेकले गेले. यात ज्याप्रमाणे लिऊ शाओ ची व नंतर लिन पिआओ यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्यांचा समावेश होतो त्याचप्रमाणे शेकडो कार्यकर्त्यांचाही. तथापि एक गोष्ट मात्र लक्षात घ्यावयास हवी व ती ही की स्टालिनने जेवढ्या प्रमाणावर हत्याकांड करून सुमारे एक कोटी लोक मारले, यमयातना भोगण्यासाठी सैबेरियात धाडले, तेवढ्या प्रमाणात माओने हत्याकांड केले नाही. तरीही चीनने अधिकृतरीत्या कबूल केल्याप्रमाणे लाखभर लोक मारले गेले आणि सुमारे तीन ते चार लाख लोकांवरील प्रतिगामित्वाचा शिक्का कालांतराने रद्द झाला.

माओ, चौ एन लाय, लिऊ शाओ ची, चुथे, मार्शल चेन यी इत्यादी काही चिनी क्रांतीचे नेते. पंचवीस वर्षे त्यांनी एकत्र काढली. चिनी क्रांतीनंतर माओ हा जरी सर्वांचा नेता झाला तरी स्टालिनप्रमाणे तो सर्वाधिकारी बनला नाही. बऱ्याच वर्षांनंतर लिऊ शाओ ची व लिन पिआओ हे अस्तंगत झाले. पण तत्पूर्वी माओबरोबर ते दीर्घकाळ होते. मॅकफारकर यांनी लिऊ व माओ यांच्यातील मतभिन्नतेवर भरपूर पुराव्यानिशी प्रकाश टाकताना माओच्या विचारातील परस्परविरोध स्पष्ट केला आहे. माओला व्यक्तिगत असे प्रभावशाली नेतृत्व असावे असे वाटत होते. पण त्याचबरोबर विकेंद्रीकरणाचाही तो पुरस्कार करीत होता. स्टालिनच्या ६० व्या वाढदिवशी माओने प्रभावी व्यक्तिमत्त्वाच्या नेतृत्वाचे महत्त्व

प्रतिपादन केले होते. याउलट लिऊचे मत होते. तो स्टालिनचा भक्त असला, स्टालिनशाही त्याला मान्य असली, रशियन आर्थिक रचना त्याला पसंत असली तरी रशियात स्टालिनचे जे स्थान ते तो माओला चीनमध्ये देऊ पाहात नव्हता. त्याने म्हटले, की माओ हा जरी चिनी कम्युनिस्ट पक्षाचा नेता असला तरी त्यानेही पक्षाचे ऐकले पाहिजे.

माओ सर्वाधिकारी बनला नसल्याने लिऊ वगैरे त्याला पॉलिटब्यूरोत उघड विरोध करीत. अनेक प्रसंग असे येत की माओ हा अल्पमतात जाई. पण अल्पमतात जाऊनही माओने आपला पंथ कधी सोडला नाही. उलट राजकारणाचे फासे त्याने असे टाकले की पुढे बहुमतच त्याच्या बाजूला होऊन तो सर्वाधिकारी बनला. पण तसा तो जोपर्यंत बनला नव्हता तेव्हा लिऊसारखे सहकारी, अनेक कार्यकर्ते, योजनाकार इत्यादींशी माओला झगडावे लागले.

माओ व लिऊ यांच्या विचारसरणीत, प्रवृत्तीत फरक होता. माओ हा रचनाकार व क्रांतिकारक असा दोन्ही आहे. तो कवी आहे तितकाच तो निर्घृण व्यवहारी आहे. कवीच्या प्रतिभेने तो अनेक चित्रे रंगवितो आणि ती साध्य करण्यासाठी तो उलथापालथ करून सारा देश ढवळून काढण्यास मागेपुढे पाहात नाही. माओ हा अनेकदा अराजकवादी झाल्यासारखा दिसतो. सांस्कृतिक क्रांती वा त्यापूर्वीची हनुमान उडी ही अराजकाकडे नेणारी होती. पण या अराजकालाही आवर घालण्यात माओ हा चौ एन लायच्या साहाय्याने यशस्वी झाला. माओपेक्षा लिऊची प्रवृत्ती वेगळी. तो मॉस्कोत शिकला होता आणि मार्क्सवादाचे पद्धतशीर धडे त्याने गिरवले होते. तो व्यक्तिगत नेतृत्वापेक्षा पक्षाला मानणारा होता. त्याने पक्षाला एवढे प्राधान्य दिले होते, की स्वत:ला तो अगदीच नगण्य करून टाकावयास तयार होता. यामुळेच माओचे व्यक्तिमहात्म्य वाढविणे त्याला मंजूर नव्हते. माओला चेअरमन म्हणून संबोधण्यात येऊ लागले तेव्हा त्याने विचारले, चेअरमन ही काय भानगड आहे. येथे चेअरमन कोणी नाही.

लिऊचे जे साहाय्यक होते तेही माओवर टीका करीत. खुद्द पेकिंग पीपल्स डेलीत माओच्या विचारसरणीवर कडक टीका करण्यात आली होती व या टीकेची प्रेरणा लिऊने दिलेली होती. त्याला एक काळ वर्तमानपत्रे ही पाश्चात्य देशातील वर्तमानपत्रांसारखी मुक्त असावी, त्यांनी मोकळेपणाने टीका करावी असे वाटत होते. यामुळेच पीपल्स डेलीत टीका आली असेल. पण माओ त्यामुळे संतप्त झाला आणि पीपल्स डेली वाचण्याचेही त्याने काही काळ सोडून दिले. लिऊ व माओ यांच्यात मतभेद होता तो चीनची पुनर्रचना कशी करावी यासंबंधी. लिऊ हा रशियाचे अनुकरण करावे या मताचा होता. माओचे तसे मत नव्हते. चौ एन लाय यांची मनोवृत्ती वेगळी. त्यांचे मन लवचिक असून बुद्धिमत्ता, कष्ट आणि मुत्सद्देगिरी ही त्यांची वैशिष्ट्ये. या जोरावर ते अनेक कठीण प्रसंगातून वाचले व

त्यांनी पक्षालाही वाचविले. हनुमान उडी व सांस्कृतिक क्रांती यांचा अतिरेक चालू असता चौ एन लाय यांचे मन विचलित झाले नाही. भरकटलेले तारू किनाऱ्याला लावण्यात त्यांचा फार मोठा वाटा आहे.

क्रांतीनंतर माओने सामुदायिक शेतीवर भर दिला. सामुदायिकीकरण बऱ्याच मोठ्या प्रमाणावर झाले असतानाच विसावी आंतरराष्ट्रीय काँग्रेस भरली आणि तीत क्रुश्चॉव यांनी स्टालिनवर कडक टीका केली. या टीकेला चीनच्या प्रतिनिधीने लगेच पाठिंबा दिला नाही. स्टालिनच्या मृत्यूनंतर माओला रशियन पुढाऱ्यांच्या नेतृत्वाबद्दल संशय निर्माण झाला होताच. पण स्टालिनवर क्रुश्चॉव यांनी टीका केली तेव्हा तो पक्का होऊन कम्युनिस्ट जगताचा केंद्रबिंदू मॉस्कोऐवजी पेकिंग व्हावा अशी ईर्षा माओला वाटू लागली. रशियनांचा मार्ग हा आपला नव्हे, आपल्याला वेगळा मार्ग काढला पाहिजे या माओच्या भावनेतून सांस्कृतिक क्रांतीचा जन्म झाला.

परंतु वेगळा मार्ग काढावयाचा तर रशियन पद्धतीचे नियोजन, पक्षाची रचना, कारभारयंत्रणा ही सर्वच बदलणे भाग होते. मोठमोठ्या उद्योगांपेक्षा व औद्योगिक केंद्रीकरणापेक्षा लहान व मध्यम उद्योग काढावे, शेतीचे उत्पादन वाढवावे आणि विकेंद्रीकरणाचे धोरण केवळ उद्योगधंद्याबाबतच नव्हे तर नियोजन, राजकीय व्यवहार या सर्वांबाबत स्वीकारावे असे माओच्या मनाने घेतले. पण पक्ष, राज्यकारभार यंत्रणा, आर्थिक नियोजनव्यवस्था या सर्वांची ज्या रीतीने उभारणी झाली होती तिचा प्रचंड अडथळा माओच्या मार्गात उभा होता. पक्ष धंदेवाईक कार्यकर्त्यांच्या हाती गेला असून त्यांचे हितसंबंध निर्माण झाले आहेत आणि पक्षातील गतिमानता, नवे विचार करण्याची शक्ती अस्तंगत होत असल्याची तीव्र जाणीव माओत निर्माण झाली. त्याच्यातील क्रांतिकारकत्व, अराजकाकडील त्याची प्रवृत्ती ही उफाळून आली आणि त्याने सरकार, संघटना, नेते या सर्वांनाच आव्हान दिले. यासाठी जनतेला त्याने उठविले, भडकविले. तत्पूर्वी वाढीव उत्पादनाची जी लक्ष्ये त्याच्या प्रेरणेने झाली ती गाठण्याच्या बाबतीत अतिरेकी भूमिका घेण्यात आल्या. व्यापार, शेती, उद्योग या सर्व क्षेत्रात जहाल घोषणा करून अव्यवहार्य उद्दिष्टे मांडणारांचे फावले. पण यामुळे चीनमध्ये गोंधळ निर्माण झाला होता. उत्पादनाच्या वाटा बुजल्या आणि अनेक प्रकारची टंचाई निर्माण झाली. ज्या नियोजन मंडळाने उद्दिष्टे ठरविली होती त्याची प्रतिष्ठा गेली. यातून मार्ग काढताना नियोजन, पक्षरचना, राजकीय कारभार या सर्वांचे स्वरूप आमूलाग्र बदलण्याचा संकल्प सोडून माओने एक प्रचंड आंदोलन उभे केले. हीच सांस्कृतिक क्रांती.

हंगेरीतील उठाव रशियाने दाबला आणि पहिला स्पुटनिक सोडला याचाही परिणाम माओवर झाला होता. रशियाचे वर्चस्व वाढण्याची त्याला धास्ती होती आणि म्हणूनही

रशियापेक्षा वेगळा मार्ग त्याला शोधावयाचा होता. सांस्कृतिक क्रांतीचा जन्म यातून झाला. तो करताना त्याने सर्व थरातील नोकरशाहीला धक्के दिले. पक्षाचे कार्यकर्ते असोत वा विचारवंत असोत, त्यांना अंगमेहनत करणे भाग पडले, विद्यार्थी शाळा-कॉलेजातच न राहता सामान्य जनतेत फेकले गेले. चीनचा सारा समाज ढवळून निघाला त्याची ही पूर्वपीठिका.

२९-१-१९७४

रशियन लेखकाची रोजनिशी

रशिया व चीन यांचे संबंध बिघडून काही वर्षे झाली. या बिघडलेल्या संबंधांना पोषक असे लिखाण दोन्ही देशात प्रसिद्ध होत असते. पण जणू काही चिनी नेत्यांचा रशियाविरोध हा आपण फार पूर्वी ओळखला होता असे काही रशियन लेखक चलाखीने दाखवू पाहात आहेत. त्याचे निदर्शक असलेले 'चायनाज स्पेशल एरिया' हे पुस्तक प्रसिद्ध झाले आहे.

'चायनाज स्पेशल एरिया' – म्हणजे येनान. माओ त्से तुंगच्या नेतृत्वाखाली चीनमध्ये कम्युनिस्ट क्रांती होण्यापूर्वी येनानमध्ये कम्युनिस्ट नेत्यांचा तळ होता. लाल सेना तेथे होती. या येनानला खास विभाग मानले जाई. तेथे ४२ ते ४५ या जागतिक युद्धाच्या काळात पी. पी. ल्व्हादिमिरॉव्ह हे 'तास' या रशियन वृत्तसंस्थेचे लष्करी वार्ताहर आणि कोमिन्टर्नचे संपर्काधिकारी या नात्याने वास्तव्य करीत होते. तत्पूर्वी ते चीनमध्ये 'तास' वृत्तसंस्थेचे वार्ताहर म्हणून वावरले होते. युद्धकालातील येनानमधील वास्तव्याची त्यांनी रोजनिशी लिहिली होती. तीच 'चायनाज स्पेशल एरिया' या नावाने आता प्रसिद्ध झाली आहे. ल्व्हादिमिरॉव्ह हे पुढे ब्रह्मदेशात रशियाचे वकील होते आणि नंतर वारले.

कोमिन्टर्नचे संपर्काधिकारी या नात्याने ते सर्व चिनी कम्युनिस्ट नेत्यांच्या सहवासात येत. उल्लेखनीय गोष्ट मात्र ही, की ज्या चर्चा त्यावेळी झाल्या त्यांचा विशेष तपशील या रोजनिशीत नाही. पण व्यक्तिगत अनुभव, अनुमान यांचा भरणा मात्र बराच आहे.

रोजनिशीचा मुख्य रोख माओवर आहे. माओचे जे व्यक्तिचित्र निरनिराळ्या प्रकारे रंगविण्यात आले ते माओची बदनामी करण्यासाठी हे स्पष्ट दिसते. माओ त्या काळात बरेच धूम्रपान करी. एडगर स्नोनेसुद्धा तसे म्हटले आहे. त्याचप्रमाणे माओला काळी व लाल मिरी फार आवडत होती. ल्व्हादिमिरॉव्ह यांच्या लिखाणाचा मात्र रोख असा, की धूम्रपान, मिरीमिश्रित पदार्थ आणि मद्यपान यातच माओ सतत गर्क असे. चिनी नेतेही याच रीतीने खानपानात बरात वेळ घालवीत. अतिरिक्त मद्यपान करून लालबुंद चेहरा करून माओ म्हणे तासन्‌तास बोले. पण त्यात मुद्याच्या गोष्टी थोड्या असत. एडगर स्नो असे चित्र रंगवीत नाही. माओला मिरी आवडत असे कारण ज्या हुनान प्रांतात तो जन्मला तेथील लोकांच्या खाण्यात ती आहे. रशियन लोकही मिरी खातात. माओ तर एकदा गमतीने एडगर स्नोला सांगत होता, की मिरी खाणारे लोकच क्रांती करू शकतात. रशिया, मेक्सिको वगैरेंचा त्याने यासंदर्भात उल्लेख केला. त्यावर स्नोने इटालियनही मिरी

खातात असे म्हटले तेव्हा माओ जोरात हसला व आपला 'सिद्धान्त' त्याने मागे घेतला. तथापि माओचे मिरीप्रेम हा काय चेष्टेचा विषय होऊ शकतो की काय? पण ल्व्हादिमिरॉव्ह यांनी त्याचा अनेकवार उल्लेख केला आहे. आणि माओ तेव्हा बरेच मद्यपान करीत असावा असे ग्राह्य धरले तरी स्टालिनचा तो भाऊच ठरतो. कारण स्टालिनही बरेच मद्यपान करीत असे हे चर्चिलसह अनेकांनी नमूद करून ठेवले आहे. तत्पूर्वीचा एक प्रसंग एम. एन. रॉय यांनी वर्णन केला आहे. स्टालिन इतर काही रशियन नेत्यांबरोबर एका रात्री मद्यपान करीत असता उत्तर रात्र सुरू झाली तसे एकेक रशियन नेते आडवे झाले, उरले फक्त स्टालिन व रॉय. त्यांचे मद्यपान चालूच होते. तेव्हा स्टालिन रॉयना म्हणाला, की हे आडवे झालेले युरोपियन्स असून आपण दोघेच आशियाई आहोत व म्हणूनच टिकून आहोत! या स्थितीत एका रशियनाने माओच्या मद्यपानाची टवाळी करण्यात काही अर्थ नाही.

ल्व्हादिमिरॉव्ह यांच्या लिखाणाचा दुसरा हेतू असा, की माओ व त्याचे सहकारी हे अमेरिकन्स व ब्रिटिश यांच्या मैत्रीसाठी त्यावेळी फार आसुसलेले होते. त्यांना अमेरिकनांकडून मदत हवी होती आणि ती शस्त्रास्त्रे त्यांना चँग के शेकविरुद्ध वापरावयाची होती. चिनी कम्युनिस्ट जपान्यांशी प्रामाणिकपणे लढत नव्हते आणि हिटलरच्या सैन्याकडून रशियनांचा पराभव झाला, की माओ वगैरेंना आनंद होत होता. स्टालिनग्राडला वेढा पडला तेव्हा माओ व चिनी नेते ल्व्हादिमिरॉव्ह यांना म्हणे धड भेटतही नव्हते. हे सर्वच इतके अतिरेकी आहे, की त्यांच्या खोटेपणाबद्दल वेगळा पुरावा देण्याचीही गरज नाही. चिनी नेते जेव्हा अमेरिकन शस्त्रास्त्रांची अपेक्षा करीत होते तेव्हा अमेरिकन युद्धसामग्री रशियालाही प्रचंड प्रमाणावर मिळत होती. रशियाचा हिटलरकडून पराभव व्हावा ही चिनी कम्युनिस्ट नेत्यांची सुप्त इच्छा असावी असे दुरान्वयानेही म्हणता येणार नाही.

माओच्या येनानमधील वास्तव्याच्या काळात पक्षविरोधी कारवायांबद्दल कसा छळ होत होता, माओ हा उद्धटपणे कसा वागे याची काही उदाहरणे या रोजनिशीत आहेत. स्टालिनने इतके अवाढव्य हत्याकांड केले असता रशियनांना चिनी नेत्यांनी केलेल्या छळाबद्दल वा अत्याचाराबद्दल नाकाने कांदे सोलण्यासारखे काही नाही. उद्धटपणा, सत्तेची हाव याबद्दल बोलावे तर लेनिनने आपल्या मृत्युपत्रातच स्टालिन हा कसा उद्धट, सत्तापिसाट झाला होता याचा उल्लेख केला आहे.

ल्व्हादिमिरॉव्ह म्हणतात, की त्यांच्यावर सतत पाळत ठेवली जाई, त्यांचा स्वयंपाकी हासुद्धा हेर होता. त्यांच्या स्वत:च्या देशात जे चालले होते तेच चिनी नेते त्यांच्याबाबत करीत होते. माओने म्हणे काही सुंदर चिनी ललनाही ल्व्हादिमिरॉव्ह यांच्याभोवती ठेवल्या होत्या व त्यातली तुला कोणीच आवडत नाही काय असेही माओने त्यांस विचारले होते.

ही फार खालची पातळी झाली. या सुंदर ललनांबाबत लेखक खरोखरच अलिप्त राहिला होता की नाही हे कोण सांगणार?

व्हादिमिरॉव्ह यांची रोजनिशी बनावट वाटते याचा मुख्य पुरावा अंतर्गत आहे. रोजनिशीत स्टालिनचा उल्लेख कोणत्याही विशेषणांशिवाय आहे. ज्या काळात पाचपंचवीस विशेषणाशिवाय अधिकृत रशियन प्रकाशनात स्टालिनचा उल्लेख होत नव्हता व जेव्हा स्टालिनच्या दडपशाहीने प्रत्येकाचाच जीव धोक्यात होता तेव्हा रोजनिशीतसुद्धा एकाही विशेषणाशिवाय स्टालिनचा उल्लेख करण्याची कोणाही रशियनाची छाती नव्हती. येथे मात्र तसा उल्लेख आहे व म्हणूनच रोजनिशी संशयित ठरेल.

१४-१२-१९७४

प. युरोपातील कम्युनिस्ट

गेल्या काही महिन्यात इटलीत कम्युनिस्ट पक्षाचे पार्लमेंटमधील बळ वाढले. पोर्तुगालमध्ये त्याला लष्करातील काही गट मिळाले आहेत. या संदर्भात पश्चिम युरोपातील कम्युनिस्ट पक्षांचा इतिहास आणि त्याचे स्वरूप यांचे विश्लेषण उपयुक्त ठरेल. नील मॅकलनेस यांनी ते साधार केले आहे. त्यांनी असे दाखवून दिले आहे, की प. युरोपातील दहा देशांतील कम्युनिस्ट पक्षांविषयी पुरेशी माहिती नसल्याने किंवा त्याचे योग्य विश्लेषण न केल्याने हे पक्ष त्या त्या देशात सत्ता ताब्यात घेण्याच्या नजीक पोहोचले असल्याची भीती व्यर्थ आहे. ग्रीसमध्ये अमेरिकनांना वाटले, की कम्युनिस्ट पक्ष ७४ सालच्या निवडणुकीत १५ टक्के मते मिळवील. पण अन्य पक्षाशी युती करूनही त्या पक्षास जेमतेम साडेनऊ टक्के मते मिळाली व पार्लमेंटमध्ये ३०० जागांपैकी आठ जागा त्याने जिंकल्या! पोर्तुगालमध्ये २३ टक्के मते मिळतील हा अंदाजही चुकीचा ठरला व केवळ बारा टक्के मते मिळाली.

युद्धानंतर फ्रान्स, इटली, बेल्जियम, लक्झेंबर्ग, ऑस्ट्रिया, ग्रीस, नॉर्वे, फिन्लंड, डेन्मार्क, आइसलँड या देशांत कम्युनिस्टांचा सत्तेत सहभाग होता. आता तशी परिस्थिती नाही. पोर्तुगालमधील सालाझारशाही किंवा ग्रीसमधील लष्करशाही नष्ट करण्यात या पक्षाचाच पुढाकार होता असे नव्हे. युद्धोत्तर काळात प. युरोपमधील कम्युनिस्ट पक्षांची सभासदसंख्या चाळीस लाख होती. आता ती वीस लाख आहे. अर्थात या काळात प्राध्यापक, लेखक, पत्रकार इत्यादींच्या संघटना स्थापन करून त्यावर वर्चस्व ठेवण्याचे प्रयत्न बरेच झाले आणि ते अनेक ठिकाणी यशस्वी झाले. डिमिट्रॉव्हने म्हटलेच होते, की कम्युनिस्ट सहानुभूतिदारापेक्षा डझनभर कम्युनिस्टांची उपयुक्तता कमी आहे. याच काळात कम्युनिस्ट पक्षांच्या वृत्तपत्रांचा व नियतकालिकांचा खप मात्र बराच घसरला. लेखकाने निरनिराळ्या देशांच्या वृत्तपत्रांच्या खपांचे आकडेच दिले आहेत. याला अनेक कारणे घडली. यात रशियाने हंगेरी, पोलंड, पूर्व जर्मनी व चेकोस्लोव्हाकिया इत्यादी कम्युनिस्ट देशांतच लष्कराच्या बळावर केलेला हस्तक्षेपही कारणीभूत झाला आहे. युद्धोत्तर काळात कम्युनिस्ट पक्षास मतदान करणारांची संख्या प. युरोपात वाढली काय? तसेही दिसत नाही. प. जर्मनी, फ्रान्स, ब्रिटन, इटली, हॉलंड, बेल्जियम, लक्झेंबर्ग, डेन्मार्क, आयर्लंड या सर्वांचे मिळून जर एकच पार्लमेंट असते तर ७३ साली या पार्लमेंटच्या २९८७ सभासदांत कम्युनिस्ट पक्षाचे केवळ २७६ सभासद असते, म्हणजे जेमतेम नऊ टक्के. सायप्रस,

इटली, फ्रान्स यात कम्युनिस्ट पक्षाच्या मतांचे प्रमाण ३९, २७ व २१ टक्के होते. पण इतर अनेक प. युरोपीय देशांत ते दहा टक्क्यापेक्षाही कमी व ब्रिटन वगैरे देशांत तर दोन टक्केच होते. हंगेरीतील दडपशाहीचा काही देशांच्या कम्युनिस्ट पक्षांच्या मतसंख्येवर परिणाम झाला; पण फ्रान्समध्ये तो झाला नाही. तरीही मतसंख्या घटली होती ती फ्रेंच कम्युनिस्ट पक्षाचा तेव्हाचा नेता मॉरिस थोरे हा स्टालिनिस्ट होता म्हणून नव्हे, तर चौथ्या फ्रेंच प्रजासत्ताकाच्या संबंधात कोणती भूमिका घ्यावयाची याविषयी त्याची मते स्पष्ट नव्हती म्हणून.

या कम्युनिस्ट पक्षांचे सभासद बदलत आले आहेत. काही काळ सभासदत्व ठेवून पक्ष सोडून गेलेल्यांची संख्या मोठी आहे. निरनिराळ्या निमित्ताने पक्षत्याग अनेकांनी केला व नव्यांची भरती झाली. त्यामुळे दीर्घकालीन अनुभव असलेल्यांचे प्रमाण कमी पडते. एकट्या फ्रान्समध्येच ५९ ते ७२ या काळात कम्युनिस्ट पक्षाचे ५ लाख ३५ हजार सभासद झाले, पण पक्षाची सभासदसंख्या केवळ २५ हजारांनी वाढली. यावरून पक्षत्याग करणारांचे प्रमाण किती असेल याची कल्पना करता येते. निरनिराळ्या देशांतील विभागपरत्वे सभासदसंख्या कमी अधिक आहे. सर्वच औद्योगिक क्षेत्रात ती अधिक आहे असे नव्हे. वयोमानाचा विचार केला तर तरुणांची भरती करण्याकडे कम्युनिस्ट पक्ष पुढाऱ्यांनी कमी लक्ष दिले. ६४ साली नॉर्वेजियन कम्युनिस्ट पक्षाच्या सभासदांच्या वयाचे सर्वसाधारण प्रमाण ५५ ते ६० होते. फ्रान्समधील ५७ टक्के सभासदांचे वयाचे प्रमाण ४० पेक्षा अधिक आहे. डॅनिश पक्षाचे ७० टक्के सभासद याच गटात मोडतील. सर्व कम्युनिस्ट पक्षात पुरुषांचेच वर्चस्व आहे.

तथापि लेखकाने कम्युनिस्ट पक्षांच्या सामाजिक व अन्य सुधारणांसंबंधी भूमिकांबाबत दिलेली माहिती विशेष उल्लेखनीय ठरेल. कॅथलिक धर्माचा कुटुंबनियोजनाला जेवढा विरोध तेवढाच या पक्षाचाही. स्त्रियांना त्यांचे स्वत:चे प्रश्न असू शकतात हेही कम्युनिस्ट पक्ष कधी स्वीकारीत नाही. त्यामुळे स्त्री-मुक्तीच्या चळवळीबद्दल हे पक्ष उदासीनच राहिले. इटलीत जेव्हा घटस्फोटाचा प्रश्न तीव्र स्वरूपाचा बनला तेव्हा कम्युनिस्ट पक्षाने संदिग्ध भूमिका घेतली. फ्रेंच कम्युनिस्ट पक्षाने गर्भपातासंबंधी अशा स्वरूपाचा कायदा सुचविला, की तो कायदाच नव्हता. तसेच पक्षाच्या सेक्रेटरीने गर्भपात, लैंगिक शिक्षण, घटस्फोट याबद्दलही नेहमी संदिग्ध भूमिका घेतली. पारंपरिक विचाराच्या पण प्रभावी अशा कॅथलिक पुढाऱ्यांना कम्युनिस्ट पक्षाने सुधारक कॅथलिकांपेक्षा अधिक महत्त्व दिले. (येथेही लीगचे पुढारी त्यांनी फाळणीपूर्वी जवळ केले होते.)

सर्वत्र औद्योगिक कामगारांची सभासदसंख्या कम्युनिस्ट पक्षात अधिक आहे. परंतु त्याचबरोबर असेही दिसेल की, इटलीसारख्या देशात उद्योगधंदे अधिक आहेत तेथेच

कम्युनिस्ट पक्षास पाठिंबा आहे असे नव्हे, तर ज्या विभागात समाजवादी परंपरा, वातावरण असेल तेथे तो आहे. याचा परिणाम सर्वच देशांत असा झाला आहे, की कम्युनिस्ट पक्षाची मते ही एकंदर समाजवादी मतदारसंघातूनच मिळतात. समाजवादी पक्षाची मते कमी अधिक होण्यावर कम्युनिस्ट पक्षाची मते कमी अधिक होणे अवलंबून आहे. प. युरोपात डावी मते अनेकदा अति डाव्या अशा संघटनांकडे झुकलेली आढळतील. या अति डाव्या संघटना या कम्युनिस्ट पक्षाशी स्पर्धा करतात. अनेक देशांत लेखक, कलावंत या पक्षात सामील झाले आहेत. पण कम्युनिस्ट पक्ष हा क्रांतिकारी कामगारांचा पक्ष ही जर त्याची मूळची भूमिका तर कलावंत, लेखक, बुद्धिजीवी वर्ग यांच्या या वाढत्या प्राबल्याचे समर्थन कसे काय करता येईल? असा लेखकाचा सवाल आहे. यातून अनेक धोरण व वर्तनविषयक विकृती निर्माण झाल्या आहेत.

बुद्धिजीवी वर्ग कम्युनिस्ट पक्षात वाढत्या प्रमाणात आल्याने त्या पक्षात विचारस्वातंत्र्य वाढले, अधिकाराचे विकेंद्रीकरण झाले असे बिलकूल नाही. मध्यवर्ती समिती, पॉलिटब्यूरो वगैरे यंत्रणा या नावापुरत्या असतात. सेक्रेटरी-जनरल हाच खरा प्रभावी असतो व तो मूठभर पदाधिकाऱ्यांना जवळ करून अधिकार गाजवितो. त्याचा मॉस्कोकडे जेवढा अधिक वशिला तितके त्याचे पक्षात वजन अधिक. हा सेक्रेटरी-जनरल मग आपल्या मर्जीप्रमाणे अधिकार, पैसे वगैरेंचे वाटप करतो. यात वशिलेबाजी भरपूर होते. आपापल्या जागा, अधिकार टिकविण्यासाठी जो तो वरिष्ठांची मर्जी संपादन करण्यासाठी धडपडतो. आपली निष्ठा व्यक्त करण्याची संधी साधली जाते. पक्षद्रोहाच्या संकटाचा बागुलबोवा नेहमीच उभा केला जातो. मग न परवडणारे सत्य दडविले जाते आणि परवडेल, सोयीस्कर असेल तेच सत्य ठरते. किंबहुना सोयीस्कर असत्याला, गैरसोयीच्या सत्यापेक्षा अधिक महत्त्व येते. या स्थितीत वस्तुस्थितीला प्राधान्य न मिळता नेत्याच्या मनाला जे सुखद वाटेल तेच बोलावे, लिहावे व वागावे ही वृत्ती वाढते. ही मानसिक गुलामगिरी पराकोटीला पोहोचून सेक्रेटरी-जनरल हा जणू परमेश्वराचा अवतार बनतो. मॉरिस थोरे यांना एक मानपत्र देण्यात आले होते. वास्तविक थोरे हे युद्धकाळात स्वदेशात फ्रान्समध्ये न राहता रशियात सुरक्षित होते, पण या काळात त्यांनी देश व पक्ष यासाठी अजोड कामगिरी बजावल्याचे सांगून हे मानपत्र म्हणते,

'केवळ तुमच्या हजेरीनेच आमच्या आशांना उजाळा येतो. आम्हा प्रत्येकात तुमच्याच अस्तित्वाची आम्हाला जाणीव होते. ('भगवान' रजनीश इत्यादी बुवांचे भक्त यापेक्षा वेगळी भाषा वापरीत नाहीत) आपल्या जीवनास व पक्षाला तुम्ही अर्थ प्राप्त करून दिला आणि वैभव मिळवून दिले!'

एका कम्युनिस्ट पत्राने तर रोमाँ रोलाँ व नेपोलियन यांच्यापेक्षाही थोरे यांची प्रतिमा उजळ असल्याचा निर्वाळा दिला होता! थोरे हा स्वत: अतिशय विलासी वातावरणात राहात असे आणि पुढे तर त्याने आपल्या पत्नीलाच केंद्रीय समितीत नेमले. रोमाँ रोलाँ व नेपोलियनपेक्षा मोठ्या मानल्या गेलेल्या थोरेचे नाव फ्रेंच कम्युनिस्टही आज फारसे घेत नाहीत. अशा या वातावरणात एकमेकाला 'भाई' म्हणूनही भाईपणा, बंधुत्व यांची या पक्षात कधीच वाढ झाली नाही. पक्षसदस्यांत औपचारिक शिक्षण घेतलेल्यांची संख्याही सर्वत्र कमी आहे. याचा परिणाम एकंदर सांस्कृतिक व बौद्धिक पातळीवर होत असतो.

रशियाचा हस्तक्षेप निरनिराळ्या देशांच्या कम्युनिस्ट पक्षात होत असतो. याही स्थितीत कम्युनिस्ट पक्षांचा भर एकंदरीत तीन शक्तींवर असतो. (१) रशियन शक्ती, (२) स्थानिक पक्षाची कारभारयंत्रणा (नोकरशाही) आणि (३) कम्युनिस्ट कामगार.

रशियाचा हस्तक्षेप होत असला तरीही रशिया व चीन यामधील तेढीमुळे एक बदल झाला. रशियाला अधिकाधिक कम्युनिस्ट पक्षांच्या साहाय्याची गरज भासू लागली. पाश्चात्य देश व रशिया यांच्यातील काही प्रमाणातील सहकार्याचा या संबंधावर परिणाम झाला आहे. पण रशियाचा मार्ग हाच समाजवादाकडे जाण्याचा एकमेव मार्ग आहे काय? इटालियन, फ्रेंच वगैरे कम्युनिस्ट नेत्यांनी तसा तो नाही, असे या ना त्या वेळी म्हटले आहे. पण प्रत्यक्षात मात्र रशियाच्या विरुद्ध या नेत्यांनी उघडपणे व दीर्घकालीन भूमिका घेतली नाही. चेकोस्लोव्हाकियावरील आक्रमणाचे अखेरीस हे पक्ष समर्थन करतात किंवा निदान त्यावद्दल मौन धारण करतात. समाजवादाकडे जाण्याच्या स्वतंत्र मार्गाची त्यांना किती मातब्बरी वाटते, हे यावरून स्पष्ट होते. या संदर्भात आता पोर्तुगाल, फ्रान्स व इटली यांसारख्या देशांतील घटना विशेष कळजीपूर्वक निरीक्षल्या जात आहेत. पोर्तुगालमध्ये बारा टक्के मते मिळवूनही लष्कर व काही कामगार संघटनांच्या जोरावर सत्ता बळकावण्याचा प्रयत्न कम्युनिस्ट पक्षाने केला. यामुळे इटली व फ्रान्स यांमध्ये समाजवाद्यांशी सहकार्य करणाऱ्या कम्युनिस्ट पक्षांबद्दल समाजवाद्यांना व अपक्ष नागरिकांना संशय वाटू लागला आहे. त्याचप्रमाणे आर्थिक बाबतीत या पक्षांनी आतापर्यंत वेळोवेळी घेतलेली भूमिकाही सुसंगत व वास्तव नसल्याने त्यांच्याबद्दल संशय वाढला. फ्रेंच कम्युनिस्ट जेव्हा सत्तेत सहभागी होते, तेव्हा त्यांनी संपाला विरोध केला. पण जेव्हा त्यांची सत्ता गेली, तेव्हा फ्रेंच जनतेच्या आर्थिक विकासाची सत्यताही ते नाकारू लागले. फ्रेंच कामगारांनी स्कूटर्स घेतले, तर ते म्हणत, कामगारांना त्यांच्या कामाच्या ठिकाणापासून दूर राहावे लागते म्हणून स्कूटर्स घेतले जातात आणि मोटारी घेतल्या, तर आगगाड्यांचा प्रवास महाग पडतो म्हणून! अशा या भूमिकांमुळे आता जेव्हा त्यांना सत्तेत सहभाग नाही, तेव्हा कामगारांच्या मागण्या सतत वाढवीत नेऊन आर्थिक क्षेत्रात गोंधळ माजविण्याचे धोरण

कम्युनिस्ट पक्षांनी स्वीकारले आहे. ब्रिटनमधील मजूर पक्षातील डावे याच मार्गाने जात आहेत.

मार्क्स व एंजल्स यांना भांडवलशाहीतून साम्यवादाकडे शांततेने परिवर्तन होईल असे वाटत होते. लेनिनने हे मान्य केले नाही. कामगारांच्या क्रांतिकारक संघटनेखेरीज हे परिवर्तन होणार नाही, ही त्याची धारणा. या स्थितीत प. युरोपातील कम्युनिस्ट पक्ष कोणती भूमिका घेणार? सत्ता ताब्यात येण्यापूर्वी अनेक पक्ष चालतील, पण सत्ता हाती आल्यावर अन्य पक्षांना वाव नाही, ही भूमिका ते घेणार काय? या पक्षांना याचे उत्तर द्यावयाचे आहे.

यासंबंधात लेखकाने मार्क्सचे एक वचन उद्धृत केले आहे. प्रुधाँला उत्तर देताना त्याने म्हटले होते की, मानवी हक्काची सनद विस्तारित झाली, प्रजासत्ताक लोकशाही वाढली, तरीही त्यामुळे साम्यवाद येणार नाही. लेखक म्हणतो, की याचाच अर्थ असा, की जो समाज मानवी हक्क मानतो, प्रजासत्ताक लोकशाही स्वीकारतो तो साम्यवाद स्वीकारणार नाही. या स्थितीत व्यक्तिस्वातंत्र्य, संसदीय लोकशाही, विचारस्वातंत्र्य इत्यादी मूलभूत तत्त्वांचा स्वीकार प. युरोपातील कम्युनिस्ट पक्षांना करावयाचा आहे, की नाही हा महत्त्वाचा प्रश्न उरतो. याचे उत्तर मिळालेले नाही.

१८-१०-१९७५

रशियाची दीडशे वर्षे

रशियाचा धावता आणि अतिशय आकर्षक शैलीतील इतिहास श्री. वेस्टवूड यांनी सादर केला आहे. १८१२ ते १९७१ एवढ्या काळाचा हा आढावा आहे. त्यांनी या इतिहासाला 'सहनशीलता आणि प्रयत्न' हे नाव दिले आहे ते रास्त आहे. झारची राजवट असो वा स्टालिन किंवा त्याच्यानंतरचे रशियन राज्यकर्ते असोत; रशियन जनतेने अनंत हाल सोसले, कष्ट केले आणि या सर्व हालअपेष्टा होत असताना अतिशय सोशिकता दाखविली. तसे पाहिले तर व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या दृष्टीने निकोलसच्या वेळची परिस्थिती व स्टालिनच्या राजवटीतील स्थिती यात काय फरक होता? या सर्व रशियन इतिहासात एक सूत्र दिसते. ते म्हणजे राज्यकर्त्यांचा बेगुमानपणा. निर्घृणपणा आणि निर्घृणपणाचे बळी झालेली जनता.

रशियाच्या इतिहासात नेपोलियनशी १८१२ मध्ये झालेल्या युद्धाला फार महत्त्व आहे. अद्यापही पहिले देशभक्तीपर युद्ध असा रशियनांना त्या युद्धाचा अभिमान वाटतो. तसे पाहिले तर रशियनांनी नेपोलियनशी त्यावेळी शर्थीची झुंज दिली असे नव्हे; पण माघार घेत घेत ते मॉस्कोपर्यंत आले आणि त्या प्रमाणात नेपोलियनची रसद तुटत गेली. साधनसामग्री कमी झालेली, रसद तुटल्याने पुरवठा कमी; नवीन कुमक नाही. तेव्हा सैनिक हैराण झाले व रोगराईने मेले. त्यावेळी रशियात अभूतपूर्व असा थंडीचा कडाका होता ही समजूत चुकीची आहे. थंडी नेहमीसारखीच होती, पण नेपोलियनचे सैनिक निःसत्त्व बनले होते आणि त्यामुळे ते मृत्युमुखी पडले. त्यावेळी रशियन समाजाने मात्र नेपोलियनच्या सैन्याशी पूर्ण असहकार पत्करला होता आणि त्याचे गंभीर परिणाम झाले. म्हणून वेस्टवूड म्हणतात, की रशियनांचा नेपोलियनवरील विजय हा लष्करी विजय नव्हता, तर नैतिक होता.

पहिल्या ॲलेक्झांडरची ही राजवट होती. त्यावेळच्या समाजात एकंदर दोन टक्के उमराव व दोन टक्के धर्मोपदेशक वगैरे होते. बाकीचा ९६ टक्के समाज हा शेतकरी होता. हे उमराव लोक अठराव्या शतकाच्या अखेरीपासून केवळ फ्रेंच बोलत. रशियन बोलत नसत. फ्रेंच पद्धतीचे फर्निचर, कपडेलत्ते असा त्यांचा थाट होता. बहुसंख्य शेतकरी हा दारिद्र्यात पिचत होता आणि त्यातही ज्यांना सर्फ म्हणून म्हटले जाई ते गुलाम होते. पहिल्या ॲलेक्झांडरने गुलामांची ही संख्या वाढू नये असे प्रयत्न केले. ॲलेक्झांडरच्या कारकीर्दीत नेपोलियनला रशियातून माघार घ्यावी लागल्याने त्याचा युरोपात भाव वाढलेला

होता. पोलंड वगैरे मुक्त झाले होते आणि त्यामुळे रशिया हा मुक्तिदाता झाला होता. पण अखेरीच्या काळात ॲलेक्झांडरने कमविलेले हे नाव गमावले. युरोपच्या राजकारणाचा प्रश्न निघाला की, पहिला ॲलेक्झांडर घटनात्मक राजवटीचा पुरस्कार करी. पोलंडमध्ये त्याने या दिशेने काही प्रयत्न केले. पण खुद्द रशियात मात्र त्याने घटनात्मक सुधारणा केल्या नाहीत.

ॲलेक्झांडरच्या कारकीर्दीत नवी शिक्षणपद्धती अमलात आली. हे नवे शिक्षण घेणारे राज्यकारभारात येणार होते. १८२५च्या डिसेंबरात ॲलेक्झांडर मरण पावला. त्यावेळी उठाव झाला. लष्कराचे लोक पुढारी होते. १८१६ त रशियातील पहिली क्रांतिकारी संघटना स्थापन झाली होती. डिसेंबरात उठाव करणारांत मतभेद होते. शिस्त कमी होती. तरीही पहिले क्रांतिकारक म्हणून त्यांना मान दिला जातो. पुढे शंभर वर्षे उलटण्याच्या आत रशियातील राजेशाही संपुष्टात आली.

पहिल्या ॲलेक्झांडरनंतर पहिल्या निकोलसची राजवट सुरू झाली. निकोलसला काही चांगले करून दाखवावे असे वाटे. पण अदूरदर्शीपणामुळे त्याला अपयश येई. त्याच्या तीस वर्षांच्या कारकीर्दीत दडपशाही बरीच झाली. पण बौद्धिक क्षेत्रात प्रगतीही झाली. त्या काळात विचारवंतांचे दोन गट होते. एक पाश्चात्य देशांच्या प्रभावाखालचा आणि दुसरा रशियन परंपरेचा अभिमानी. निकोलसची राजवट ही पोलिसी राजवट होती. अनेक प्रकारचे निर्बंध होते आणि अनेक नागरिकांवर देशद्रोहाचे खरेखोटे आरोप ठेवून त्यांना शिक्षा दिली जात असे. त्यामुळे लोकजीवन असुरक्षित होते. महाविद्यालयात प्राध्यापकांना त्यांच्या पाठाच्या टिपणी संबंधित अधिकाऱ्यास तपासणीसाठी द्याव्या लागत आणि त्यापलीकडे जाऊन त्याला विद्यार्थ्यांपुढे पाठ देता येत नसे.

तथापि याही स्थितीत निकोलसच्या राजवटीमध्ये बौद्धिक क्षेत्रात बरीच प्रगती झाली. मॉस्को विद्यापीठ हे याबाबतीत मध्यवर्ती होते. निकोलसने तत्त्वज्ञानाचा दुस्वास केला. मॉस्को विद्यापीठातील तत्त्वज्ञानाचे अध्यासनच बरखास्त झाले. इतिहासाची मात्र भरभराट झाली. विज्ञानाच्या क्षेत्रात रशियन संशोधक व प्राध्यापक यांनी विशेष नाव केले. गणित, भूमिती या विषयांत हे प्राध्यापक नवे प्रयोग करीत. त्या काळात पिरोगॉव्ह हा नावाजलेला सर्जन आणि शिक्षणतज्ज्ञ होता. ॲनॅस्थेशिया देण्याचे त्याने प्रयोग केले होते व गॅरिबाल्डीच्या जखमा त्याने बऱ्या केल्या होत्या.

अठराव्या शतकात रशियन भाषेचे केवळ बोलीभाषा हे स्वरूप जाऊन ती वाङ्मयीन भाषा झाली. पण एकोणिसाव्या शतकातील पुश्कीन या कवीने रशियन भाषा समृद्ध बनविली. काव्य, नाटक इत्यादी वाङ्मयप्रकार वाढीला लागले, प्रगत झाले. वाङ्मयीन समीक्षेलाही बहर आला.

लष्कराची रिक्रूट भरती त्या काळात श्रीमंत लाच देऊन टाळीत. सामान्य सैनिकांचे फार हाल होत आणि रोगराईने मृत्यू पावलेल्या सैनिकांची संख्या बरीच होती. १८५५मध्ये पहिला निकोलस मरण पावला. पण तत्पूर्वी फ्रान्समध्ये राज्यक्रांती झाली होती. ज्या रशियनांनी ती पाहिली होती त्यांच्यावर तिचा प्रभाव पडला होता आणि बाकुनिन हा यातूनच अराजकवादाचा पुरस्कार करू लागला होता.

पहिल्या निकोलसनंतर दुसरा ॲलेक्झांडर गादीवर आला. श्री. वेस्टवूड म्हणतात, की स्टालिननंतर क्रुश्चॉव आल्यावर जसा फरक पडला तसा दुसऱ्या ॲलेक्झांडरच्या राजवटीत पडला. अलेक्झांडरने गुलाम शेतकऱ्यांची गुलामगिरी संपविली. स्थानिक स्वराज्य, न्याय, शिक्षण व लष्कर यांत सुधारणा घडवून आणल्या. जमीनविषयक त्याने केलेल्या सुधारणांचे जमीनदार विरोधी होते; पण ॲलेक्झांडरने योग्य संधी पाहून सुधारणा अमलात आणल्या. रशियातील तेव्हाचे प्रचलित उद्योगधंदे वाढीला लागले व नवे कारखाने सुरू झाले. तत्पूर्वीचे वातावरण निवळल्याची एक गमतीदार खूण वेस्टवूड सांगतात, की रशियन नागरिकांना मॉस्कोच्या राज्यात धूम्रपान निर्वेधपणे करण्याची मोकळीक मिळाली. गुलामगिरीवरोबरच लष्कर ही रशियाच्या गळ्यातील एक मोठी धोंड होती. लष्कराचे संख्याबळ वाढविण्यावरच सारखा भर दिला गेला. रशियन समाजावर हे एक मोठे ओझे होते. पुढे पहिल्या महायुद्धात लष्कर व समाज यांनी एकमेकांना खच्ची केले. दुसऱ्या ॲलेक्झांडरच्या कारकीर्दीत शिक्षणाचा प्रसार झाला व वाङ्मयावरील निर्बंध कमी झाले. त्यामुळे पुस्तकांना मागणी बरीच वाढली. टॉलस्टॉय, डोस्टोव्हस्की, तुर्गिनिव्ह वगैरे नामवंत साहित्यिकांच्या कलाकृतींचा जन्म याच काळात झाला.

परंतु निर्बंध सैल झाल्याने दुसऱ्या ॲलेक्झांडरच्या कारकीर्दीत लोक त्यावर समाधान मानून राहात होते असे नव्हे. त्यांची राजकीय स्वातंत्र्याची भूकही वाढली आणि क्रांतिकारकांचे गट स्थापन होऊ लागले. चेर्निशेव्हस्की हा 'कॉन्टेम्पररी' या नावाचे नियतकालिक चालवीत असे व त्यातून समाजवादाचा प्रसार होत होता. तरुण वर्ग त्याकडे आकर्षित झाला होता. या नव्या आंदोलनात विद्यार्थीवर्गाचा पुढाकार होता. लँड अँड लिबर्टी या नावाने एक गट ओळखला जात होता. पुढे 'पीपल्स विल' – लोकमत – हा गट स्थापन झाला. त्यात मध्यम व कनिष्ठ मध्यमवर्गातील सुशिक्षित प्रामुख्याने होते. राजसत्ता नष्ट करून लोकांच्या हाती सत्ता द्यावयाची, समाजवाद स्थापन करावयाचा हे या गटाचे उद्दिष्ट होते. १८८८मध्ये तिसऱ्या ॲलेक्झांडरवर या गटाच्या लोकांनी बॉम्ब टाकला. त्यात लेनिनचा भाऊ होता.

तिसऱ्या ॲलेक्झांडरची राजवट ही अत्याचारी व दडपशाहीची होती. ज्यूंचाही त्यावेळी फार छळ झाला. तिसऱ्या ॲलेक्झांडरने विस्तारवादी धोरण स्वीकारले होते.

सैबेरियात वस्ती करण्यासाठी त्याने उत्तेजन दिले. या काळात रशियाचे नौदल संख्येने जगात पाचव्या क्रमांकाचे असले तरी प्रभावशालीपणाचा विचार केल्यास त्याचा क्रम अगदीच खाली लागत होता. पुढे दुसरा निकोलस राज्यावर आला. त्याने विस्तारवादी धोरण स्वीकारून दडपशाही चालू ठेविली. त्याच्या राजवटीच्या प्रारंभीच जपानशी युद्ध झाले व त्यात रशियाचा पराभव झाला. अथति जपानचे आरमार बांधले होते इंग्लंडमध्ये; त्याचे सैनिक इंग्रजांच्या हाताखाली तयार झाले होते हा भाग वेगळा. पण पौर्वात्य देशाने पाश्चात्य देशाचा केलेला हा पहिला पराभव होता.

दुसऱ्या निकोलसच्या अत्याचारी राजवटीत रासपुतीन व निकोलसची पत्नी यांनी बेगुमानपणे कारभार केला. याच काळात रशियात मार्क्सवादी विचार मूळ धरू लागले. १९०५ मध्ये पहिला उठाव झाला, पण तो दडपला गेला. पुढे युद्धकाळात निकोलसची राजवट खिळखिळी झाली. काही काळ केरेन्स्कीची जनता-राजवट आली. तिने अनेक निर्बंध उठविले. म्हणूनच लेनिनने म्हटले होते, की पहिल्या युद्धाच्या अखेरच्या पर्वात रशियन जनतेएवढा मुक्त समाज कोणताच नव्हता. १९१४ च्या सुमारास विज्ञानाच्या क्षेत्रात मात्र रशिया प्रगतिपथावर होता. अनेक प्रकारचे संशोधन चालू होते. विमानविद्येतही रशियाने पदार्पण केले होते. त्याचे संशोधन पूर्णत: यशस्वी झाले नाही ही गोष्ट वेगळी. वाङ्मयाच्या क्षेत्रात पीछेहाट झाली होती.

१९१७ च्या ऑक्टोबरमध्ये बोल्शेव्हिकांनी बंड केले व केरेन्स्कीचे सरकार कोलमडले. लेनिन रशियात आला आणि क्रांतीचा सूत्रधार बनला. त्याच्या अगोदर ट्रॉटस्की रशियात आला होता. क्रांती यशस्वी होऊन बोल्शेव्हिकांच्या हाती सत्ता आल्यावर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रश्न उपस्थित झाले. लेनिनने युद्धतहकुबी व शांतता हे धोरण स्वीकारले. अंतर्गत बाबतीत मात्र त्याला क्रांतीनंतरच्या काळात अनेक निर्बंध जाहीर करावे लागले. वृत्तपत्रस्वातंत्र्य गेले आणि कम्युनिस्ट पक्ष हा राज्यकारभारावरही प्रभुत्व गाजवू लागला. लेनिननेच चेका ही गुप्तहेर संघटना स्थापन करून पक्षसदस्यांविरुद्ध हेरगिरी करण्याची व्यवस्था केली. लेनिनने नवे आर्थिक धोरण आखले. ते पद्धीक मार्क्सवादी नव्हते. त्यात व्यक्तिगत प्रयत्नांना वाव होता. या स्थितीत उत्पादन वाढू लागले होते. पण वेस्टवूड यांनी हेही दाखवून दिले आहे, की श्रीमंतांचा एक नवा वर्ग या काळात तयार झाला. ज्यांच्याजवळ काही मालमत्ता, साधनसामग्री होती अशा ऐपतदारांची मिळकत वाढली. पुढे लेनिनला स्टालिनच्या उद्धटपणाची व सत्तालोलुपतेची जाणीव होऊन त्याने स्टालिनला प्रतिबंध करण्याचा प्रयत्न केला. पण पक्षघाताने तो दुर्बल होऊन स्टालिन हा सर्वसत्ताधारी झाला.

स्टालिनच्या राजवटीतील अत्याचार, दडपशाही, राजकीय खून यांचा इतिहास आतापर्यंत अनेकांनी सांगितला आहे. या ग्रंथात तो थोडक्यात दिला आहे. सामुदायिक शेती, सरकारी धान्यव्यापार या सर्व स्टालिनच्या धोरणांनी दुष्काळ मात्र वाढला, टंचाई निर्माण झाली. दहा लाख लोक यात मरण पावले. लोकांचे हाल इतके झाले, की उपाशी लोक लहान मुलेही मारून खाऊ लागले. स्टालिनच्या इतका कर्दनकाळ राज्यकर्ता झाला नाही. त्याच्या या सर्व अत्याचारांना तत्त्वज्ञानाची बैठक देण्यात आली होती. स्टालिनने उद्योगधंद्यावर भर देऊन रशियाला औद्योगिक युगात आणला, पण सांस्कृतिकदृष्ट्या रशिया मागे पडला. कला, साहित्य या सर्वात तो मागे गेला आणि स्वातंत्र्याचा पुरता लोप होऊन लोक एका राजवटीचे गुलाम बनले. दुसऱ्या युद्धात रशियाची फार मोठी हानी झाली. स्टालिननंतर क्रुश्चॉवने अनेक बंधने सैल केली. क्रुश्चॉवचे स्थान याद्दृष्टीने मोठे आहे. पण रशियन राजवटीचे मूळ स्वरूप क्रुश्चॉव बदलू शकला नाही. या राजवटीत विषमता आहे आणि व्यक्तिस्वातंत्र्य नाही. शेतीच्या आघाडीवर तिचा पराभव झालाच आहे, पण औद्योगिक व तांत्रिक प्रगतीत रशिया पाश्चात्य देशांची बरोबरी करू शकत नाही. क्रुश्चॉवने सामुदायिक नेतृत्वाची कल्पना आणली, पण तोही एकमेव सत्ताधारी झाला. आता ब्रेझनेव्ह त्याच्याच मार्गाने चालले आहेत.

असा हा रशियाचा इतिहास आहे. क्रांतीनंतर झालेल्या अनन्वित अत्याचाराने क्रांती फार पुढे गेली असे नव्हे, पण तिने जे साध्य करावयाचे ठरविले होते ते साध्य झाले नाही हे वेस्टवूड यांचे म्हणणे खरे आहे. रशियन जनतेचा हा इतिहास असा कष्ट आणि सहनशीलता यांचा आहे.

२३-६-१९७३

रशिया व भारत

या देशातील कम्युनिस्ट चळवळ व पक्ष यांनी प्रारंभापासून आतापर्यंत रशियन नेत्यांच्या आदेशाचे तंतोतंत पालन केले आहे. फ्रेंच वा इटालियन कम्युनिस्ट पक्षाचे थोरे वा तॉग्लिआती यांच्याप्रमाणे राजकीयदृष्ट्या जबरदस्त नेताही भारतातील कम्युनिस्ट पक्षास मिळालेला नाही. रशियन नियंत्रकाचे धोरण ज्याप्रमाणे बदलले त्याप्रमाणे येथील पक्षानेही वारंवार धोरणात बदल केले आहेत. याचा तपशीलवार अभ्यास करून प्रा. डोनाल्डसन यांनी 'सोव्हिएट पॉलिसी टोवर्ड इंडिया' हा ग्रंथ लिहिला आहे. त्यांनी मूळ रशियन ग्रंथ, प्रकाशने यांचा आधार घेतला त्याचप्रमाणे असंख्य ग्रंथांचा. संदर्भ-ग्रंथ व प्रकाशनांची सूची पाहिल्यावरही प्रा. डोनाल्डसन यांच्या अभ्यासाची कल्पना येते.

लेनिनपासूनच रशियन कम्युनिस्ट पक्ष भारत, चीन इत्यादी देशांत कम्युनिस्ट चळवळ कशी वाढेल याचा विचार करीत असे. भारतासारख्या देशात त्यावेळी साम्राज्यसत्तेविरुद्ध आंदोलन होत होते. लेनिनच्या मते हे आंदोलनाचे नेतृत्व भांडवलदार वर्गाच्या प्रतिनिधींकडे असले तरी ते साम्राज्यशाहीविरोधी असल्यामुळे आंदोलनास पाठिंबा द्यावा. मानवेंद्रनाथ रॉय यांचा लेनिनच्या भूमिकेला विरोध होता. भांडवलदारी वर्गाच्या प्रतिनिधींच्या नेतृत्वाखाली आंदोलन साम्राज्यसत्तेविरुद्ध यशस्वी तोंड देणार नाही आणि त्यातून आर्थिक व सामाजिक परिवर्तन घडून येणार नाही असे रॉय यांचे म्हणणे होते. यासंबंधी जो वाद कम्युनिस्ट इंटरनॅशनलमध्ये झाला त्याचा तपशील डोनाल्डसन यांनी दिला आहे. रॉय यांना भारतात कम्युनिस्ट पक्षाची स्थापना करून त्याच्याकरवीच क्रांतिकारक आंदोलन हवे होते. ताश्कंद येथे यासाठी प्रशाळाही स्थापन झाली होती आणि रॉय सशस्त्र बंडाळीची तयारी करीत होते. पुढे लेनिन व रॉय यांच्यात काहीशी तडजोड झाली. शिवाय २१ साली ब्रिटिशांच्या दडपणामुळे रशियन नेत्यांनी भारतात प्रत्यक्ष हस्तक्षेप करण्याचे धोरण तात्पुरते स्थगित केले. येथे कम्युनिस्ट चळवळ वाढण्यास अनुकूल भूमी नाही आणि म्हणून सध्या साम्राज्यविरोधी चळवळीला पाठिंबा द्यावा असे रशियन नेत्यांनी ठरविले. त्यावेळी तुर्कस्तानात सरकारने कम्युनिस्टांना यमसदनास पाठविले तरीही तुर्कस्तानातील साम्राज्यविरोधी प्रवृत्ती सरकार वाढीला लावत असून त्यास पाठिंबा द्यावा ही भूमिका कार्ल रॅडेक यांनी मांडली होती आणि भारतासंबंधी साधारणत: हाच दृष्टिकोन स्वीकारला गेला.

पुढे स्टालिन सत्ताधारी झाला. भारत हा एकसंध नाही, तेथे भाषिक राष्ट्रे आहेत असा त्याचा सिद्धान्त होता. साम्राज्यवादी साखळीत जो कच्चा दुवा असेल तो लवकर तुटेल

आणि असा दुवा भारत आहे असे स्टालिनचे प्रतिपादन होते. काही प्रमाणात औद्योगिक प्रगती झाली, श्रमजीवी जनता जागृत झाली, की हा दुवा तोडण्याच्या चळवळीत कम्युनिस्ट अग्रभागी राहतील अशी स्टालिनची धारणा होती. भारतातील भांडवलदारीचे प्रतिनिधी हे साम्राज्यवाद्यांशी तडजोड करतील तेव्हा जनतेचा त्यांच्यावर दाब ठेवून त्यांना अलग पाडावे आणि श्रमजीवी जनतेच्या नेतृत्वाचे प्रभुत्व स्थापन करावे असा व्यूह स्टालिनने रचला. श्रमजीवी जनतेचे नेतृत्व भारतातील कम्युनिस्ट पक्षाने करावे पण हा पक्ष कोमिन्टर्नला बांधील राहावा ही स्टालिनची भूमिका होती. आजतागायत हे मुख्य सूत्र सुटलेले नाही. काँग्रेसचे नेतृत्व भांडवलशाहीशी तडजोड करील म्हणून लोकांचा दबाव त्यावर राहावा आणि त्यास अलग पाडण्यात यावे ही आजची कम्युनिस्ट पक्षाची भूमिका स्टालिनच्या स्वातंत्र्यपूर्वकालीन स्वातंत्र्यलढ्यासंबंधीच्या भूमिकेपेक्षा वेगळी नाही. चीनमधील कोमिन्टांग संघटनेबद्दल स्टालिनने २७ साली म्हटले होते, की तिचा उपयोग अखेरपर्यंत करावा, लिंबासारखी तिला पिळावी व नंतर फेकून द्यावी. चीनमधील क्रांतिकारी चळवळीबद्दल रॉय व स्टालिन यांचे नंतर मतभेद झाले आणि माओने स्टालिनच्या मार्गदर्शनाचा स्वीकार न करता स्वतंत्र मार्ग चोखाळला.

म. गांधींसंबंधी रॉय आणि रशियन प्राच्यविद्या संशोधक रेसनर यांच्यात मतभेद होते. ३० साली रेसनर यांनी असे प्रतिपादन केले, की गांधी हे भांडवलदारांचे प्रतिनिधी आहेत. रॉय यांना ते मान्य नव्हते. त्यांचे म्हणणे असे की गांधींचे नेतृत्व हे कनिष्ठ मध्यमवर्गाचे आहे. याचा अर्थ असा की हे नेतृत्व यामुळेच श्रमजीवी जनतेच्या प्रभावाखाली आणता येईल. तथापि रॉय यांना कोमिन्टर्नचे दरवाजे यापूर्वीच बंद झाले होते. त्यांचा बर्लिनमधील विश्वासू सहकारीच स्टालिनने त्यांच्याविरुद्ध उठविला होता. रॉय हिंदुस्थानात आले आणि त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. इकडे येथील कम्युनिस्ट पक्ष ब्रिटिश कम्युनिस्ट पक्षाशी बांधला गेला. त्याला मॉस्कोचे आदेश येत ते ब्रिटिश कम्युनिस्ट पक्षातर्फे. पाम दत्त यांनी घटना समितीची कल्पना मांडली ती कम्युनिस्ट पक्षाने उचलून धरली, पण रॉय यांनी तीच दोन वर्षे अगोदर मांडली तेव्हा कम्युनिस्ट पक्षाने टीका केली. त्याचप्रमाणे राष्ट्रीय स्वातंत्र्याखेरीज समाजवाद येणार नाही या नेहरूंच्या घोषणेवर कोमिन्टर्न व येथील कम्युनिस्ट पक्षाने टीका केली होती. पण कोमिन्टर्नचे मत बदलले ते स्प्रॅट, दत्त वगैरेंच्या लिखाणातून प्रगट झाले आणि नेहरूंचीच घोषणा तीन वर्षांनी उचलून धरली गेली.

संयुक्त आघाडीचे राजकारण याच काळात सुरू झाले आणि मग गांधीवादाचा फेरविचार करण्याची बुद्धी कम्युनिस्ट पक्षास आली. परंतु ३४-३५ साली गांधीवादातही क्रांतिकारक घटक शोधणाऱ्या कम्युनिस्ट पक्षास ४० साली गांधीवाद हा पुन्हा प्रतिगामी वाटू लागला आणि त्यांचा प्रभाव नष्ट करण्याचा पवित्रा घेतला गेला तोही कोमिन्टर्नच्या

आदेशामुळेच. फासिस्टविरोधी आघाड्या युरोपात कोमिन्टर्नच्या धोरणाप्रमाणे स्थापना झाल्या. भारतातही म्हणूनच कॉंग्रेस व त्यातही गांधींचा निर्भेळ युद्धविरोध हाणून पाडण्याचे धोरण कम्युनिस्ट पक्षाने ठरविले. गांधीचा जनमतावरील प्रभाव हा प्रतिगामी ठरवला गेला. पण ४० साली कम्युनिस्ट पक्षाने मुस्लिम लीगचा मुस्लिम जनतेवरील प्रभाव मात्र प्रतिगामी मानला नाही. पाकिस्तानला त्याने त्यावेळी नि:संदिग्ध पाठिंबा दिला नव्हता, तो पुढे देण्यात आला. पुढे रशियावर हिटलरने हल्ला केला आणि कम्युनिस्ट पक्षाने ब्रिटिश सरकारांशी सहकार्य करण्याचे धोरण स्वीकारले. येथे चाललेल्या राष्ट्रीय चळवळीस त्याने विरोध केला.

भारत स्वतंत्र झाला. पण कम्युनिस्ट पक्षाला हे स्वातंत्र्य खरे वाटत नव्हते. ४८ सालापासून रणदिवे प्रभृतींच्या नेतृत्वाखाली नेहरूंच्या सरकारविरुद्ध उठावाची भूमिका घेतली गेली. संप, जाळपोळ इत्यादींना ऊत आला; पण ही बंडाळी मोडून काढली जाऊन कम्युनिस्ट पक्षाला आपल्या धोरणाचा फेरविचार करावा लागला. तोही त्याने रशियाच्या आदेशानंतरच केला. नेहरूंनी परराष्ट्र राजकारणात अलिप्ततावादाचा स्वीकार केला. कोरियन युद्ध न वाढू देण्याची हाक दिली. नव्या चिनी कम्युनिस्ट राजवटीचे स्वागत केले. हे सर्व रशिया व कम्युनिस्ट पक्ष यांना गोंधळात टाकणारे होते. त्यामुळे नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाच्या या भागास पाठिंबा द्यावा, पण अंतर्गत बाबतीत त्यांचे सरकार भांडवलधार्जिणे आहे असा पवित्रा घेण्याचे ठरले. तत्पूर्वी रणदिवे यांच्या लढावादी धोरणालाही रशियाचा पाठिंबा होता आणि पुढे येथे ज्याप्रमाणे दोन गट झाले त्याचप्रमाणे रशियातही दोन विचारप्रवाह भारताबाबत होते. रणदिवे यांची 'लाइन' कम्युनिस्ट पक्षाने सोडली तीही कोमिन्फॉर्मच्या आदेशाने. 'आपल्याला सुधारून मार्गावर आणण्यास कोमिन्फॉर्म आहे ही किती चांगली गोष्ट आहे!' असे डांगे त्यावेळी म्हणाले होते.

स्टालिनच्या मृत्यूनंतर क्रुश्चॉव यांनी भारतविषयक धोरणात आमूलाग्र बदल केला. नेहरू व क्रुश्चॉव यांचे बरेच जुळले. रशियाने काश्मीरसंबंधी भारताला पाठिंबा दिला. भिलाई वगैरे पोलाद कारखान्यास मदत दिली. आर्थिक धंद्यातील मदत व आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील सहकार्य यांचे क्षेत्र वाढत गेले. या काळात रशियनांनी येथील कम्युनिस्ट पक्षाचे काय होईल याची पर्वा केली नाही. चीन आणि रशिया यांचे बिनसू लागले. तेव्हा रशिया भारताच्या अधिक जवळ आला. क्रुश्चॉव हे प्रथम चीनच्या सीमाविषयक भूमिकेबद्दल तटस्थ होते. त्यामुळे येथील कम्युनिस्ट पक्ष तारेवर कसरत करीत होता. चीनसारखा साम्यवादी देश भारतावर आक्रमण कसा करील असा भूपेश गुप्ता, डांगे प्रभृतींचा सवाल होता. चीनचे आक्रमण झाले तरीही या मंडळींना आपले धोरण बदलावेसे वाटले नाही. पण नंतर रशियाचे चीनशी बिनसले तेव्हा चीनच्या आक्रमक धोरणाचा शोध येथील

कम्युनिस्ट पक्षास लागला. चीनविषयक भूमिका कोणती घ्यावी हे कम्युनिस्ट पक्षातील फाटाफुटीचे मुख्य कारण ठरले. एक गट रशियावादी झाला व दुसरा चीनवादी. अर्थात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला पुढे चीनचे छत्र शिल्लक राहिले नाही. ज्याप्रमाणात रशिया व चीन यांचे संबंध बिघडले त्याप्रमाणात ते भारताबरोबर सुधारले. क्रुश्चॉव यांचे हे धोरण ब्रेझनेव्ह यांनी चालू ठेवून भारताशी अधिक निकट संबंध प्रस्थापित केले आहेत.

तथापि भारत हा केवळ आपल्यावरच अवलंबून राहावा असे रशियाला वाटत नसल्याचे डोनाल्डसन यांचे मत आहे. भारताच्या मागण्या वाढतील व त्या भागविणे आपल्याला शक्य नाही याची कल्पना रशियाला आहे. म्हणून अमेरिकेशी मर्यादित सहकार्य करू देण्यास रशियाचा विरोध नाही. कम्युनिस्ट पक्षाची मात्र यामुळे अडचण होते. पण या पक्षाचे नेतृत्व देशाचे नेतृत्व करण्याइतके समर्थ नाही याची जाणीव रशियन नेत्यांना आहे.

हा सारा इतिहास डोनाल्डसन यांनी मोठ्या अभ्यासू रीतीने व चिकित्सक पद्धतीने मांडला आहे. येथल्या कम्युनिस्ट पक्षाच्या बाजूक दास्याची ही पुराव्यानिशी दिलेली गाथाच आहे.

१-३-१९७५

रशियातील समाजजीवन

न्यूयॉर्क टाइम्सचे हेंड्रिक स्मिथ आणि वॉशिंग्टन पोस्टचे कैसर हे एकाच वेळी (७१-७४) रशियात होते. दोघांनीही रशियावर पुस्तक लिहिले आहे. स्मिथ यांचे पुस्तक – रशियन्स – हे अधिक तपशीलवार व उजवे आहे. स्मिथ यांनी राजकारणाची चर्चा केलेली नाही. ते रशियात सैबेरियापासून अनेक भागात हिंडले, असंख्य रशियनांशी त्यांच्या गाठीभेटी पडल्या आणि या सर्व अनुभवातून जे लोकजीवन त्यांना दिसले ते या पुस्तकात रंगविले आहे. 'संडे टाइम्स'मध्ये (लंडन) जिलास यांनी या पुस्तकाची प्रशंसा केली होती आणि तशी ती करावी अशारीतीने स्मिथ यांचे हे पुस्तक आहे.

गेल्या दहा-पंधरा वर्षात रशियनांचे राहणीमान बरेच उंचावले आहे. स्मिथ मॉस्कोत गेले तेव्हा सर्वसामान्य माणसाचा पोषाख बराच चांगला आढळला. अर्थात मॉस्कोतील परिस्थिती व इतर ग्रामीण भागातील परिस्थिती यात फरक आहे. केवळ पाच वर्षात ३५० कोटी डॉलर्स एवढी रक्कम घरबांधणीवर खर्च झाली. ५६ सालपासूनच्या वीस वर्षात ४ कोटी ४० लक्ष घरे बांधली गेली. ७५ सालात १ कोटी १० लक्ष लोकांच्या घरांचा प्रश्न सोडविण्याचे ठरले होते. अर्थात वीस वर्षात ४ कोटी ४० लक्ष निवासस्थाने बांधून झाली असली तरी लोकसंख्या साडेचार कोटींनी वाढली. तसेच निवासस्थाने याचा अर्थ तीनचार खोल्यांचे निवासस्थान असाही गृहीत धरून चालणार नाही. पण जेथे सामुदायिक निवासस्थानात राहावे लागे, तेथे स्वत:ची एक खोली मिळाली तरी किती समाधान वाटते हे अमेरिकनांना कळणार नाही असे स्मिथ यांना काही रशियनांनी ऐकविले होते. हा घरांचा प्रश्न सोडविण्यावर रशियन सरकारने भर दिला आहे. पूर्वीच्या तुलनेत धान्याचा खपही बराच वाढला आहे. अर्थात अन्नपदार्थांसाठी रांगा लावण्याचे चुकत नाही. तसेच मॉस्को वगळल्यास इतर लहानशा गावांत पुरेसे मटण मिळेलच अशी खात्री नसते. स्मिथ यांच्या ओळखीचा एक रशियन आपल्या आईवडलांना भेटावयास जाई तेव्हा मटण बरोबर नेत असे. स्मिथ यांच्या वास्तव्यात त्यांना असे आढळले की, खाजगी मोटारींची संख्या १८ लाख होती ती ३० लाख झाली. (अमेरिकेत ती १० कोटी आहे.) मोटारींची किंमत कमी नाही. तसेच खाजगी मोटारींची संख्या वाढली असली तरी मोटारींची देखभाल करणे सोपे नसते. सुटे भाग मुष्किलीने मिळतात. ते मिळत नसल्यास अनेकांना कित्येक दिवस आपली मोटार न वापरता ठेवून द्यावी लागते. सर्व्हिसिंग म्हणून ज्यास म्हणतात त्याची अडचण सर्वात अधिक. त्यासाठी पैसेही बरेच मोजावे लागतात. असे असूनही मोटारीसाठी प्रतीक्षायादी मोठी आहे. याचा अर्थ लोकांजवळ पैसा झाला आहे. शिवाय

सर्वांनाच मालमत्ता करता येत नसल्याने पैशाला वाट ही फुटावी लागते व त्यामुळे मोटारींसाठी प्रतीक्षायादी लांबणे साहजिक आहे. रशियातला आणखी एक उल्लेखनीय विशेष म्हणजे लहान मुलांची घेतली जाणारी काळजी. आर्थिक परिस्थितीमुळे अनेकांना मूल होणेच परवडत नाही; दुसरे मूल होणे हे तर फार खर्चाचे ठरते. यामुळे गर्भपाताचे प्रमाण बरेच वाढले आहे. पण मूल झाल्यावर त्याच्या संगोपनाची व शिक्षणाची सरकारी व्यवस्था उल्लेखनीय असते. लहान मुलांचे छंद पुरविले जातात. पण एका शिक्षिकेने सांगितले, कोणतीही चित्रे काढावयाची असली तरी काढण्यास मुलांना मोकळीक आहे. फक्त लेनिनचे चित्र काढू दिले जात नाही, कारण ते फार वाईट काढतात. लेनिनविषयी अनेक धडे व उल्लेख असल्याने लेनिनचा प्रभाव बालवयापासूनच पडलेला असतो.

रशियन क्रांती ही वर्गविग्रहातून झाली. पण नंतर नवे वर्ग निर्माण झाले. कुशल, कर्तबगार अशा लोकांना जादा वेतन देणे आवश्यक आहे असे लेनिनने ठरविले आणि स्टालिनने कमाल व किमान वेतनातील तफावत बरीच रुंदावून नवे वर्ग प्रतिष्ठित केले. आपला दर्जा, अधिकार यांच्याबद्दलची जागरूकता रशियात जेवढी दिसते तेवढी ती इतरत्र क्वचित दिसते असे स्मिथ यांचे म्हणणे. एक नवी उतरंड तयार झाली आहे. अगदी वरिष्ठ नेते, पॉलिटब्यूरोचे सदस्य, केंद्रीय समितीचे सभासद यापासून कम्युनिस्ट कार्यकर्त्यांपर्यंत खास अधिकार आहेत, सवलती व सोयी आहेत. तसेच कलावंत, शास्त्रज्ञ, लेखक वगैरेनांही काही सोयी आहेत. त्यांना राजकीय अधिकार नाही. पण राजकीय अधिकार असलेल्यातही अनेक श्रेणी आहेत व त्याप्रमाणे त्यांना अनेकविध सुखविलास मिळत असतात. ब्रेझनेव्ह, पॉडगॉर्नी, कोसिगिन वगैरे वरिष्ठ नेत्यांना निवासस्थाने, आरामगृहे, मोटारी यापासून अनेक सुखविलास मिळतात. ज्येष्ठ नेत्यांना क्रेमलिनमधून खास प्रकारचे जेवण मिळते. पॉलिटब्यूरो, केंद्रीय समितीचे सभासद यांच्यासाठी खास दुकाने आहेत. तेथे उत्तमोत्तम स्वदेशी व परदेशी माल मिळतो. ही दुकाने सर्वसामान्यांना उघडी नाहीत. या अधिकाऱ्यांना समुद्रकिनारी खास आरामगृहे आहेत. त्यातही लहानमोठी असा भेद आहे. ग्रोमिको हे पॉलिटब्यूरोचे सभासद झाल्यावर त्यांना मोठे आरामगृह मिळाले. केवळ परराष्ट्रमंत्री असताना त्यांना ते उपलब्ध नव्हते. अधिकार गेल्यावर ही सोय काढून घेतली जाते. मिकोयान यांच्यासारखे अपवाद थोडे. त्यांचे आरामगृह पूर्वीचेच कायम राहिले. उलट मोलोटॉव्ह यांना लहान आरामगृह मिळाले. या वरिष्ठ मंडळींना खास औषधोपचाराची सोय आहे त्याचप्रमाणे नाट्यगृहात त्यांच्यासाठी सर्वच जागा राखीव असतात.

कम्युनिस्ट पक्षाचे नेते, कार्यकर्ते, शास्त्रज्ञ, कलावंत या सर्वांचा एक वरिष्ठ वर्ग तयार झाला आहे. त्या वर्गास सुखाचे, आरामाचे अनेक मार्ग मोकळे आहेत. त्यांच्या मुलाबाळांना, नातेवाइकांनाही भराभर बढत्या मिळतात, चांगले हुद्दे मिळतात. ब्रेझनेव्ह यांचा मुलगा युरी हा दहा वर्षे रशियन व्यापारी प्रतिनिधी म्हणून स्वीडनमध्ये होता.

याखेरीज त्याच्या परदेशी अनेक वाऱ्या झाल्या त्या वेगळ्याच. कोसिगिन यांची मुलगी नेहमी त्यांच्याबरोबर परदेशी प्रवासात असते. त्यांचा जावई हाही व्यापारी तज्ज्ञ या नात्याने परदेशी प्रवास करीत असतो. ग्रोमिको यांचा मुलगा अनातोली हा लंडन व वॉशिंग्टनच्या रशियन दूतावासात मोठ्या हुद्द्यावर होता.

वशिला – ब्लाट – हा शब्द रशियात सर्वत्र वापरला जातो. वशिल्यामुळे अनेक कामे होतात. एखाद्या प्राध्यापकाला चांगल्या वस्तू पुरवून दुकानाचा व्यवस्थापक आपल्या मुलाला वरच्या वर्गात पाठवू शकतो. गृहमंत्र्याच्या 'ढ' मुलाला 'अ' वर्ग मिळतो. अशी अनेक कामे अनेकांची होत असतात. पण वशिल्याचे प्रकार व प्रमाण एवढ्यावरच थांबत नाही. याचे रूपांतर भ्रष्टाचारात होते. सर्व प्रकारच्या मालाच्या टंचाईमुळे जादा पैसा देऊन माल घेतला जातो. हा पैसा अर्थातच काळा पैसा आहे. हा समांतर अर्थव्यवहार व्यापक प्रमाणावर चालू आहे. सरकारी मोटारींचे सरकारी ड्रायव्हर राजरोसपणे पेट्रोल कमी किंमतीत विकतात व पैसे काढतात. चांगला माल घेऊन त्याच्या बदली अन्य सोयी-सवलती घेणारे व्यवस्थापकही जागोजागी आहेत. अशा प्रकारच्या भ्रष्टाचाराचा कळस ब्रुश्चॉव यांच्या कारकीर्दीतील फुर्त्सेवा या सांस्कृतिक खात्याच्या महिला मंत्र्यांनी गाठला. त्यांनी एक प्रचंड आरामगृह बांधलेच, पण शिवाय आणखी एक असेच विलासी आरामगृह उभारले. त्यासाठी सरकारी माल वापरला. नंतर त्यांचे मंत्रिपद गेले एवढेच, पण त्यांना शिक्षा झाली नाही. भ्रष्टाचार, वशिला यांचे राज्य हे आता रुजले आहे.

टंचाईमुळे हे शक्य झाले आणि टंचाई कशामुळे? तर सर्वकष केंद्रीभूत नियोजनामुळे. उत्पादनाच्या व्यवहारात विकेंद्रीकरण नाही. सर्व निर्णय वरून घेतले जातात. त्यामुळे काही ठिकाणी नको त्या मालाची रेलचेल होते, तर काही ठिकाणी हव्या त्या मालाची चणचण असते. एखाद्या कारखान्याचे उत्पादनाचे लक्ष्य ठरविले, तरी त्याच्या कच्च्या मालाची व्यवस्था होत नाही. त्यामुळे उत्पादन थंडावते. भांडवल, यंत्रसामग्री, व्यवस्थापन यातील उणिवांमुळे उत्पादनाचे लक्ष्य गाठले जात नाही; पण यासंबंधीच्या हुकुमाला धाब्यावर बसविण्यासाठी मालाची प्रत कमी करून लक्ष्य गाठण्याचा प्रयत्न होतो. समजा चार इंच जाडीची काच दोन लाख मीटरपर्यंत तयार करावयाची असेल व ते जमत नसेल, तर दोन इंच जाडीची काच दोन लाख मीटरपर्यंत तयार होऊन लक्ष्य गाठल्याचे दाखविले जाते. मग ही काच जेथे उपयोगी पडावयाची ती पडत नाही. कामगारांत गैरहजेरीचे प्रमाण फार आहे आणि याला दारूचे व्यसन हे प्रामुख्याने कारणीभूत आहे. उपलब्ध साधनसामग्रीचा जास्तीत जास्त सोडाच, पण पुरेसा उपयोग होत नाही; त्यामुळे नासाडीचे प्रमाण बरेच आहे. यामुळे उत्पादनखर्चही वाढतो. मालाची प्रत चांगली नसते. ८५ टक्के टेलिव्हिजन सेटस् हे नादुरुस्त असतात. मोटार काय की रेफ्रिजरेटर काय, बिघडल्यावर दुरुस्त केव्हा होईल, याची शाश्वती नसते. मालाचा दर्जा चांगला ठेवावा

याची ओढ नसल्याने वाटेल त्या प्रकारचा माल गिऱ्हाईकांना घ्यावा लागतो. त्यामुळे दुकानात गेल्यावर तेथील विक्रेतेच परदेशी माल घ्या म्हणून गिऱ्हाइकांना उघड उघड सांगतात. अगदी दाढीची ब्लेडसुद्धा पूर्व जर्मनी वा बल्गेरियाची घ्या म्हणून एखादी विक्रेती स्मिथ यांना सांगत होती. या अशा सामान्य दर्जाच्या मालाचीही टंचाई असल्याने रांगा लावणे, हा एक जीवनाचा भागच होऊन बसला आहे. मॉस्कोत निदान आज ना उद्या आवश्यक वस्तू मिळतात. करमणुकीची साधने आहेत. लहान गावात तीही नाहीत. त्यामुळे ग्रामीण जीवन अधिक कंटाळवाणे बनले आहे.

तथापि, सर्वसामान्य रशियन माणूस आपल्या देशावर विलक्षण प्रेम करणारा आहे आणि तो मोकळेपणाने बोलणारा आहे. अमेरिकनांना तो स्वभावत: जवळचा वाटतो. स्मिथ यांच्या प्रवासातच अनेक रशियनांच्या गाठी पडल्या व त्यांच्याकडून कितीतरी प्रकारची माहिती मिळाली. रशियनांचा आणखी एक विशेष म्हणजे काव्याची आवड. काव्यवाचनाच्या कार्यक्रमासाठी बराच श्रोतृवर्ग जमतो. विशेषत: प्रचारकी काव्यापेक्षा जे कवी प्रामाणिकपणे काव्यनिर्मिती करतात त्यांच्या काव्यवाचनास फार गर्दी होते. पण एरवी राजकीय समस्या, राजकीय व्यक्तींची भाषणे याबाबत उदासीनता असल्याचे स्मिथ सांगतात. तरुण पिढीत ही वृत्ती वाढीला लागली आहे. तरुणांना पाश्चात्य जाझ संगीत आवडते. एवढेच नव्हे, तर अधिकारपदस्थांच्या मुलांच्या मेळाव्यात हे संगीत, आधुनिक नृत्ये यांची चलती असल्याचेही आढळून आले आहे.

रशियनांचे जीवन तीन वर्षांच्या वास्तव्यात जसे आढळले, तसे स्मिथ यांनी रंगविले आहे. त्यात अतिशयोक्ती नाही. उदाहरणे देऊनच त्यांनी आपला मुद्दा स्पष्ट केलेला दिसेल. साचेबंद जीवन अखेरीस कंटाळवाणे होते. हीच भावना एका रशियन कवीने वर्णन केली आहे. त्याची कविता अशी :

Boredom is a fast of the spirit,
It is a solitary supper.
The carousing of your enemies is boring,
And your comrade is doubly boring.
Art lies, thought is scant.
Impudent rhymes are boring.
And your darling is as boring
As a whore who plays the nun,
A great feast of the spirit;
The applauding audiences are boring

ही कविता प्रत्ययकारी व अर्थपूर्ण आहे.

२०-११-१९७६

स्टालिनशाहीतील हत्याकांड

क्रुश्चॉव यांनी ५६ साली स्टालिनच्या दुष्कृत्यांची वाच्यता केली तेव्हा रशियात एका नव्या पर्वाला सुरुवात झाली. याचा अर्थ तेथे व्यक्तिस्वातंत्र्य स्थापन झाले असे नव्हे. परंतु स्टालिनशाहीत जे अनन्वित प्रकार होत त्यांना पायबंद बसला. स्टालिनशाही व स्टालिनचे व्यक्तित्त्व यावर प्रकाश टाकणारे ग्रंथ यापूर्वी बरेच प्रसिद्ध झाले आहेत. डॉयश्चरने लिहिलेली स्टालिन व ट्रॉटस्कीची चरित्रे यांचा या संदर्भात उल्लेख करता येईल. तथापि त्याही ग्रंथात नसलेली अशी बरीच माहिती देणारा ग्रंथ रॉय मेदवेदेव्ह यांनी लिहिला आहे. रशियन भाषेत लिहिलेल्या या ग्रंथाचे इंग्रजी रूपांतर 'लेट हिस्टरी जज' या नावाने प्रसिद्ध झाले असून संपादकांनी तो साक्षेपाने संपादित केला आहे. रॉय मेदवेदेव्ह यांचे वडील तत्वज्ञानाचे प्राध्यापक होते. त्यांच्यावर संक्रांत आली. त्यांनी आपल्या दोन मुलांची नावे क्रांतिकारकांच्या नावांवरून ठेविली. एक झोरेस व दुसरा रॉय. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या नावावरून हे नाव ठेवले होते. झोरेस हे शास्त्रज्ञ आहेत तर रॉय हे शिक्षणशास्त्रज्ञ, इतिहासतज्ज्ञ आहेत. प्रस्तुतच्या ग्रंथाचा विशेष हा, की त्यातील अनेक संदर्भ हे रशियन नियतकालिके, ग्रंथ, अप्रकाशित चरित्रे, रोजनिशा यातून घेतलेले असल्याने स्टालिनशाहीवर बराच वेगळा प्रकाश हा ग्रंथ टाकतो.

हे सर्वज्ञातच आहे, की स्टालिन हा रशियन क्रांतीच्या अगदी पहिल्या प्रणेत्यांपैकी नव्हता. त्यामुळे 'जगाला धक्का देणारे ते दहा दिवस' हे पुस्तक लिहिणाऱ्या रीड याच्या पुस्तकात स्टालिनबद्दल एक ओळही नाही. स्टालिनचे लेनिनशी प्रारंभापासून मतभेद होते. लेनिन परदेशात व स्टालिन रशियात अशा त्या काळात लेनिनची तीन पत्रे स्टालिनने प्रसिद्धच केली नाहीत. यात कॅमेनिव्हची त्याला साथ होती. स्टालिनचा निर्घृणपणा हा सत्ताधारी झाल्यानंतर आलेला नाही. तो प्रारंभापासूनच होता. क्रांतीनंतर काही खेड्यांतून विरोध झाला तेव्हा ती खेडी सर्व माणसांसह बेचिराख करावी असा त्याचा आदेश होता. लेनिनला स्टालिनच्या निर्घृणपणाची कल्पना होती. त्याने त्याला त्याची जाणीवही दिली होती. लेनिनची पत्नी क्रुप्सकाया हिचा स्टालिनने अपमान केला म्हणून तिची माफीही मागावयास लावली होती. पण लेनिनला गोळी लागल्यानंतर त्याची प्रकृती ढासळली. या काळात स्टालिनने आपला जम बसविला. स्टालिनच्या हाती सत्ता जाऊ नये असे लेनिनने लिहून ठेवले होते. पण त्याच्या त्या मृत्युपत्राची स्टालिनने वासलात लावली. लेनिनच्या मृत्यूनंतर क्रुप्सकाया शिक्षणक्षेत्रात वावरत असे. पण तिच्या कोणत्याच सूचना स्टालिन

मानीत नसे व इतरांनी मानू नये असा त्याचा आदेश होता. तिने लेनिनच्या आठवणी प्रसिद्ध केल्या तेव्हा स्टालिनने तिची स्तुती केली पण दुसऱ्या दिवशी 'प्रवदा'त या पुस्तकाचे वाभाडे काढणारा लेख प्रसिद्ध झाला!

लेनिनच्या मृत्यूनंतर स्टालिनच्या हाती सत्ता आली व मग ती त्याने अधिकाधिक दृढ करण्याचा प्रयत्न सुरू केला. यासाठी त्याने विरोधक, लेनिनचे सहकारी या सर्वांचा काटा काढण्याचे पद्धतशीर प्रयत्न केले. अगदी प्रारंभीच फ्रुन्झ याचा बळी घेतला गेला. यादवी युद्धाच्या काळात सेनापती या नात्याने फ्रुन्झ याने मोलाची कामगिरी बजावली होती. २४ सालात मार्चमध्ये त्याला पोटदुखीचा विकार जडला. पण विश्रांतीनंतर तो सुधारला. तरीही ऑपरेशन करावे हा स्टालिनचा आग्रह. ऑपरेशन केल्यावर पोटात अल्सर नसल्याचे आढळले. पण फ्रुन्झला तत्पूर्वी अतिरिक्त क्लोरोफॉर्म देण्यात आला होता व त्यामुळे त्याचे हृदय बंद पडले. स्टालिनने असे किती लोक मारले याची गणतीच नाही. फ्रुन्झ हा पहिला बळी. नंतर जी मालिका लागली ती अखेरपर्यंत चालूच होती. ट्रॉटस्कीचा खून करणाऱ्याचा स्टालिनने सन्मान केला. या ग्रंथात शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, लेखक, कवी अशा साडेसातशे व्यक्तींची नावेच दिली आहेत की जे स्टालिनशाहीचे बळी ठरले. पण हे झाले नामवंत. याखेरीज सर्वसाधारण नागरिक, शेतकरी यांचे शिरकाण मोठ्या प्रमाणावर झाले. वेठबिगार प्रचंड प्रमाणावर झाली. हालअपेष्टा, वेठबिगार इत्यादींपायी दहा लाखाहून अधिक लोक मेले. सर्व देश एक तुरुंग बनला. स्टालिनने निरनिराळ्या क्षेत्रातील व्यक्तींचे जे हत्याकांड केले त्यामुळे या ज्ञानशाखा खुरटल्या. युद्ध झाले तेव्हा लायक सेनापती कमी पडले याचे कारण स्टालिनचे हत्याकांड.

मार्क्स आणि लेनिनचे सर्व सिद्धान्त स्टालिनने धुडकावले. या दोघांनी वृत्तपत्रस्वातंत्र्याचा पुरस्कार केला. स्टालिनने भाषण, लेखन वगैरे स्वातंत्र्यच खतम केले. आपली व्यक्तिगत सत्ता वाढविण्यासाठी स्टालिनने ज्यांचा उपयोग केला त्यांचेही त्याने शिरकाण केले. त्यासाठी खोटे आरोप ठेवले गेले. न झालेल्या कटांची कुभांडे रचली गेली. ज्यांनी क्रांतीसाठी आयुष्य वेचले ते क्रांतीचे द्रोही ठरविण्यात आले. यासंबंधीच्या काही खटल्यांच्या हकीगती लेखकाने दिल्या आहेत त्या वाचण्यासारख्या आहेत. अनन्वित छळ करून खोटे कबुलीजबाब घेतले गेले. बुखारिन यासारख्या क्रांतिकारकाचा असाच बळी गेला. त्याच्याकडून कबुलीजबाब घेतला खरा, पण त्याने आपल्या पत्नीकडून एक निवेदन पाठ करून घेतले होते. वेळ आली की ते तिने प्रसिद्ध करावे असे बुखारिनने तिला सांगितले होते. या निवेदनाचा काही भाग या ग्रंथात आहे. बुखारिनच्या पत्नीने क्रुश्चॉवच्या कारकीर्दीत ते सर्व लिहून काढून सरकारला कळविले. पण रशियन नेत्यांनी त्याची दखल घेतली नाही. बुखारिन हा निर्दोष होता, त्याचे रशियन क्रांतीच्या इतिहासातले स्थान त्यास

पुन्हा द्यावे असे त्याच्यावरोबरच्या चौघांनी रशियन राज्यकर्त्यांना क्रुश्चॉवच्या राजवटीत लिहून कळविले होते. हे पत्रही या ग्रंथात आहे. पण त्यांची मागणी मान्य झाली नाही.

सत्ता हाती घेण्यासाठी एवढे अत्याचार करणारा कर्दनकाळ स्टालिन हा मरून पडलेल्या नवऱ्याच्या वायकोच्या तोंडात मारण्याइतका जंगली होता. इतकी सत्ता हाती आल्याने स्टालिनने आर्थिक क्रांती घडवून आणली हा समज चुकीचा आहे असे लेखकाचे म्हणणे आहे. तो म्हणतो की, शेती व उद्योगधंदे यात स्टालिनने चुकीची धोरणे स्वीकारली आणि स्टालिन नसता तर रशियाने अधिक प्रगती केली असती. या संदर्भात शेतीच्या क्षेत्रातील स्टालिनच्या धोरणाचा जो आढावा लेखकाने घेतला आहे तो उल्लेखनीय ठरेल. लेनिनने सामुदायिक शेतीपूर्वी सहकारी शेतीचा प्रयोग करावा, मध्यम पातळीवरील जे जमीनमालक आहेत त्यांचा अनुभव व कौशल्य यांचा उपयोग करून घ्यावा ही भूमिका प्रतिपादन केली होती. पण स्टालिनने याउलट सामुदायिक शेतीचे धोरण अमलात आणले आणि मध्यम पातळीवरील शेतकरी हे धनिक – कुलक – मानून त्यांचे हत्याकांड केले. परिणामत: रशियात धान्याचे दुर्भिक्ष झाले आणि अद्यापही रशियाला अन्नधान्याचा प्रश्न सोडविता आलेला नाही. सेटनर हे रशियन माप आहे. एक सेटनर म्हणजे शंभर किलो. रशियात धान्याचे दुर्भिक्ष असता २८ साली जवळ जवळ दहा लाख सेटनर धान्य निर्यात केले गेले आणि हे प्रमाण वाढता वाढता १ कोटी ८१ लक्ष सेटनर धान्य ३२ साली निर्यात करण्यात आले. या काळात रशियात मोठ्या प्रमाणावर भूकबळी होत होते. क्रांतीपूर्व काळात रशियात पूड या नावाचे माप होते. एक पूड म्हणजे छत्तीस पौंड. या हिशेबाने लेखकाने धान्योत्पादनाचा हिशेब दिला आहे. १९०९ ते १३ या काळात म्हणजे क्रांतिपूर्वी दर वर्षी एक हजार लक्ष पूड धान्य बाजारात येत असे. पण २३ ते २७ या काळात ५१ कोटी ४० लक्ष पूड धान्यच बाजारात आले.

याला अनेक कारणे आहेत. सरकारने जी किंमत ठरविली होती ती किफायतशीर नव्हती. त्यामुळे शेतकरी धान्य विकेनात किंवा विकले तर काळाबाजार करीत. त्याखेरीज त्यांना गत्यंतरच नव्हते. काहींनी आपली सर्व जमीन लागवडीस आणण्याचे सोडून दिले. कारखानदारी वाढली व त्या प्रमाणात मजुरीचे पैसे लोकांच्या हाती शहरातून आले. त्यांची धान्य व इतर उपभोग्य वस्तूंची मागणी वाढली. पण धान्यच बाजारात नव्हते. सामुदायिक शेती वा सहकारी शेतीचे उत्पादन काही वाढले नाही व त्यामुळे त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात धान्य बाजारात येत नव्हते. २७ सालात फार मोठ्या सधन शेतकऱ्यांनी १३ कोटी पूड धान्य बाजारात आणले; सरकारी शेतीतून चार कोटी पूड आले. पण जे लहान लहान शेतकरी होते तेच खरे मोठ्या प्रमाणावर धान्य पिकवीत व बाजारात आणीत. २७ साली या शेतकऱ्यांनी ४ हजार लक्ष पूड धान्य पिकविले. पण दहा टक्केही

विक्रीला आणले नाही. स्टालिनच्या घातक धोरणाचा हा परिणाम होता. धान्यवसुली झालीच नाही.

आपण यापासून बरेच शिकण्यासारखे आहे. मध्यम पातळीवरील शेतकऱ्याच्या विरुद्ध समाजवाद व पुरोगामित्वाच्या नावाखाली आघाडी येथेही उघडली गेली आहे. गव्हाचे भाव ठरविले ते ६८ साली. त्यानंतर वाढ केलेली नाही. परिणामत: गव्हाचा व्यापार सरकारकडे येऊनही तो यशस्वी झाला नाही. गव्हाची वसुलीच नीट झाली नाही. आपण अमेरिकन शेतकऱ्याला धान्याचा वाटेल तो भाव देण्यास व त्यासाठी परकी चलन खर्च करण्यास तयार आहोत, पण येथल्या शेतकऱ्याला क्विंटलमागे दहा-वीस रुपये वाढवून देण्यास तयार नाही. धान्याचे भाव वाढले की चलनवाढ व भाववाढ होईल ही भीती दाखविली जाते. स्टालिननेही हाच युक्तिवाद केला व तो फसला. येथे त्याच चुका पुरोगामित्वाच्या नावाखाली केल्या जात आहेत. कोणत्याही समाजवादी देशाला शेतीचा प्रश्न सोडविता आलेला नाही हे येथे लक्षातच घेतले जात नाही.

अशा ह्या स्टालिनशाहीत मोठमोठे उद्योग वाढले खरे, पण त्याची किंमत फार द्यावी लागली. युद्धकाळात लायक लोकांचा तुटवडा भासू लागला आणि उत्पादित मालाचा दर्जा घसरला होता. नोकरशाही, लालफीत, गोंधळ, दिरंगाई व भ्रष्टाचार यांची वाढ स्टालिनच्या राजवटीत झाली. निरंकुश सत्ता हाती ठेवण्याच्या स्टालिनच्या महत्त्वाकांक्षेपायी त्याने सर्व समाजाच्या जिवंतपणावरच आघात केला. आसुरी महत्त्वाकांक्षा हा स्टालिनचा स्थायीभाव होता. ज्याप्रमाणे त्याने स्वत:ची सत्ता वाढविली त्याचप्रमाणे रशियाचे सामर्थ्य वाढविण्याच्या ईर्ष्येपायी आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळ दुर्बल केली. जर्मनीशी सख्य करताच फासिस्टविरोधी भूमिका सोडण्यास जर्मन कम्युनिस्टांना भाग पाडण्यात आले. हिटलर रशियाविरुद्ध मोर्चे बांधत असताना रशियन मात्र जर्मनीचे गोडवे गात होते व गाफील राहिले.

लेखकाने स्टालिनची मानसशास्त्रीय ठेवण काय होती याचाही शास्त्रीय ऊहापोह केला आहे. आसुरी महत्त्वाकांक्षा हा स्थायीभाव असल्याने स्टालिनने लाखो लोक यमसदनास पाठविले. शेकडो वर्षांत एवढा निर्घृण व कर्दनकाळ राज्यकर्ता झाला नाही. अखेरीस त्याचा कोणावरही विश्वास नव्हता. ज्या मोलोटॉव्ह, कागानोव्हिच वगैरेंनी त्यास साथ दिली त्यांनाही त्याने घावरवून सोडले होते. खुद्द मोलोटॉव्हच्या बायकोला त्याने स्थानबद्ध केले. बेरिया हा त्याचा खास विश्वासातला व हत्याकांडाच्या सत्राचा सूत्रधार. पण त्याच्यावरही स्टालिनचा अखेर विश्वास राहिला नव्हता. तो व बेरिया या काळात नौकाविहार करीत असता बंदुकीचे बार झाले. बेरियाचा आपल्याला मारण्याचा कट असावा असा संशय स्टालिनला आला होता. या अखेरच्या दिवसात स्टालिनचे भोजनाचे वगैरे आमंत्रण आले

की आमंत्रित घाबरून जात. बुद्धिबळाचा खेळ मांडला तर स्टालिनचा कोणी पराभव करीत नसत. न जाणो त्यापायीही देहदंड व्हावयाचा. स्टालिनने एवढे हत्याकांड केले पण ते करताना त्याने एक खबरदारी घेतली. आपले शत्रू हे जनतेचे शत्रू आहेत हाच प्रचार त्याने प्रभावी बनविला आणि हे सर्व लोकांसाठी चालले असल्याचा भास त्याने टिकविला. उद्योगधंदे वगैरे वाढल्याने रशियन जनतेला हे खरेही वाटले. पण अखेरीस सारा समाज त्याने पक्षाघात झाल्यासारखा बनविला. असा हा स्टालिन रशियातील हत्याकांडाला तितकासा जबाबदार नसून त्याचे सहकारीच कारणीभूत आहेत हे दाखविण्याचा प्रयत्न स्टालिनची मुलगी स्वेतलाना हिने केला आहे. पण तिचे पुस्तक लबाडीचे आहे असा अभिप्राय लेखक देतो. हा अभिप्राय मान्य होण्यासारखा आहे. त्याचप्रमाणे स्टालिनशाही गेली तरी स्वातंत्र्यविरोधी वातावरण रशिया व कम्युनिस्ट चळवळ यातून गेले नाही हा त्याचा निष्कर्षही वास्तव आहे.

१९-८-१९७३

इतिहासाचा निर्णय

रशियन क्रांतीचा वाढदिवस दोन दिवसांनी साजरा होईल. वास्तविक रशियात आजही वेगळी क्रांतीच चालू आहे. श्री. गोर्बाचोव यांनी राजकीय, आर्थिक व वैचारिक क्षेत्रात स्वीकारलेल्या धोरणांमुळे साधारणत: सत्तर वर्षांहून अधिक काळ जी घडी बसविली जात होती, ती पुरती विस्कटली आहे. गोर्बाचोव यांनी स्टालिनने अवलंबिलेल्या धोरणाकडे पाठ फिरविली आणि त्या वेळच्या सर्व इतिहासाचे नव्याने विश्लेषण करण्याची मुभा दिली. स्टालिनच्या राक्षसी राजवटीत जे लाखो लोक यमसदनास पाठविण्यात आले, त्यांचे स्मारक मॉस्कोत उभे करण्यात येत आहे. त्या काळात ज्यांना राजकीय गुन्हेगार ठरविले, त्यांचे पुनर्वसन करण्याचे काम होत आहे.

या कामी इतिहासकारांचा उपयोग अधिक. श्री. रॉय मेदवेदेव्ह हे हे नाणावलेले रशियन इतिहासकार आहेत. त्यांनी 'लेट हिस्टरी जज्ज' या नावाचा ग्रंथ १९७२ साली लिहिला व तो अमेरिकेत प्रसिद्ध केला. त्याचे रशियन भाषांतरही अमेरिकेतच छापले गेले. उलट चीनमध्ये मात्र हे पुस्तक निघाले. रशियात ते अद्याप प्रसारित झालेले नाही. पण गेल्या काही वर्षांत रशियन सरकारने निर्बंध काही प्रमाणात सैल केले असल्यामुळे, मेदवेदेव्ह यांचे काम सुकर झाले. त्यांनी बऱ्याच प्रमाणात खाजगी पत्रव्यवहार, आत्मकथा व कात्रणे जमा केली आहेत. अप्रकाशित असा हा दस्तऐवज उपयोगात आणून त्यांनी आपल्या ग्रंथाची सुधारून वाढविलेली आवृत्ती प्रसिद्ध केली आहे. तीत पहिलीपेक्षा इतकी माहिती नवी आहे की, त्यांनीच म्हटल्याप्रमाणे ही दुसरी आवृत्ती नसून तो नवा ग्रंथच आहे. चांगला नऊशे पानांचा हा ग्रंथ वाचून संपल्यावर मन सुन्न होते ते यात कथन केलेल्या अत्याचारी राजवटीच्या प्रतापामुळे.

रॉय मेदवेदेव्ह यांनी प्रारंभीच्या काही प्रकरणांत लेनिन व स्टालिन यांच्यात खाजगी व जाहीररीत्या मततभेद कसे होते, हे दाखवून दिले आहे. तथापि स्टालिनच्या संघटनकौशल्यावर लेनिन खूष होता. तसेच तो निर्धारी पुरुष आहे, हे लेनिनला पटले होते. पक्षात स्टालिनची त्याही काळात भांडणे होत. त्याच्या उद्धटपणाचा अनुभव येऊन तेव्हा त्याने काही शत्रू करून घेतले होते. पक्षाच्या संघटनेत मात्र स्टालिन लेनिनच्या कारकीर्दीतच वर चढू लागला होता. काही वेळा लेनिन स्टालिनच्या काही वक्तव्यांमुळे वा वागण्यामुळे अस्वस्थ होत असे. पण स्टालिनच्या अधिकारांत वाढच होत गेली. त्याच वेळी लेनिन आजारपणामुळे बेजार होता. यातच स्टालिनने जेव्हा लेनिनची पत्नी

क्रुप्सकाया हिचा अपमान केला, तेव्हा लेनिनने चिडून जाऊन स्टालिनविरोधी पत्र पक्षातील प्रमुखांना लिहिले. ते रशियात क्रुश्चॉव यांनी स्टालिनच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध केले. पण या पत्राची कोणाला महितीच नव्हती, असे नव्हे.

मेदवेदेव्ह यांनी या पत्राचा इतिहासच दिला आहे आणि त्यावरून अनेकांना याची कल्पना वरीच वर्षे होती, हे कळून येते. तसेच रशियातील निरनिराळ्या राष्ट्रिकांसंबंधी स्टालिनची जी भूमिका होती, ती लेनिनला मान्य नसल्यामुळे, विशेषत: जॉर्जियासंबंधी स्टालिनने जो पवित्रा घेतला होता, त्यामुळे त्याने स्टालिनला विरोध करण्यास ट्रॉटस्कीला सांगितले होते. याखेरीज इतरही काही कागदपत्रे तो ट्रॉटस्कीला द्यावयास तयार होता. लेनिन आजारी असल्यामुळे त्याने विरोधी भाषण करण्याची सूचना केली होती. ट्रॉटस्कीने ती नाकारली. नंतर मात्र त्याने लिहिले की, आपली चूक झाली. लेनिनने सांगितल्याप्रमाणे विरोध केला असता व दस्तऐवज वाचून दाखविले असते, तर स्टालिनचा पक्षात राजकीय पराभव झाला असता व तो सरचिटणीस होऊ शकला नसता. या संदर्भात मेदवेदेव्ह यांनी लेनिनच्या महिला चिटणिसाची जी आठवण उद्धृत केली आहे, ती नमूद करण्यासारखी आहे. ही चिटणीस सांगते की, लेनिन हा अपंग बनला होता आणि पक्ष व सरकार यात जे चाल्ले होते, ते पाहून तो एकटाच बसून राही आणि काही वेळा त्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहात. केवळ वैफल्यग्रस्त झाल्यामुळेच नव्हे, तर आपला अपमान होत आहे, असे त्याला वाटत होते, असे ती म्हणते. ट्रॉटस्की हाच पक्षात पुढे पराभूत झाला. स्टालिनने एकाला दुसऱ्याविरुद्ध उभा केला आणि ट्रॉटस्कीचा पक्षातल्या सामान्य कार्यकर्त्यांशी संबंध नसल्यामुळे त्याचा पराभव करणे सोपे झाले. इतक्यावर न थांवता स्टालिनने आपल्या हस्तकाकरवी ट्रॉटस्कीचा खून केला आणि शिक्षा भोगून सुटल्यावर त्याच्या खुन्याचा जाहीर सन्मान केला.

लेनिनच्या मृत्यूनंतर स्टालिनने सावध पावले टाकली व सत्ता हस्तगत केली. आर्थिक अडचणीवर मात करण्यासाठी त्याने निर्वंध सैल करण्याचे धोरण उचलून धरले. त्यावेळी त्याने बुखारिनला पाठिंबा दिला, ट्रॉटस्कीचा पराभव केला. नंतर त्याने बुखारिन प्रभृतींना उजवे वा प्रतिगामी ठरवून नेस्तनाबूत केले. पक्षात हे जे डावपेच खेळले जात होते, त्यांची विस्तृत माहिती या ग्रंथात आहे. तसेच या निमित्ताने ट्रॉटस्की, बुखारिन, कॅमेनिव्ह, झिनोविव्ह, रॅडेक, मोलोटॉव्ह अशा अनेकांच्या स्वभाववैशिष्ट्यांवर मेदवेदेव्ह यांनी चांगला प्रकाश टाकला आहे.

आपल्या विरोधकांच्या वा स्पर्धकांच्या उणिवांचा पुरेपूर उपयोग स्टालिनने केला आणि सत्ता केंद्रित करण्यात त्यास यश आले. त्यावरोवर पक्षाच्या काँग्रेसने काय ठराव केले, तेही न लक्षात घेता स्वत:च्या मताप्रमाणे अंमलवजावणी सुरू केली. सामुदायिक शेतीचा

प्रयोग आस्ते कदम करावा, असे काँग्रेसने ठरविले होते. पण अधिवेशन संपताच स्टालिनने सक्तीने सामुदायिक शेती करण्याचे जाहीर केले आणि लगेच आदेश सुटले. या शेतीबरोबरच कारखानदारीची गतीही वेगवान करण्याच्या दिशेने पावले टाकण्यात आली. बुखारिनने यास विरोध दर्शवून वेगळी योजना मांडली. ती लक्षात घेण्यासारखी आहे, असे सांगूनही प्रत्यक्षात स्टालिनने स्वत:ची योजना दामटली.

याचे परिणाम काय झाले? सामुदायिक शेतीचा आदेश निघताच अनेक शेतकऱ्यांनी आपली जनावरे ठार मारली, धान्य दडवून ठेवले. यामुळे दुष्काळ पडला. सामुदायिक शेती धडपणे चालणे शक्य नव्हते. म्हणून धान्याचा तुटवडा अधिकच तीव्र झाला. या काळात एक कोटी चाळीस लक्ष जनावरे ठार मारली गेली. अनेक ठिकाणी दंगे झाले. परिणामत: पंचवार्षिक योजनेची उद्दिष्टे सफल होणे अशक्य झाले. सामुदायिक शेतीमुळे उत्पादनवाढीचे प्रमाण किती वाढेल, यासंबंधी भरमसाठ आकडे देण्यात आले. १९२७-२८ मध्ये पंचवीस टक्क्यांनी धान्याचे उत्पादन वाढविण्याचे लक्ष्य होते, पण हे लक्ष्य गाठण्याऐवजी उत्पादन घटले. दुसऱ्या व तिसऱ्या योजनांच्या काळातही हीच अवस्था होती.

औद्योगिक उत्पादनात वाढ झाली. नवी उत्पादनक्षमता तयार झाली. अवजड उद्योग सुरू झाले. पण त्याची प्रचंड किंमत द्यावी लागली. धान्याची भयंकर टंचाई निर्माण झाल्यावर स्टालिनने दडपशाहीचा बरबंटा फिरविण्यास सुरुवात केली. गावेच्या गावे उठविण्यात आली, तशीच उद्ध्वस्त झाली. हजारो, लाखो लोकांना बंदिस्त करण्यात आले आणि ठारही मारण्यात आले. सर्वत्र दहशतीचे वातावरण तयार झाले. स्टालिनने प्रथम लेनिनच्या अगदी जवळ असलेल्यांना हात लावला नाही. पण नंतर तेही बळी गेले. बनावट आरोप ठेवून खोटे खटले उभे झाले. यात अनेकांचा बळी गेला. दुष्काळामुळे लोक हजारोंनी मरत असता स्टालिनने धान्य निर्यात करण्याचे धोरण अवलंबिले होते.

या काळात शॉ, वेब इत्यादी रशियात येऊन गेले. त्यांनी वस्तुस्थिती जगापुढे मांडण्याऐवजी खोटी चित्रे रंगविली आणि दिशाभूल केली. खटले बनावट होते, पण न्यूयॉर्क टाइम्सचा वार्ताहर असो वा अमेरिकन वकील डेव्हिस असो, आरोपी खरोखरच कबुलीजबाब देत असल्याचे अहवाल त्यांनी पाठविले. जगभर अनेकांनी हा फसवणुकीचा धंदा सुरू केला होता. शेतकरी, कामगार, पक्षाचे कार्यकर्ते व पदाधिकारी, लष्कर, तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ, लेखक अशा अनेकांना यमसदनास धाडण्यात आले. मेदवेदेव यांनी पानेच्या पाने यांच्या याद्याच दिल्या आहेत. किरॉव हा स्टालिनचा प्रतिस्पर्धी झाला असता. त्याचा लेनिनग्राडमध्ये खून झाला. याची जबाबदारी स्टालिनवर पडते.

खटल्यातील आरोपीचे कबुलीजबाब कसे येत, हा प्रश्न होता. एक कारण म्हणजे पक्ष कधीही चूक नसतो, ही निष्ठा. हा एक धर्मपंथच बनला होता आणि पंथाचे आदेश जसेच्या तसे मानणे, हे कर्तव्य होऊन बसले. तेव्हा अनेकांनी इतिहासात आपण पक्षद्रोही ठरू नये, यासाठी गुन्हे कबूल केले. अनेकांना औषधे, इंजक्शने देऊन हे जबाब घेतले गेले, असे इलिया इऱ्हेनबर्ग या लेखकाने मेदवेदेव यांना सांगितले.

शारीरिक व मानसिक छळ अनेक प्रकारे होत असे. यासाठी वापरण्यात येणारी पद्धती अमानुष होती. याचे काही अनुभवच मेदवेदेव यांनी ग्रथित केले आहेत. एकाला दहा तास पाण्यात उभे करण्यात आले होते. दुसऱ्याचा कोथळा बाहेर काढून त्याला तसाच टाकून देण्यात आले. बघता बघता लोक नाहीसे होत आणि त्यांचा ठावठिकाणा लागत नसे. सर्व देश तुरुंग बनला आणि कुटुंबातील लोकच एकमेकांविरुद्ध पोलिसांना खबर देऊ लागले. गॉर्की हाही नजरकैदेत होता. केवळ रशियनच या दहशतवादाचे बळी नव्हते. तर परदेशी कम्युनिस्टही होते. हिंदी कम्युनिस्टांपैकी मुखर्जी, लुहानी व चटोपाध्याय यांची नावे मेदवेदेव यांनी दिली असून, त्यांना ठार करण्यात आल्याचे लेखक नमूद करतात. एम. एन. रॉय याच सुमारास रशियातून बाहेर पडले म्हणून वाचले नाही तर त्यांचीही धडगत नव्हती.

ज्या असंख्य रशियन कम्युनिस्टांना हा छळ सोसावा लागला व जे बळी पडले त्यांच्यासंबंधी एका रशियन स्त्रीने लिहिले आहे की, आपल्या ओळखीच्या काहींवर आपत्ती कोसळली म्हणून क्षणभर वाईट वाटले. पण नंतर असा विचार आला की, यांना अद्दल घडावयास हवीच होती; कारण स्वत: त्यांच्यावर आपत्ती कोसळेपर्यंत, ते स्टालिनच्या या दहशतवादी पद्धतीचे पाठीराखे होते. दुसरा एक कैदी क्रांती झाल्यापासून कारावासात होता. त्याने अनेक कम्युनिस्ट स्थानबद्ध होत असल्याचे पाहिले व अनेकांना गोळ्या घातल्याचे त्याने ऐकले, तेव्हा त्याला समाधान वाटले. तो रशियन राजा झारचा पक्षपाती होता. त्याने एका बोल्शेव्हिकास सांगितले की, स्टालिन हा झारचेच काम करीत आहे. झारला सर्व बोल्शेव्हिकांना ठार मारावयाचे होते वा स्थानबद्ध करावयाचे होते. झारला जे जमले नाही, ते स्टालिन करीत आहे.

स्टालिनने जे हे शिरकाण केले, त्याचे परिणाम सर्व प्रकारच्या उत्पादनावर झाले आणि जेव्हा दुसरे महायुद्ध आले, तेव्हा तर विशेषच जाणवले. स्टालिनने जर्मनीबरोबर करार केला होता व त्याचा त्यावर इतका विश्वास होता की, हिटलर रशियावर स्वारी करील, अशी कल्पनाच तो सहन करू शकत नव्हता. म्हणून मनातून हिटलरविरोधी असलेला जर्मनीचा रशियातील राजदूत स्टालिनला भेटला व त्याने हिटलर हल्ला करण्याचा संभव असल्याची माहिती दिली, तेव्हा स्टालिनने त्याच्याकडे लक्ष दिले नाही. रशिया व जर्मनी यांच्यातील

हा करार म्हणजे, स्टालिनच्या राजनीतीतील कौशल्याचे द्योतक असून, यामुळे रशियाला तयारी करण्याची संधी मिळेल व मिळाली, असे समर्थन पुढे होऊ लागले. एम. एन. रॉय यांनीसुद्धा असे समर्थन केले होते. वस्तुस्थिती मात्र वेगळी होती.

जर्मनीचा हल्ला झाल्याची बातमी स्टालिनला पहाटे झोपेतून उठवून द्यावी लागली. पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची नंतर बैठक झाली, तेव्हा स्टालिन पांढराफटक पडला होता. बराच वेळ तो बोललाही नाही. नंतर पहिले सहा दिवस स्टालिन क्रेमलिनमध्ये नव्हता आणि तो कोणाशी संपर्क ठेवीत नव्हता. त्याच्याशी कोणी बोलण्यासही धजत नसत. कालांतराने त्याने नेतृत्व करण्यास सुरुवात केली. त्याच्या संघटनाकौशल्याचा तेव्हा प्रत्यय आला. पण युद्धनेतृत्व या दृष्टीने पाहिल्यास, त्याचे कोणते निर्णय कसे चुकीचे व घातक आणि अधिक नुकसान करणारे होते, याची माहिती मेदवेदेव यांनी काही लष्करी अधिकाऱ्यांच्या लिखाणाचाच आधार घेऊन दिली आहे. याही काळात रशियात अनेक पिढ्या स्थायिक झालेल्या जर्मन व फिनिश वगैरे लोकांना पकडण्यात आले आणि अनेकांना ठारही मारण्यात आले.

अशी ही स्टालिनची राजवट. तिचा हा इतिहास वाचताना अनेकदा शहारे येतात आणि मानवप्राणी किती क्रूर बनू शकतो, हे समजून आल्यावर विषण्णताही येते. इतके होत असल्याचे माहीत असून, देशोदेशीचे विचारवंत स्टालिनशाहीच्या विरुद्ध बोलत नसत व जे बोलत त्यांना प्रतिगामी ठरवून त्यांची निर्भर्त्सना करीत. या विचारवंतांचा दुटप्पीपणा नमूद करण्यासारखा आहे. रोमाँ रोलाँ यांनी आपल्या रोजनिशीत लिहिले होते की, ही रशियन राज्यपद्धती ही अनिर्बंध आहे. प्राथमिक स्वरूपाचे स्वातंत्र्यही येथे नाही. न्याय व मानवता यांनाही स्थान नाही. मला याचा अतिशय संताप येतो, पण मी माझा राग दाबून ठेवितो. रोमाँ रोलाँ यांनी हे लिहून ठेविले खरे, पण प्रत्यक्षात मात्र याच पद्धतीची प्रशस्ती केली.

रॉय मेदवेदेव्ह यांनी हा ग्रंथ लिहून, इतिहासाने निर्णय करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. त्यासाठी त्यांनी पुरावा सादर केला आहे. तो पाहिला की, डोस्टोव्हस्कीने त्याच्या 'द पझेस्ड' ह्या कादंबरीत रंगविलेल्या क्रूरकर्मा, हा समानधर्म्याच्या साहाय्याने दहशत निर्माण करतो त्याची आठवण येते, असे मेदवेदेव्ह यांनी म्हटले आहे, ते खरे असल्याचे आता दिवसेंदिवस रशियातच बाहेर येत असलेल्या माहितीवरून म्हणावयास हरकत नाही.

५-११-१९८९

भयानक पर्वाचा इतिहास

रशियाने हद्दपार केलेला लेखक सोल्झेनित्सिन याचे नवे पुस्तक प्रसिद्धीच्या मार्गावर असून, क्रांतीनंतरच्या रशियातील हत्याकांडावर त्यात प्रकाश टाकण्यात आला आहे. अर्थात याविषयी इतर ग्रंथही आजपर्यंत प्रसिद्ध झाले असून, रॉबर्ट कॉन्क्वेस्ट यांचा 'द ग्रेट टेरर' हा ग्रंथ या दृष्टीने अतिशय माहितीपूर्ण ठरेल. या ग्रंथाची तिसरी आवृत्ती थोड्याच अवधीत प्रसिद्ध व्हावी यावरून त्याची लोकप्रियता स्पष्ट होईल. रशियात काही भूमिगत नियतकालिके आहेत आणि त्यांनी या ग्रंथाची प्रशंसापर परीक्षणे प्रसिद्ध केली आहेत हे आणखी एक वैशिष्ट्य. या ग्रंथात लेखकाने केलेल्या विधानांना कागदोपत्री पुरावा दिला असून त्यासंबंधीच्या टिपणी तपशीलवार आहेत. यावरून घेतलेली मेहनत कळून येते.

स्टालिननेच हत्याकांड केले आणि बाकीचे रशियन कम्युनिस्ट नेते हे मोठे उदारमतवादी होते असे लेखकाचे मत नाही. क्रांतिकारी हिंसा आवश्यक आहे असे लेनिनचे मत होते व क्रांतीनंतर त्यानेही अनेकांना यमसदनास पाठविले, तुरुंगात डांबले. लेखक म्हणतो ते बरोबर आहे, की लेनिनने कम्युनिस्ट पक्षांतर्गत लोकशाही नष्ट केली. त्यामुळे केवळ कारस्थानी, उपद्व्यापी लोकांचे फावले. त्या वातावरणात स्टालिनसारखा कमालीचा कपटी व उलट्या काळजाचा पुढारी हाच सत्ताधीश बनणे अपरिहार्य होते.

लेनिननंतर स्टालिन सत्ताधारी झाल्यावर त्याने एकेका सहकाऱ्याचा काटा काढला आणि त्यानिमित्ताने सर्व पक्षालाच नव्हे तर देशालाही रक्ताचे स्नान घातले. ट्रॉटस्की, बुखारिन, झिनोविव्ह, कॅमेनिव्ह, रॅडेक, किरॉव्ह अशा सर्व समान पातळीवरील सहकाऱ्यांना त्याने तुरुंगात घालून मारले किंवा सरळ खून केला. ट्रॉटस्कीचा खून कालांतराने व परदेशात झाला. स्टालिनने शेती व उद्योगधंदे यावद्दलचे जे धोरण स्वीकारले ते काही यशस्वी होत नव्हते आणि त्यावद्दल मतभेदही होणे साहजिक होते. पण स्टालिनने हे ओळखूनच लाखो लोकांचे शिरकाण केले, लाखोजणांना वेठबिगार करावयास लावली. एवढा क्रूरकर्मा आधुनिक इतिहासात झाला नाही. हिटलरसुद्धा त्याच्यापुढे फिका पडतो. जे स्टालिनच्या बरोबर होते त्यांच्यावर खटले भरण्यात आले आणि ते उघड्या कोर्टात चालले. अत्यंत खोटे आरोप ठेवून नसलेल्या कटांची व कारस्थानांची जबाबदारी त्यांच्यावर टाकली गेली. किरॉव्हसारखा लेनिनग्राडच्या पक्षाचा प्रमुख हा लोकप्रिय होता. त्याची लोकप्रियता स्टालिनला सहन होणे शक्य नव्हते. त्यानेच किरॉव्हचा खून केला

आणि हा खून करण्याच्या कटात सामील झाल्याच्या खोट्या आरोपाखाली हजारो लोकांना त्याने यमसदनास पाठविले. कधी ट्रॉटस्कीशी संगनमत केले म्हणून तर कधी प्रतिगामी, भांडवलदारी संघटना स्थापून साम्यवादी सरकार उखडण्याचा कट केला म्हणून, तरी कधी किरॉव्हचा खून झाला म्हणून अशा अनेकविध कारणास्तव स्टालिनने लाखो लोकांचे शिरकाण करून सारा देश एक तुरुंग बनविला. कॅमेनिव्हसारख्याला स्टालिन किती निर्घृण असेल याची कल्पना नव्हती.

जे पूर्वीपासून क्रांतीच्या कार्यात सामील होते त्यांची मानखंडना करून त्यांच्यावर नाहीनाही ते आरोप ठेवण्यात आले. कोठडीत त्यांना अनंत प्रकारे छळण्यात आले. छळाचे हे प्रकार वाचल्यावर स्टालिनशाहीतील रशिया हा विसाव्या शतकात होता की मध्ययुगात असा प्रश्न पडेल. कोणालाही कोणत्याही क्षणी अटक होई आणि त्याच्याबरोबर त्याचे नातेवाईक, बायकामुले हीसुद्धा ओढली जात. अनन्वित अत्याचार करून या सर्वांकडून कबुलीजबाब घेण्यात आले आणि जाहीर स्वरूपात हे 'आरोपी' आपले 'गुन्हे' कबूल करीत आहेत असे दृश्य स्टालिनने उभे केले. हा डाव उलटवून लावण्यात बुखारिन बराच यशस्वी झाला. तो व सरकारी वकील व्हिशिन्स्की यांच्यात कोर्टात झालेल्या चकमकी वाचनीय आहेत.

स्टालिनच्या या हत्याकांडात केवळ राजकीय नेते व कार्यकर्तेच सापडले असे नव्हे, तर लेखक, कलावंत, शास्त्रज्ञ, लष्करी पेशाचे लोक आणि सामान्य कामगार, शेतकरी व नागरिक अशा सर्वांवर त्याच्या दडपशाहीचा वरवंटा फिरला. सामुदायिक शेतीच्या साथीमुळे शेतीचे अतोनात नुकसान झालेच आणि हजारो शेतकरी ठार केले गेले. जाहीर स्वरूपात आरोपी आपले गुन्हे कबूल करीत असल्याचे दृश्य उभे करून स्टालिनने या क्रूरतेवर सफेती केली खरी, पण या कबुलीजबाबामागे अत्याचार आणि कम्युनिस्ट पक्षावरील अंधश्रद्धा ही होती. एवढे करूनही स्टालिनला सर्वात मोठा विरोध युक्रेनमध्ये होता. तेथे अनेक उठाव झाले आणि हिटलरच्या फौजा घुसल्या तेव्हा त्यांचे स्वागत युक्रेनच्या लोकांनी केले.

आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट संघटनेच्या यंत्रणेचा उपयोग करून स्टालिनने पोलंड, हंगेरी, चेकोस्लव्हाकिया वगैरे देशांतील हत्याकांड घडवून आणले. स्टालिन हा हिटलरचा द्वेष्टा होता, नाझीवादाचा विरोधक होता हेही खोटे. उलट हिटलरशाहीबद्दल त्याला सुप्त प्रेम होते. रशिया-जर्मनी कराराच्या पूर्वी किती तरी अगोदर त्याने जर्मनीशी संधान जुळविले होते अशी माहिती लेखकाने दिली आहे.

स्टालिन हा विकृत वृत्तीचाच होता. ज्यांच्याशी त्याने मैत्रीचा देखावा केला त्यांना त्याने यमसदनास पाठविले. असंख्य लोकांच्या शिक्षेविषयीच्या हुकुमावर त्याच्या सह्या

असत. एकदा त्याचा गुप्त पोलिस प्रमुख येझॉव्ह याने मद्यपानाच्या प्रसंगी झिनोव्हिव्ह हा खटल्याच्या वेळी कसा याचना करीत होता याची नक्कल केली तेव्हा स्टालिनची हसताहसता मुरकुंडी वळली. यावरूनही त्याच्या विकृत वृत्तीचा पुरावा मिळतो असे हे भयानक पर्व भरपूर पुराव्यानिशी या ग्रंथात वर्णन केले आहे. एवढे अनन्वित अत्याचार होत असतानाही कोणीही स्टालिनचे मुंडके कसे उडविले नाही असा प्रश्न पडतो.

३०-३-१९७४

क्रुश्चॉव यांचे ऐतिहासिक कार्य

रॉय व झोरेस मेदवेदेव्ह हे दोघे रशियन बंधू. यापैकी रॉय हा इतिहासतज्ज्ञ व झोरेस शास्त्रज्ञ. 'लेट हिस्टरी जज' हे रॉय मेदवेदेव्ह यांचे पुस्तक गाजलेले आहे. या बंधूंनी आता क्रुश्चॉव यांच्या कारकीर्दीवर लहानसे पुस्तक लिहिले आहे.

स्टालिनच्या मृत्यूनंतर बेरिया, मेलेन्कॉव्ह, मोलोटॉव्ह असा गट अधिकारावर येणार होता. बेरियाने अनन्वित अत्याचार केले होते व त्याची महत्त्वाकांक्षा जबर होती. त्याने चार हजार गुन्हेगार प्रथम तुरुंगातून सोडले. पण राजकीय कैदी सोडले नाहीत. याला काही अपवाद होते. उदाहरणार्थ, मोलोटॉव्हची पत्नी. मोलोटॉव्ह हा स्टालिनचा परराष्ट्रमंत्री, पण त्याची बायको स्टालिनने तुरुंगात घातली होती. ती स्टालिनच्या मृत्यूनंतर सुटली. बेरियाची महत्त्वाकांक्षा आपल्यासारख्या अनेकांचे बळी घेईल ही क्रुश्चॉव यांना शंका होतीच. त्यांनी मार्शल झुकॉव्हशी एकजूट करून प्रथम बेरियाचा काटा काढला. त्यानंतर बेरियाच्या दुष्कृत्यांचा पुरावा गोळा करण्याचे काम एनेगेव्ह याला दिले. त्याने प्रचंड पुरावा जमा केला. पण हा पुरावा जमा होत असताना स्टालिनच्याही दुष्कृत्यांचा पुरावा जमला. असंख्य गोष्टी अशा होत्या की त्यांची क्रुश्चॉव यांच्यासारख्यांना कल्पना असण्याची शक्यता नव्हती व कल्पना नव्हतीही. हा पुरावा हाती आल्यावर बेरियाच्या पाठोपाठ मेलेन्कॉव्हही पदच्युत झाला. मेलेन्कॉव्हला अकारण जावे लागले नाही. ४७ साली त्याने क्रुश्चॉवचे प्रस्थ वाढू नये म्हणून भरपूर प्रयत्न केले होते. युक्रेनमध्ये मेलेन्कॉव्हने क्रुश्चॉवच्या डोक्यावर दुसऱ्या एकाची नेमणूक करून घेतली. पुढे स्टालिनने क्रुश्चॉव यांना मॉस्कोत बोलावले तेव्हा त्यांचे वजन वाढू नये म्हणून मेलेन्कॉव्ह पुन्हा प्रयत्नशील होता. या सर्वांची किंमत स्टालिनच्या मृत्यूनंतर त्याला मोजावी लागली.

क्रुश्चॉव यांनी जगाला सर्वात मोठा धक्का दिला तो स्टालिनच्या हत्याकांडाचा पाढा कम्युनिस्ट काँग्रेसपुढे वाचून. त्यांचे हे भाषण गुप्त होते हे खरे नव्हे. रशियन कम्युनिस्ट पक्षाच्या सदस्यांपुढे ते झाले. त्याच्या प्रती सर्वत्र वाटल्या गेल्या. अनेक कारखान्यांत, गावांत या भाषणावर चर्चा, वादविवाद झाले. साऱ्या रशियाला या भाषणाची माहिती होती आणि पश्चिम युरोपात त्याची प्रसिद्धीही जाणूनबुजून करण्यात आली. हे सर्व होण्यापूर्वी रशियात निर्माण झालेली परिस्थिती महत्त्वाची आहे. क्रुश्चॉव यांनी प्रथम बारा हजार राजकीय कैदी सोडले. त्यानंतर हळूहळू करता करता ६० ते ७० लाख लोकांची सुटका झाली. हे सुटलेले राजबंदी क्रुश्चॉव यांना धन्यवाद देत, पण त्याचबरोबर

ज्यांच्यामुळे आपण तुरुंगात पडलो त्या सर्वांना शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी ते करू लागले. यामुळे रशियात सर्वत्र वादळ उठले होते. ही एक प्रकारची सांस्कृतिक क्रांती होती. क्रुश्चॉव यांच्या स्टालिनविरोधी भाषणाची ही पार्श्वभूमी उल्लेखनीय म्हणावी लागेल. मेदवेदेव्ह बंधूंनी तीवर प्रकाश टाकला असून तपशील दिला आहे.

क्रुश्चॉव यांची लोकप्रियता या प्रकरणात वाढली. मग त्यांनी आर्थिक प्रश्न हाती घेण्याचे ठरविले. त्यांना शेतीत रस आणि रशियन शेती सर्वात मागासलेली. तेव्हा त्यांनी अनेक प्रयोग करण्याचे ठरविले. अशा प्रयोगांना उत्तेजनही दिले. विशेष म्हणजे ते अमेरिकेच्या शेतीवरील अनुबोधपट मागवीत आणि रशियन शेतीतज्ज्ञांकडून त्यातील वारकावे समजावून घेत. परंतु शेतीच्या संबंधात एकाएकी बदल करणे घातक असते. ज्याप्रमाणे सामुदायिक शेतीच्या प्रयोगाने स्टालिनच्या काळात उलथापालथ झाली त्याचप्रमाणे क्रुश्चॉव यांनी लागवडीखाली न आणल्या गेलेल्या भागातील जमिनींची मशागत करण्याचा प्रयोग केला. शेतीचे नियंत्रण हे केंद्रानुवर्तीच राहिले. मग कोठे ट्रॅक्टर कमी, तर कोठे बियाणे कमी. ट्रॅक्टर मिळाले तर त्यांचे सुटे भाग मिळेनात. यासाठी बँकांचा पैसा मोठ्या प्रमाणावर गुंतून राहिला. तो वसूल न झाल्याने पतव्यवस्था कोलमडून पडू लागली. एवढी उलथापालथ करून उत्पादन वाढले नाहीच. हा प्रयोग क्रुश्चॉव यांच्या अंगाशी आला. या पुस्तकात याचे सविस्तर वर्णन आहे.

तथापि क्रुश्चॉव यांच्याकडे अनेक नव्या उपक्रमांचे श्रेय जाते. त्यांनी स्टालिनचा दहशतवाद संपुष्टात आणला. आता रशियात राजबंदी आहेत, मतभेदाला वाव नाही, विरोधकांची मुस्कटदाबी होते, पण गोळ्या घालून मारण्याचे बंद झाले आहे. क्रुश्चॉव हेही बिछान्यात वारले, गोळीला बळी पडले नाहीत याचे कारण त्यांनीच घडवून आणलेले परिवर्तन. पश्चिम युरोपशी, विशेषत: अमेरिकेशी मर्यादित प्रमाणात सहकार्य करण्याचे धोरणही त्यांनीच प्रथम अवलंबून शीतयुद्ध काही प्रमाणात कमी केले. स्टालिनशाहीकडे रशिया पुन्हा जाणे कठीण आणि क्रुश्चॉव हे याचे प्रवर्तक असल्याने त्यांची कामगिरी केव्हाही ऐतिहासिकच ठरेल.

६-८-१९७७

क्रुश्चॉव यांच्या आठवणी

दिवंगत रशियन नेते क्रुश्चॉव यांच्या आठवणींचा दुसरा खंड त्यांच्या स्वभावावर व कारकीर्दीवर प्रकाश टाकणारा आहे. क्रुश्चॉव यांनी रशियात अवलंबिलेले धोरण आणि अमेरिका, फ्रान्स, चीन, भारत वगैरे देशांमध्ये केलेले दौरे, या देशांबाबत स्वीकारलेले धोरण यांची ओळख त्यांच्या आठवणींच्या या संग्रहाने करून दिली आहे. अर्थात इतर अनेक आत्मपर लिखाणाचा रोख ज्याप्रमाणे आत्मसमर्थनावर असतो तसा तो याही ग्रंथाचा आहे.

उदाहरणार्थ, मार्शल झुकॉव्ह यांची पदच्युती. झुकॉव्ह यांना लष्कराचा उपयोग करून सर्व सत्ता कावीज करावयाची होती असे असे क्रुश्चॉव म्हणतात. वस्तुत: मेलेन्कॉव्हला दूर करून स्वत:कडे सत्ता घेताना क्रुश्चॉव यांनी झुकॉव्हचा उपयोग केला होता. पण पुढे तो डोईजड होईल म्हणून झुकॉव्हला बाजूला केले गेले. त्याचप्रमाणे चेकोस्लोव्हाकिया, पोलंड, हंगेरी, रुमानिया यांच्यावरील रशियन प्रभुत्वाचे त्यांचे समर्थन पटणारे नाही. हे प्रभुत्व दृढ करण्याचे प्रयत्न क्रुश्चॉव यांनीही केले. म्हणून पूर्व जर्मनी, पोलंड व हंगेरीत तत्कालीन कम्युनिस्ट राजवटीविरुद्ध उठाव झाले तेव्हा ते दडपण्यासाठी क्रुश्चॉव यांनी लष्कराचा उपयोग केला. या स्थितीत स्टालिनने जरी पूर्व युरोपला रशियाच्या नियंत्रणाखाली आणले तरी ते नंतरच्या रशियन राज्यकर्त्यांना नामंजूर होते असे म्हणता येणार नाही.

अर्थात स्टालिन व क्रुश्चॉव यांच्या पूर्व युरोपमधील कम्युनिस्ट देशांसंबंधीच्या धोरणात महत्त्वाचा फरक मात्र जरूर होता. याची हकीगत क्रुश्चॉव यांनीच दिली आहे. पोलंडचा कोळसा व इतर माल, तसेच अन्य पूर्व युरोपीय देशांकडील कच्चा माल रशिया अतिशय स्वस्त भावाने घेत होता. स्टालिनने हा भाव ठरवून दिला होता. या देशांची ती आर्थिक पिळवणूक होती. एका समाजवादी देशाने दुसऱ्या समाजवादी देशाशी याप्रमाणे वर्तन करणे म्हणजे समाजवादाच्या नावाखाली साम्राज्यवाद पोसणे होते. युद्धकाळात या देशांच्या रक्षणार्थ रशियन रक्त सांडले याची ही भरपाई असल्याचा स्टालिनचा दावा होता. पोलंडमध्ये जेव्हा अन्नधान्याच्या प्रश्नावरून दंगली झाल्या तेव्हा क्रुश्चॉव यांनी दंगलीच्या कारणांचा शोध घेतला. यात आर्थिकदृष्ट्या पोलंड दुर्बळ झाल्याचे आढळले आणि या दुर्बलतेलाही ही पिळवणूक कारणीभूत असल्याचे लक्षात आले. तेव्हा मग क्रुश्चॉव यांनी कोळशाचा भाव वाढवून दिला, रेल्वे-वाहतुकीसाठी भांडवल घातले.

क्रुश्चॉव यांनी या आठवणींच्या संग्रहात काही प्रश्नांबाबत स्पष्टपणे कबुली दिली आहे. स्टालिनच्या मृत्यूनंतर का होईना, पण स्टालिनशाहीतील अनन्वित अत्याचारांवर त्यांनीच अधिकृतरीत्या प्रकाश टाकला होता. ते अधिकारारूढ झाल्यानंतर त्यांनी अनेक बाबतीत स्टालिनच्या धोरणास मूठमाती दिली. शांततामय सहजीवनाचा उघड पुरस्कार केला. रशियन लेखक, कवी, कलावंत यांच्यावर स्टालिनशाहीत कडक बंधने होती आणि अनेक लेखक, कलावंत व विचारवंत हकनाक प्राणास मुकले. लेखकांना, कलावंतांना स्टालिनने गुलाम व लाचार बनविले. फादेयेव हा असाच एक लाचार लेखक. तो स्टालिनची भरमसाट स्तुती करी आणि ज्यांच्यावर खटले भरले असतील अशा कलावंतांविरुद्ध व विचारवंतांविरुद्ध खोटी माहिती पुरवी. स्टालिन पारितोषिकाच्या निवड-समितीवर फादेयेव हा सभासद होता. तो कमालीचा दारुड्या. स्टालिन त्याची चारचौघांत भरपूर टिंगल करीत असे. फादेयेव हा कोठल्या गुत्त्यात झिंगून पडला असेल याची पोलिसांना बरोबर कल्पना असल्याने स्टालिनने बोलावणे धाडताच ते त्याला बरोबर शोधून काढीत. क्रुश्चॉव म्हणतात, पुढे असे आढळून आले की, स्टालिनने ज्यांना ठार मारले, सैबेरियात धाडले असे अनेक लेखक, कलावंत हे निर्दोष होते. क्रुश्चॉव यांनी आपल्या राजवटीत लेखकांवरील निर्बंध मर्यादित प्रमाणात सैल केले, पण मर्यादित प्रमाणातच. त्यापेक्षा अधिक स्वातंत्र्य देणे रशियन समाजाला मानवणारे नव्हते असे क्रुश्चॉव म्हणतात. त्यांनी पास्टरनाकच्या डॉ. झिवागो या कादंबरीच्या प्रकाशनास रशियात परवानगी दिली. स्टालिनशाहीतील ललित साहित्याबद्दल क्रुश्चॉव म्हणतात, "जर प्रत्येक जण एकाच तऱ्हेने लिहू लागला, एकसारखेच युक्तिवाद करू लागला, तर ते अती कंटाळवाणे होते. यामुळे सर्जनशीलतेला वावच राहात नाही. लेखकाला आपली बुद्धी विकसित करण्यास व शैली तीक्ष्ण करण्यास अवसर मिळत नाही. एखाद्या नळीच्या दोन टोकातून दोघांनी बोलण्यासारखे ते आहे. जर वाङमय हे एकसाची होऊन तोच-तोच चोथा सारखा चावल्यासारखे झाले तर वाचकाला फक्त ओकारी येते."

क्रुश्चॉव यांनी आणखीही काही कबुली दिल्या आहेत. रशियात अजूनही निवासस्थानांची चणचण आहे असे ते म्हणतात. मॉस्कोत त्यांना युद्धानंतर निवासस्थानांच्या उभारणीची योजना पार पाडण्यासाठी नेमले गेले होते. या काळात त्यांनी बरीच निवासस्थाने बांधली. दीर्घकाळ मॉस्कोतही लोकांना बंदिस्त पायखाना वापरण्याची सवय नव्हती. उद्याने, मैदाने, नदीकाठ, शेते यांचा उपयोग आपल्याकडे होतो तसाच प्रातर्विधीसाठी केला जात होता. अद्यापही ग्रामीण भागात हीच परिस्थिती असावी असे क्रुश्चॉव यांच्या लिखाणावरून वाटते. या स्थितीत मॉस्को शहरानजीकची नदी गलिच्छ बनली होती. ती स्वच्छ करून नौकानयनालाही योग्य अशी बनविण्यात आपला पुढाकार

होता असे क्रुश्चॉव सांगतात. रशिया अद्यापही घरबांधणीचा प्रश्न सोडवू शकलेला नाही. सेवानिवृत्तीच्या काळात तरुण जोडपी आपल्याला भेटून याविषयी तक्रार करतात असे क्रुश्चॉव यांनी म्हटले आहे.

शेतीच्या आघाडीवरील रशियाचे अपयश क्रुश्चॉव यांनी प्रांजलपणे कबूल केले आहे. यासंबंधात लोकांचे किती हाल होतात हेही ते स्पष्ट करतात. क्रुश्चॉव हे सेवानिवृत्तीनंतर एका सर्वोच्च दर्जाच्या हॉस्पिटलमध्ये असता हॉस्पिटलच्या नोकरवर्गाकरिता काही डबाबंद खाद्यपदार्थ आले. ते मिळविण्यासाठी डॉक्टरमंडळींनीही धावपळ कशी केली याची हकीगत क्रुश्चॉव निवेदन करतात. पुरेशा भाज्या, फळे यांचा अभाव असल्याची स्वच्छ कबुली क्रुश्चॉव यांनी दिली आहे. तसेच वस्तूच्या दर्जात कसलाही बदल न करता ब्रँडचे नाव बदलून किंमती वाढविल्या जातात असे ते सांगतात तेव्हा साम्यवादी देशात भाववाढ होत नाही इत्यादी प्रचाराचा फोलपणा लक्षात येतो.

शेती हा क्रुश्चॉव यांचा आवडीचा विषय. त्यांनी रशियन शेतीचे जे चित्र रंगविले आहे ते बरेच उद्‌बोधक ठरेल. ते म्हणतात, स्टालिनला शेतकऱ्यांबद्दल कमालीचा तिरस्कार होता. शेतकरीवर्ग हा प्रतिगामी असतो या समजुतीने त्याने तो बहिष्कृत ठरविला होता. सामुदायिक शेतीचा प्रयोग स्टालिनने निर्घृणपणे करून लाखो लोकांची कत्तल केली. शेतकऱ्यांच्या उपक्रमशीलतेला कसलाच वाव न ठेवल्यामुळे शेतीचा अधःपात झाला. उपक्रमशीलता त्याने इतकी मारली, की कोणी शेताच्या बांधावर फळझाड लावले तरी त्यावर जबर कर लादला जात असे. खत, बीज, पाणी यांचा पुरेसा पुरवठा न करता उत्पादन वाढेल अशी स्टालिनची कल्पना होती आणि उत्पादनवाढीची लक्ष्ये मॉस्कोत ठरवून ती गाठण्यासाठी शेतकऱ्यांवर सक्ती केली जात होती. क्रुश्चॉव म्हणतात, की आर्थिक आघाडीवर घोषणाबाजीने यश मिळत नसते. पण रशियात या घोषणाबाजीला ऊत आला. क्रांतीनंतरच्या काळात ज़िनोविव्हने ज्यांच्यापाशी घोडा नाही अशा शेतकऱ्यास एक घोडा मिळेल अशी घोषणा दिली, तर स्टालिनने त्याच्यावर ताण करण्याकरिता सात तासांचा दिवस अशी घोषणा दिली. वास्तविक कामाचे आठ तास न ठेवता सात तास करणे रशियन अर्थव्यवहारास मानवणारे नव्हते व तसे तास कमी झालेही नाहीत. सामुदायिक शेतीवर शेतकऱ्यांना काही उत्तेजन मिळेल असे वातावरण नव्हते. खाजगी शेतीत शेतकऱ्यांना वाजवी भाव दिला गेला नाही. याचा परिणाम रशियन शेतीची अधोगती होण्यात झाला. अद्यापही रशिया धान्य मोठ्या प्रमाणावर आयात करतो यावरून रशियन शेतीचा प्रयोग हा कसा फसला हे कळून येईल. क्रुश्चॉव यांनी या संदर्भात पोलंडचा दाखला दिला आहे. तेथे सामुदायिक शेती स्वीकारली नाही. त्यामुळे पोलंड हा युरोपातील कोणत्याही कम्युनिस्ट देशापेक्षा धान्याच्या बाबतीत अधिक सुस्थितीत आहे.

एवढेच नव्हे, तर आर्थिक कराराचा फायदा घेऊन तो रशियाकडून धान्य मिळवतो. त्यावर डुकरे पोसतो आणि त्यांचे मांस अमेरिकेला विकून डॉलर्स कमावतो, असेही क्रुश्चॉवच सांगतात.

क्रुश्चॉव यांनी आपल्या कारकीर्दीत अमेरिका, भारत, इंडोनेशिया, चीन, फ्रान्स, इंग्लंड, इजिप्त इत्यादी अनेक देशांना भेटी दिल्या. पं. नेहरूंचे व त्यांचे सख्य जमले होते हे या आठवणींवरूनही स्पष्ट दिसते. सुकार्नोबद्दल क्रुश्चॉव यांच्या आठवणी विशेष चांगल्या नाहीत. सुकार्नो हे दणकेबाज वक्ते होते आणि गर्दी जमविण्याची त्यांना हौस होती. म्हणून क्रुश्चॉव यांच्याकडून त्यांनी जकार्तात स्टेडियम बांधण्यासाठी आर्थिक मदत मागितली. यावरून आर्थिक प्रश्नाविषयी ते किती बेफिकीर होते याची कल्पना येईल. सुकार्नो यांचा लंपटपणाही क्रुश्चॉव यांना मानवला नाही. एकदा दोघे फिरत असता एक इंडोनेशियन महिला आपल्या लहान मुलाला ओढ्याच्या काठावर ठेवून विवस्त्र स्थितीत स्नान करीत होती. सुकार्नो सरळ तिच्यापाशी गेले, तिचे मूल त्यांनी उचलून घेतले व त्या स्त्रीशी ते बोलत राहिले. क्रुश्चॉव यांना हे बिलकूल आवडले नाही.

नासेर यांच्याबद्दल क्रुश्चॉव यांनी चांगले उद्गार काढले असले तरी इजिप्त व इस्रायल यांच्यात युद्ध होणे क्रुश्चॉव यांना पसंत नव्हते. रशियन लष्करी तज्ज्ञांच्या चुकीमुळे नासेर युद्धास प्रवृत्त झाले असे क्रुश्चॉव म्हणतात. त्यांनी नंतर नासेर यांना स्पष्ट केले, की त्यांना रशिया लष्करी व आर्थिक मदत देत असला तरी इस्रायल नष्ट करण्याची भूमिका त्यास मान्य नाही. रशियाच्या या धोरणात अद्याप फरक पडलेला नाही.

द गॉल यांच्या व्यक्तित्त्वाने व परराष्ट्रीय धोरणाने क्रुश्चॉव प्रभावित झाले होते. एवढेच नव्हे, तर पॅरिसचा अद्ययावत विमानतळ व अमेरिकेतील उत्पादन-व्यवस्थेची कार्यक्षमता पाहून क्रुश्चॉव कबुली देतात, की भांडवलशाही देशांपासून रशियाला बरेच शिकण्यासारखे आहे. विशेषत: गुंतवलेला पैसा किफायतशीर व्हावा म्हणून जी दक्षता राखली जाते तशी साम्यवादी देशात राखली जात नाही. त्यामुळे साधनसामग्रीची नासाडी होते असे क्रुश्चॉव म्हणतात.

तथापि माओ व अन्य चिनी नेते यांना क्रुश्चॉव यांनी शेलके आहेर दिले आहेत. माओ हा स्टालिनप्रमाणेच संशयी आहे आणि तो कमालीचा सत्तापिपासू, आत्मकेंद्रित आहे असे त्यांचे म्हणणे. स्टालिनला भेटण्यास माओ गेला तेव्हा बरेच दिवस स्टालिन वा इतर रशियन पुढारी त्यास भेटत नसत. यामुळे माओ संतप्त झाला तेव्हा स्टालिनने त्यास भेटावयास बोलावले. स्टालिनलाही माओने चीनमध्ये शिरकाव करू दिला नाही. रशिया व चीनच्या सहकार्याने रबराचे मळे स्थापन करण्याची कल्पना स्टालिनने सुचविली तेव्हा

चीनच्या ताब्यातील एका बेटावर हे मळे उभे करू, पण मजूर वगैरे चिनीच राहतील हे माओने स्पष्ट केले. ही योजना अर्थातच बारगळली. याउलट क्रुश्चॉव यांनी सैबेरियाच्या विकासासाठी चिनी मजूर देण्याची कल्पना मांडली तेव्हा माओ प्रथम त्यांच्यावर उखडला. माफक मजुरीत चिनी मजूर राबविता येतात म्हणून ही मागणी केली जाते, पण ती साम्राज्यवादी धोरणाची द्योतक आहे असे त्याने बजावले. तथापि त्याने ही मागणी मान्य केली व चिनी मजूर सैबेरियात धाडले. पुढे ते कंत्राटाची मुदत संपली तरीही तेथून निघेनात, सैबेरियात वस्ती करावी व वाढवीत नेऊन नंतर तो आपल्या ताब्यात घ्यावा असा माओचा डाव असल्याचे आपण ओळखले व चिनी मजुरांना परत धाडले अशी माहिती क्रुश्चॉव देतात.

माओची सांस्कृतिक क्रांती, हनुमान उडी इत्यादीबाबत क्रुश्चॉव यांनी भरपूर टीका केली आहे. यामुळे चिनी समाज ढवळून निघाला व आर्थिक क्षेत्रात अराजक माजले असे क्रुश्चॉव म्हणतात. सर्व कम्युनिस्ट जगताचा माओ हा नेता होऊ पाहात होता. त्याने चीनमध्ये जो स्वत:च्या प्रशस्तीचा पंथ तयार केला यामुळे आपल्याला उबग आला अशी माहिती क्रुश्चॉव यांनी दिली आहे. त्याचप्रमाणे अमेरिकेबरोबर अणुयुद्ध झाले तरी हरकत नाही. यात लाखो लोक मरण पावले तरीही आपल्यापाशी भरपूर प्रजा राहील असे माओ क्रुश्चॉव यांना म्हणाला तेव्हा त्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना ही कल्पना सहन झाली नाही. मानवी जीवितासंबंधीची इतपत बेफिकिरी त्यांना पसंत पडणारी नव्हती.

भारत-चीन युद्धाचे वेळी रशियाने चीनचा निषेध केला नव्हता, पण क्रुश्चॉव या आठवणींत मात्र तो करतात. चीनने हे युद्ध ओढवून घेतले असे ते म्हणतात. पुढे चीनशी रशियाचे वितुष्टच आले. त्याबाबतची आपली बाजू क्रुश्चॉव यांनी मांडली आहे.

क्रुश्चॉव यांच्या या आठवणींत प्रांजलपणा आहे. त्या त्यांनी टेपरेकॉर्डवर ध्वनिमुद्रित केल्या. या आठवणींचे विश्लेषण करणारी प्रस्तावना एडवर्ड क्रॅन्कशॉ यांनी लिहिली आहे तीही उद्‌बोधक आहे.

९-८-१९७५

रशियनांच्या दु:खाची व्होल्गा

सोल्झेनित्सिन यांचे 'द गुलाग आर्चिपिलेगो' हे पुस्तक म्हणजे एका ध्येयनिष्ठ अशा व्यक्तीचे अमानुष अत्याचार, भयानक क्रौर्य याविरुद्धचे आक्रंदन आहे. त्यांनीच म्हटले आहे, की दु:खाची व्होल्गा नदीच रशियात वाहात आली आहे. या व्होल्गाचेच दर्शन त्यांनी घडविले आहे. सोल्झेनित्सिन यांना स्वत:ला दीर्घकाळ कारावास भोगावा लागला. त्यावेळचे अनुभव आणि इतर अनेकांचे अनुभव, ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधारे उजेडात आलेली प्रकरणे या सर्वांचा उपयोग करून त्यांनी हा ग्रंथ तयार केला आहे. जेवढे साहित्य, पुरावा त्यांच्यापाशी आहे त्यावरून एक खंड तयार झाला. अजून दोन तयार व्हावयाचे आहेत. रशियन भाषेतील ग्रंथ-प्रकाशनाने खळबळ माजली व सोल्झेनित्सिन यांना देशत्याग करावा लागला. आता इंग्रजी भाषांतर उपलब्ध आहे. पुढील महिन्यात स्वस्त किंमतीत पेपरबॅक प्रसिद्ध होईल.

गुलाग आर्चिपिलेगो याचा अर्थ काय? सोल्झेनित्सिन यांना असे दाखवावयाचे आहे की रशिया हा जो एक अवाढव्य देश आहे त्यात लहान मोठी अशी स्थानबद्धांची 'बेटे' आहेत. काही रेल्वे स्टेशनइतकी लहान तर काही पश्चिम युरोपमधील एखाद्या देशाएवढी मोठी. या बेटांच्या मालिकेचे प्रशासन करणारी शासनयंत्रणा म्हणजे गुलाग. सोल्झेनिसिन यांनी स्थानबद्धांच्या छावण्या आणि त्यांचे प्रशासन करणारी यंत्रणा या दोघांचेही स्वरूप वर्णन केले असून अनेक स्थानबद्धांनी त्यांना जे अनुभव कथन केले, कळविले व सोल्झेनित्सिन यांना स्वत:ला जे अनुभव आले त्यांची हकीगत या ग्रंथात असून एकेका व्यक्तीची त्यांनी कथन केलेली कथा ही एकेका शोकान्त कादंबरीचा वा नाटकाचा विषय होऊ शकेल. दडपशाही, निर्घृणपणा, क्रौर्य, दैन्य व दु:ख यामुळे सोल्झेनित्सिन यांचा कलावंताचा आत्मा तडफडून उठला आणि मग त्यांनी जळजळीत शब्दांत हे सर्व रानटी विश्व शब्दबद्ध केले. अत्याचारांची वर्णने असल्याने काही वेळा द्विरुक्ती होणे साहजिक आहे; पण सर्व पुरावाच उजेडात आणावयाचा असल्याने लेखकाचा नाइलाज झाला असेल. सोल्झेनित्सिन यांच्या आत्म्याचे हे आक्रंदन आहे आणि यात कधी त्वेष आहे, कधी नैराश्य आहे, तर कधी उपहास. हे सर्व वाचत असताना आपण सुन्न होऊन जातो आणि क्रौर्याचे इतके नमुने रशियन प्रशासकांना सुचले कसे, याचेही आश्चर्य वाटते. हे सर्व खरे असेल काय असासुद्धा प्रश्न पडतो, पण सोल्झेनित्सिन यांनी स्वत:चे व इतरांचे

अनुभव तारीखवार, नावानिशी दिले आहेत. त्यामुळे संशय फिटतो. इतरही ग्रंथ यासंबंधात प्रसिद्ध झालेलेच आहेत.

वर्गविरहित समाजात लाचलुचपत, लूटमार नसते असे कम्युनिस्ट सांगतात. हे खोटे आहे. 'गुलाग'मध्ये तर सोल्झेनित्सिन यांनी स्थानबद्धांच्या छावण्यांचे प्रमुख, रक्षक इत्यादीही कसे लूटमार करीत याची माहिती दिली आहे. स्टालिनने अटकेचा व गोळ्या घालून मारण्याचा विक्रम केला असला तरी या सर्व क्रूर अशा यंत्रणेचा पाया लेनिनने घातला हे सोल्झेनित्सिन यांनी दाखवून दिले आहे. केरेन्स्कीच्या राजवटीत फाशीची शिक्षा रद्द झाली होती. ती रद्द करावी अशी बोल्शेव्हिकांची मागणीही होती. पण सत्ता हाती येताच लेनिनने हा ध्येयवाद परवडणार नाही, असे स्वच्छ सांगितले आणि गोळ्या घालण्याचे सत्र सुरू केले. चेका ही गुप्त पोलिसांची खास संघटना ही पुढील एम. के. व्ही. डी., के. जी. बी. वगैरे संघटनांची जन्मदात्री. प्रारंभी चेकाला न्यायालयापेक्षा अधिक अधिकार देणे काही साम्यवाद्यांना मान्य नव्हते, पण हा विरोध दडपण्यात आला. रस्त्यातील बर्फ नीटपणे दूर केला नाही म्हणून गोळ्या घालण्याचा आदेश लेनिनचाच. अनेक प्राध्यापक, लेखक वगैरेंना हद्दपार करण्यात आले तेव्हा गॉर्कीने तक्रार केली. त्यावेळी या आपल्या भिकार बुद्धिजीवी लोकांबद्दल तू उगाच जिवाचा ताप करू नकोस, असे लेनिनने गॉर्कीला सुनावले. लोकांच्या मनात भीती निर्माण करणे हे त्यांचे मतपरिवर्तन करण्याचे एक साधन आहे, असे लेनिनने म्हटले होते आणि न्यायालयांनी हा दंडक लक्षात ठेवूनच निवाडा करावा असा त्याचा आदेश होता. क्रांतीपूर्वी जे अराजकवादी व अन्य पक्ष होते त्यांच्या नेत्यांना लेनिनने पक्ष बरखास्त करण्याचा आदेश दिला. ज्यांनी तो मानला नाही त्यांना गोळ्या घातल्या गेल्या.

लेनिनने घातलेल्या या पायावरच स्टालिनच्या क्रौर्याची इमारत उभी राहिली. त्याने आपले राजकीय विरोधक खतम केले. त्यासाठी खोटे खटले उभे केले आणि हालहाल करून त्यांना ठार मारले. लाखो शेतकरी नाहीसे करण्यात आले. सबंध रशियन राजवट एका वेडाने झपाटलेली होती. त्यामुळे पतिपत्नी, आईबाप व मुले, भांवडे, मित्र यांचे संबंधच खलास झाले. कोण कोणाविरुद्ध चुगली करील, भीतीने उगीच कोणाचे नाव सांगील याचा नेम राहिला नाही. गुलागमध्ये सोल्झेनित्सिन यांनी याची असंख्य उदाहरणे दिली आहेत. इर्या मेंडेल या नावाची हंगेरियन स्त्री आपल्या प्रियकराबरोबर ऑपेराला गेली, पण ऑपेरा संपल्यावर त्या प्रियकरानेच तिला तुरुंगात डांबली. आजारी, अपंग हेही पकडले जात. अल्सरसाठी शस्त्रक्रिया करावयास घेतलेल्या रोग्याला फरफटत नेण्यात येई.

अटकेचे सत्र सतत चालू असले तरी काही विशिष्ट वर्षात लाटच येत होती. २९-३० साल, ३७ साल व ४६-४७ साल. अशा तीन लाटा व त्यात सापडलेल्या लोकांचे कसे

हाल झाले याचे वर्णन सोल्झेनित्सिन यांनी केले. या तीन पर्वांपैकी प्रत्येक पर्वाचे वैशिष्ट्य वेगळे होते तसेच प्रत्येक छावणीचे व तेथील अधिकाऱ्यांचे वेगळे होते. जे कैदी होत त्यांच्यासुद्धा स्वभावाचे नमुने किती तरी वेगळे. स्टालिनने प्रथम ग्रामीण भागात हत्याकांडाचा, अत्याचाराचा नांगर फिरवला. पुढे शहरी भागांवर आणि त्यानंतर युद्धात व नंतर जर्मनांनी जो रशियन प्रदेश व्यापला त्यावर आणि जे जर्मनांच्या हाती सापडले, युद्धात अपंग झाले, असे सर्व या सत्रात सापडले. ग्रामीण भागावर हा वरवंटा फिरला तेव्हां शहरवासीयांना बरे वाटले. पुढे तेच सापडले. स्वत:चे युद्धकैदी वा व्याप्त मुलखातल्या लोकांना कोणतेही सरकार कधी वाईट वागवत नाही, ज्यांनी जर्मनांची गोळी चुकविली ते रशियनांच्या गोळीला बळी पडले. रशियन युद्धकैदी व व्याप्त मुलखातील लोकांबाबत स्टालिनची वागणूक कशी झाली याचे सोल्झेनित्सिन यांनी फार तळमळून वर्णन केले आहे. ३७ साली जी धरपकड व हत्याकांड झाले त्यावेळचे आरोप पाहिले तर असे वाटेल, की रशियात जणू घातपात्यांचा सुळसुळाट झाला होता. कारखान्याची इमारत बांधणाऱ्या इंजिनियरपासून झाडूवाल्यापर्यंत असंख्य लोकांवर घातपाताचे आरोप होते.

झारशाहीतच नव्हे, तर रशियाच्या इतिहासात झाले नाही एवढे हत्याकांड लेनिन व स्टालिनच्या राजवटीत झाले. सोल्झेनित्सिन म्हणतात, १८७६ ते १९०४ पर्यंत झारशाहीत एकूण ४८६ लोकांना फासावर देण्यात आले. १९०५ ते १९०८ या काळात बावीसशे लोक फासावर गेले. हंगामी सरकारने फाशी रद्द केली, ती रद्द होण्यापूर्वीच गोळ्या घालण्याचे तंत्र बोल्शेव्हिकांनी लेनिनच्या आदेशाप्रमाणे सुरू केले. फाशीची शिक्षा १९२० मध्ये अधिकृतपणे सुरू झाली. ३७ व ३८ या दोन वर्षांत पाच लाख लोक ठार करण्यात आले. येझॉव्ह हा या यंत्रणेचा मुख्य होता. पुढे त्याच्यावर खटला भरला गेला. तो स्टालिनकडे दयेची याचना करीत होता व तुझ्याच हुकुमावरून हे हत्याकांड केले असे म्हणत होता, पण स्टालिनने त्याच्याकडे लक्षच दिले नाही.

बुखारिनचाही स्टालिनने असाच छळ केला. बुखारिन हा अतिशय बुद्धिमान व लेनिनच्या विश्वासातला. स्टालिनच्या हत्याकांडात झिनोविव्ह, कॅमेनिव्ह वगैरे लेनिनच्या वेळेपासूनचे बोल्शेव्हिक सापडले. बुखारिन म्हणाला, त्यांनी गुन्हे केले असतील, म्हणून त्यांना शिक्षा झाल्या. पण पुढे बुखारिनवरच प्रसंग गुदरला. त्याने स्टालिनकडे विनवण्या केल्या, पण तो गोळीला बळी गेलाच.

झारची सत्ता खिळखिळी होत होती व म्हणून बोल्शेव्हिक व इतर राजकीय कार्यकर्ते यांना तुरुंगवासही विशेष जाचक होत नव्हता. राजसत्तेत असा छळ करण्याची ताकदच नव्हती. बुखारिन काय की इतर बोल्शेव्हिक काय, यांना चार पाच वर्षांपेक्षा अधिक काळ

शिक्षा झाली नव्हती. पण क्रांतीनंतर बोल्शेव्हिक सत्ता प्रबळ झाली, विरोध राहिला नाही आणि मग अत्याचाराचा नांगर सर्रास फिरत राहिला.

सोल्झेनित्सिन म्हणतात, की हे अत्याचार स्टालिनच करू शकत होता एवढेच नव्हे, तर कम्युनिस्ट पक्षामुळेच हे हत्याकांड होऊ शकले. हे जेवढे खरे तेवढेच हेही खरे, की रशियातच याप्रकारचे हत्याकांड होऊ शकत होते आणि एवढी दडपशाहीही होऊ शकली. कारण तेथे ही परंपरा होती. तेथे व्यक्तिस्वातंत्र्य, व्यक्तीचे स्वतंत्र अस्तित्व, व्यक्तिगत मते यांची दृढ परंपरा नव्हती. हे वातावरण व ही परंपरा ही दोन्ही अत्याचारांना अनुकूल होती. त्यांचीच सुन्न करून टाकणारी ही हकीगत आहे.

२७-७-१९७४

एक क्रांतिकारी पुस्तक

रशियातून बाहेर पडलेले नामवंत लेखक सोल्झेनित्सिन यांच्याकडे रशियन साहित्यामध्ये काही काळ स्वातंत्र्याचा वसंतऋतू आणण्याचे श्रेय जाते. 'वन डे इन द लाइफ ऑफ इव्हान डेनिसॉव्हिच' या त्यांच्या कादंबरीने इतिहास घडविला. तिच्या प्रसिद्धीकरणामुळे रशियन साहित्यावरील बंधने उठणार अशी आशा निर्माण झाली, पण ती अल्पकाळ टिकली. पुन्हा हे साहित्य आणि साहित्यिक अनेकविध निर्बंधांच्या दाबाखाली दाबले गेले. सोल्झेनित्सिन यांच्या त्या कादंबरीच्या प्रकाशनाला आता दहा वर्षे झाली असून झोरेस मेदवेदेव्ह यांनी त्या कादंबरीचा व नंतरचा इतिहास 'टेन इयर्स आफ्टर इव्हान डेनिसॉव्हिच' या पुस्तकात कथन केला आहे. मेदवेदेव्ह हे शास्त्रज्ञ असून त्यांचे बंधू रशियात वास्तव्य करतात. ते इतिहास-तज्ज्ञ आहेत.

क्रुश्चॉव यांच्या हाती सत्ता आल्यावर त्यांनी रशियन नागरिक, विचारवंत, शास्त्रज्ञ, साहित्यिक यांच्यावरील निर्बंध सैल करण्यास प्रारंभ केला. अर्थात या वर्गाची भूमिगत चळवळ चालू होती व अद्यापही आहे. पण क्रुश्चॉवनी स्टालिनविरुद्ध उघड भूमिका घेतल्यावर तिची तार्किक परिणती विविध निर्बंध सैल करण्यात होणे अपरिहार्यच होते. याच काळात मेदवेदेव्ह यांनी लिसेंकोवर एक पुस्तक लिहिले व ते गाजले. लिसेंको हा शास्त्रज्ञ. त्याचे सिद्धान्त स्टालिनला मानवत नव्हते. कारण स्टालिनच्या मते ते मार्क्सवादाच्या विरुद्ध होते. पण पदार्थविज्ञान शास्त्र असो वा कोणतेही शास्त्र असो, प्रयोगांती जर जुने काही सिद्धान्त चुकीचे ठरले तर ते मान्य करणे हे बुद्धिवादाचे लक्षण आहे. स्टालिनला हे मंजूर नव्हते. त्यामुळे लिसेंकोचा छळ झाला. मेदवेदेव्ह यांनी यावर प्रकाश टाकणारे पुस्तक लिहिल्याने स्वातंत्र्यासाठी धडपडणाऱ्या साहित्यिकांत, विचारवंतांत त्यांचे नाव झाले होते व ऊठबस होती.

याच काळात सोल्झेनित्सिन यांनी 'वन डे इन द लाइफ ऑफ इव्हान डेनिसॉव्हिच' ही कादंबरी लिहिली. तिचे हस्तलिखित क्रुश्चॉव यांच्याकडे गेले. त्यावेळी ते सुटीवर होते. त्यांना ती कादंबरी फार आवडली व मग त्यांनी मिकोयान यांना वाचावयास दिली. त्यांनाही ती आकर्षक वाटली. पुढे ती 'नोव्ही मिर' या नियतकालिकात हप्त्याहप्त्याने प्रसिद्ध झाली आणि नंतर पुस्तकरूपाने. या कादंबरीच्या हजारो – लाखो प्रती खपल्या. मेदवेदेव्ह यांनी हे हस्तलिखितच वाचले होते आणि त्यामुळे त्यांची व सोल्झेनित्सिन यांची अप्रत्यक्ष ओळख झाली. पुढे तिचे मैत्रीत रूपांतर झाले.

सोल्झेनित्सिन यांच्या कादंबरीचा बोलबाला फार झाला. त्यावर अनेक अनुकूल अभिप्राय प्रसिद्ध झाले. क्रुश्चॉव यांना वाटू लागले की साहित्यावरील सर्व निर्बंध उठवावे. त्यांच्या काही सहकाऱ्यांना हे मान्य नव्हते. पण क्रुश्चॉव म्हणाले, की परदेशी वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींवरील निर्बंध उठविल्यावर ते फार थोडे वृत्तांत प्रसिद्ध करू लागले. तेच रशियन साहित्यिकांचे होईल. पण सोल्झेनित्सिन यांच्या कादंबरीच्या प्रकाशनानंतर 'नोव्ही मिर' व इतर नियतकालिके, तसेच रशियन सरकारी प्रकाशनसंस्था यांच्याकडे स्टालिनशाहीतील अत्याचारांचे वर्णन करणाऱ्या हस्तलिखितांचा पाऊस पडला. त्यामुळे साहित्यावरील निर्बंध उठवू नयेत असे म्हणणारांनी जोर केला. हे सर्व साहित्य बाहेर येईल तर अनवस्था प्रसंग ओढवेल असे त्यांचे म्हणणे. हा विरोध वाढत गेला. तोपर्यंत सोल्झेनित्सिन यांना लेनिन पारितोषिक मिळाले. पण अखेरीस क्रुश्चॉव यांनी माघार घेतली आणि रशियन साहित्य पुन्हा नियंत्रणाखाली दबले गेले. त्यानंतरही कॅन्सर वॉर्ड, फर्स्ट सर्कल वगैरे सोल्झेनित्सिन यांच्या कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या.

तथापि या कादंबऱ्या वादग्रस्त ठरल्या. 'वन डे –'प्रमाणे त्यावर केवळ स्तुतीची सुमनेच उधळली गेली नाहीत. कारण रशियन सरकारचे धोरण बदलले होते व म्हणून सोल्झेनित्सिन यांच्यावर व त्यांच्यासारखे साहित्य प्रसविणारांवर कडक टीका होऊ लागली. हा काळ सोल्झेनित्सिन यांना अतिशय मनःस्तापाचा आणि हालअपेष्टांचा गेला. त्याचे वर्णन मेदवेदेव्ह यांनी केले आहे. सोल्झेनित्सिन हे अतिशय साधे राहू लागले. त्यांच्यापाशी पुरेसे कपडे नसावयाचे की खाण्यासाठी अन्न नसावयाचे. त्यांना आर्थिक मदत द्यावी म्हणून त्यांच्या मित्रांनी पैसे जमा करून त्यांना दिले, पण त्यांनी ते परत केले. स्टालिनशाहीत करावास भोगलेला हा लेखक बाहेर राहूनही हालअपेष्टा सहन करू लागला. त्यांना अनेक प्रकारे त्रास होऊ लागला. त्यांच्याकडे कोण येतो जातो यावर नजर ठेवण्यात येऊ लागली. पण सोल्झेनित्सिन डगमगले नाहीत.

सरकारचे धोरणच फिरल्यामुळे सोल्झेनित्सिन यांचा जीवनेतिहासही विकृत करण्यात येऊ लागला. युद्धकाळात ते जर्मनीचे हस्तक होते असे आरोप होऊ लागले. पण मेदवेदेव्ह यांनी अधिकृत रशियन नियतकालिके व प्रकाशने यांचा आधार घेऊन त्यांनीच पूर्वी हे आरोप कसे खोटे होते हे पुराव्यानिशी दाखवून दिले.

सोल्झेनित्सिन यांचे साहित्य चेकोस्लोव्हाकिया, हंगेरी वगैरे देशांतही प्रसिद्ध होऊ लागले व तेथून त्यांना आमंत्रणे येऊ लागली. पण रशियन सरकारने एकतर ती त्यांच्यापर्यंत पोहोचू दिली नाहीत व पोचविली तर त्यांच्या परदेशी भेटीस प्रतिबंध केला. पाश्चात्य देशांत सोल्झेनित्सिन यांच्या पुस्तकांच्या आवृत्त्या निघाल्या. त्यांचे पैसे देण्याचा प्रश्नच नव्हता. पुढे एका स्विस प्रकाशकाने यासंबंधीची कायदेशीर बाजू सांभाळली. सोल्झेनित्सिन यांना नोबेल पारितोषिक मिळाले. पण त्यांना ते घेण्यासाठी जाता आले

नाही. या समारंभासाठी त्यांनी भाषण लिहून पाठविले. ते लेखकांच्या स्वातंत्र्याविषयीच्या उदात्त भावनेमुळे काव्यमय झाले आहे.

आता सोल्झेनित्सिन रशियाच्या बाहेर आहेत. त्यांच्या ज्या कादंबरीने क्रांती केली तिच्यानंतरच्या दहा वर्षांतील ही हकिगत लेखकाने भरपूर पुराव्यामुळे वजनदार केली आहे. तसे पाहिले तर गॉर्की व लेनिन यांच्यातही लेखकाच्या स्वातंत्र्यावद्दल बराच पत्रव्यवहार झाला होता, पण तो अद्याप प्रसिद्ध झाला नाही. लेनिन हा स्वातंत्र्याचा भोक्ता होता ही मुळातच चुकीची कल्पना आहे. कारण अखेरीस हा एका तत्त्वज्ञानाचा व राज्यकारभाराच्या पद्धतीचा प्रश्न आहे. या तत्त्वज्ञानात व राज्यपद्धतीत वैचारिक स्वातंत्र्य बसत नाही. ब्रुश्चॉव यांनी ते देण्याचा किंचित प्रयत्न केला, पण तो फसला. तो फसणे अटळ होते. लोकशाही व स्वातंत्र्य याखेरीज वैचारिक स्वातंत्र्य मिळणे अशक्य आहे. सोल्झेनित्सिन यांच्या 'वन डे –' या कादंबरीच्या प्रकाशनानंतरचा दहा वर्षांचा इतिहास हेच स्पष्ट करतो.

६-७-१९७४

मार्क्सवादी विचारांचा कोश

कार्ल मार्क्सच्या निधनास शंभर वर्षे झाली तरी त्याच्या विचारांची चिकित्सा अद्याप होत असते. मार्क्सवादाबद्दल कितीही भिन्न मते प्रगट होत असली तरी तत्त्वज्ञान, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास इत्यादी क्षेत्रांत मार्क्सवादाला डावलून चालणार नाही हे सर्व जण मान्य करतात. त्यापैकी काही मार्क्सवादी प्रमेये अमान्य करतील, काही त्यात सुधारणा करू पाहतील, तर काही ती त्याज्य ठरवतील. पण यापैकी कोणतीही भूमिका घेतली तरी वैचारिक जगत हे मार्क्सपूर्वी व मार्क्सनंतर असे विभागले आहे हे मान्य करावे लागेल.

मार्क्सने आपले विचार प्रगट केले असले तरी मार्क्सवाद ही एक साचेबंद विचारसरणी नाही. मार्क्सच्या अनेक संकल्पनांचे अर्थ निरनिराळ्या भाष्यकारांनी निरनिराळे लावले आहेत. अशा वेळी मार्क्सने अनेकविध विषयांसंबंधी स्वत: काय म्हटले आणि त्यानंतर इतर भाष्यकारांनी काय भर टाकली, मुरड घातली हे एकाच ग्रंथाच्या द्वारे कळण्याची चांगली सोय आता झाली आहे. 'ए डिक्शनरी ऑफ मार्क्सिस्ट थॉट' हा एकप्रकारे मार्क्सवादी विचारांचा शब्दकोश व दुसऱ्या अर्थाने ज्ञानकोश आहे असे या ग्रंथाच्या पुरस्कारार्थ म्हटले गेले आहे. त्याचे कोणतेही पान वाचले तरी याचे प्रत्यंतर येते. एलियनेशन, हिस्टॉरिकल मटेरिॲलिझम, कॅपिटल अशा अनेक संज्ञा मार्क्सच्या लिखाणात येतात. त्यांचा अर्थ देऊन त्यावर मोजक्या शब्दांत भाष्य करण्यात आले आहे. जगातल्या ऐंशी विद्वानांकडून हे लिखाण मागविण्यात येऊन ते संपादित केले गेले आहे. यातील कोणतीही नोंद वाचली तर तिचा सुबोधपणा व आटोपशीरपणा प्रथम नजरेत भरतो. काही तज्ज्ञांच्या अभिप्रायात तत्त्वज्ञानात्मक काही नोंदी अपुऱ्या व काहीशा सदोष आहेत. ते खरे असेलही. तो तज्ज्ञांचा प्रांत झाला. तरीही असा अभिप्राय देणारांनीही एकंदर ग्रंथाची उच्च वैचारिक बैठक व विवेचनाचा सुबोधपणा याची तरफदारी केली आहे. ज्यांनी नोंदी केल्या त्यांचे लिखाण व संपादनातील कौशल्य या दोघांचेही कौतुक वाटावे असा हा ग्रंथ असून आधुनिक वैचारिक जगताचा परिचय ज्यांना करून घ्यावासा वाटतो त्यांना हा ग्रंथ नेहमीच हाताशी ठेवावासा वाटेल. शब्दकोशाप्रमाणे तो संदर्भ म्हणून उपयोगी पडेल आणि कोणत्याही उत्कृष्ट ग्रंथाप्रमाणे तो वैचारिक आनंद देईल.

बहुतेक लेखकांनी मार्क्सवादाच्या विविध अंगांचे वस्तुनिष्ठ विवेचन केले आहे आणि निरनिराळ्या संकल्पनांसंबंधी अनेकविध मतांचा परामर्श घेतला आहे. त्यामुळे हा एक

चिकित्सक अभ्यास झालेला दिसेल. पोथीवादी मार्क्सवाद्यांची गोष्ट वगळली तर कोणालाही हा चिकित्सक अभ्यास स्वागतार्ह वाटेल.

मार्क्सने इतिहासाचे विश्लेषण करून समाजाची गती कोणत्या दिशेने होईल याविषयी आपले सिद्धान्त मांडले. त्यानंतर अनेक देशांत जी आर्थिक व सामाजिक परिस्थिती होती तिच्या संदर्भात काहींनी या सिद्धान्ताचा पडताळा येतो किंवा कसे याचा अभ्यास केला. लेनिनसारख्यांनी क्रांती घडवून आणली तेव्हा प्रत्यक्ष आर्थिक संघटना कशी उभारावयाची हा प्रश्न पडला. त्याने मग आपल्या अनुभवाप्रमाणे व सोयीचे वाटत होते त्याप्रमाणे काही सिद्धान्त मांडले. मार्क्सने कामगार क्रांतीची कल्पना मांडली व प्रगत भांडवलदारी देशात कामगार क्रांती करतील असे म्हटले. रशियात मात्र भांडवलशाही प्रगत नव्हती व क्रांती करण्याइतका कामगारवर्ग प्रबळ नव्हता. अशा वेळी क्रांतीसाठी आणि क्रांतीनंतर नवा समाज उभारण्यासाठी कम्युनिस्ट पक्षाने नेतृत्व करावयास हवे असे लेनिनने प्रतिपादन केले. हे मार्क्सवादी विचाराचे वेगळे अंग झाले.

रशियात क्रांती स्थिर झाली आणि मग इतर देशांत कम्युनिस्ट पक्ष स्थापन होऊन ते क्रांतीची स्वप्ने पाहू लागले. त्या त्या देशातील परिस्थिती वेगळी होती. त्या परिस्थितीप्रमाणे ज्यांनी मार्क्सवादाला वेगळे स्वरूप देण्याचा प्रयत्न केला त्यात इटलीतील ग्रामची याचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल. किंबहुना इटालियन कम्युनिस्ट पक्षात रशियन नेत्यांपेक्षा स्वतंत्र विचारांचा प्रसार होण्यास त्या पक्षावरील ग्रामचीचे वैचारिक प्रभुत्व कारणीभूत आहे. ग्रामचीच्या विचारांचे सार काय हे पाहावयाचे असेल तर ते दोनचार पानांत या ग्रंथात आढळेल.

ग्रामचीचा एक मार्ग, माओचा दुसरा. त्याने शेतकीप्रधान मागासलेल्या देशात कम्युनिस्ट पक्ष कशी सत्ता घेऊ शकतो हे दाखविले. त्याच्या विचारांचा परामर्ष घेत असतानाच सांस्कृतिक क्रांती इत्यादी मोहिमांचीही चिकित्सा येथे केलेली आहे. जर्मनीत एक नवा पंथ दुसऱ्या-तिसऱ्या दशकात निघाला. तो फ्रँकफुर्ट स्कूल म्हणून ओळखला जातो. या ग्रंथाचे वैशिष्ट्य पाहण्यासाठी केवळ एकच नोंद सांगण्याची कोणी सूचना केली तर या फ्रँकफुर्ट स्कूलबद्दलच्या नोंदीचा निर्देश करणे योग्य होईल. हा पंथ भांडवलशाही व रशियन धर्तीचा साम्यवाद यांच्याविरुद्ध आहे. सामाजिक विकासाचे वेगवेगळे मार्ग असू शकतात हे या पंथाने दाखवून दिले. स्टालिनच्या राजवटीत मार्क्सवाद हे दडपशाहीचे तत्त्वज्ञान बनले व त्याद्वारा त्याच्याकडे सत्याची गुरुकिल्ली नाही हेही दिसून आले असे हा पंथ मानतो. या पंथाने लेनिनच्या कम्युनिस्ट पक्षावर सर्व भिस्त ठेवण्याच्या कल्पनेसही विरोध केला.

रोझा लक्झेंबर्ग हिनेही कम्युनिस्ट पक्षावरच सर्व भिस्त ठेवावी, कामगार क्रांतीचे नेतृत्व केवळ त्याच्याचकडे असावे, याविरुद्ध मतप्रदर्शन केले होते. कामगार स्वत:च्या अनुभवातून शिकतील. त्यांच्यावर सतत कम्युनिस्ट पक्षाचे प्रभुत्व हवे असे नव्हे अशी तिची भूमिका होती. तथापि ती संघटनेचे महत्त्व मानते. काही लेखकांनी रोझा लक्झेंबर्ग ही व्यक्तिस्वातंत्र्यवादी होती व याबाबतीत तिचे व लेनिनचे मतभेद होते असे काही वाक्यांचा संदर्भ देऊन म्हटले आहे. या ग्रंथातील नोंदीत या कल्पनेचा फोलपणा दाखवून देण्यात आला आहे.

पूर्व युरोपात मार्क्सवादी विचारांनी कोणती दिशा घेतली याचे विवेचनही असेच सुबोध आहे. पूर्व युरोपात एकाच दिशेने मार्क्सवादी विचारांना मुरड घातली गेली असे नव्हे. प. जर्मनी व पोलंड यात फरक आहे. हंगेरी व चेकोस्लोव्हाकिया यात तफावत आहे. याची सामाजिक कारणमीमांसा करण्यात आली आहे. पोलंडमध्ये कोलकोव्हस्कींनी वेगळा विचार मांडला. शासनसंस्था व नागरी समाज यांच्यातील संघर्ष वा द्वंद्व यांची त्यांनी चिकित्सा केली आणि सर्वंकष अशी सत्ता स्थापन झाल्याखेरीज समाजाचा विकास होत नाही याचा प्रतिवाद केला. रशियन शासनव्यवस्था व तिचे नेते यांच्या हे विरोधी होते. कोलकोव्हस्की यांच्यासारख्यांनी ही जी विचारसंपदा निर्माण केली ती पुढे निर्माण झालेल्या सॉलिडॅरिटी या संघटनेच्या व तिच्या आंदोलनाच्या मुळाशी आहे.

प्रत्येक नोंदीबरोबर पूरक वाचनासाठी निवडक ग्रंथांची यादी दिलेली आहे. याशिवाय संदर्भग्रंथांची एक प्रदीर्घ यादी आहे. खरे ज्ञान असले व बुद्धीला शिस्त असली की या प्रकारचा ग्रंथ तयार होतो. यात कोठे जडजंबालपणा व फापटपसारा नाही. सर्व ग्रंथ एकदम वाचण्याची गरज नाही कारण तो संदर्भग्रंथाप्रमाणे हवा तेव्हा व तेवढा वाचता येतो. शब्दकोशाप्रमाणेच तो आवश्यक व उपयुक्त आहे.

२९-१२-१९८४

REFBK-0026622



ग्रंथसूची

१) **द केंब्रिज इकॉनॉमिक हिस्टरी, खंड-१**
संपादक : तपन रायचौधुरी व इर्फान हबिब
किंमत ४० रुपये

खंड-२
संपादक : धर्मा कुमार
प्रकाशक : ओरिएंट लॉगमन्स, मुंबई.
किंमत ६० रुपये

२) **गोखले : द इंडियन मॉडरेटस् ॲण्ड द ब्रिटिश राज**
लेखक : बी. आर. नंदा
प्रकाशक : ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस
पृष्ठे : ५२०, किंमत ८० रुपये

३) **टोवर्डस् नॅशनॅलिझम**
लेखक : जे. मॅसालोस
प्रकाशक : पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
पृष्ठे : ३३२, किंमत ६० रुपये

४) **द न्यू केंब्रिज हिस्टरी ऑफ इंडिया, भाग-३, खंड-१**
सोशिओ-रिलिजस रिफॉर्म मुव्हमेंट इन इंडिया
लेखक : केनेथ डब्ल्यू. जोन्स
प्रकाशक : केंब्रिज यु. प्रे. आणि ओरिएंट लॉगमन्सच्या सहकार्याने
पृष्ठे : २४३, किंमत २५० रुपये

५) **द ऑप्टिमिस्ट**
लेखक : इयान ब्रॅडले
प्रकाशक : फेबर ॲण्ड फेबर, लंडन
वितरक : ऑ.यु.प्रे.
पृष्ठे : ३००, किंमत १२.५० पौंड

६) **राममोहन रॉय**
संपादक : व्ही. सी. जोशी
प्रकाशक : विकास पब्लिशिंग हाऊस, नवी दिल्ली
पृष्ठे : २३४, किंमत ४० रुपये

७) **कास्ट कॉन्फ्लिक्ट ॲण्ड आयडियॉलॉजी**
लेखक : रोझालिंड ओहानलॉन
प्रकाशक : केंब्रिज यु.प्रे. ओरिएंट लॉगमनच्या सहाय्याने
पृष्ठे : ३२६, किंमत १५० रुपये

८) **बियाँड कम्युनिझम**
लेखक : एम. एन. रॉय
पृष्ठे ११२, किंमत ३० रुपये

न्यू ह्युमॅनिझम
लेखक : एम. एन. रॉय
प्रकाशक : अजंटा पब्लिकेशन्स, दिल्ली-११० ००७
पृष्ठे : २२२, किंमत ३० रुपये

पॉलिटिक्स, पॉवर ॲण्ड पार्टीज
लेखक : एम. एन. रॉय
प्रकाशक : अजंटा पब्लिकेशन्स, दिल्ली-११० ००७
पृष्ठे : २१६, किंमत ६० रुपये

९) एम. एन. रॉय : पोलिटिकल बायॉग्राफी
लेखक : व. भ. कर्णिक
प्रकाशक : नवजागृती समाज, डी. ४६, लोकमान्य नगर, माहिम, मुंबई-१६.
पृष्ठे : ६५६, किंमत १२४ रुपये

१०) सबाल्टर्न स्टडीज, खंड-५
लेखक : रणजित गृह
प्रकाशक : ऑ.यु.प्रे. मुंबई
पृष्ठे : ३८३, किंमत १६० रुपये

११) दि पोलिटिकल इकॉनॉमी ऑफ द राज
लेखक : बी. आर. टॉमलिन्सन
प्रकाशक : मॅकमिलन ॲण्ड कं.
पृष्ठे : १९९, किंमत १५ पौंड

१२) दि इंडियन नॅशनल काँग्रेस ॲण्ड राज १९२९-४२
लेखक : बी. आर. टॉमलिन्सन
प्रकाशक : मॅकमिलन ॲण्ड कं.
पृष्ठे : २०८, किंमत ५९ रुपये

१३) सरदार पटेल्स कॉरस्पॉन्डन्स १९४५-५०, खंड-६
संपादक : दुर्गादास
प्रकाशक : नवजीवन पब्लिशिंग हाऊस, अहमदाबाद
पृष्ठे : ५३४, किंमत ३० रुपये

१४) सरदार पटेल्स कॉरस्पॉन्डन्स : खंड-९ (पृष्ठे-५४१), खंड-१० (पृष्ठे-५१२)
संपादक : दुर्गादास
प्रकाशक : नवजीवन पब्लिशिंग हाऊस, अहमदाबाद
किंमत प्रत्येकी ४० रुपये

१५) डॉ. राजेंद्र प्रसाद : कॉरस्पॉन्डन्स ॲण्ड सिलेक्टेड डॉक्युमेंटस्, खंड ८ व ९
संपादक : वाल्मिकी चौधरी
प्रकाशक : अलाइड पब्लिशर्स लि., मुंबई
किंमत प्रत्येकी १५० रुपये

१६) सरदार पटेल कॉरस्पॉन्डन्स : खंड ८
संपादक : दुर्गादास
प्रकाशक : नवजीवन पब्लिशिंग हाऊस, अहमदाबाद
पृष्ठे ६३२, किंमत ४० रुपये

१७) जवाहरलाल नेहरू : खंड ३
लेखक : एस. गोपाल
प्रकाशक : ऑ.यु.प्रे.
पृष्ठे : ३३६, किंमत १२० रुपये

१८) इंटरेस्ट ग्रुप्स ॲण्ड डेव्हलपमेंट : बिझनेस ॲण्ड पॉलिटिक्स इन पाकिस्तान
लेखक : स्टॅन्ले कोचनेक
प्रकाशक : ऑ. यु. प्रे.
किंमत ११० रुपये

१९) अमृतसर
लेखक : मार्क टली आणि सतीश जेकब
प्रकाशक : रूपा ॲण्ड कं., दिल्ली
किंमत ३० रुपये

२०) आऊटसाइड द आर्काइव्हज
लेखक : वाय. डी. गुणदेविया
प्रकाशक : संगम बुक्स
वितरक : ओरिएंट लॉगमन्स
पृष्ठे : ४३५, किंमत १४० रुपये

२१) इंग्लिश कल्चर ॲण्ड डिक्लाइन ऑफ द इंडस्ट्रियल स्पिरिट
लेखक : मार्टिन वेनर
प्रकाशक : केंब्रिज यु. प्रे.
पृष्ठे : २१७, किंमत ९.९५ पौंड

२२) दि इंडस्ट्रियल इंपिरियल रूल
लेखक : पीटर लेन
प्रकाशक : वायडफिल्ड ॲण्ड निकल्सन, लंडन
पृष्ठे : २९२, किंमत ६.९५ पौंड

२३) पेझंटस् ॲण्ड इंपिरियल रूल
लेखक : नील चार्लस्वर्थ
पृष्ठे : ३१९, किंमत ३० पौंड

कॅनॉल इरिगेशन इन ब्रिटिश इंडिया
लेखक : इयान स्टोन
प्रकाशक : केंब्रिज यु. प्रे.
पृष्ठे : ३७४, किंमत ३० पौंड

२४) ए हिस्टरी ऑफ दि इंग्लिश पीपल
लेखक : पॉल जॉन्सन
प्रकाशक : वायडनफिल्ड
वितरक : यु.बी.एस., मुंबई
पृष्ठे : ४६६, किंमत ५.९५ पौंड

२५) १९३९ द लास्ट सीझन
लेखक : ॲन द कर्सी
प्रकाशक : थेम्स ॲण्ड हडसन, लंडन
वितरक : यु.बी.एस., मुंबई
पृष्ठे : ३४८, किंमत १२.९५ पौंड

२६) द इमर्जन्स ऑफ द लेबर पार्टी : १८८०-१९२४
लेखक : रॉजर मूर
प्रकाशक : होल्डर

२७) द केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस : १५८४-१९८४
लेखक : एम. एच. ब्लॅक
प्रकाशक : केंब्रिज यु. प्रे.
पृष्ठे : ३४३, किंमत १२.५० पौंड

२८) चार्लस् डिकन्स ॲण्ड हिज पब्लिशर्स
लेखक : रॉबर्ट पॅटन
प्रकाशक : ऑक्सफर्ड क्लेरेन्डन प्रेस
पृष्ठे : ५०२, किंमत १५ पौंड

२९) द लास्ट एडवर्डियन ॲट नंबर टेन
लेखक : जॉर्ज हचिन्सन
प्रकाशक : क्वॉर्टेट, लंडन
पृष्ठे : १५१, किंमत ६.५० पौंड

३०) लाइव्ह फ्रॉम नंबर टेन
लेखक : मायकल क्रॉकिल
प्रकाशक : फेबर ॲण्ड फेबर, लंडन
वितरक : यु.बी.एस.
पृष्ठे : ३७७, किंमत ६.९५ पौंड

३१) गुड टाइम्स, बॅड टाइम्स
लेखक : हॅरॉल्ड एव्हन्स
प्रकाशक : वायडफिल्ड ॲण्ड निकल्सन, लंडन
वितरक : यु.बी.एस.
पृष्ठे : ४३०, किंमत ११.९५ पौंड

३२) अ लिटररी मॅन
लेखक : व्ही.एस. प्रिचेट
प्रकाशक : शातो ॲण्ड विन्डस्, लंडन
पृष्ठे : ३०२, किंमत १२.९५ पौंड

३३) अ व्ह्यू फ्रॉम द स्टँडस्
लेखक : जॉन केनेथ गालब्रेथ
प्रकाशक : हॅमिश हॅमिल्टन, लंडन
वितरक : यु.बी.एस.
किंमत १४.९५ पौंड

३४) ए स्टडी ऑफ द मॉडर्न वर्ल्ड
लेखक : पॉल जॉन्सन
प्रकाशक : विडनफिल्ड, लंडन
वितरक : यु.बी.एस.
पृष्ठे : ८१७, किंमत ५.१५ पौंड

३५) ए शॉर्ट इकॉनॉमिक हिस्टरी ऑफ मॉडर्न जपान
लेखक : जी. सी. ॲलन
प्रकाशक : जॉर्ज ॲलन ॲण्ड उन्विन, तिसरी आवृत्ती
वितरक : ब्लॅकी ॲण्ड सन, मुंबई
पृष्ठे : २६२, किंमत ३ पौंड

३६) मल्टिनॅशनल कंपनीज ॲण्ड द थर्ड वर्ल्ड
लेखक : लुई टर्नर, ॲलन लेन
वितरक : ओरिएन्ट लॉगमन्स, मुंबई
पृष्ठे : २९३, किंमत ३.५० पौंड

३७) द एन्डलेस क्रायसिस
प्रकाशक : सायमन ॲण्ड शूस्टर
किंमत २.७५ डॉलर

३८) कलकत्ता – द लिव्हिंग सिटी, खंड १ व २
संपादक : सुकान्त चौधरी
प्रकाशक : ऑ. यु. प्रे., मुंबई
पृष्ठे ७६ व ३६५,
किंमत प्रत्येकी ६०० रुपये

३९) पब्लिक ॲण्ड प्रायव्हेट
लेखक : हम्प्रे ट्रेव्हेलियन
प्रकाशक : हॅमिश हॅमिल्टन, लंडन
पृष्ठे : १९१, किंमत ८.९५ पौंड

४०) चायना आफ्टर द कल्चरल रेव्होल्युशन
संपादक : डिक विल्सन
प्रकाशक : व्हिन्टेज बुक्स, न्यूयॉर्क
पृष्ठे : २४७, किंमत १.९५ डॉलर

चायना इन द इयर २००१
लेखक : हान सुयिन
प्रकाशक : बेसिक बुक पब्लिशर्स, न्यूयॉर्क
पृष्ठे : २६८, किंमत ५.९५ डॉलर

चायना टुडे
लेखक : क्लॉस मेहनर्ट
प्रकाशक : थेम्स ॲण्ड हडसन, लंडन
पृष्ठे : ३२२, किंमत २.५० पौंड

चायना कम्स ऑफ एज
लेखक : जीऑ पिअरे ब्रुले
प्रकाशक : पेलिकन
पृष्ठे : १९२, किंमत ३५ पेन्स

जर्नी थ्रु चायना
लेखक : ज्युल्स रॉय
प्रकाशक : हार्पर ॲण्ड रो, न्यूयॉर्क
पृष्ठे : २९९, किंमत ७.९५ डॉलर

४१) कम्युनिकेशन्स ॲण्ड नॅशनल इंटिग्रेशन इन कम्युनिस्ट चायना
लेखक : ॲलन लिऊ
प्रकाशक : ऑ. यु. प्रे.
पृष्ठे : २२५, किंमत ४५ रुपये

४२) चायना – मॅनेजमेंट ऑफ ए रेव्होल्युशनरी सोसायटी
संपादक : जॉन लिंडबेक
प्रकाशक : जॉर्ज ॲलन ॲण्ड डन्विन
वितरक : ब्लॅकी ॲण्ड सन, मुंबई
पृष्ठे : ३९१, किंमत ७.७५ पौंड

४३) द ओरिजिन्स ऑफ द कल्चरल रेव्होल्युशन : खंड १
लेखक : रोररिक मॅकफारकर
प्रकाशक : ऑ. यु. प्रे.
पृष्ठे : ४३९, किंमत ५.५० पौंड

४४) चायनाज स्पेशल एरिया
लेखक : पी. पी. ल्व्हादिमिरॉव्ह
प्रकाशक : अलाइड पब्लिशर्स
पृष्ठे : ४९९, किंमत ६० रुपये

४५) द कम्युनिस्ट पार्टीज ऑफ वेस्टर्न युरोप
लेखक : नील मॅकलनेस
प्रकाशक : द रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ इंटरनॅशनल अफेअर्स, लंडन यांच्यासाठी ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीचे प्रकाशन
पृष्ठे : २०९, किंमत ५ पौंड

४६) एन्ड्यूरन्स ॲण्ड एन्डेव्हर
लेखक : जे. एन. वेस्टवूड
प्रकाशक : ऑ. यु. प्रे.
पृष्ठे : ४७२, किंमत २.७५ पौंड

४७) सोव्हिएट पॉलिसी टोवर्ड इंडिया
लेखक : रॉबर्ट डोनाल्डसन
प्रकाशक : हॉर्वर्ड युनिव्हर्सिटी प्रेस
वितरक : स्ट्रॅन्ड बुक स्टॉल, फोर्ट, मुंबई १
पृष्ठे : ३३८, किंमत १५ डॉलर

४८) द रशियन्स
लेखक : हेन्ड्रिक स्मिथ
प्रकाशक : टाइम बुक, लंडन
पृष्ठे : ५२७, किंमत ६.५० पौंड

४९) **लेट हिस्टरी जज्ज**
लेखक : रॉय ए मेदवेदेव्ह
प्रकाशक : ऑल्फ्रेड नॉफ, न्यूयॉर्क
पृष्ठे : ५६६,
किंमत १२.५० डॉलर

५०) **लेट हिस्टरी जज्ज (११ वी सुधारित व विस्तारित आवृत्ती)**
लेखक : रॉय ए मेदवेदेव्ह
प्रकाशक : ऑल्फ्रेड नॉफ, न्यूयॉर्क
पृष्ठे : ९०३, किंमत २५ पौंड

५१) **द ग्रेट टेरर**
लेखक : रॉबर्ट कॉन्क्वेस्ट
प्रकाशक : मॅकमिलन
पृष्ठे : ८४४, किंमत ६ पौंड

५२) **क्रुश्चॉव : द इयर्स इन पॉवर**
लेखक : रॉय व झोरेस मेदवेदेव्ह
प्रकाशक : ऑ. यु. प्रे.
पृष्ठे : १९८, किंमत ३.९५ पौंड

५३) **क्रुश्चॉव रिमेंबर्स**
अनुवादक : स्ट्रोब टाल्बट
प्रकाशक : विकास पब्लिशिंग हाऊस, दिल्ली
पृष्ठे : ६०२, किंमत ८५ रुपये

५४) **द गुलाग आर्चिपिलागो : खंड १**
लेखक : ॲलेक्झांडर सोल्झेनित्सिन
प्रकाशक : कॉलिन्स, लंडन
पृष्ठे : ६६०, किंमत ३ पौंड

५५) **टेन इयर्स आफ्टर इव्हान डेनिसॉव्हिच**
लेखक : झोरेस मेदवेदेव्ह
प्रकाशक : मॅकमिलन
पृष्ठे : २०२, किंमत ३.९५ पौंड

५६) **ए डिक्शनरी ऑफ मार्क्सिस्ट थॉट**
संपादक : टॉम बॉटमोर, लॉरेन्स हॅरिस, किरनान, मिलिबन्ड
प्रकाशक : ऑ. यु. प्रे.
पृष्ठे : ५८७, किंमत २०० रुपये



'इंग्रजी ग्रंथांचा परिचय' हे 'महाराष्ट्र टाइम्स'मधील एक लोकप्रिय सदर आहे. अनेक विषयावर इंग्रजीत जी पुस्तके प्रसिद्ध होतात त्यांची मराठी वाचकांना ओळख करून देण्यासाठी व त्यायोगे त्यांना वेगळ्या जगाची माहिती करून देण्यासाठी हे सदर सुरू केले.

या सदरात श्री. गोविंद तळवलकर यांनी अनेक पुस्तकांचा परिचय करून दिला. यात राजकारण, अर्थकारण, आठवणी, सामाजिक प्रश्न, चरित्र व आत्मचरित्र असे विविध प्रकार आहेत. ही परिक्षणे नव्हेत. पण ओळख करून देतांना लेखकाचा दृष्टिकोण प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे प्रगट होतो.

विषयांची विविधता आणि ज्यावर लिहावयाचे त्या पुस्तकातील महत्त्वाची व निवडक वैशिष्टचे मोजक्या शब्दात येथे सांगण्यात आली आहेत. भारत, ब्रिटन, रशिया, अमेरिका व चीन अशा देशातील अनेक घडामोंडीची व व्यक्तींची ही ओळख रोचक व उद्‌बोधक ठरेल.